# १

# प्रबोधन चळवळ

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ प्रबोधनाचा अर्थ
१.३ प्रबोधन चळवळीची कारणे
१.४ प्रबोधन चळवळीची वैशिष्ट्ये
१.५ प्रबोधनकालीन साहित्याची प्रगती
१.६ प्रबोधनकालीन कला व स्थापत्य कलेची प्रगती
१.७ प्रबोधनकालीन विज्ञानाची प्रगती
१.८ प्रबोधन चळवळीचे परिणाम
१.९ सारांश
१.१० प्रश्न

## १.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

१. प्रबोधन संकल्पनेचा अर्थ समजावून घेणे.
२. युरोपमधील प्रबोधन चळवळीची पार्श्वभूमी आणि त्याची कारणे यांची माहिती समजून घेणे.
३. प्रबोधन चळवळ युरोप खंडातील कोणकोणत्या देशात सुरु झाली त्याचे स्वरूप काय होते? त्याचा अभ्यास करणे.
४. कला, विज्ञान आणि वाङ्मय क्षेत्रातील प्रबोधनाचा अभ्यास करणे.
५. युरोपमध्ये प्रबोधन चळवळीच्या परिणामाचा आढावा घेणे.

## १.१ प्रस्तावना

इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन असे तीन विभागात विभाजन केलेले आहे. मध्ययुगीन काळाचीसुरुवात इ.स. ४७६ पासून होते. मध्ययुगीन काळात धर्मयुद्धामुळे युरोपीयन जनतेला नव्या जगाचा, त्याच्या आचारविचारांचा व संस्कृतीचा

परिचय झाला. या काळात राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता प्रबळ होती. इ.स. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टोटिनोपल शहर जिंकून घेतले. या घटनेने मध्ययुगाचा शेवट होऊन, अर्वाचीन युगाला प्रारंभ झाला. ख्रिस्ती धर्म आणि पाश्चिमात्य संस्कृती म्हणजेच सर्व काही आहे असे नव्हे तर, इतर संस्कृतीमध्ये काही शिकण्यासारखे आहे, असे जनतेला वाटू लागले. त्यामुळे अंधश्रद्धा कमी होऊन अर्वाचीन युगातील वैचारिक क्रांतीची पार्श्वभूमी तयार करण्याचे कार्य धर्मयुद्धांनी केले. प्रबोधन चळवळ ही क्रांतिकारी चळवळ होती. कारण या चळवळीने समाजात महत्त्वाचे परिवर्तन घडविले. युरोपमध्ये इटाली, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड या देशामध्ये प्रबोधन चळवळीला सुरुवात झाली. ही प्रबोधन चळवळ प्रामुख्याने साहित्य, चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला, संगीत, रंगभूमी व नाट्यकला या विविध कलाक्षेत्रात प्रबोधन चळवळ सुरु झाली. त्याचप्रमाणे विज्ञानक्षेत्रामध्ये गणित, खगोलशास्त्र, भूगोलशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, वनस्पतीशास्त्र इ. शास्त्रांमध्ये प्रबोधन चळवळ सुरु झाली. प्राचीन काळातील ज्ञान, कला, विज्ञान याचा अनेक अभ्यासक, विचारवंत, कलाकार, संशोधन यांनी अभ्यास करुन वर्तमानकाळात त्याची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या काळात अनेक क्षेत्रात नवे साहित्य, कला, शोध यांचा उदय झाला.

## १.२ प्रबोधनाचा अर्थ

रेनेसान्स (Renaissance) या मूळ फ्रेंच भाषेतील शब्दाचा इंग्रजी भाषेत वापर केलेला आहे. रेनेसान्स याचा शब्दशः अर्थ पुनर्जन्म असा आहे. प्रबोधन, पुनरुज्जीवन, पुनर्जागृती हे शब्द मराठी भाषेत वापरले जातात. ग्रीक व रोमन संस्कृतीबद्दल नव्याने उत्पन्न झालेली आवड या मर्यादेत अर्थाने हा शब्द प्रथम वापरण्यात आला. १५ व्या शतकात म्हणजे अर्वाचीन काळाच्या प्रारंभापासून ग्रीक व लॅटिन साहित्य, विज्ञान, कला, धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण या सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणार्या काळाला प्रबोधन काळ म्हणतात. या काळात मानवाने वरील सर्व क्षेत्रात जो विकास घडवून आणला. त्यामुळे या युगाला विकासयुग असे म्हणतात. मानवेंद्रनाथ रॉय यांनी या बदलांचे वर्णन मानवाचे बंड या शब्दात केले आहे.

## १.३ प्रबोधन चळवळीची कारणे

प्राचीन काळातील मानवाच्या वैभवशाली प्रगतीचा शेवट होऊन, मध्ययुगीन काळात मानव अप्रगत व बंदिस्त जीवन जगू लागला. धर्म आणि पोप यांचे वर्चस्व निर्माण झाल्याने लोकांच्या जीवनाला दुय्यम स्थान प्राप्त झाले. विचारशक्ती, विचारस्वातंत्र्य कमकुवत झाले. १५ व्या शतकात युरोपमध्ये प्रबोधन चळवळ सुरु झाली. त्याला अनेक कारणे जबाबदार आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

### १.३.१ अप्रगत मध्ययुगीन कालखंड :

मागासलेल्या व मरगळलेल्या मध्ययुगीन काळाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक युगाची भव्य व वैभवशाली इमारत उभी राहिली. प्रबोधन चळवळीतून आधुनिक युगाचा जन्म झाला. मध्ययुगीन काळाचा विचार करता, प्राचीन प्रगत संस्कृतीचा र्हास झाला. धर्म व धर्मगुरुचे समाजावर प्राबल्य निर्माण झाले. परिणाम सर्व युरोपीयन समाज मरगळलेला, निद्रिस्त, कर्मठ, अंधश्रद्धा, संवेदनाशून्य, अकार्यक्षम होता. त्याला जागृत करुन मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीची, परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली. ही प्रक्रिया म्हणजे प्रबोधन चळवळ होय.

### १.३.२ धर्मप्रसार व धर्मयुद्धे


इ.स. पहिल्या शतकात ख्रिश्चन धर्माचा आणि सातव्या शतकात इस्लाम धर्माचा उदय झाला. ख्रिश्चन धर्माचा युरोपमध्ये तर इस्लाम धर्माचा आशिया खंडात धर्मप्रसार झाला. तुर्की आणि ख्रिस्ती अनुयायी यांच्यात युरोपमध्ये प्रदीर्घ काळ म्हणजे इ.स. १०९६ ते इ.स. १२७० या काळात आठ युद्धे झाली. त्यांना धर्मयुद्धे (क्रुसेडल) असे म्हणतात. या युद्धाच्या पराभवामुळे युरोपमधील पोपच्या व सरंजामदारांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. ख्रिश्चन धर्मसंस्थापक येशूची जन्मभूमी पॅलेस्टाईन ही तुर्की नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी धर्मयुद्धे झाली.

धर्मयुद्धामुळे युरोपचा बाहेरच्या जगाशी संबंध आला. त्यामुळे बाहेरच्या जगातील संस्कृती, ज्ञान याची माहिती झाली. त्यांची अभिजात वाङ्मयाची आवड वाढली. ख्रिस्ती धर्माचे महत्त्व कमी झाले. त्यामुळे प्रबोधन चळवळीला प्रारंभ झाला.

### १.३.३ सरंजामशाहीमधील बदल

इ.स. पाचव्या शतकात युरोपमधील साम्रज्य नष्ट झाले. मध्ययुगात सरंजामदार उदयाला आले. तर सरंजामशाहीमध्ये हळूहळू बदल घडून आले. सरंजामदार भूदासांकडून मोबदल्याच्या स्वरूपात पैसा घेत असे. ते स्वत: शहरात राहत असे. शहरांची संख्या वाढल्याने भूदास वर्गसुद्धा शहराकडे जाऊ लागला. या बदल्या परिस्थितीमुळे प्रबोधनाला चालना मिळाली.

munotes.in



**कॉन्स्टोटिनोपल शहर**

### १.३.४ कॉन्स्टोटिनोपलचा पाडाव (इ.स. १४५३) :

रोमन साम्रज्याची राजधानी म्हणजे कॉन्स्टोटिनोपल होय. आशिया व युरोप खंडाचा व्यापार कॉन्स्टोटिनोपल शहराच्या भूमार्गे चालू होता. इ.स. १४५३ मध्ये अटोमन तुर्की सत्तेने कॉन्स्टोटिनोपल शहर जिंकून घेतले. त्यामुळे व्यापार बंद झाला. येथील अनेक कलावंत, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, लेखक यांनी युरोपमध्ये आश्रय घेतला. युरोपमधील विशेषत: इटालीतील श्रीमंत लोक, राजे, राज्यकर्ते यांनी आश्रय देऊन विद्येच्या उपासकांचे स्वागत केले. परिणामी इटाली व युरोपात प्राचीन ग्रंथाचे संशोधन व अभ्यास सुरु झाला. त्यामुळे इटाली प्रबोधन चळवळीचे केंद्र बनले.

### १.३.५ जलमार्गाचा शोध :

कॉन्स्टोटिनोपल तुर्कांनी जिंकल्यामुळे आशिया खंडाशी जोडणारा खुष्कीचा मार्ग बंद झाला. त्यामुळे युरोपियन लोकांनी नवीन जलमार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरु केले. यातून अनेक धाडसी खलाशी पुढे आले. पोर्तुगीज, स्पेन, इंग्लंड, हॉलंड इ. राष्ट्रांनी नवीन जलमार्ग शोधून काढले. नवीन भौगोलिक प्रदेशाच्या शोधामुळे व्यापार, भौगोलिक ज्ञानात वाढ झाली. पोर्तुगीज बार्थोलोडासने इ.स. १४४६ मध्ये आफ्रीकेच्या दक्षिण टोकावरील केप ऑफ गुड होप, स्वीत्झलँडच्या ख्रिस्तोफर कोलंबस व अमेरिगो व्हेस्पुशीने अमेरिकन खंडाचा, वास्को द गामाने इ.स. १४९८ मध्ये हिंदुस्थानचा शोध लावला. यामुळे युरोपमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यातूनच प्रबोधन चळवळ सुरु झाली.

**१.३.६ छापखान्याचा शोध :**

प्राचीन काळात ची लोकांनी मुद्रण कलेचा शोध लावला होता. परंतु यांत्रिक पद्धतीने मुद्रणकलेचा प्रारंभ युरोपमध्ये झाला. १५ व्या शतकात जर्मनीचा जॉन गटेनबर्ग यांनी पहिला आधुनिक छापखाना निर्माण केला. इंग्लंडच्या बॅकस्टनने पहिले पुस्तक छापले. प्रबोधन काळातील अनेक लेखक, विचारवंत, धर्मसुधारक यांनी हजारो ग्रंथ छापून. अनेक विचार, साहित्य, धर्मतत्वे लोकांपर्यंत पोहोचल्याने वैचारिक क्रांतीला मोठी मदत झाली. प्रबोधन चळवळीला चालना मिळाली. प्रा. एडिथच्या मते बौद्धिक जगताला सुपीक बनवणारे जलसिंचनाचे साधन म्हणजे छापखाना होय.

**१.३.७ शैक्षणिक प्रसार :**

१३ व्या शतकापासून युरोपमध्ये शिक्षणाचा प्रसार सुरु झाला. स्थानिक भाषा व लॅटिन भाषा याचे वाचन व लेखन सुरु झाले. शिक्षण प्रसाराचे कार्य प्रामुख्याने धर्मगुरु, अधिकारी, डॉक्टर, वकील इत्यादींनी केले. नवीन व तरुण वर्ग वाङ्मयाच्या अभ्यासाकडे झुकला व त्यातूनच प्रबोधन चळवळ सुरु झाली.

**१.३.८ आर्थिक गरज व व्यापारवाढ :**

मध्य युगातील धर्मयुद्धे, नव्या जलमार्गाचा शोध, धाडसी खलाशांना मदत करणे यासाठी पैशाची गरज होती. या गरजेतून नवीन भौगोलिक प्रदेशांचा शोध लावला. पूर्वेकडील देशामध्ये सोने, जवाहीरे, हस्तीदंत, मसाल्याचे पदार्थ भरपूर असल्याची माहिती होती. ते प्राप्त करण्यासाठी नवीन जलमार्ग शोधले. पंधराव्या शतकापर्यंत युरोपात व्हेनिस, जिनिव्हा, प्लोरेन्स, मिलन, नेपल्स, पॅरिस, पीआ, फेरॅरा, रोम इ. शहरांचा उदय झाला. पोर्तुगीज, हॉलंड, स्पेन, इटली, इंग्लंड देशांनी व्यापार वाढ केली. त्यातूनच प्रबोधन चळवळीला चालना मिळाली.

**१.३.९ ग्रीक रोमन संस्कृतीची प्रेरणा :**

प्राचीन काळात अनेक वैभवशाली संस्कृतीचा उदय झालेला होता. त्याचे तत्त्वज्ञान, वाङ्मय, शास्त्र, कला यांचीही प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली होती; परंतु मध्ययुगीन काळात सर्वत्र अप्रगत परिस्थिती होती. काही विचारवंतांनी ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. त्यांचे लक्ष ग्रीक-रोमन संस्कृतीकडे गेले. त्यांचे श्रेष्ठत्व जगासमोर ठेवण्याच्या प्रयत्नातून प्रबोधन चळवळ निर्माण झाली.

**१.३.१० धर्मसत्तेला अमर्यादित अधिकार :**

मध्ययुगात रोमचा पोप व चर्चला मोठ्या प्रमाणात अधिकार व प्रतिष्ठा होती. राजसत्तेचे वर्चस्व नष्ट केले. तिसरा लिओ, सातवा ग्रेगरी, तिसरा अलेक्झांडर, तिसरा इनोसंट, चौथा इनोसंट, आठवा बोनीफेस या पोपनी राज्यसत्तेबरोबर संघर्ष करुन धर्मसत्तेला विविध अधिकार प्राप्त करुन घेतले. त्यामुळे ख्रिश्चन समाजावर धर्माचे वर्चस्व होते. माणसाला मुक्ती व स्वर्ग पोपमुळेच मिळू शकतो. सर्व प्रकारचे सामाजिक व धार्मिक

स्वरूपाचे अधिकार धर्मगुरुला होते. बिशप, आर्च बिशप, कार्डिनल इ. लहान मोठ्या धर्मगुरुंच्या नियुक्त्या रोमचा पोप करीत असे. पोपच्या सर्व प्रकारच्या अधिकारात बदल करण्याचा प्रयत्न विचारवंतांनी केला. त्यामुळे प्रबोधन चळवळ सुरु झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रबोधन चळवळीची कारणे सांगा.

## १.४ प्रबोधन चळवळीची वैशिष्ट्ये

प्रबोधन ही निरंतर चालणारी एक प्रक्रिया आहे. १५ व्या शतकामध्ये युरोपात सुरु झालेली ही प्रक्रिया हळूहळू संपुर्ण जगामध्ये पसरली. ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात प्रबोधन घडून आले. कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा, धर्मसंस्था इत्यादींचा समावेश होतो. या चळवळीमुळे युरोपात धार्मिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊन एक नवीन सुशिक्षत, सुसंस्कृत वर्ग उदयास मोठा हातभार लागला. प्रबोधनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. धर्मसत्तेचा राज्य व समाजावरील पगडा नाहीसा झाला.
२. प्रबोधनामुळे मानवी विचार मुक्त झाला.
३. बुद्धीवाद व वैज्ञानिक दृष्टीकोनाला प्राधान्य मिळाले.
४. नवीन राष्ट्रराज्याचा व अनियंत्रित राजेशाहीचा अनेक देशात उदय झाला.
५. आर्थिक परिवर्तन हे आधुनिक युगाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय.

## १.५ प्रबोधनकालीन साहित्याची प्रगती

प्रबोधन पूर्वकाळात धर्मसंस्था व विद्वान मंडळींमध्ये लॅटिन भाषेचा वापर होत असे. त्यामुळे सामान्य माणसापर्यंत ते ज्ञान पोहोचू शकत नसे. प्रबेधनकाळात लोकभाषेत साहित्यनिर्मिती होऊ लागली. पूर्वीचे साहित्य बहुतांशी पद्यात्मक होते. प्रबोधन काळात लेखकांनी गद्य साहित्यावर भर दिला. या साहित्यात मानवतावादी, ऐहिकवादी वृत्तीचे चित्र रेखाटले होते. साहित्य सामान्य लोकांच्या जीवनाशी निगडित साहित्य निर्माण केले. विविध भाषेतील प्रबोधनकालीन साहित्य पुढीलप्रमाणे -

### १.५.१ इटालियन साहित्य

प्रबोधन चळवळीचा पाया घालण्याचे काम डांटे व पेट्राॅर्फ यांनी केले. १३ व १४ व्या शतकातील डांटे याने दि. 'डिव्हाईन कॉमेडी' हे जगप्रसिद्ध महाकाव्य इटालियन भाषेत रचले आहे. या काव्याचा नामक स्वत: डांटे आणि इन्फर्नो व पगॅटरी हे नरक व स्वर्ग असे तीन भागात काव्याची रचना केली आहे. याशिवाय 'ऑफन इलेक्कन्स इन दी व्हर्नाक्यूलर' आणि 'दी बॅकेट' ही त्याची अन्य दोन काव्य आहेत. साहित्यातील मानवतावादाचा जनक म्हणजे पेट्रार्क (इ.स. १३०४-१३७४) होय. त्याने इटालियन व लॅटीन भाषेत काव्यरचना केली. देव, धर्म, संतापेक्षा मानवी जीवनातील प्रेम व आनंदाचे लेखनात चित्रण केले. लॉरा या काल्पनिक प्रेयसीला उद्देशून प्रेमकाव्य लिहिले. त्याने मानवी सौंदर्य, आशा-आकांक्षा, हक्क व कर्तव्ये याविषयीचे विचार मांडले आहेत. इटालियन गद्यलेखनाचा जनक म्हणजे जिओव्हनी बोकॅशियो (इ.स. १३१३-७४) होय. त्याने सर्व आयुष्य फ्लॉरेन्स व नेपल्स राज्यात घालवते. डांटे व पेट्रार्क यांच्या साहित्याबद्दल आदर होता. त्याने १०० कथांचा संग्रह असलेला 'डिकॅमेरॉन' हा कथासंग्रह लिहिला. धर्मगुरु आणि धार्मिक धोरण याच्यावर टीका केली. इटालियन साहित्यातील बंडखोर कवी म्हणजे ॲरिओस्टो (इ.स. १४७४ - इ.स. १५३३) हा होय. त्याने 'ओरलँडो फ्युरिओसो' या ग्रंथात आपण स्त्रिया, शिलेदार, लढाया, प्रेम यांचीच गाणी गाऊ असा विचार मांडला. मानवाने मानवी विषयांवर मानवासाठी वाङ्मयनिर्मिती करण्यास प्रारंभ ॲरिओस्टोच्या काळापासून झाला. इटालियन मुत्सद्दी व राजनीतीतज्ज्ञ आणि आधुनिक राज्यशास्त्राचा जनक निकोलो मॅकिॲव्हेली (इ.स. १४६९ - इ.स. १५२७) होय. माणसाने काय करावे, यापेक्षा माणूस काय करतो याचे चित्रण रेखाटले आहे. राज्यशास्त्र व राजनीती या विषयाचे विचार 'द प्रिन्स' या ग्रंथात मांडले. याशिवाय 'डिसकोर्सेस अपॉन द फर्स्ट टेन बुक्स ऑफफ लिव्ही' व 'द आर्ट ऑफ वॉर' हे ग्रंथ नावाजलेले आहेत. 'मॅन्ड्रागोला' हे नाटक लिहिले आहे. तसेच फ्लॉरेन्सचा इतिहास, युद्धशास्त्रपर लेखन केले. टासोने 'जेरूसलेम डेलिव्हर्ड' हे महाकाव्य रचले.

### १.५.२ फ्रान्स साहित्य :

फ्रेंच वाङ्मय देखील नव्या युगाचे खरेखुरे प्रतिनिधित्व करणारे ठरले आहे. फ्रेकाईज व्हिले, माटेन, राबेलाय हे आधुनिक फ्रेंच वाङ्मयातील बडे तीन होते. उपहास आणि विनोद याच्या माध्यमातून फ्रान्स्वाराबेलाय (इ.स. १४९० - इ.स. १५५३) याने लेखन केले. त्याने मानवी जीवनासंबंधी आशा, आनंद, उत्साह व उमेद याचे चित्रण रेखाटले आहे. समाजातील अंधश्रद्ध, राजकीय व सामाजिक, धार्मिक परिस्थितीवर टीका केली आहे. फ्रेंच साहित्यातील श्रेष्ठ लेखक व वैयक्तिक स्वरूपाच्या लघुनिबंध या वाङ्मय प्रकाराचा जनक मायकेल डी माटेन हा होय. त्याच्या विचारसरणीमुळे त्याला पहिला आधुनिक मानव असे म्हणतात. मानवतावादी वाङ्मय सेवकांच्या मालिकेमध्ये मोठे स्थान आहे. मानवाने स्वत:ला ओळखले आणि आत्मवंचना न करता आत्मानुभाव घेणे ही गोष्ट सर्वप्रथम केली पाहिजे, असे त्याने सांगितले. आधुनिक फ्रेंच वाङ्मयाचा त्याला निर्माता समजतात. त्याने लघुनिबंधाचे नवे दालन खुले केले. आपल्या लेखनाविषयी म्हणतो की, 'वाचका, मी माझे

आत्मचरित्र केले आहे. मी आणि माझा ग्रंथ यात एकात्मता आहे.' जीन रॅसिन याने अनेक शोकांतिका लिहिल्या 'प्रँकाईन व्हिले' हा श्रेष्ठ साहित्यकार होता.

### १.५.३ इंग्लंडमधील साहित्य :

इंग्लंडमधील १२ व्या शतकात ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठाने सांस्कृतिक प्रबोधनाचे मोठे कार्य केले आहे. धर्म, कायदा वैद्यक व कला यांचा अभ्यास केला जात असे. आधुनिक इंग्रजी काव्याचा जनक जिऑफ्रे (इ.स. १३८० - इ.स. १४००) असून त्याची 'द कॅंटरबरी टेल्स' ही सर्वश्रेष्ठ कलाकृती होय. त्याने इंग्लडंच्या राजदरबारी मंडळीच्या जीवनपद्धतीवर, आचार, विचारावर, रीतीरिवाजावर उपहासात्मक टीका केली. त्याने 'द बुक ऑफ द डचेस', 'द हाऊस ऑफ फेम', 'द पार्लमेंट ऑफ फाऊल्स' आणि 'दी लिजेंड ऑफ गुड विमेन' काव्यरचना केली. जॉन मिल्टन याने 'प्यरोडाइज लॉस्ट', 'प्याराडाइज रिगेन्ड' ही काव्ये लिहिली. विद्वान, मुत्सद्दी सर थोमस मूर (इ.स. १४७७ - इ.स. १६२६) होय. तो तत्त्वज्ञ, वकील, सुधारक, निबंधकार होता. समाजातील अज्ञान, अंध:कार दूर करण्यासाठी त्याने भरपूर परिश्रम घेतले. त्याने ॲरिस्टॉटल प्रमाणेच आपल्या लिखाणाची छाप समाजावर टाकली. लेखन, वाचन, मनन हा अध्ययनाचा मार्ग आहे असे लोकांना सांगितले. त्याने 'द ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग', 'नोव्हम ऑरगॅनम', 'न्यू ॲटलांटिस' इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १६ व्या शतकात महाकाव्य लिहिण्याचा प्रयत्न करणारे एडमंड स्पेन्सर (इ.स. १५२२ - ९९) हा होय. त्याने 'द फेअरी क्वीन' हे महाकाव्य एलिझाबेथ राणीवर रचले आहे. अभिमान, दिखाऊपणा, गर्व, नेमस्तपणा, मैत्री, न्याय व विजय इ. गुणासंबंधी विचार मांडले. इंग्रजी साहित्याचा मुकुटमणी व श्रेष्ठ नाटककार विल्यम शेक्सपिअर (इ.स. १५६४ - इ.स. १६१६) हा प्रबोधनकाळ होऊन गेला. नाट्य-वाङ्मयामध्ये क्रांती घडवून आणली. त्यामुळे जगातील सर्वश्रेष्ठ नाटककार मानला जातो. मानवी स्वभावाच्या अंतरंगाचे सूक्ष्म दिग्दर्शन आपल्या साहित्यातून घडविले. 'हॅम्लेट', 'किंग लियर', 'ज्युलियस सिझर', 'ऑथेल्लो', 'अँथनी अॅण्ड क्लिओात्रा', 'ॲज यू लाइक इट', 'दी हेमिंग ऑफ दी मर्चंट ऑफ व्हेनिस' इ. कलाकृती अजरामर आहेत. बेन जॉन्सन म्हणतो की, 'शेक्सपिअर हा केवळ एका युगाचा प्रतिनिधी नसून तो युगायुगाचा प्रतिनिधी आहे.' टीका वाङ्मयाचा पाया मजबूत करणारा सर फिलिप सिडने याने 'अपोलोनी फोर पोइट्री' हा ग्रंथ लिहिला. बेन जॉन्सन हा टीकाकार होता. तौलनिक भाषाशास्त्राचा आद्यप्रवर्तक फॉन जेसनर (इ.स. १५५३) याने शंभराहून अधिक ग्रंथाचा अभ्यास करुन ग्रंथलेखन केले. ¬क्रमर याने 'बुक ऑफ कॉमन प्रेअर' हा ग्रंथ लिहिला. डिन्डेल याने बायबलमधील नव्या करारांचे इंग्रजी भाषेत भाषांतर केले.

### १.५.४ पोर्तुगीज साहित्य :

अर्वाचीन पोर्तुगीज भाषेचा पाया घालणारा कामोएन (इ.स. १५२४ - ८०) याने 'ल्युसि ॲड्स' हे महाकाव्य लिहिले. याच काळात मुद्रणकलेचा शोध लागल्याने ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणात झाली.

### १.५.५ जर्मन साहित्य :

जर्मनीतील मेंझ या गावी जॉन गटेनबर्ग याने इ.स. १४५४ मध्ये मुद्रणकलेचा शोध लावला. सायप्रसचा राजा दुसरा जॉनच्या मदतीने छोटा ग्रंथ छापला. मार्टिन ल्युथरने बायबलचे जर्मन भाषेत भाषांतर केले. हॅन्स सारवूस, टाइनरिख स्टाइन हॉवेल व आल्ब्रेट फॉन आइप यांनी लेखन केले.

### १.५.६ स्पॅनिश**साहित्य :**

आधुनिक स्पॅनिश भाषेची पायभरणी मिग्युरेल डी सर्व्हाते (इ.स. १५४७ - इ.स. १६१६) या लेखकाने केलेली आहे. 'डॉन क्विक्सोट' ही अमर कलाकृती जगाला मिळालेली सर्वात मोठी देणगी होय. त्याने मानवी स्वभावाच्या गुणदोषांचे विश्लेषण विनोद व उपहास याचा उपयोग करुन केले. त्याने अर्धवट व साहसी शिलेदाराच्या अचाट शक्तीचे विचित्र प्रयोग, पवनचक्कीला राक्षस समजून तिच्याशी टक्कर देणे, मरतुकड्या कुत्र्याशी दोन हात करणे, अशी साहसकर्मे वाचून वाचकाला हसू आवरेनासे होते. लोपे ही व्हेगा याने सुखांतिका लिहिल्या. कालेरॉन याने काव्ये रचली आहेत.

### १.५.७ डच साहित्य :

बंडखोर धर्मसुधारक व क्रांतिकारी लेखक डेसिडेरियस ड्ररॅसमस (इ.स. १४६६ - इ.स. १५३६) याने 'दी प्रेज ऑफ फॉली' (मूर्ख स्तुती) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून धर्मगुरुवर टीका केल्या आहेत.

आपली प्रगती तपासा :

१) प्रबोधन कालीन साहित्याची प्रगती सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.६ प्रबोधनकालीन कला व स्थापत्य कलेची प्रगती

### १.६.१ चित्रकलेची प्रगती :

मध्ययुगीन काळात कला ही धर्माची दास होती. धर्मगुरुंनी आपल्या मतानुसार कलेवर बंधने घातली होती. केवळ धर्मतत्त्वे शिकवण्यासाठीच कलेचा उपयोग केला जाई. एखादे शिल्प हे अधिक पवित्र कसे दिसेल, यावर जास्त कटाक्ष असे. नैतिक मूल्ये आणि पौराणिक कथा यांचा आविष्कार कलेमध्ये झालेला असेल तरच, कलेला आश्रय दिला जात असे. प्रबोधनकाळातील कलावतांने यामध्ये बदल घडवून आणला. प्रबोधनकाळातील

कलेमध्ये चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला, संगीतकला, रंगभूमी व नाट्यकला, मुद्रणकला इत्यादी कलांमध्ये कोणकोणते बदल झाले याचे येथे स्वरूप पाहावयाचे आहे. मध्ययुगातल्या कलेच्या पद्धतीत अनेक महत्त्वपूर्ण बदल प्रबोधन चळवळीच्या ओघात झाले. चर्चच्या मतानुसार चित्रकला असे. परंतु त्याच्या बंधनातून मुक्त होऊन कलाकाराने स्वत:च्या जाणिवेतून व अनुभवातून आपल्याला आवडणार्या विषयावर चित्र रंगवीत असे. इटालीमध्ये चित्रकलेच्या प्रबोधनाचा सर्वात मोठा बहर आला. याचे उगमस्थान इटलीमधील फ्लोरेन्स शहर होते. प्रबोधनकाळातील महान चित्रकार पुढीलप्रमाणे -

गिओटी (इ.स. १२६६ - इ.स. १३३७) : याने प्रथमच मध्ययुगीन नियम आणि परंपरा यांच्या जोखडातून कलेची मुक्तता केली. मानवी चित्र रेखाटणे, मानवी पुतळे तयार करणे, त्यांना रंग देणे व घरगुती वातावरण आपल्या कलेतून व्यक्त करणे. 'द लॅमेंटेशन ऑफ खाइस्ट' ही त्याची चित्रकृती विशेष प्रसिद्ध आहे. फ्रौ-ॲन्जिलीको (इ.स. १३८७ - इ.स. १४५५) : हा चित्रकार इतरांना स्फूर्ती देणारा ठरला. याच्या कथावस्तू पूर्णपणे धार्मिक असून चित्रविषयातील व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. मॅसॅसिओ (इ.स. १४०१ - इ.स. १४२८) : याने चित्रकलेच्या तंत्रात महत्त्वाचे बदल घडवून आणले. नैसर्गिक वस्तूंच्या प्रामाणिक चित्रीकरणानेच कला प्रगत होऊ शकते, हे दाखविले. बेनाझो गोझोली (इ.स. १४२० - इ.स. १४९७) व फिलिपो लिप्पी (इ.स. १४०६ - इ.स. १४६९) : यांना मॅसॅसिओचे अनुयायी मानतात. पारंपरिक स्थापत्य कलेतील चित्रणाऐवजी नैसर्गिक चित्रणावर भर दिला. सॅंड्रो बॉटीसेली : याने प्राचीन कलांची प्रेरणा पुन्हा चित्रकलेत आणली. यामुळे ख्रिश्चनेत्तर परपंरांना नवजीवन प्राप्त झाले.

निओप्लॅटॉनिझम या चित्रकलेच्या नव्या तंत्राचा आपल्या चित्रकृतीमधून केला. 'बर्थ ऑफ व्हिनस' ही चित्रकला प्रसिद्ध आहे. लिओनार्डो द व्हिन्सी (इ.स. १४५२ - इ.स. १५१९) : प्रबोधनकाळातील सर्वश्रेष्ठ चित्रकार असून तो शिल्पकार, संगीतज्ज्ञ, इंजिनीयर, गणितशास्त्रज्ञ, कवी, यंत्रशास्त्रज्ञही होता. लिओनार्डोने प्रथम चित्रकला व नंतर शिल्पकला यामध्ये नाव कमावले. 'मोनालिसा', 'दी लास्ट सपर' (येशुचे अंतिम भोजन) 'दी व्हर्जिन ऑफ दी रॉक्स' आणि 'दी व्हर्जिन ॲण्ड चाइल्ड विथ सेंट अंत' ही त्याची चार चित्र जगप्रसिद्ध आहेत. निसर्गाच्या सुंदर पार्श्वभूमीवर मोनालिसाचे चित्र काढलेले असून, आकृतीच्या चेहर्यावरील अगाध व मुग्ध हास्य मनाला भुलावणी पाडणारे आहे. हे चित्र काढण्यासाठी इ.स. १५०० - इ.स. १५०४ अशी चार वर्षे घालवली. पक्षी कसे उडू शकतात, याचे विवरण केले आहे. विमानाची रचना कशी असावी यासंबंधी काही सूचक आकृती काढल्या आहेत. हेलिकॉप्टर व प्यारॉशूट यांच्या कल्पना त्यास सुचल्या होत्या.

मायकेल एँजेलो (इ.स. १४७५ ते इ.स. १५६४) : हा प्रथमश्रेणीचा चित्रकार व शिल्पकार आणि कवी होता. त्याचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यवादी आणि सौंदर्याचा निस्सीम उपासक होता. सत्य व शिव यांचा पुरस्कर्ता होता. व्हॅटिकन या पोपच्या राजधानीतील सिस्टाईन चॅपल या धर्ममंदिराच्या भिंतीवर १४५ चित्रे व ३९४ मानवकृती

तयार केल्या होत्या. त्यापैकी 'द क्रिएशन ऑफ अॅडॅम', 'लास्ट जजमेंट', 'दि क्रुसिफिकेशन ऑफ सेंट पिटर', 'द कन्वरीन ऑफ सेट पॉल' इत्यादी चित्रे विशेष प्रसिद्ध आहेत. चित्रांची भव्यता, गाढ धार्मिक भावना, दु:ख आणि प्रेरणा ही त्याच्या चित्रकलेची वैशिष्ट्ये आहेत.

**सॅंझिओ रॅफेल (इ.स. १४९३ - इ.स. १५२०) :** रॅफेलची कला ही सुखद व शांत होती. त्याने विशेष सौंदर्यसंपन्न समजलया जाणार्या स्त्रियांचा उपयोग आपल्या चित्रांचा आदर्श म्हणून केला आहे. त्याच्या कलाकृतीची मुख्य प्रेरणा नि:धर्मी स्वरूपाची होती. त्यामुळे रसिकांचा लाडका चित्रकार म्हणून त्याचे नाव अमर झाले. 'दी ट्रान्सफिगरेशन ॲण्ड मॅडोना ऑफ द गोल्ड फिंच', 'मॅरेज ऑफ द व्हर्जिन', 'सिस्टाइन मॅडोना', 'स्कूल ऑफ अथेन्स' इ. चित्रकलाकृती विशेष प्रसिद्ध आहे. या चित्रातील रंगमिश्रणामधील सौंदर्यआणि जिवंतपणा यामुळे जगातील श्रेष्ठ चित्रांमध्ये त्यांचा क्रमांक लागतो.



**टिशियन (इ.स. १४७७ - इ.स. १५०६) :** हा व्हेनिशियन चित्रकलेचा मुख्य प्रणेता होता. या पद्धतीच्या चित्रात सुख, मादक सौंदर्य आणि ऐहिक जीवन याचे प्रतिबिंब पडलेले होते. टिशियन हा मोठमोठी चित्रे रंगवण्यात तरबेज होता. ग्रामीण जीवनाचे देखावे व सृष्टीशोभा दर्शविणारी चित्रे प्रसिद्ध आहेत. त्याचे 'अॅसम्फ्रांन ऑफ द व्हर्जिन' हे चित्र जगातील सर्व धार्मिक चित्रांमध्ये उत्कृष्ट चित्र समजले जाते.

**तिंतो रेट्टो (इ.स. १५१८ - इ.स. १५९२) :** हा व्हेनिसचा चित्रकार, रंगकाम आणि विविध छटा व्यक्त करण्याचे काम याबाबत त्याचे असामान्य कौशल्य होते. चित्रकार, रंगकाम आणि विविध छटा व्यक्त करण्याचे काम याबाबत त्याचे असामान्य कौशल्य होते.

**अलब्रेच ड्यूरर (इ.स. १४७१ - इ.स. १५२८) :** जर्मन चित्रकारांपैकी न्युरेम्बर्गचा सवांत प्रसिद्ध चित्रकार होता. त्याच्यानंतर धाकटा हान्स हॉलबेल (इ.स. १४९७ - इ.स. १५४३) प्रसिद्ध चित्रकार होता. फ्लेमिश चित्रकार पिटर बुधेल याने सामान्य लोकांचे जीवन, खेळी याचे चित्रण केले.

**एल ग्रेको (इ.स. १५४१ - इ.स. १६१४) :** त्याच्या चित्रशेलीला मॅनरिझम शैली म्हणून ओळखतात. 'द बेरियल ऑफ काऊंट ओरगॅझ' ही कलाकृती सर्वश्रेष्ठ आहे.



रेमंब्र (इ.स. १६०६ - इ.स. १६६९) : विविध प्रकारच्या दोन हजार चित्रे काढली आहेत. त्यामध्ये निसर्गचित्र, नग्न स्त्री-पुरुष, व्यक्तिचित्रे, दैनंदिन जीवनातील व धार्मिक प्रसंग कोरले आहेत. 'क्लाइडिंग ऑफ सॅमसन', 'डाने', 'रेप ऑफ गॅनीमिड', 'द नाइट वॉच' इ. चित्रे प्रसिद्ध आहेत.

### १.६.२ संगीत कला

मध्ययुगीन काळातील संगीतावरही धर्माचा मोठा पगडा होता. १६ व्या शतकातील धर्मसुधारणेच्या चळवळीमुळे संगीतात बदल घडून आला. मार्टिन ल्युथरने आपल्या अनुयायांना संगीताचा उपयोग करण्यास प्रोत्साहन दिले. इ.स. १५२४ मध्ये 'काव्य पुस्तक' प्रसिद्ध केले. हा पहिला धार्मिक पद्यसंग्रह होय. त्यामध्ये त्याने प्राचीन लॅटीन गीते, ईश्वरविषयक पद्ये गोळा केली. नंतर जॉन कॅलव्हिन याने धार्मिक पदांची संगीतानुसार योजना केली.

धर्मसुधारकांनी संगीताचा उपयोग आपल्या मतप्रसारासाठी केला. त्यामुळे रोम कॅथॉलिक धर्मसंस्थेने संगीताचा पुनर्विचार करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने गिओव्हानी पॅलेस्ट्रिना या धर्मोपदेशकाला संगीत योजना करण्यासाठी नियुक्त केले. त्याने अनेक नवीन धार्मिक पदे लिहिली. त्याचे पदे संगीतशास्त्रात अतिशय वरच्या दर्जाची आहेत. म्हणून त्याला आधुनिक पाश्चात्य संगीत रचनाकारापैकी एक मानले जाते. त्याने इ.स. १५६० मध्ये रचलेले पद्य तेव्हापासून आजपर्यंत फ्लोरेन्स येथील सिस्टाईल चॅपेलमध्ये गुड फ्रायडे या सणाच्या दिवशी म्हटले जाते. फिलीप मेरी याने बायबलमधील कथा संगीतरूपाने आणि समूहगीतांच्या साहाय्याने लोकांसमोर मांडल्या.

जुन्यापुराण्या व ओबडधोबड संगीताऐवजी सोळाव्या शतकात नवी, सुरेल आणि मधुर वाद्य प्रचारात आले. संगीतात 'हार्पसीकार्ड' नावाचे तंतुवाद्य, व्हॉयोलिन ही वाद्ये लोकप्रिय होती. संगीतात सुसंवादित्वाला, तालबद्धतेला, प्रमाणबद्धतेला अधिक मान मिळू लागला. व्हेनेशियन पद्धतीच्या संगीताचे प्रवर्तक गिओव्हानी ग्रेबिएली, ॲडिसन हे थोर संगीतज्ज्ञ होते.

### १.६.३ रंगभूमी व नाट्यकला

मध्ययुगीन काळात रंगभूमी म्हणजे धार्मिक समारंभाचे एक सहायक साधन होते. ख्रिस्ती धर्मातील निरनिराळ्या पौराणिक कथांना व घटनांस नाट्यरूप देऊन त्यांचे प्रयोग करत असे. नाटकांच्या प्रयोगाचे दिग्दर्शन हळूहळू सामान्य माणसाच्या हाती आले. या काळात चपत्कृतीपूर्ण व अद्भूतरम्य नाटके केली जात. व्यापारी व कारागिरांच्या संघामार्फत नाट्यप्रयोग केले जात. फ्रान्स, स्पेन, इटली, इंग्लंड इ. देशात नाटके होत असे.

प्रवोधन काळात रंगभूमीवर व नाटकात प्राचीन रंगभूमीचे पडसाद उमटले होते. फ्लोट्स व हेरेन्स यांची सुखान्त आणि सिनेकाची दु:खान्त नाटके होती. आधुनिक पाश्चात्त्य रंगभूमीचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. विद्यापीठीय चतुर या नावाने ओळखला जाणार्या जॉन लिली, रॉबर्ट ग्रीन आणि ख्रिस्टोफर मॅर्लो यांच्या गटाने इंग्लंडमध्ये नव्या रंगभूमीची स्थापना केली. याच्यानंतर शेक्सपिअरच्या काळात नाट्यकला विकसित झाली.

### १.६.४ शिल्पकला

मध्ययुगीन काळात शिल्पकलेवर धर्म आणि धर्मसंस्थेचे वर्चस्व होते. प्रबोधन युगात शिल्पकलेला उर्जितावस्था आली. याची सुरुवात इटलीपासून झाली. मानवी आकृती, हावभाव व हालचाली यांना या कलेमध्ये जास्त महत्त्व देण्यात आले. प्राचीन ग्रीक, रोमन शिल्पकलेचे अनुकरण करण्याचा प्रयत्न प्रबोधनकाळात झाला.

**लॉरेन्झो गिबर्टी (इ.स. १३५८ - इ.स. १४५५) :** हा शिल्पकार इटालियन होता. फ्लोरेन्स धर्म मंदिरासाठी त्याने दरवाजे तयार केले. त्याचे वर्णन मायकेलने केले की, स्वर्गाच्या प्रवेशद्वाराला लावण्यास योग्य अशी दारे आहेत. डोनॅटेलो (इ.स. १३८६ - इ.स. १४६६) : त्याने फ्लोरेन्स येथील सेंट जॉर्जच्या पुतळा, व्हेनिसमधील सेंट मार्कचा पुतळा डेव्हीड याची दगडी मूर्ती इ. पुतळे तयार केले. यदुआ येथील अश्वारूढ पुतळा, गॅटोमेर्लेश व यंग ॲनेल्स ही शिल्प प्रसिद्ध आहेत. ल्युकाडेला रॉबिया (इ.स. १३९९ - इ.स. १४८२) : याने भाजलेल्या मातीच्या चकचकीत मूर्ती तयार केल्या. त्याचबरोबर शुद्ध व साधी शी कलाकृती त्यांनी निर्माण केली. मायकेल अँजोलो (इ.स. १४७५ - इ.स. १५६४) : याने चित्रकलेपेक्षा शिल्पकलेत जास्त क्रांती घडवून आणली. मेडिसो घराणाच्या आश्रयाखाली त्याने अनेक मूर्ती तयार केल्या. त्यांना डॉइंग कॅप्टिव्ह किंवा हिरॉइक कॅप्टिव्ह म्हणतात. मोझेस, पायटो, डेव्हिडचा भव्य पुतळा या कलाकृती प्रसिद्ध आहेत.

munotes.in

**१.६.५ स्थापत्य कला :**

प्रबोधनकालीन स्थापत्य कलेत प्राचीन स्थापत्य कलेचा प्रभाव आढळतो. ग्रीक आणि रोमन या कलेचा संगम झालेला होता. इटलीतील स्थापत्यकलेतून आधुनिक स्थापत्य कलेची निर्मिती झालेली आहे. इटलीमध्ये गोथिक कलेचे मूळ रूजले नाही. त्यामुळे प्रबोधन काळात स्थापत्य कलेचे प्रमुख केंद्र रोम बनले. रोमन कलेतील कमानी, गोलाकार घुमट आणि भव्य स्तंभ याचा अधिक उपयोग केलेला आढळून येतो. पराकाष्ठेची प्रमाणबद्धता हे प्रबोधनकालीन वास्तुकलेच्या शैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

**फिलीपी ब्रुनोलेशी :** हा नव्या शैलीचा प्रमुख होता. त्याने प्रथमत: प्राचीन रोमनच्या भग्न अवशेषाकडे आणि त्यातील सौंदर्याकडे लक्ष वेधले. फ्लोरेन्स मध्ये कॅथेड्रेल या चर्चचे बांधकाम केले. सॅन लॉरेन्झो, सॅटो स्पिरिटो व पाझ चॅपेल या अन्य चर्चच्या इमारतीचे बांधकामही केले.

**रॅफेल :** याने रोमच्या या सौंदर्यपूर्ण अवशेषांचे रक्षण करण्याची जाहीर विनंती पोपला केली. यावरुन प्राचीन स्थापत्य कलेतील कलेचे स्थान कळते.

**लिऑबॅरिस्टा अलबर्टी :** याने निर्माण केलेल्या वास्तुमध्ये रेमिनी येथील सॅन फ्रान्सिस्को चर्च, फ्लोरेन्स मधील सेट ॲण्ड्री चर्च, फ्लोझो रूसेलाई हा राजवाडा इ. वास्तूचा समावेश होतो. त्याने 'ऑन आर्किटेक्चर' हा ग्रंथ वास्तुकलेवर लिहिला आहे.

**डोनॅटो ब्रमाण्टे :** रोममधील सेंट पीटर चर्चची सर्व योजना याने तयार केली. मध्यवर्ती स्थापत्यकलेवर भर देऊन एक प्रचंड इमारत योजली. अमानवी योजना आणि साधेपणा याचा सुंदर मिलाफ येथे दिसतो.

**लिओनार्डो डा व्हिन्सी :** याने प्रत्यक्षात इमारती उभारणीपेक्षा त्यांचे नकाशे तयार करणे. वास्तू रचनेबाबत सल्ला देणे ही कामे प्रामुख्याने केली.

**मायकेल ॲंजेलो :** याने ब्रमाण्टेने योजलेल्या इमारतीची पूर्तता केली. सेंट पिटर याचा घुमट तयार केला.

फ्रान्स, स्पेन, जर्मनी या देशातही स्थापत्य कलेत बदल झाले. फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सिस याने इटलीतील स्थापत्य कलाकारांना बोलवून प्राचीन पद्धतीच्या इमारती बांधल्या. स्पेनचा राजा दुसरा फिलीप याने प्राचीन स्थापत्य कलेला उत्तेजन दिले. जर्मनीतील हायडेलबर्ग किल्ला व इतर इमारती प्राचीन स्थापत्य कलेच्या धर्तीवर बांधल्या आहेत. इंग्लंडमध्ये १७ व्या शतकात बांधकाम सुरु झाले.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रबोधन काळातील कला-स्थापत्यकलेचा आढावा घ्या.

## १.७ प्रबोधनकालीन विज्ञानाची प्रगती

मध्ययुगात धर्मसंस्थेचा शास्त्रीय संशोधनाला विरोध होता. धर्मग्रंथांमध्ये जे लिहून ठेवले आहे तेच अंतिम सत्य आहे, असा धर्मसंस्थेचा दृष्टिकोन होता. तत्कालीन लोकांचे जगासंबंधीचे ज्ञान अगदी तुटपुंजे होते. मागासलेली समाजवृत्ती व धर्मसत्तेचा अडसर या दोन कारणांमुळे विज्ञानाची प्रगती झाली नाही. शास्त्राच्या अनेक संशोधनांना धर्मसंस्थेचा विरोध होता. तथापि थोड्याफार प्रमाणात अरबांनी संशोधन सुरु ठेवले होते. त्यांनी भारत व चीनमधील शास्त्रीय प्रगतीचे पुनरूज्जीवन करुन त्यात स्वत:ची थोडीफार भर घातली.

**१.७.१ गणित :**

पाश्चात्य जगाला गणिताची बरीच माहिती पौर्वात्य देशाकडून मिळाली. प्राचीन हिंदूंचे शून्य (०) व एक ते नऊ अंकगणना अरबांनी युरोपमध्ये पोहोचवली. ग्रीकांनी अंकगणित व भूमिती याचा वारसा पाश्चात्यांना दिली. गणितशास्त्राचा विकास होण्याचे मुख्य कारण इतर शास्त्रांना विशेषत: खगोलशास्त्र, पदार्थशास्त्र यांना लागणारा पुरावा बिनचुक सिद्ध करण्याचे कार्य गणितशास्त्राला करावे लागते. कोपर्निकसचा सिद्धांत असो अथवा व्यापार्यांचे हिशेब असोत सर्वांना गणित आवश्यक असे. युद्धकलेतील प्रगतीदेखील गणितशास्त्रावर अवलंबून होती. यामुळे गणित शास्त्राचा प्रसार जलद गतीने झाला. रब्बा रिझमीने 'अलशब्रवल मुकाब्ल' म्हणजे नंतरचा अलजिब्र (बीजगणित) हा ग्रंथ निर्माण केला. टार्टग्लिआ (इ.स. १५०० - इ.स. १५५७) याने प्रथमत: धन समीकरण सोडविले आणि को-इफिशियन्टविषयी प्रयोग केले. फेरारीने (इ.स. १५२२ - ६५) कॉर्ड्रिक समीकरण शोधले. व्हिएटा (इ.स. १५४० - इ.स. १६०३) याने आधुनिक बीजगणितातील अनेक समीकरणे शोधून काढली. केपलर (इ.स. १५७१ - इ.स. १६३०) याने कोमिक सेक्शनविषयी सिद्धांत प्रस्थापित केला. देसार म्युअस (इ.स. १५९३ - इ.स. १६२२) याने आधुनिक भूमिती शास्त्रशुद्ध पायावर प्रस्थापित केली. रेने देकार्त (इ.स. १५९६ - इ.स. १६५०) याने विश्लेषणात्मक भूमितीचा पाया घातला. स्टेव्हिनने दशांश अपूर्णांकाविषयी एक ग्रंथ लिहून दशमान पद्धतीचा उपयोग नाणी, वजने, मापे यासाठी करावा असे मत मांडले. आज सर्व जगात ही पद्धती रूढ झाली आहे. नेपियर (इ.स. १५५० - इ.स. १६१७) याने लॉगॅरिथम्स शोधून काढले.

### १.७.२ खगोलशास्त्र-भूगोल शास्त्र :

नव्या जगाचा शोध आणि शास्त्रीय संशोधन यामुळे शास्त्रीय विचारांना उत्तेजन मिळू लागले. खगोलशास्त्रज्ञांच्या नव्या संशोधनामुळे नवे विश्व निर्माण झाले. दुसर्या शतकातील ट्वोलेमी या शास्त्रज्ञाने मांडलेला विश्वाच्या रचनेविषयीच्या भूकेंद्र सिद्धांत हा १६ व्या शतकापर्यंत सर्वमान्य झाला होता. धर्मसंस्थेचाही या सिद्धांताला पाठिंबा होता. त्याच्या सिद्धांतानुसार पृथ्वी केंद्रस्थानी असून सूर्य व चंद्र, तारे तिच्याभोवती फिरतात. हा सिद्धांत पवित्रक्ष मानला जात असे. १५ व्या शतकात पोलंडमधील कोपर्निकस (इ.स. १४७३ - इ.स. - इ.स. १५४३) याने हा सिद्धांत चुकीचा असून सूर्य केंद्रस्थानी असून त्याच्या भोवती पृथ्वी, चंद्र, तारे फिरतात, असा क्रांतिवारी विचार मांडला. १६ व्या शतकात जर्मनीमधील केपलर (इ.स. १५७१ - इ.स. १६३०) याने कोपर्निकसच्या सिद्धांताला गणितशास्त्रीय आधार दिला. त्याने सांगितले की, ग्रह सूर्याभोवती लंबवर्तुळाकार फिरतात. इटालियन शास्त्रज्ञ गॅलिलिओ (इ.स. १५६४ - इ.स. १६४२) याने आधुनिक दुर्बिणीचा शोध लावला. कोपर्निकसच्या सिद्धांताचे कार्य पूर्ण केले. हॉलडंच्या चष्मेविक्या लिप्परशेने पहिली दुर्बिण बनवली होती. इ.स. १५९२ मध्ये त्याने उष्णतामापी तयार केली. त्याच्या शोधामुळे धर्मगुरुंनी मृत्यूदंडाची शिक्षा दिली. इंग्लंडमधील शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटन (इ.स. १६४२ - इ.स. १७२७) याने विश्वाच्या व्यापाराविषयी असलेले निरनिराळे सिद्धांत अभ्यासून गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला. हॅले या शास्त्रज्ञाने धूमकेतूच्या उत्पत्तीविषयी अचूक मत मांडले. इ.स. १५८२ मध्ये पोप १३ वा ग्रेगरी याने ज्युलियन कॅलेंडर बदलून नवे कॅलेंडर सुरु केले. या कालगणना १० दिवसांची पुढे ढकलण्यात आली आणि प्रत्येक वर्षी मोजण्यात येणारा लिप वर्ष दिवस गाळण्यात आला. फक्त ज्या वर्षाला चारने भाग जातो अशा वर्षात तो दिवस अधिक धरला जातो. ते ग्रेगेरियन कॅलेंडर आज जगात सर्वत्र सुरु आहे.

### १.७.३ पदार्थ विज्ञानशास्त्र :

प्रबोधनाच्या काळात पदार्थविज्ञानाच्या प्रगतीची व्यावहारिक गरज निर्मान झाली. त्यामुळे या शास्त्राची प्रगती झाली. विल्यम गिल्बर्ट (इ.स. १५४० - इ.स. १६०३) या इंग्लंडच्या संशोधनाने चुंबकीय लक्षणांचा अभ्यास करुन विद्युतशक्तीच्या अभ्यासाला क्षेत्र निर्माण केले. प्रयोगनिष्ठ विज्ञानाची उभारणी करणारा पहिला व विद्युतशास्त्राचा पाया घालणारा म्हणून गिल्बर्टला ओळखले जाते. लोहचुंबक व विद्युतशक्ती यांच्या बाबतचे प्रयोग महत्त्वाचे आहेत. त्याने 'डी मॅगनेट' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. स्टेव्हिनने द्रव पदार्थांच्या दाबाविषयी संशोधन केले. पदार्थविज्ञानाच्या शाखेत महत्त्वपूर्ण संशोधन करणारा इटालियन शास्त्रज्ञ गॅलिलिओ (इ.स. १५६४ - इ.स. १६४२) हा होय. खाली पडणार्या वस्तूंचा वेग हा त्याच्या वजनावर अवलंबून असतो, असा गणितशास्त्राचा सिद्धांत मांडला. त्याने ॲरिस्टॉटलने मांडलेले सिद्धांत चुकीचे आहेत असे मत मांडले. गती व आवाज यांचा अभ्यास केला. हवामापक यंत्र, हॅड्रोस्टॅटिक बॅलन्स, एरोस्कोप, दूरदर्शिका इ. शोध लावले. त्यामुळेच त्याला यंत्रशास्त्राचा जनक म्हणतात. टोरीसेली (इ.स. १६०८ - इ.स. १६४७) हा गॅलिलिओचा शिष्य याने बॅरोमीटरविषयी संशोधन केले. त्याच्या संशोधनामुळे निसर्गाला पोकळी मानवत नाही ही समजूत खोटी ठरली. त्याच्यावर टीका झाली. पॅस्कल (इ.स. १६२३ - ६४) या फ्रेंच शास्त्रज्ञाने टोरीसेलीच्या सिद्धांताचा पाठपुरावा केला. द्रवावर

दिलेला हवेचा दाब सर्व दिशांना सारख्याच प्रमाणावर असतो हा सिद्धांत मांडला. त्याने वातावरण शास्त्राला चालना मिळाली. ऑटो फा गुरिक (इ.स. १६०२ - इ.स. १६८६) याने पोकळी निर्माण करणारे अनेक प्रयोग करुन एअरपंप शोधून काढला. रॉबर्ट बॉयल (इ.स. १६२७ - इ.स. १६९१) या इंग्रज संशोधकाने वायुचा दाब व आकार यांच्यातील परस्पर प्रमाणासंबंधी सिद्धांत मांडला. तो 'बॉईल लॉ' या नावाने प्रसिद्ध आहे. एअर पंपमध्ये सुधारणा घडवून आणली. न्यूटनने गतीचा नियम मांडला.

**१.७.४ रसायनशास्त्र :**

सोळाव्या शतकापासून रसायनशास्त्रात महत्त्वाचे बदल घडून आले. हे शास्त्र प्राचीन आहे. प्राचीन इजिप्त, ग्रीस आणि अलेक्झांड्रिया येथील लोकांना या शास्त्राची माहिती होती. प्राचीन ग्रीक शास्त्रज्ञ हिपॉक्रॅटस आणि गॅलेन यांच्या रसायनविषयक ग्रंथांचे प्रबोधन काळात पुनरुज्जीवन झाले. पॉरासेल्सस (इ.स. १४९३ - इ.स. १५४१) याने रसायनशास्त्र व वैद्यकशास्त्रातील परस्पर संबंध दाखवून दिला. कॉईस (इ.स. १५१५ - इ.स. १५४४) याने गंधकाम्ल आणि मद्यार्क यापासून ईथर तयार केले. न हेलमाट (इ.स. १५७७ - इ.स. १६४४) याने जलतत्त्वाच्या एकमेव द्रव्याचा सिद्धांत मांडला. रसायनातील वायुचे प्रथम संशोधन केले. वातावरणात निरनिराळे वायू हे स्वतंत्ररीत्या अस्तित्वात असतात. हे सिद्ध केले आणि कार्बन डायऑक्साइड हा वायू शोधून काढला. स्टेव्हीहन याने द्रव पदार्थाच्या दाबाविषयी संशोधन केले. रॉबर्ट बाईल याने घन, द्रव आणि वायूरूप अवस्थेतील पदार्थाचा अभ्यास केला. रसायनशास्त्रातील मूलद्रव्यांची कल्पना त्याने निश्चित केली. त्यानंतर ज्वलन क्रियेच्या अभ्यासास सुरुवात झाली. प्रिस्टले याने अमोनिया वायू वेगळा केला आणि ऑक्सिजन वायुचा शोध लावला. लाव्होसिये याने प्राणवायू ज्वलनास आवश्यक असतो हे सिद्ध केले.

**१.७.५ वैद्यकशास्त्रातील प्रगती :**

अरबांनी ग्रीकाकडून घेतलेल्या वैद्यकशास्त्रात सुधारणा घडवून स्वत:चे वेगळे वैद्यकशास्त्र निर्माण केले. हिप्पोक्रॅटिस व गलन या प्राचीन वैद्यकशास्त्रज्ञांचा परिचय पाश्चात्य जगाला भारताकडून झाला. त्यामुळे या शास्त्रात मोठी प्रगती झाली. परासेल्सस (इ.स. १४९३ - इ.स. १५४१) या जर्मन शास्त्रज्ञाने मानवी शरीर हे रासायनिक स्वरूपाचे असते, असा सिद्धांत मांडला. बसालियन (इ.स. १५१४-६४) हा इटालियन शरीरशास्त्रज्ञ होता. त्याने रक्तवाहिनया, नस, फुफ्फुसे, स्नायू, जननेंद्रिय, कवट्या, सांगाडा, मेंदू इ. मानवी शरीराच्या अंतर्रचनेची माहिती 'प्रॅब्रिक्स ऑन ह्यूमन बॉडी' या ग्रंथात एकत्रित केली आहे. विल्यम हार्पे (इ.स. १५७८ - इ.स. १६५७) हा इंग्लंडचा पहिल्या चार्ल्सचा राजवैद्य व इंद्रिय विज्ञान शाखेचा अभ्यासक होता. रक्ताभिसरणासंबंधी सिद्धांत मांडला. शुद्ध रक्त हे प्रथम हृदयाकडून रोहिणीच्या द्वारा सर्व शरीरभर पसरते आणि नीलेच्या द्वाराशरीरातील अशुद्ध रक्त हृदयाकडे येते. प्राण्यांच्या गर्भावस्था, हृदयक्रिया इ. संशोधन केले. जॉन मेयोने रक्ताचे गुणधर्म तपासण्याची पद्धती शोधून काढली. अटनी लिबेन हॉकने मायक्रोस्कोप तयार करुन सूक्ष्मजंतू तपासण्याला चालना दिली. स्वामरडॉमने मधमाशी व गोगलगाईची अंतर्रचना स्पष्ट केली. लिबेनकॉकने डोळ्याच्या अंतर्रचनेची माहिती दिली.

**१.७.६ वनस्पतीशास्त्र :**

प्रबोधनकाळात इतर शास्त्राप्रमाणे वनस्पतीशास्त्र यामध्येही मोठी प्रगती झाली.

क्युसाचा निकोलस (इ.स. १४०१ - ६४) याने वनस्पतीचे रोपटे कसे वाढते याचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यावरुन एक शोक्षण घेतल्याने त्याचे वजन वाढते असा निष्कर्ष काढला होता.

अल्ब्रेक्ट ड्युसर (इ.स. १४७१ - १५२८) याने प्राणी व वनस्पती यांच्या वाढीचे सूक्ष्म निरीक्षण केले. रॉबर्ट हुक याने वनस्पतीच्या अंतर्रचनेत पेशी असतात असे सांगितले. कॅलिसिओने निसर्गात पोकळी असते सिद्ध केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रबोधनाच्या काळातील विज्ञान स्पष्ट करा.

## १.८ प्रबोधन चळवळीचे परिणाम

munotes.in

चौदाव्या ते सतराव्या शतकापर्यंतचा काळ म्हणजे प्रबोधनाचा काळ होय. प्रबोधन चळवळीने आधुनिक युगाचा पाया घातला. युरोपमध्ये अनेक महत्त्वाचे बदल घडवून आणले. त्याची पडसाद सर्व जगामध्ये उमटले. प्रबोधन चळवळीने सर्व क्षेत्रात व समाजजीवनात बदल घडवून आणले. या सर्व परिवर्तन प्रक्रियेमधून जगात आधुनिक युग अवतरले आणि मध्ययुगाचा शेवट झाला. प्रबोधन चळवळीचे परिणाम किंवा महत्त्व आणि त्यांची वैशिष्ट्य व वारसा, आपणाला पुढीलप्रमाणे दिसून येतो.

**१.८.१ मध्ययुगीन काळाचा शेवट :**

प्रबोधन चळवळ इटलीमध्ये सुरु होऊन तिचा सर्व युरोपमध्ये प्रसार झाला. या कालखंडात बुद्धी व विचार यापेक्षा श्रद्धा व विश्वास याला समाजात स्थान होते. त्यामुळे समाजजीवनावर धर्म व धर्मगुरु यांचा प्रभाव होता. मध्ययुगातील सरंजामी राज्ये, अर्थव्यवस्था, भ्रष्टाचार व मानवाची अवहेलना संपुष्टात आणण्यासाठी प्रबोधनकालीन विचारवंत व सुधारणांनी जीवापाढ प्रयत्न केले. मानवाची अप्रगतावस्था संपून सर्वांगीण उन्नतीला प्रारंभ झाला. कोणत्याही घटनेचा, कल्पनेचा, विचारांचा विचार स्वतंत्रपणे करण्यात येऊ लागला. या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक परिस्थिती बदलली.

### १.८.२ मानवतावादी दृष्टिकोनाचा उदय व विकास :

राष्ट्र, संस्कृती व धर्म याचा निर्माता मानव असूनही त्याला मध्ययुगीन जीवनपद्धतीत कोणतेही स्थान नव्हते. या काळात धर्म व संस्कृतीने मानवाच्या सुखदु:खाचा व भौतिक प्रगतीचा विचार केला नाही; परंतु प्रबोधन काळाने मानवाला केंद्रबिंदू मानून त्याचा विचार केला. त्याच्या अभ्यासाच्या विषयांना मानवविज्ञान असे ओळखले जाऊ लागले. मानवाच्या विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिमत्त्व विकासालाच प्राधान्य दिले. त्यामुळे माणसाच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला.

### १.८.३ प्राचीन संस्कृतीबाबत जागृती :

प्रबोधन चळवळीने युरोपियन लोकांच्या मनामध्ये प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीविषय व त्याची ज्ञान, कला यांच्याबद्दल आदर निर्माण केला. प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृती अभिजात संस्कृती म्हणून ओळखली जात होती. मध्ययुगात या संस्कृतीचा विसर पडला होता. प्रबोधन काळात त्याचा अभ्यास सुरु झाला. परिणामी ती आपली संस्कृती आहे, असे लोकांना वाटू लागले. त्यामुळे या संस्कृतीबद्दल लोकांच्या मनात आदर निर्माण झाला.

### १.८.४ विद्या-साहित्य-कलेची प्रगती :

मध्ययुगीन काळात प्राचीन अभिजात संस्कृती मागे पडली होती. मध्ययुगात धार्मिक शिक्षणाला प्राधान्य दिल्याने अंधश्रद्धा वाढली होती. प्रबोधनकर्त्यांनी समाजात बौद्धिक क्रांती केली. त्यामुळे नवनवीन ज्ञानाची द्वारे खुली झाली. प्रबोधन काळातील असंख्य साहित्यिकांनी विविध भाषेत नावीन्यपूर्ण साहित्य निर्माण केले. कथा, कादंबरी, नाट्य, काव्य, महाकाव्य इ. साहित्य प्रकार उदयास आला. त्याचबरोबर त्यांनी टीकात्मक दृष्टिकोनातून साहित्याचा नव्याने अभ्यास सुरु केला. मध्ययुगीन काळात कलेचा विकास खुंटलेला होता. चित्रकला, शिल्पकला, स्थापत्य कला, संगीत कला, फक्त धर्मासाठीच विकसित झाल्या होत्या. या सर्व कला धर्माच्या गुलाम बनलेल्या होत्या. प्रबोधनामुळे लौकिक-निधर्मी कलेचा विकास झाला. प्रबोधन काळात सर्व कलांमध्ये मानवाला स्थान प्राप्त झाले व धर्माचे वर्चस्व नष्ट झाले.

### १.८.५ प्रादेशिक भाषांचा विकास :

प्रबोधन काळात युरोपमधील अनेक देशांत प्रादेशिक भाषांना व वाङ्मयाला प्रोत्साहन देण्यात आले. फ्रेंच, इंग्रजी, स्पॅनिश, इटालियन, जर्मन व इतर अनेक प्रादेशिक भाषेमध्ये ग्रंथनिर्मिती झाली. अनेक नवीन विषयांवर लेखन सुरु झाले. प्रादेशिक भाषेमुळे हे सर्व ज्ञान सामान्य माणसापर्यंत जाऊन पोहाचले. त्यामुळे पारंपारिक हिंबू, इराणी, अरबी व ग्रीक या भाषा मागे पडल्या. प्रादेशिक भाषांचा विकास झाला.

### १.८.६ संशोधन व वैज्ञानिक प्रगती :

प्रबोधनामुळे बुद्धिप्रामाण्यवाद व प्रयोगशीलतेची प्रगती झाल्यामुळे संशोधनाची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागली. विज्ञानाच्या अभ्यासाला उत्तेजन मिळाले. अनेक शास्त्रज्ञांनाही मोठ्या प्रमाणात आश्रय मिळाला. त्यामुळे अनेक विज्ञान शाखांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्रांचाही विकास झाला.

**१.८.७ मानवी जीवनाचे सर्वांगीण परिवर्तन :**

प्रबोधन काळात सरंजामशाही व धर्मसत्तेचा र्हास होऊन, नव्या समाजरचनेचा पाया घातला गेला. धर्मसुधारणा, साहित्यनिर्मिती, कलाविकास, वैज्ञानिक प्रगती यांनी मानवी जीवन बदलून टाकले. विविध क्षेत्रातील प्रगतीमुळे सांस्कृतिक उन्नती झाली. त्यामुळे सामाजिक परंपरा अंधश्रद्धा, रूढी यातून माणूस मुक्त होऊ लागला. त्यामुळे मनुष्य सुसंस्कृत, सुधारलेला बनला. मानवाची सर्वांगीण उन्नती झाली.

**१.८.८ धर्मसत्तेचे वर्चस्व नष्ट झाले:**

मध्ययुगात मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात धर्म व धर्मसत्तेचे वर्चस्व होते. प्रबोधन काळात लोकांच्यात जिज्ञासू वृत्ती वाढल्याने त्यांचे वर्चस्व कमी झाले. धर्मसंस्थेने उपदेश, तत्त्वे सांगितली. त्यांच्याविषयी शंका व्यक्त केली जाऊ लागली. मानवतावादाने निधर्मवादाचा पुरस्कार केला. लोक भौतिकवादाकडे आकर्षिले जाऊ लागले. एकंदरीत राजसत्ता, समाज, शिक्षण, कला, साहित्य, विज्ञान या क्षेत्रावरील धर्मसत्तेचे वर्चस्व नष्ट झाले.

**१.८.९ आधुनिक कालखंडाची सुरुवात :**

अंधार व अप्रगत मध्ययुगाच्या कालखंडावरच प्रबोधन चळवळीचा सूर्योदय झाला. या चळवळीने जगात आधुनिक युगाचा प्रारंभ केला. कारण नवी विचारपद्धती व जिज्ञासू वृत्ती यामुळे अंध:कारमय काळातून आधुनिक काळात प्रवेश केला. विविध क्षेत्रामध्ये आमूलाग्र परिवर्तन प्रबोधनाने घडवून आणले. नव्या विचारांचा, संकल्पनेचा व स्वातंत्र्यमूल्यांचा विकास घडून आला.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रबोधनाचे परिणाम सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.९ सारांश

इ.स. १५ व्या शतकामध्ये युरोपात घडवून आलेले प्रबोधन हळूहळू जगाच्या इतर भागामध्येही झाले. या प्रबोधनाची पार्श्वभूमी, कला, साहित्य, विज्ञान, धर्म या सर्वच क्षेत्रात प्रबोधन होऊन नव्या युगाला सुरुवात झाली. वरील सर्वच क्षेत्रात घडवून आलेल्या प्रबोधनाचा इतिहास तसेच त्याचे परिणाम आणि त्यातून नव्याने उदयास आलेला समाज या दृष्टीने हे प्रकरण महत्त्वाचे आहे.



munotes.in

## १.१० प्रश्न

१) प्रबोधन चळवळ म्हणजे काय ते सांगून चळवळीची कारणे स्पष्ट करा.

२) कला, साहित्य, विज्ञान व वाङ्मय क्षेत्रातील प्रबोधनाचा आढावा घ्या.

३) प्रबोधन चळवळीचे परिणाम सांगा.

४) टिपा लिहा.

अ) प्रबोधन काळातील चित्रकला

ब) प्रबोधनाची वैशिष्ट्ये

क) वाङ्मय क्षेत्रातील प्रबोधन

❖❖❖❖

munotes.in

# २

# भौगोलिक शोध

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ भौगोलिक शोधाची कारणे

२.३ पूर्वेकडील देशांशी जोडणारे प्रमुख मार्ग

२.४ भौगोलिक शोधासाठी युरोपियन देशांचे व खलाशांचे प्रयत्न

२.५ भौगोलिक शोधाचे परिणाम

२.६ सारांश

२.७ प्रश्न

## २.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

१) नवीन भौगोलिक जलमार्ग शोधण्याची गरज का निर्माण झाली याचा आढावा घेणे.

२) नवीन जलमार्ग शोधण्यासाठी युरोपियन देशांचे व खलाशांचे प्रयत्न कसे होते?

३) नवीन भौगोलिक प्रदेशामुळे झालेले परिणाम

## २.१ प्रस्तावना

प्रबोधन चळवळीने नव्या युगाची मुहूर्तमेढ रोवली तर धर्मसुधारणा चळवळीने नव्या युगाची इमारत तयार केली आणि त्या इमारतीवर भूप्रदेशाच्या शोधांनी कळसच चढविला. कारण आधुनिक युगाची खरी किमया युरोपीय राष्ट्रांना भूप्रदेशाच्या शोधानंतरच समजली. कॉन्स्टॅटिनोपलचा इ.स. १४५३ मध्ये पाडाव ही जगाच्या इतिहासात महत्त्वाची घटना ठरली आहे. या घटनेतनंतर तुर्कांनी जगाची नाकेबंदी केली. त्यामुळे नवीन जलमार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यातून अनेक नवीन प्रदेश अनेक खलाशांनी शोधून काढले. त्यातूनच युरोपात वसाहती व साम्राज्य वाढविण्याची चढाओढ सुरु झाली. यामध्ये पोर्तुगीज, स्पेन, फ्रेंच, इंग्लंड, इटली, नेदरलँड, रशिया इ. देशांनी नवीन प्रदेश व मार्ग शोधण्याचे प्रयत्न केले.

munotes.in

## २.२ भौगोलिक शोधाची कारणे

युरोपमधील दर्यावर्दी खलाशांनी अज्ञात भूप्रदेशाचा शोध लावला. त्यामुळे ज्ञानाचे क्षेत्र विस्तारले. अनेक नवीन प्रदेशात आपल्या वसाहती स्थापन केल्या. त्यातून प्रचंड संपत्ती जमा केली. या भौगोलिक शोधाची गरज का निर्माण झाली? त्याची कारणे पुढीलप्रमाणे -

**२.२.१ पूर्वेकडील देशांचे आकर्षण :**

धर्मयुद्धाच्या काळात पूर्वेकडील देशांशी संबंध आला. याच वेळी युरोप व पूर्वेकडील देश यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात झाली. पूर्वेकडील लोकांची लौकिक, पारलौकिक प्रगती, त्यांची शास्त्रीय, कलाक्षेत्रातील ज्ञान आणि आर्थिक संपत्ती इ. ची माहिती या काळात युरोपियनांना झाली. व्यापार प्रवृत्तीच्या युरोपिय लोकांना आशिया खंडातील देशाचया संपत्तीची आकर्षण हाते. त्यातूनच नवीन जलमार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरु झाला.

**२.२.२ युरोपमध्ये पूर्वेकडील वस्तुंना मागणी :**

मध्ययुगात युरोप व आशिया यांच्यात व्यापार व उद्योग चालत असे. तो पुन्हा सुरु व्हावा यासाठी नवीन जलमार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले. कारण युरोपच्या बाजारपेठेत पूर्वेकडील पदार्थ व चैनी वस्तूंना मोठी मागणी होती. साखर, मसाल्याच्या पदार्थांची त्यांना मोठी चटक लागली होती. चैनीच्या वस्तूंमध्ये चीनमधील रेशमी कापड, भारतातील सोने, चांदी, हिरे, माणिक, तलम सुती वस्त्रे, अत्तरे, तेले, रंग, औषधे, चंदनी लाकूड इत्यादींना मोठी मागणी होती. याचा व्यापार करणार्यांना मोठा फायदा होत असे. पूर्वेकडील देशातील व्यापाराचा एकाधिकार इटलीतील व्यापार्यांनी मिळवला होता. त्यामुळे इतर व्यापार्यांना त्याचा हेवा वाटत असे, म्हणून स्पेन, पोर्तुगीज देशांनी आपले धाडसी खलाशी पाठवून नवीन मार्ग शोधण्याचे काम सुरु केले.

**२.२.३ कॉन्स्टॅटिनोपल राजधानीचा पाडाव :**

या काळात सर्व दळणवळण खुष्कींच्या मार्गाने चालत असे. हा मार्ग इ.स. १४५३ मध्ये बंद पडला. कारण तुर्कांनी रोमन साम्रज्याची राजधानी कॉन्स्टॅटिनोपलचा पाडाव केला. हे शहर खुष्कीच्या मार्गावरील एक प्रमुख शहर व व्यापारी पेठ होती. तुर्कांच्या ताब्यात आल्याने पाश्चिमात्यांना पूर्वेकडे जाण्याचा मार्ग बंद झाला. त्यामुळे नवीन मार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली.

**२.२.४ ख्रिश्चन धर्माचा प्रसार :**

व्यापार्यांना व्यापारासाठी तर धर्मगुरुंना धर्मप्रसारासाठी पूर्वेकडील देशात जावयाचे होते. आपल्या धर्माचा जगभर प्रसार व्हावा अशी तीव्र इच्छा व आकांक्षा होती. युरोपातील अनेक ख्रिस्ती मिशनर्यांनी संपूर्ण विश्व पालथे घालण्याची चढाओढ सुरु झाली. सर्व देशांत या धर्माचा पताका त्यांनी फडकवला.

munotes.in

### २.२.५ युरोपियन राजांचे प्रोत्साहन :

काही राजांना आपल्या भूप्रदेश वाढवायचा होता, म्हणून ते नवीन भूप्रदेश शोधाच्या प्रयत्नात सामील झाले. या राजांनी नौकानयनाला प्रोत्साहन दिले. धाडसी दर्यावर्दी खलाशांना अनेक प्रकारची मदत केली. त्यामुळे नवीन प्रदेशाचा शोध लागला.

### २.२.६ ऐहिक सुखात वृद्धी करण्यासाठी :

जीवनभरात चांगला बदल करण्याच्या खटपटीत मनुष्य सदैव गुंतलेला आहे. ऐहिक सुख वाढवण्यासाठी मौल्यवान वस्तू, धातू आणि आवडीचे पदार्थ त्यांना आवश्यक होते. त्याची ही सुखाची ओढ तृप्त करण्यासाठी नवीन प्रदेशातून वस्तूंची प्राप्ती करणे, यासाठी नवीन प्रदेशाची गरज होती.

### २.२.७ खलाशांची साहसी वृत्ती व पराक्रमाची आवड :

या काळात युरोपियन लोकांच्या मनात धाडस व साहस करावे. समुद्रमार्गे अज्ञात प्रदेश शोधून काढावे. काही खलाशी व व्यापारी हौसेपोटी व व्यापारासाठी दूरच्या प्रदेशाचा विचार कसा असे. खलाशांना भौगोलिक ज्ञान मिळवणे यासाठी ते पराक्रम करण्यास तयार होते.

### २.२.८ भौगोलिक ज्ञानाची व प्रदेशातील परंपरेची माहिती :

धर्मयुद्धाच्या निमित्ताने व प्रवासाच्या माध्यमातून लोकांना नवीन भूप्रदेशाची माहिती मिळाली. तेथील नवे विचार, शेतीभाती यांची माहिती झाली. सैनिकांनी त्या त्या प्रदेशाची लिहिलेली माहिती याच्या आधारे त्यांना भौगोलिक ज्ञानाची माहिती मिळाली. 'सिक्रेट्स ऑफ द फेथफूल क्रुसेडर' या ग्रंथात पूर्वेकडील प्रदेशाची, शहरांची तपशीलवार माहिती दिली आहे.

### २.२.९ शास्त्रीय संशोधन :

युरोप खंडातील लोकांनी निरनिराळे नवीन प्रदेश शोधून काढण्यासाठी प्रवृत्त होण्यास काही शास्त्रीय शोधही कारणीभूत झाले. होकायंत्राचा शोध प्रथम चिनी लोकांनी लावला. चिनी लोकांपासून अरब लोकांनी तर अरबांकडून युरोपियन लोकांनी होकायंत्राचा शोध घेतला. होकायंत्रामुळे अथांग सागरातही दर्यावर्दी लोकांना रात्रंदिवस दिशा निश्चितपणे कळू लागली. त्यामुळे या लोकांच्यात आत्मविश्वास निर्मान झाला. कोपर्निकसने पृथ्वी गोल असल्याचे सांगितले. या शोधाचा उपयोग कोलंबसने केला व अचानकपणे अमेरिकेचा शोध लावला. बंदुकीच्या दारूचा शोधही महत्त्वपूर्ण होता. बंदुकीमुळेच युरोपियन माणूस कोणत्याही अज्ञात प्रदेशात फिरू लागला व त्यावर आपले वर्चस्व गाजवू लागला. गॅलिलिओने दुर्बिणीचा शोध लावला. त्यामुळे दूर अंतरावरील असलेल्या वस्तू स्पष्टपणे दिसणे सोपे झाले. त्याचप्रमाणे जहाज बांधणीत सुधारणा झाली. बिनचूकपणे नकाशे तयार करण्यात आले. या सर्वांचा उपयोग नवीन प्रदेश शोधण्यासाठी झाला.

### २.२.१० नौकानयनला मदत :

पोर्तुगाल, स्पेन राजांनी नौकानयनला सर्व प्रकारची मदत करण्याचे धोरण अवलंबिलेले होते. पोर्तुगालचा राजा पहिला जॉन याने भारताकडे जाणार्या समुद्रमार्गाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न केला. पोर्तुगालचा राजा हेन्री (इ.स. १३९२-इ.स. १४६०) याने

खलाशांना शिक्षण देण्यासाठी नाविक शिक्षण केंद्र उभारले होते. यासाठी चाळीस वर्षे कष्ट घेतले. त्याने प्रसिद्ध दर्यावर्दी, जहाज बांधणीचे कुशल कारागीर, भूगोलतज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, गणितज्ञ इ. आमंत्रित करुन नौकानयन तंत्राच्या अभ्यासाला गती दिली. या केंद्राने अचूक नकाशे तयार केले. नाविकांना शास्त्रीय प्रशिक्षण देण्यात आले. आफ्रिकेतील अज्ञात प्रदेशाच्या शोधासाठी दरवर्षी एक तुकडी पाठवत असे. नौकानयन कलेच्या प्रेमामुळेच युरोपियन लोक त्याला हेन्री द नेव्हिगेटर (नाविक हेन्री) म्हणत असे.

**२.२.११ प्रबोधनकालीन विचार :**

युरोपमध्ये जी प्रबोधन चळवळ सुरु झाली. तिने समाजामध्ये शास्त्रीय दृष्टिकोन व नवीन कल्पनांचा प्रसार केला. चळवळीमधील बुद्धिनिष्ठ व विज्ञाननिष्ठतेमुळे लोकांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती वाढीस लागली होती. ज्ञानप्राप्तीसाठी कष्ट करण्याची तयारी प्रबोधन चळवळीने समाजात निर्माण केली. ज्ञानप्राप्तीसाठी जगाच्या विविध प्रदेशात जाण्यासाठी, नवीन मार्गाचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरु झाला.

**२.२.१२ व्यापार व वसाहतीसाठी स्पर्धा :**

युरोपियन राष्ट्रांमध्ये व्यापार व वसाहतीसाठी मोठी स्पर्धा सुरु होती. ही स्पर्धा देखील नवीन प्रदेश शोधासाठी कारणीभूत ठरली. या कालखंडामध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे व पोपच्या आदेशानुसार एखादा नवीन प्रदेश शोधून काढला तर, त्या प्रदेशावर शोधून काढणार्या देशाची सत्ता असे. त्यामुळे त्या प्रदेशाशी व्यापार व त्याकडे जाणारा जलमार्ग यावर त्या देशाची सत्ता असे. परिणामी पूर्वेकडील देशांशी जाणारे जलमार्ग शोधून काढण्यासाठी युरोपिय राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरु झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) भौगोलिक शोधाची कारणे थोडक्यात सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.३ पूर्वेकडील देशांशी जोडणारे प्रमुख मार्ग

युरोपियन खलाशांनी महाप्रयासाने जे समुद्र मार्ग शोधून काढले, हे सर्व मार्ग दिशांवर आधारित होते. अशा एकूण पाच मार्गांचा शोध लावला. ते पुढीलप्रमाणे –

**२.३.१ पूर्वेकडील केप ऑफ गुड होप मार्ग :**

आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून अटलांटिक महासागरातून हिंदी महासागरात प्रवेश करणारा मार्ग होय. या मार्गाने प्रथम बार्थोलोमिया डायझ व वास्को-डो-गामा हे आले.




munotes.in

### २.३.२ अटलांटिक मार्ग :

पूर्वेकडे म्हणून कोलंबस प्रवासाला निघाला, पृथ्वी गोल असल्याने, पश्चिम दिशेने पूर्वेला जाता येईल. या कल्पनेने कोलंबस बाहेर पडला. प्रवासात सापडलेला नवीन मार्ग म्हणजे अटलांटीक मार्ग होय. त्या मार्गावरील वेस्ट इंडीज बेट व अमेरिका या अज्ञात भागांचा शोध.

### २.३.३ नैऋत्येकडील / दक्षिण-पश्चिम मार्ग :

या मार्गाचा अवलंब करुन मॅगलन या धाडसी प्रवाशाने पृथ्वी प्रदक्षिणेचा अभूतपूर्व असा प्रयोग केला.




### २.३.४ वायव्येकडील / उत्तर-पश्चिम मार्ग

हा जलमार्ग हडसन नावाच्या खलाशाने शोधून काढला.

**२.३.५ ईशान्येकडील / उत्तर-पूर्व मार्ग १**

हा जलमार्ग विलीबी नावाच्या खलाशाने शोधून काढला.

## २.४ भौगोलिक शोधासाठी युरोपियन देशांचे व खलाशांचे प्रयत्न

प्राचीन काळातील इ.स.पू. २००० च्या सुमारास क्रीटच्या मिनोअन (मायनोअन) लोकांची भूमध्य समुद्रावरुन इजिप्त, सायप्रस, सिसिली, इटली इ. देशांशी संबंध जोडला होता. ग्रीक भूगोलशास्त्रज्ञ टोलेमी याने इ.स. १३० च्या सुमारास जगाचा नकाशा तयार केला. त्यामुळे ग्रीक लोक काळा समुद्र, तांबडा समुद्र, कास्पियन समुद्र इ. समुद्रावरुन पर्यटन करु लागले. अलेक्झांड्रिया येथील हिप्पालस याने प्रथम मान्सून वार्याच्या सहाय्याने कोणत्या दिवसात शिडे उभारुन हिंदी महासागरात जावे याचा शोध लावला. इ.स. च्या पहिल्या शतकात व्यापार्यांच्या सोयीसाठी लिहिलेला ग्रंथात आफ्रिका, हिंदुस्थान, सिलोन, मलाया, चीन इ. देशांकडील मार्गाचे वर्णन केलेले आहे. नॉर्मन टोळ्यांनी अंटलाटिक महासागरावरुन जलपर्यटन करुन अमेरिकेचा शोध लावला. याची माहिती ॲडम ऑफबे सेन याने इ.स. १०७० मध्ये ग्रंथात लिहिली आहे. इटलीतील व्यापारी लोकांनी जगाच्या भूगोलविषयक ज्ञानात भर घातली. ती 'ए मर्चंट्स हॅण्डबुक' हे पुस्तक प्रसिद्ध करुनच. त्यामुळे अनेक धाडसी खलाशी पुढे आले. त्यांनी वेगवेगळा प्रदेश व जलमार्ग शोधून काढला.

**२.४.१ पोर्तुगीजांचे प्रयत्न :**

पंधराव्या शतकात नवीन जगाचा शोध घेण्याचे जे प्रयत्न झाले, त्या प्रयत्नाचे नेतृत्व पोर्तुगीजांकडे जाते. अज्ञात जगाची माहिती मिळवण्याचा प्रयत्न पोर्तुगीजांनीच केला. आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनार्याने आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून आपणास पुढे हिंदुस्थान व चीनमध्ये जाता येईल, असे पोर्तुगीजांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले.



पोर्तुगाल राजपुत्र हेन्री

पोर्तुगाल राजपुत्र हेन्री (इ.स. १३९४ - इ.स. १४६०) : हा खलाशी राजपुत्र म्हणून ओळखला जातो. त्याने जलपर्यटनाला प्रोत्साहन दिले. तांत्रिक शिक्षणासाठी विद्यालय सुरु केले. दरवर्षी सागरी मोहिमा काढल्या. वादळी हवेतही समुद्रातुन दूरच्या प्रदीर्घ प्रवासासाठी कॅराव्हेल नावाची नौका तयार केली त्याच्या प्रयत्नामुळेच आफ्रिकेच्या पश्चिम किनार्यावरील

munotes.in

मदेरिया, अझोरेस, गियानाचा किनारा शोधून काढला. परिणामी मोठ्या प्रमाणात विविध वस्तू व गुलाम यांचा पुरवठा होऊ लागला.

लोपो गॉन साल्वेस : याने सर्वप्रथम इ.स. १४७२ मध्ये विषुववृत्त रेषा ओलांडण्यात यश मिळविले. येथील अति उष्णतेमुळे समुद्राचे पाणी नेहमी उकळत असते. उष्णतेमुळे माणसाचा मृत्यू व त्याची राख होते. या युरोपियन लोकांच्या समजुती खोट्या ठरवल्या. डिगो काओ : याने कांगो नदीचे मुख शोधून काढले. बार्थोलोमियो डायझ: याने इ.स. १४८६ मध्ये आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला सर्वप्रथम वळसा घातला. वादळामुळे त्याला पुढे जाता आले नाही. भारताकडे जाण्याचा मार्ग सापडण्याची आशा निर्माण झाली. त्यामुळे या भागाला आशादायीभूशीर (केप ऑफफ गुड होप / वादळाने उफाळणारे भूशीर) असे नाव देण्यात आले.

पोर्तुगाल राजा इमॅन्युअल दि फॉरच्युनेट याने भारताचा शोध लावण्यासाठी वास्को - द - गामा याची निवड केली. तो बार्थोलोमियो डायजचा साथीदार असून त्याचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यासाठी मोहिमेवर निघाला. लिस्वन राजधानीतून ४ गलबतरे, ११८ माणसे, अनेक पुस्तके व नकाशे घेऊन जुलै १४९७ मध्ये सफरीस निघाला. २२ नोव्हेंबर १४९७ रोजी केप ऑफफ गुड होप येथे पोहोचला. तेथील मुक्कामात झांजीबारचे चार अरब व्यापारी भेटले. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे दक्षिण आफ्रिकेच्या टोकाला वळसा घालून पूर्व किनार्याला आला. १७ मार्च इ.स. १४९८ रोजी मालिंदी येथे आला. तेथील भारतीय व्यापार्याने दिलेल्या माहितीनुसार हिंदी महासागरातून २३ मार्च इ.स. १४९८ रोजी कालिकत बंदरात आला. या प्रवासाला एकूण १० महिने १२ दिवस लागले. कालिकतच्या झामोरीन राजाने त्याचे स्वागत केले. वास्को-द-गामा २९ ऑफगस्ट इ.स. १४९४ रोजी परत मायदेशी निघाला. त्या वेळी सफरीच्या खर्चाच्या ६०पट इतकी संपत्ती बरोबर नेली. त्याने भारताचा शोध लावल्याने त्याचा जलपर्यटनपटू आणि थोर दर्यावर्दी म्हणून गौरव करण्यात आला. त्याने जगाच्या इतिहासात प्रथमच २४००० नॉटिल मैल इतकी लांब सफर केली. इ.स. १५०२ मध्ये भारताला दुसर्यांदा भेट दिली. त्यावेळी त्याच्याबरोबर १५ जहाजे होती. इ.स. १५२४ मध्ये भारतातील पोर्तुगीज वसाहतीची व्हाईसरॉय म्हणून पुन्हा भारतात आला. १४ डिसेंबर इ.स. १५२४ रोजी कोचीन येथे मृत्यू पावला. कॅब्रॅल : आफ्रिकेच्या मार्गाने भारतात येण्यास सुरुवात केली. पण वादळामुळे त्याला आपली जहाजे पश्चिमेकडे वळवावी लागली. त्याने ब्रझीलचा शोध लावला.



वास्को-द-गामा

**पोर्तुगीजांच्या वसाहती :** पोर्तुगीज लोकांनी भारतात व्यापार व वसाहती स्थापण्यास सुरुवात केली. कॅब्रल (इ.स. १५००) आणि अल्ब्रुकर्क (इ.स. १५०३) यांनी वास्को-द-गामाच्या जलमार्गाचा अवलंब केला. इ.स. १५०९ मध्ये फ्रान्सेस-दी-आलमेडा याने अरबांचा व इजिप्त आणि गुजरातच्या सुलतानाचा संयुक्त पराभव केला. अल्ब्रकर्क याने पर्शियन आखातातील ओमेझ काबीज केले. नंतर सोकोत्रा बेट जिंकून घेतले. इ.स. १५१० मध्ये गोवा जिंकले. इ.स. १५११ मध्ये मलाक्का हे व्यापारी केंद्र जिंकले. त्याने भारताचा पूर्व-पश्चिम किनार्यावरील हुगळी, मच्छलीपट्टण, काशीम बझार, डाक्का, दीव, दमण, वसई, मुंबई इ. ठिकाणचा व्यापार हाती घेण्याचा प्रयत्न केला आणि नंतर ही ठाणी पोर्तुगीजांनी ताब्यात घेतली. सिलोन, मलाक्का, सुमात्रा, जावा, चीन इ. व्यापार सुरु केला. संपूर्ण आफ्रिका, दक्षिण आशिया, ब्रझीलवर त्यांचे वर्चस्व होते. इ.स. १५८० मध्ये स्पेनने पोर्तुगाललाच आपल्या साम्रज्यात समाविष्ट केले.

### २.४.२ स्पेनचे प्रयत्न आणि त्यांच्या वसाहती :

१) क्रिस्टोफर कोलंबस (इ.स. १४५१ - इ.स. १५०६) : कोलंबस हा मूळचा इटलीतील जिनेव्हा शहरातील रहिवासी होता. अत्यंत दरिद्री विणकर कुटुंबात जन्म झाला. त्याला प्रथमपासूनच समुद्रावरील सफरीचे मोठे आकर्षण होते. तो इ.स. १४८९ मध्ये लिस्बन येथे स्थिर झाला. पोर्तुगालहून निघून पश्चिमेकडे पर्यटन केले म्हणजे जपान व हिंदुस्थानचा शोध लागेल, या समजुतीने त्याने सतत पर्यटन करण्याचा विचार केला. पोर्तुगाल राजाकडून मदत मिळवण्यात अपयश आले. त्यामुळे इ.स. १४८२ मध्ये पोर्तुगाल सोडून स्पेनला जाऊन राहिला.



क्रिस्टोफर कोलंबस

एका राजदूताने त्याला कॅस्टाइन येथील दरबारात प्रवेश मिळवून दिला. स्पेनचा राजा फर्डिनंड व त्याची राणी इसाबेल यांची भेट झाली. राणी इसाबेलला नव्या भूप्रदेशाचा शोध लावून तेथे ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याची महत्त्वाकांक्षी असल्यामुळे तिने कोलंबसला उदार हस्ते मदत केली. ३ ऑफगस्ट इ.स. १४९२ रोजी कोलंबस ९९ माणसे व ३ जहाजे घेऊन कॅडिझजवळच्या पालोस बंदरातून ऐतिहासिक सफरीसाठी निघाला. सांता मारिया, नीना व पिंटा अशी त्याच्या जहाजांची नावे होती. ६९ दिवसांच्या प्रवासानंतर १२ ऑफक्टोबर इ.स. १४९२ रोजी सॅन साल्वादोर बेटावर पोहोचला हे भारताजवळील आहे असे समजून त्याला पूर्वेकडील बेट (East Indies) असे नाव दिले. तेथील तांबूस व तपकिरी वर्णाचे लोक पाहून त्यांना रेड इंडियन नाव दिले. पुढे त्याने कॅरेबियन समुद्राचा किनारा, व्हेनेझुएला, मध्य अमेरिका या भागाचा शोध लावला. तो १६ जानेवारी इ.स. १४९३ रोजी परत स्पेनला आला. त्याने राजाला सोने, कापूस, पशुपक्षी, दोन रेड इंडियन माणसे भेट दिली.

इ.स. १४९३ मध्ये पुन्हा राजाने कोलंबसला दुसर्या सफरीवर पाठवले. १७ जहाजे व १५० माणसे घेऊन कोलंबस हैती येथे जाऊन पोहोचला. या वेळी त्याने डॉमिनिका, जमेका, प्युर्टोरिको इ. बेटे शोधून काढली. त्याने ५ जहाजे भरुन रेड इंडियन लोक युरोपात गुलाम म्हणून विकण्यासाठी स्पेनला आणली. तो इ.स. १४९५ मध्ये परत स्पेनला आला. सोने, फळे, रोपटी, मका इ. बरोबर स्पेनमध्ये आणले. ३० में इ.स. १४९८ रोजी तिसरी सफर सुरु केली. या वेळी आफ्रिकेच्या पश्चिमेकडील केप व्हर्ड बेट व दक्षिण अमेरिकेतील त्रिनिदाद याचा शोध लावला. त्रिनिदादला मोती सापडले. तेथून दक्षिण अमेरिकेनजीकच्या हाइटी बेटाकडे जाताना अटक करुन स्पेनला पाठवले.

इ.स. १५०३ मध्ये चौथी व शेवटची सफर काढली. या सफरीत त्याने प्रेस्किकोचे आखातात जमेका बेट, दक्षिण अमेरिकेतील होंडुरास या किनार्याचा शोध लावला. इ.स. १५०६ मध्ये कोलंबसचा मृत्यू झाला. १२ ऑफक्टोबर इ.स. १४९२ रोजी सर्वप्रथम कोलंबस अमेरिकेच्या जवळपास जाऊन पोहोचला. त्याच्या स्मरणार्थ अमेरिकेमध्ये दरवर्षी १२ ऑफक्टोबर हा 'कोलंबस दिन' म्हणून पाळला जातो.

**२) फर्डिनंड मॅगेलन (इ.स. १४८० - इ.स. १५१९) :** पोर्तुगीज खलाशी मॅगलेन हा इ.स. १५०२ मध्ये वास्को-द-गामाबरोबर भारतात आला होता. त्याने मलायाच्या द्विपकल्यापर्यंत प्रवास केला होता. इ.स. १५१३ मध्ये पनामाची समुद्रधुनी पार केली. कोलंबस व अमेरिगो ने जो प्रदेश शोधला तो भारत नाही म्हणून अमेरिकेचा प्रदेश ओलांडून पूर्वेकडे जायचे ठरवले. त्यानुसार पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करण्याचा विचार केला. यासाठी फर्डिनंड मॅगलेन याने स्पेनची मदत घेतली. २० सप्टेंबर इ.स. १५१९ रोजी पाच जहाजे व २८० खलाशी यांच्यासह तो स्पेनमधील सॅव्हिल बंदरातून पृथ्वी प्रदक्षिणेसाठी निघाला. सॅन अण्टोनियो, त्रिनिदाद, कन्स्पेप्शन व्हिक्टोरिया, सॅण्टियागो अशी पाच जहाजांची नावे होती. तो अटलांटिक महासागरातून तो अमेरिकेत पोहोचला. ब्रझील किनारा व दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून पॅसिफिक महासागरात प्रवेश केला. या समुद्राला त्याने प्रशांत

महासागर नाव दिले. कालांतराने गुआम बेटावर आले. प्रशांत महासागराच्या प्रवासात वादळ, अन्नपाणी यामुळे प्रचंड हाल झाले. २७ एप्रिल इ.स. १५२१ रोजी फिलिपिन्सच्या किनार्यावर पोहोचला. त्याने सेबू बेटाच्या राजाशी मैत्री केली. स्थानिक लोकांशी झालेल्या चकमकीत मॅगेलन ठार झाला. ८ सप्टेंबर इ.स. १५२२ रोजी फक्त १८ लोक आणि कन्पेप्शन व्हिक्टोरिया हे जहाज सॅव्हिल बंदरात सुखरूप पोहोचले. हे जहाज बोर्निओ मार्गे हिंदी महासागरातून आफ्रिकेच्या केफ ऑफफ गुड होपला वळसा घालून पुन्हा तीन वर्षांनी परत पोहोचले.




फर्डिनंड मॅगेलन

**३) वास्को मुमझ डी बल्जाओ :** या स्पॅनिशखलाशाने इ.स. १५९३ मध्ये पनामाच्या समुद्रधुनीचा प्रदेश शोधून काढला. हेरनॅन्डो कॅर्टिझ या स्पॅनिशअधिकार्याने वेस्ट इंडीज बेटातील क्युबा येथून अनेक जहाजे व सैनिक घेऊन मॅक्सिकोचा प्रदेश शोधून काढला. त्याला मूळ रहिवासी अझटेक लोक सूर्यपूत्र आहे असे समजत असे. या प्रदेशातून सोने, चांदी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाली. त्यानंतर तो कॅलिफोर्नियाच्या दक्षिण भागापर्यंत पुढे गेला आणि नंतर मायदेशी परतला. फ्रान्सिको पिझारो याने इ.स. १५३२ मध्ये पेरु प्रदेशावर स्वारी केली. तेथील राजाला कपटाने कैद करुन त्याने त्याच्याकडून बरेच सोने-नाणे, जडजवाहीर घेतले व त्याला ठार मारले. येथील सोन्याच्या जोरावर स्पेन देश श्रीमंत बनला.

**स्पेनच्या वसाहती :** स्पेनने दक्षिण अमेरिका (ब्रझील वगळून) मध्य अमेरिका, मेक्सिको या प्रदेशात वसाहती स्थापन केल्या. स्पॅनिशव रेड इंडियन यांच्यातून मिश्र संस्कृतीचा उदय झाला. पोपने दक्षिण अमेरिकेची फाळणी करणारी एक सीमारेषा (केप हर्डेनिया पश्चिमेला ३७० मैलावर) आखून दिली. स्पेन व पोर्तुगीज यांच्यातील वाद मिटवला.

### २.४.३ नेदरलँडचे (हॉलंड) प्रयत्न :

समुद्रसान्निध्यामुळे व भौगोलिक परिस्थितीमुळे नेदरलँडचे लोक स्वाभाविकच दर्यावर्दी बनले. जलपर्यटन व समुद्रावरील व्यापार, वाहतूक हेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनले. स्पेन व पोर्तुगालप्रमाणे डचांनी व्यापार व वसाहती स्थापन करण्यासाठी पोपच्या फतव्यास न जुमानता इ.स. १५९२ पासून प्रयत्न सुरु केले. पूर्वेकडील व्यापार



munotes.in

वाढविण्यासाठी त्यांनी इ.स. १५९२ मध्ये कंपनी स्थापन केली. इ.स. १५९७ मध्ये हटमनने जावावर मोहीम नेऊन तेथे व्यापारी संबंध जोडले. नेदरलँडमध्ये पूर्वेकडे व्यापार करणार्या अनेक कंपन्या स्थापन झाल्या. इ.स. १६०० मध्ये डचांनी स्पेनविरुद्ध लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त केले. इ.स. १६०२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. जावा, बाटंक, मलाक्का, चीन, जपान इ. प्रदेशाशी व्यापार वाढवला. इ.स. १६१९ मध्ये कोएनने जकार्ता जिंकून त्याच्या अवशेषावर बटाव्हियाची उभारणी केली. पोर्तुगीजाच्या ब्रझील, ईस्ट इंडीज, हिंदुस्थान, आफ्रिका इ. देशातील व्यापारी ठाण्यावर हल्ला करुन ठाणी जिंकली. भारतातील भडोच, सुरत, खंबायत, आग्रा, बऱ्हाणपूर, वेंगुर्ले, पिंपली, बालासोर, चिनसुरा, कासीम बझार, पाटणा, मच्छलीपट्टनम, पुलिकत इ. ठिकाणी वखारी स्थापन केल्या; परंतु इंग्रज-फ्रान्स यांच्या संघर्षाच्या वेळी ही सर्व ठाणी गमवावी लागली.

इ.स. १६४८ मध्ये डचांच्या स्वातंत्र्याला राजनैतिक मान्यता मिळाली. उत्तर अमेरिकेतदेखील डचांनी वसाहत स्थापून तिला 'न्यू ॲमस्टरडॅम' असे नाव दिले होते. १७ व्या शतकात इंग्रजीमुळे त्याचे रूपांतर न्यूयॉर्कमध्ये झाले. गियाना, ब्रझील येथे वसाहती स्थापन केल्या.

### २.४.४ इंग्लंडचे प्रयत्न

**१) जॉन कॅबेट :** इंग्लडचा राजा ७ वा हेन्री याने जॉन कॅबेटचा या जिनोआच्या इटालियन खलाशाला भारत व चीन-जपानकडे जाण्याचा सागरी मार्ग शोधण्यास आर्थिक मदत केली. त्याने वायव्य दिशेने प्रवास करुन अज्ञात प्रदेश शोधण्याचा प्रयत्न केला. अटलांटिक समुद्रपार करुन उत्तर अमेरिकेच्या ईशान्येकडील समुद्रकिनारा इ.स. १४९७ मध्ये त्याने शोधून काढला. त्याला न्यू फाऊंड लॅण्ड असे नाव दिले. दुसऱ्या वर्षी त्याने ग्रीन लँड व लॅब्रडोर हे प्रदेश शोधून काढले. या प्रदेशावर त्यानंतर फ्रो-बिशर (१५७६) गिलबर्ट (१५८४) डेव्हीस (१५०६) इ. अनेक वेळा जाऊन उत्तर अमेरिका व कॅनडाचा प्रदेश शोधून काढला.

**२) फ्रांसिस ड्रेकचा धाडसी दरोडा :** इंग्लंडमधील धाडसी खलाशी फ्रान्सिस ड्रेक, हॉकेन्स, ऑफक्झेनहॅम, कॅव्हेडिश इत्यादीने छोट्या परंतु वेगवान युद्धसज्ज नौकांच्या सहाय्याने अमरिकेकडून स्पेनकडे येणार्या व्यापारी जहाजांवर हल्ले करत असे. पेरुमधील बंदरावर हल्ला करुन ट्रेकने गोल्डन हॅण्ड (सोनेरी हरिण) हे सोन्याने भरलेले जहाज लुटले. तो उत्तर अमेरिकेच्या उत्तर टोकाला वळसा घालून व्हँकोव्हरपर्यंत पोहोचला. तेथून तो पश्चिमेस जावाला पोहोचला. हिंदी महासागरातून दक्षिण आफ्रिकेच्या दक्षिण टोकास वळसा घालून तो तीन वर्षांनी इंग्लंडला पोहोचला. तेव्हा राणी एलिझाबेथने त्याचा मोठा सन्मान केला. इंग्लंडचा हा पृथ्वी प्रदक्षिणा करणारा पहिला प्रवासी होय. राणीने त्याला 'सर' हा बहुमानाचा किताब देऊन 'नाईट' (सरदार) केले. ड्रेकच्या कृत्याने स्पेन खवळले व त्याने इंग्लंडशी सामना केला. यामध्ये स्पेनचा पराभव झाला.

**३) सर वॉल्टर रॅले व कॅप्टन स्मिथ :** सर वॉल्टर रॅले याने इ.स. १५८४ मध्ये उत्तर अमेरिकेत व्हर्जिनिया ही वसाहत शोधून काढली व राणी एलिझाबेथच्या नावाने वसाहत स्थापन करण्याचा प्रयत्न केला, पण अपयश आले. पहिल्या जेम्सच्या काळात इ.स. १६०७ मध्ये कॅप्टन स्मिथ याने व्हर्जिनिया येथे वसाहत स्थापन केली. येथील हवा रोगट व रेड इंडियन लोकांचा त्रास झाला. या वसाहतीमधून तंबाखूचे उत्पादन घेतले.

**४) प्युरिटन पंथाची वसाहत :** पहिल्या जेम्सच्या काळात धर्म स्वातंत्र्यावर गदा आल्यामुळे इंग्लंडमधील प्युरिटन पंथाच्या काही लोकांनी उत्तर अमेरिकेतील हडसन नदीच्या उत्तरेकडील प्रदेशात इ.स. १६२०-४० च्या दरम्यान वसाहती स्थापन केल्या. प्लिमथ, कनेक्टिकट, न्यू हॅम्पशायर, होंड आयलंड, मॅसॅच्युसेट्स, मेरिलँड, पेन्सिल्व्हानिया, उत्तर कॅरोलिना, दक्षिण कॅरोलिना, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, डिलावेअर, जॉर्जिया इ. वसाहती होत्या. यांनाच न्यू इंग्लंड वसाहती म्हणतात. प्युरिटन्स लोकांच्या पहिल्या तुकडीस 'पिलग्रीम फादर्स' असे म्हणतात. त्यांनी स्थापन केलेल्या वसाहतीस 'न्यू प्लीमथ' म्हणतात.

**५) चॅन्सेलर :** या इंग्लिश धाडसी गृहस्थाने ईशान्य दिशेने पूर्वेकडे जाणारा जलमार्ग सापडल्यास पाहावा या हेतूने १५५३ मध्ये सफर केली होती. परंतु उत्तरेकडील समुद्र बर्फाच्छादित असल्याने ऑर्केजल या बंदरापर्यंत पोहोचल्यानंतर त्याला मागे परतावे लागले.

**इंग्लंडच्या वसाहती :** इ.स. १६०३ ते १७३२ या काळात उत्तर अमेरिकेत १३ वसाहती इंग्लंडने स्थापन केल्या. इ.स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. इ.स. १६०७ मध्ये कंपनीचा प्रतिनिधी कॅप्टन विल्यम हॉकीन्स याने जहांगीर बादशाहची भेट घेऊन वखार स्थापण्याचा प्रयत्न केला; परंतु अपयश आले. त्यानंतर इ.स. १६१५ मध्ये सर थोमस रो याचे शिष्टमंडळ आले. त्याने परवानगी प्राप्त केली. त्यामुळे सुरत, मच्छलीपट्टण, आग्रा, अहमदाबाद, मलबार, मद्रास, हरिहरपूर, बलासोर, हुगळी, मुंबई, कलकत्ता इ. ठिकाणी वखारी स्थापन केल्या. क्रोम्बेलने इ.स. १६५७ मध्ये नवीन सदन देऊन ईस्ट इंडिया कंपनीच्या वाढीला चालना दिली. ७ लाख ४० हजार पौंडाचे नवे भांडवल उभारुन कंपनीने व्यापार वाढवला.

### २.४.५ फ्रान्सचे प्रयत्न :

स्पेन व पोर्तुगालचा व्यापार व वसाहतविषयक उत्कर्ष पाहुन फ्रान्सने देखील व्यापारी स्पर्धेमध्ये प्रवेश केला. फ्रान्सच्या राजाश्रयाखाली व्हेरोझनो या इटालियन खलाशाने उत्तर कॅरोलिना ते न्यूयॉर्क या किनार्याखाली अनेक खाड्यांचा व उपसागराचा शोध लावला. जॅक कार्टिये या फ्रेंच संशोधकाने अमेरिकेतील सेंट लॉरेन्स नदीच्या मुखाचा प्रदेशाचा शोध लावला. मोट्रियल हे नवे शहर वसवले. ही पहिली वसाहत स्थापन केली. डी वेशझिनो, डी शॅम्पलेन, ला झालू, लुई जोविएट व जाक मार्केट यांच्या प्रयत्नामुळे कॅनडा, मिसिसिपी आणि सेंट लॉरेन्सच्या नदीच्या खोर्यात वसाहती स्थापन केल्या.

फ्रान्सचा राजा चौथा हेन्री याच्या काळात फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करण्यात आली. फ्रान्सने कनाडा, आफ्रिका व पूर्वेकडील इंडोचायना आणि मादागास्कर व भारत इतयादी क्षेत्रात वसाहती स्थापन केल्या. भारतामध्ये पाँडेचरी, चंद्रनगर, माटे, मच्छलीपट्टण, सुरत इ. ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. डुप्ले याने वसाहती वाढवण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सचा भारतात बांदिवॉशीच्या लढाईत व अमेरिकेत ही इंग्लंडने पराभव केला.

### २.४.६ इटालियनचा प्रयत्न :

**१) अमेरिगो व्हेस्पुशी :** कोलंबसपासून स्फूर्ती घेऊन इटालियन खलाशी अमेरिगो याने इ.स. १४१७, इ.स. १४१९, इ.स. १५०१, इ.स. १५०३ अशा चार सफरी अमेरिकेत केल्या. त्याने उत्तर व दक्षिण अमेरिकेचा किनारा शोधला. ५ अंश ते १० अंश रेखांशपर्यंतचा दक्षिण अमेरिकेचा किनारा शोधून काढला. नवीन खंडाचा संशोधक अमेरिगो याच्या सन्मानार्थ त्या प्रदेशाला अमेरिका असे नाव द्यावे, असे जर्मन भूगोलतज्ञ वोल्ड सिमुल्लर याने सुचवले व त्या प्रदेशाला अमेरिका नाव दिले.

**२) मार्को पोलो :** व्हेनिस नगरात राहणार्या मार्को पोलोने इ.स. च्या १३ व्या शतकात वडील व चुलत्याबरोबर चीनचा प्रवास केला. तेथील कुबलाईखान राजाकडे नोकरी मिळवून राजदूत म्हणून काम केले. चीन व आसपासच्या प्रदेशात प्रवास करुन त्याने आपले प्रवास वर्णन लिहिले. त्यामुळे युरोपियनांचा नवीन प्रदेश व तेथील संपत्तीची माहिती मिळाली. अनेकांनी त्या प्रदेशात प्रवास केला.

### २.४.७ रशिया व इतर राष्ट्रांचे प्रयत्न

उत्तर रशियाच्या समुद्र किनाऱ्याकडून पूर्वेकडे जाण्याकरिता ईशान्य दिशेने जाण्याचा विलोम्बी याने प्रयत्न केला. परंतु त्याला यश आले नाही. स्वीडन, डेन्मार्क या राष्ट्रांनी प्रयत्न केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) भौगोलिक शोधासाठी विविध खलाशांचे प्रयत्न सांगा.

## २.५ भौगोलिक शोधाचे परिणाम

पूर्वेकडील देशामध्ये जाण्याकरिता नवीन जलमार्गाचा शोध लागल्याने व त्याचबरोबर नवीन भूप्रदेशाची ओळख झाल्याने त्याच्या मानवी जीवनावर दूरगामी परिणाम झाला. युरोपियन लोकांचे व्यापार व वसाहती या माध्यमातून आशिया, आफ्रिका, अमेरिकन देशातील लोकांशी संबंध आला. त्याचप्रमाणे इंग्लंड-फ्रान्स या दोन देशांमध्ये सतत युद्धे झाली. वेगवेगळ्या भागातील लोकांशी संबंध आल्याने कलाशास्त्र या क्षेत्रात प्रगती झाली. याचा सर्व क्षेत्रावर परिणाम झाला.

### २.५.१ पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार :

भौगोलिक शोधामुळे पूर्वेकडील देशांकडे जाणारे जलमार्ग प्राप्त झाले. त्यामुळे युरोपीय लोकांचा संबंध वाढला. ज्या प्रदेशात वसाहती स्थापन केल्या त्या प्रदेशात पाश्चात्य संस्कृती, युरोपीय भाषा, ख्रिस्ती धर्म, युरोपीयन कला, विज्ञान, पोशाख, चालीरीती, सामाजिक संस्था, राजकीय संघटना या सर्व गोष्टी नव्या जगात आणल्या. त्याने संवर्धन केले. त्यांच्या मते पूर्वेकडील देश सर्वच बाबतीत आपल्यापेक्षा खूप मागासलेले आहेत. त्यांना सुधारण्याचे, सुसंस्कृत करण्याचे महनीय कार्य नियतीने आपणावर सोपविले आहे. श्वेतवर्णियांनी कृष्णवर्णियांना सुधारण्याचे हे दैवी कार्य मोठ्या निष्ठेने व जबाबदारीने केलेच पाहिजे या भूमिकेतून त्यांनी आरंभिले.

### २.५.२ युरोपियन लोकांना जगाची माहिती :

नव्या जगाच्या शोधामुळे युरोपियन लोकांना ज्ञात असलेल्या जगापेक्षा कितीतरी पटीने नव्या जगाची माहिती झाली. आफ्रिकेच्या जंगलात, दक्षिण अमेरिकेच्या खोर्यात, हिमालयासारखा पर्वतराशीवर गेले. जगाच्या विविध भागात गेले. त्यामुळे त्यांना मानववंश, नव्या वनस्पती, नव्या संस्कृती, पृथ्वीविषयीच्या भूरचनेविषयी नवीन माहिती प्राप्त झाली. ज्ञानाच्या नव्या शाखा निर्माण झाल्या. त्यामुळे नव्या कल्पना, ज्ञानाविषयी आस्था व आत्मियता निर्माण झाली.

### २.५.३ व्यापारवाढ :

युरोपातील डबघाईस आलेल्या व्यापारास स्पर्धेमुळे पुन्हा गती आली. बहुतेक सर्व देशांचा अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. युरोपातील सर्व राष्ट्रे वसाहतीमधून कच्चा माल आणून तो पक्का करुन पुन्हा त्याच प्रदेशात जादा किंमतीने विकत असे. युरोपात आयात होणार्या वस्तू, उत्तर अमेरिकेतून : इमारती लाकूड, धान्य, पशुधन, चहा, कॉफी, ऊस, मका, व्हेल माशाचे तेल, कातडी, कोको, साखर, चोकलेट, बटाटे, तंबाखू, क्विनाईन, नीळ, चिनीमातीची भांडी, दक्षिण अमेरिकेतून : खनिज पदार्थ, सोने, कॉफी, मासे, फर, लोकर. मेक्सिको व पेरु : सोने, बोलिव्हिया - चांदी, इराण - गालीचे, चीन - रेशीम. भारत - कापूस, खनिज पदार्थ, मसाल्याचे पदार्थ, चहा, आफ्रिकेतून - सोने, हिरे. आग्नेय आशिया, ईस्ट इंडीज बेटे, मलाया, जावा - मसाल्याचे

पदार्थ, रबर इत्यादी युरोपच्या बाजारात येऊ लागले. व्यापार, आरमार, वसाहती या तिन्ही क्षेत्रात इंग्लंडने प्रथम क्रमांक पटकावला होता. १८ व्या शतकात इंग्लंडचा आयात व्यापार १५ कोटी १० लक्ष डॉलर्सने वाढला होता.

### २.५.४ अटलांटिक महासागराचे महत्त्व वाढले :

मध्ययुगात भूमध्य समुद्र व बाल्टिक समुद्र यांना व्यापारी महत्त्व होते. त्यामुळे इटली व तुर्कस्थान यांना व्यापारी क्षेत्रात महत्त्व प्राप्त झाले होते. पूर्वेकडील देशाकडे जाण्याचा नवा मार्ग हा अटलांटिक महासागरातून होता. त्यामुळे पाश्चात्य व पौर्वात्य देशांमधील व्यापाराचा केंद्रबिंदू अटलांटिक महासागर बनला. त्यामुळे लिस्बन, लंडन, ॲण्टवर्प, ॲमस्टरडॅम यासारखी बंदरे पुढे आली. परिणामी इटली व बाल्टिक समुद्रावरील जिनोआ, व्हेनिस, हॅम्बर्ग, ल्युवेक या बंदराचे महत्त्व कमी झाले.

### २.५.५ ख्रिस्ती धर्माचा प्रसार :

साम्रज्यवादी राष्ट्रांनी राजकीय व आर्थिक सत्तेच्या प्राप्तीबरोबरच त्यांनी स्वत:च्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार वसाहतीमध्ये केला. अनेक मिशनरी दूरदूरच्या देशात जाऊन धर्मप्रसार करु लागले. ख्रिस्ती अनुयायांच्या संख्येत, चर्चेसच्या संख्येत, शिक्षण संस्थान यांच्यात दिवसेंदिवस वाढ होत गेली. व्यापारी कंपन्यांप्रमाणेच ख्रिस्ती धर्माची मिशन्स अनेक ठिकाणी स्थापन झाली. त्यामुळे ख्रिस्ती धर्म हा जागतिक धर्म बनला.

### २.५.६ साम्रज्यवादाला प्रारंभ :

युरोपातील वर उल्लेखिलेल्या देशांनी अमेरिका, आशिया, आफ्रिका या तीन खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या. प्रारंभी व्यापार-विस्तार हा प्रमुख हेतू होता तरी व्यापारी कंपन्यांनी मायदेशाकडून जे अधिकार प्राप्त केले, त्याआधारेच आरमार वाढ व साम्रज्यविस्तार घडवून आणला. वसाहतीवर त्यांनी राज्य निर्माण करुन स्थानिक लोकांची आर्थिक पिळवणूक केली. व्यापारी स्पर्धेतून वसाहत स्पर्धा, आरमारी युद्धे आणि वसाहत विस्तार यामुळे अनेक युरोपियन राष्ट्रांत युद्धे झाली.

### २.५.७ आर्थिक क्षेत्रातील प्रचंड उलाढाल :

व्यापारी उलाढालीसाठी व आरमाराकरिता बोटी व जहाजाचा खर्च यासाठी लागणारा पैसा पुरवठा करण्यासाठी पतपेढ्या (बँका) स्थापन झाल्या. व्यापारी कंपन्यांच्या जोडीला बँका स्थापन झाल्या. त्यांनी ठेवी स्वीकारणे, तारणावर कर्जे देणे, देवघेवीचे व्यवहार, कमिशन घेऊन करणे इ. कामे बँका करु लागल्या. खुला व्यापार आणि अनिर्बंध व्यापार (संरक्षित व्यापार) हे या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये होय. श्रीमंत व प्रगत कारखाने प्रधान राष्ट्राने खुला व्यापार या धोरणाचा आग्रह धरला तर गरीब-अविकसित व बहुतेक गुलामगिरीत असलेल्या राष्ट्रांनी संरक्षित व्यापार धोरणाचा अवलंब करावा असा आग्रह धरला. ज्या देशाची आर्थिक प्रगती झाली त्या देशाची आंतरराष्ट्रीय व्यापारात मक्तेदारी निर्मान झाली होती. या आर्थिक साम्रज्यात इंग्लंड हे प्रमुख राष्ट्र होते.

munotes.in

### २.५.८ नव्या भांडवलदार व व्यापारी वर्गाचा उदय :

व्यापारी क्रांतीमुळे युरोपीय समाजरचनेत महत्त्वाचे बदल घडून आले. भांडवलदार, व्यापारी, दलाल, गुमास्त्यांचा वर्ग उदयास आला. त्याचप्रमाणे सावकार, पतपेढ्यांचे मालक, दुकानदार यांचाही उदय झाला. व्यापारात प्रचंड फायदा मिळाल्याने हा वर्ग अधिकाधिक श्रीमंत होऊ लागला. त्यांच्या हाती आर्थिक सत्ता केंद्रित झाल्याने त्यांचा सरकारवर मोठा प्रभाव निर्माण झाला. त्यामुळे नंतरच्या काळात व्यापारवादाची नवी आर्थिक विचारसरणी उदयास आली. राजकीय जीवनाची सूत्रे जुन्या राजसत्तेकडून व सरदार वर्गाकडून त्यांच्या हाती आली. त्यामुळे औद्योगिक क्रांती, व्यापारवाढ, लोकशाहीत यांना अग्रस्थान प्राप्त झाले.

### २.५.९ मौल्यवान धातुंचा युरोपकडे ओघ :

भौगोलिक शोधामुळे नवीन भूप्रदेश ताब्यात आला. त्यामुळे मौल्यवान धातूंचे उत्पादन वाढले. अमेरिका, पेरु, मेक्सिको, बोलिव्हिया या देशातून सोने व चांदी प्राप्त झाली. या संपत्तीमुळे पूर्वेकडील देशांशी मोठा व्यापार सुरु केला. या संपत्तीचे समान वाटप नसल्याने कामगार, कारागीर यांना काहीच फायदा झाला नाही.

### २.५.१० नौकानयन तंत्रज्ञानात प्रगती :

युरोपमध्ये भौगोलिक शोधाच्या काळात नौकानयन तंत्रज्ञानात मोठअ बदल झाला. अनेक ठिकाणी नावीक शिक्षणाची केंद्रे उघडली गेली. नवीन प्रदेशाचे व जलमार्गाचे नकाशे नव्याने तयार केले. समुद्रपर्यटनाविषयी अनेक लेखकांनी ग्रंथ प्रसिद्ध केले. नावीक केंद्रामधून हवामान, वार्याची दिशा यांचा शास्त्रीय अभ्यास सुरु झाला. जलदगतीने व वार्याशी सामना करणारी जहाजे बांधण्यात आली.

### २.५.११ व्यापारी मंडळाची स्थापना :

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप प्राप्त झाल्याने एकट्या व्यक्तीने व्यापार करण्याऐवजी अनेक देशांत व्यापारी मंडळाची / संस्थांची स्थापना करण्यात आली. ईस्ट इंडिया कंपनी या व्यापारी मंडळाने भारतात व इतर अनेक ठिकाणी व्यापाराबरोबरच साम्रज्य स्थापन केले. ही व्यापारी मंडळे राजाच्या खास सनदेने स्थापन झाली. त्यांनाच वसाहतीमधील व्यापाराची सनद देण्यात आली. या व्यापारी मंडळांनी स्वत:च्या संरक्षणासाठी किल्ले-कोट, गढी बांधली. सैन्य, आरमार, जहाजे निर्माण केली. त्यास राजाने सवलत दिली. अशा व्यापारी कंपन्या इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क, प्रशिया इ. देशांत स्थापन झाल्या. व्यापाराला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. त्यातून राष्ट्रवाद निर्माण झाला.

### २.५.१२ औद्योगिक बदल :

व्यापारवाढ, वसाहतीची स्थापना, कच्चा मालाचा पुरवठा, बाजारपेठेवर वर्चस्व, बँक व्यवसायीतील प्रगती यामुळे आर्थिक प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. त्याचा परिणाम औद्योगिक क्षेत्र, शेतीवर झाला. रेशमी, तलम सुती कापडाच्या गिरण्या स्थापन झाल्या.

जुने उद्योग पुन्हा प्रगतीपथावर आले. कारागीर संघाचे उत्पादन कमी होऊन भांडवलदार वर्गाचे उत्पादन वाढले. कच्चा माल व पैसा पुरवठा करुन मोठ्या प्रमाणात पक्का माल कारागीराकडून तयार करुन घेतला जात असे. यातूनच पुढे औद्योगिक क्रांती घडून आली.

**२.५.१३ युरोपात प्रबळ राजेशाहीचा उदय :**

नवीन भूप्रदेश व जलमार्ग याच्या शोधामुळे व्यापारी वर्गाचा उदय झाला. नव्या परिस्थितीत व्यापारी हितसंबंधाच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी देशांतर्गत शांतता व खंबीर सरकारची गरज होती. यासाठी प्रचलित सरंजाम व उमराव यांची सत्ता नष्ट करुन राजकीय एकीकरण व सामर्थ्यवान असा राजसत्तेला पाठिंबा दिला. त्यामुळे युरोपमध्ये राजेशाही प्रबळ निर्माण झाली.

**२.५.१४ युरोपीयन देशात वाढती स्पर्धा :**

नवीन भूप्रदेश व जलमार्ग यांच्या शोधामुळे युरोपमध्ये राष्ट्रांच्यात सत्ता स्पर्धा सुरु झाली. यामध्ये स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, फ्रान्स इ. देशांच्यात व्यापाराबद्दल स्पर्धा व संघर्ष सुरु झाला. त्यांनी पूर्वेकडील देशात व्यापार करुन जास्त संपत्ती मायदेशी पाठवली. या स्पर्धेतून स्पेन-पोर्तुगाल यांच्यात वाद निर्माण झाला. शेवटी पोप सहावा अलेक्झांडर याने मध्यस्थी केली. १४९४ च्या तोडेसिलासच्या तहानुसार वाद मिटला. त्यानुसार ब्रझील, आफ्रिका, भारत, ईस्ट इंडीज या प्रदेशाचा व्यापार पोर्तगालकडे तर वेस्ट इंडीज, उत्तर अमेरिका, ब्रझील सोडून दक्षिण अमेरिका या प्रदेशातील व्यापार स्पेनकडे देण्यात आला.

**आपली प्रगती तपासा :**

१) भौगोलिक शोधाचे परिणाम सांगा.

## २.६ सारांश

प्राचीन काळापासून युरोपीयन राष्ट्रांचे पूर्वेकडील देशांशी व्यापारी संबंध होते. या व्यापारातून प्रचंड नफा मिळवून आपल्या देशाची प्रगती आर्थिक भरभराट केली. परंतु इ.स. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅटिनोपल शहर जिंकले आणि पूर्वेकडे जाणारा भूमार्ग बंद केला. त्यामुळे नव्या जलमार्गाचा शोध घेण्याचा युरोपीय राष्ट्रांनी प्रयत्न केला. यामध्ये पोर्तुगीज, स्पेन, इटाली ह्या प्रमुख राष्ट्रांनी खलाशांना पाठींबा व आर्थिक मदत देऊन जलमार्गाच्या मोहिमा सुरु केल्या. अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि आशिया खंडातील प्रदेशांचा शोध

munotes.in

लागला. युरोपीय राष्ट्रांनी साम्रज्यवादी धोरण स्विकारुन वसाहती प्रदेशाची प्रचंड लुट केली.

## २.७ प्रश्न

१) भौगोलिक शोधांच्या कारणांची चर्चा करा.

२) भौगोलिक शोधासाठी युरोपीय राष्ट्रांचे प्रयत्न सांगा?

३) भौगोलिक शोधाचे परिणाम स्पष्ट करा.

४) टिपा लिहा.

अ) पोर्तुगीज खलाशांचे प्रयत्न

ब) पूर्वेकडील देशांशी जोडणारे मार्ग

❖❖❖❖

munotes.in

# ३

# धर्मसुधारणा चळवळ

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ धर्मसुधारणा चळवळ म्हणजे काय?

३.३ धर्मसुधारणा चळवळीची कारणे

३.४ धर्मसुधारणा चळवळीतील नेते

३.५ मार्टिन ल्युथरचे कार्य

३.६ धर्मसुधारणा चळवळीचे स्वरूप

३.७ युरोपमध्ये धर्मसुधारणा चळवळीचा प्रसार

३.८ रोमन कॉथोलिक पंथाची प्रतिधर्मसुधारणा चळवळ

३.९ धर्मसुधारणा चळवळीचे परिणाम

३.१० सारांश

३.११ प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

१) धर्मसुधारणा चळवळीची व्याख्या समजावून देणे.

२) धर्मसुधारणा चळवळीची कारणे - स्वरूप यांची माहिती मिळविणे.

३) धर्मसुधारणा चळवळीतील नेत्यांची भूमिका स्पष्ट करणे.

४) चळवळीचे स्वरूप कसे होते?

५) धर्मसुधारणा चळवळीमुळे झालेले परिणाम

## ३.१ प्रस्तावना

सोळाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक महत्त्वाच्या घटना युरोपमध्ये घडल्या. त्यामुळे परंपरागत धार्मिक मूल्यांवरचा विश्वास उडाला. मध्ययुगीन धार्मिक एकतेच्या कल्पनेला आधुनिक मानवतावाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यवाद यामुळे तडा गेला. वैचारिक जीवनावरही धर्माचे वर्चस्व असावे ही कल्पना प्रबोधन काळात नष्ट झाली. धर्मसुधारणा चळवळ ही

केवळ धार्मिक बदलाची चळवळ नसून नव्या युगाची नांदी होती. या चळवळीने सर्व युरोपमध्ये बदल घडवून आणला. अनेक देशांत या चळवळीचे नेतृत्व करणारे अनेक विचारवंत, सुधारक उदयाला आले. त्यामुळेच धर्मसुधारणा चळवळ सुरु झाली.

## ३.२ धर्मसुधारणा चळवळ म्हणजे काय?

मध्ययुगाचे ख्रिस्ती धर्म, धर्मतत्त्वे, विचार, धर्मसंस्था यांच्यातील गुणदोष व धर्मगुरु आणि त्यांचे आचार-विचार यांचे निरीक्षण करुन त्यांच्यातील दोष दूर करण्यासाठी विचारवंतांनी जी चळवळ सुरु केली. त्यास धर्मसुधारणा चळवळ म्हणतात किंवा धार्मिक बंधनाला व जुलमाला कंटाळून त्याच्याविरुद्ध आवाज उठविण्याचे कार्य म्हणजे धर्मसुधारणा चळवळ होय किंवा सोळाव्या शतकात धार्मिक जीवनात जे क्रांतिकारी बदल घडून आले त्यांना प्रोटेस्टंट चळवळ अथवा धर्मसुधारणा (Reformation) असे म्हणतात.

## ३.३ धर्मसुधारणा चळवळीची कारणे

ख्रिश्चन धर्माच्या आरंभापासून ते धर्मसुधारणा चळवळीपर्यंत पोप, बिशप, फादर्स व धर्मसंस्थेतील इतर सर्व पदाधिकारी हे सर्व विद्याशास्त्रसंपन्न सत्चारित्र्यवान, प्रामाणिक, साधी राहणी व उच्च विचारसरणीवर विश्वास ठेवणारे व समाजसेवा करणारे होते. परंतु चर्च या संस्थेजवळ देणगी, वर्गणी व कर या मार्गांनी जमा होणार्या पैशांमुळे व पैसा गोळा करण्याच्या काही भ्रष्ट मार्गामुळे अधिकारी वर्गाला विलासात व थाटात जगण्याची सवय लागली. १६ व्या शतकात उत्तर युरोपमध्ये पोपची सत्ता झुगारुन देण्यास प्रारंभ झाला. नव्या प्रोटेस्टंट पंथाचा उदय झाला. त्याने धर्मसत्तेच्या वर्चस्वाला आव्हान दिले. धर्मसत्तेला अनपेक्षित विरोध होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. त्याच गोष्टी धर्मसुधारणा चळवळीची कारणे बनली ती पुढीलप्रमाणे -

### ३.३.१ प्रबोधनाची चळवळ :

वैचारिक प्रबोधन चळवळीमुळेच धर्मसंस्थेचे स्वरूप बदलू लागले. लोकांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. प्रबोधन व धर्मसुधारणा चळवळीने नवीन समाजव्यवस्था निर्माण केली. विचारवंत, साहित्यिक आणि कलावंतांनी निधर्मीवादाचा पुरस्कार केला. मानवतावाद व व्यक्तिस्वातंत्र्यवाद यामुळे नव्या युगाचा प्रारंभ झाला. त्यामुळे पोपच्या सत्तेला विरोध होऊ लागला. धर्मसंस्थेच्या स्वरूपात बदल घडवून आणण्याची मागणी पुढे आली. त्यातून धर्मसुधारणा चळवळ सुरु झाली.

### ३.३.२ राजकीय विरोध :

धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यातील संघर्ष हे सुद्धा धर्मसत्तेचे वर्चस्व कमी होण्याचे एक कारण आहे. सुरुवातीच्या काळात ज्यांना पोपची राज्ये असे नाव होते. त्या राज्यांची व्यवस्था धर्मसंस्थेकडे होती. त्या राज्यावर सर्व प्रकारचे अधिकार धर्मसंस्थेचे होते.



munotes.in

नंतरच्या काळात रोमन साम्रज्याचा राजकीय वारसा धर्मसंस्थेकडे आला. राष्ट्रराज्यांच्या अंतर्गत राजकारणात धर्मसंस्थेने हस्तक्षेप केल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या. तेराव्या शतकात पोप आठवा बॉनिफेस आणि इंग्लंड, फ्रान्स स्पेनमधील राजसत्ता यांच्यात धर्मसंस्थेच्या मालमत्तेवर कर बसविण्याच्या प्रश्नावरुन संघर्ष निर्माण झाला. तत्कालीन राजांनी धर्मसंस्थेच्या मालमत्तेवर कर बसवले. त्यामुळे घोषणापत्र काढून जो कोणी कर बसवेल त्यास धर्म बहिष्कृत करण्यात येईल अशी धमकी दिली. या संघर्षात धर्मसत्तेवर राजसत्तेचे वर्चस्व स्थापन झाले.

**३.३.३ मध्यमवर्गाचा उदय :**

प्रबोधनकाळातील वैचारिक क्रांतीचा युरोपमधील समाज व्यवस्था व आर्थिक व्यवस्था यावर मोठा परिणाम झाला. धर्मयुद्धे आणि नव्या जगाचा शोध यामुळे व्यापाराचे क्षेत्र वाढले. यातूनच नवा व्यापारी वर्ग उदयाला आला. त्यांनी सरंजामदार वर्गाची जागा घेतली. आदर्श धार्मिक जीवनाची कल्पना पाठीमागे पडली. त्याच्याऐवजी भरपूर पैसा कमवावा व सुख जीवन जगावे यासाठी मध्यमवर्गाची धडपड सुरु झाली. त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यामुळे या वर्गाने धर्मसंस्थेस विरोध करण्यास सुरुवात केली.

**३.३.४ सामान्य जनतेचा धर्मसंस्थेला विरोध :**

धर्मसत्ता व राजसत्ता संघर्ष आणि धर्मसंस्थेतील यादवी यामुळे युरोपातील सामान्य जनता धर्मसंस्थेच्या विरोधात गेली. जर्मनी, नॉर्वे, स्वीडन येथील पोपपदावर असलेला इटालियन प्रभाव, लेटीन भाषेतून चालणारे व्यवहार आणि धर्मगुरुंचा लोभीपणा व भ्रष्टाचार या गोष्टी सामान्य जनतेला पसंत नव्हता. त्यामुळे त्यांनी धर्मसत्तेला विरोध करण्यास प्रारंभ केला.

**३.३.५ ख्रिश्चन धर्मातील अनिष्ठ प्रथा व दोष :**

मध्ययुगात धर्मसंस्थेत अनेक प्रथा नव्याने निर्माण झाल्या. अनेक धर्मगुरुंनी वाममार्गाने पैसा मिळवून ऐषारामात व अनैतिक जीवन जगत असे. त्यांच्या व्यभिचारी व स्वैराचारी जीवनाचा लोकांना कंटाळा आला होता. अनेक आळशी, भ्रष्ट, रंगेल लोकांनी अधिकाराची पद बळकावली होती. नालायक व निरक्षर लोकांची वर्णी तेथे लागली होती. धर्मसंस्थेला एक प्रकारचे बाजारी स्वरूप आले होते. तिथे नीती, विचार, तत्त्वज्ञान, जनसेवा शिल्लक नव्हती. त्यामुळे धर्मसंस्थेवर टीका होऊ लागल्या. हे सर्व नष्ट करुन धर्मात सुधारणा घडवून आणली पाहिजे, असे म्हणणार्या सुधारणांचा वर्ग उदयास आला. त्यातून धर्मसुधारणा चळवळीला प्रारंभ झाला.

**३.३.६ धर्मगुरुकडून अधिकारांचा दुरुपयोग :**

रोमन केथालिक चर्चमधील धर्मगुरुंनी साधी राहणी व उच्च विचारसरणी या आदर्शाकडे पाठ फिरवून, संपत्ती व राजकीय सत्ता प्राप्त करण्याच्या ध्यास घेतला. त्यातूनच त्यांनी सत्तेचा गैरवापर करण्यास सुरुवात केली. पैशांची अडचण निर्माण झाली

तेव्हा पापमुक्तीच्या दाखल्यांच्या विक्रीची कल्पना मांडली. मोठेपणा मिळवण्याच्या प्रयत्नातूनच राजकारणात हस्तक्षेप केला. चर्चच्या मालमत्तेवरील कराला विरोध केला. दहावा लिओ या पोपने रोममध्ये सेंट पिटर्सच्या बांधकामासाठी पैसा गोळा केला. त्यानेच चर्चमधील अधिकारांच्या जागांची विक्री करुन आपणाला अनुकूल अशी माणसे नेमली. या धर्मगुरुंनी सत्तेचा गैरवापर केल्याने धर्मसुधारणा चळवळ सुरु झाली.

### ३.३.७ इतर धर्मोपदेशकांचा पोपला विरोध :

मध्ययुगामध्ये ख्रिश्चन धर्मात सर्व सत्ता पोपच्या हाती होती. पोप स्वत:च्या लहरीनुसार अधिकाराचा वापर करत असे. त्यामुळे कनिष्ठ धर्मगुरु आणि धर्मापदेशकाची नेहमीच कुचंबना होत असे. आपल्यावर होणार्या अन्यायाविरोधी त्यांनी पोपच्या सत्तेला विरोध करण्यास सुरुवात केली. तेराव्या शतकात दक्षिण फ्रान्समधील ॲल्बी येथील अनेक धर्मोपदेशकांनी अनेक संस्कारांवर टीका केली. फ्रान्समधील वॅल्डो याच्या अनुयायांनी चर्चमधील वाईट चालीरीती व धर्मगुरुंच्या चैनी जीवनावर टीका केली.

### ३.३.८ धर्मसंस्थेतील यादवी :

धर्मसंस्थेतील अंतर्गत संघर्ष हा त्याच्या र्हासाला कारणीभूत ठरला. पोप तिसरा इनोसंट हा कर्तव्यशून्य होता. आपली धार्मिक कर्तव्य न करता संपत्ती प्राप्त करण्यात तो गुंतला होता.



फ्रेंच धर्मगुरु क्लेमंट पाचवा

त्यामुळे धर्मसंस्थेत भ्रष्टाचार वाढला व धर्मसंस्था बदनाम झाली. फ्रान्सचा राजा चौथा फिलीप व पोप आठवा बोनिफेस यांच्यात मालमत्तेवरील कर यावरुन मतभेद झाले. तेव्हा राजा फिलिप याने पोपला रोम सोडून फ्रान्समध्ये ॲव्हिग्नॉन येथे येऊन राहण्याचा हुकूम केला. त्यामुळे पोपवर राजाचे श्रेष्ठत्व प्राप्त झाले. यास 'बॅबिलोनियन बंदिवास' असे म्हणतात. या घटनेमुळे पोपविषयी आदर कमी झाला. या घटनेमुळे दोन पोप निवडण्याची कल्पना निर्माण झाली. इटालीचया धर्मगुरुंनी अर्बन सहावा याला पोप म्हणून निवडले तर फ्रेंच धर्मगुरुंनी क्लेमंट पाचवा याची पोप म्हणून निवड केली. या दोन गटाच्या कार्यपद्धती वेगळा होत्या. या काळाला यादवी युग म्हणतात. कारण दोन्ही गट एकमेकांच्या विरुद्ध सतत झगडत होते. इ.स. १४०९ मध्ये पिसा येथे संयुक्त बैठकीत तिसर्याच व्यक्तीची पोप

म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे तीन गट निर्माण झाले. या घटनेला 'महान पाश्चात्य धर्मविग्रह' असे म्हणतात. या घटनेमुळे धर्मसंस्थेविषयीचा आदर कमी झाला. शेवटी रोमचा बिशप हाच ख्रिश्चन धर्माचा प्रमुख मानण्यात येऊ लागला.

**३.३.९ मुद्रणकलेचा प्रभाव :**

प्रबोधन चळवळीच्या काळात मुद्रणकलेचा शोध लागला. अनेक ग्रंथांच्या हजारो प्रती उपलब्ध झाल्या. त्यामुळे सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोहोचले. मुद्रणकलेमुळेच वैचारिक क्रांती झाली. धर्माचे सत्य स्वरूप लोकांच्या पर्यंत पोहोचले. परिणामी धर्मसुधारणा चळवळीला प्रारंभ झाला.

**३.३.१० विद्वान, लेखक, धर्मसुधारणा नेते यांचे कार्य :**

प्रबोधन चळवळीच्या काळात अनेक विद्वान, लेखक यांनी धर्मसुधारणेची पार्श्वभूमी तयार केली. त्यांनी धर्म, धर्मसंस्थेतील अनेक दोष, वैगुण्ये, धर्मगुरुंचे चैनी-विलासी जीवन यावर प्रचंड टीका केली. इरॅस्मस याने 'मूर्ख स्तुती' या ग्रंथातून अंधश्रद्धेवर टीका केली. सर थोमस मूर याने 'युटोपियन' या ग्रंथात आदर्श समाजरचनेचे चित्र रेखाटले. अनेक धर्म सुधारकांनी आपल्या पद्धतीने समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यामुळेच धर्मचळवळ सुरु झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) धर्मसुधारणा चळवळीची कारणे स्पष्ट करा.

## ३.४ धर्मसुधारणा चळवळीतील नेते

प्रबोधनकाळातल्या साहित्यिक, तत्त्वज्ञ, कलावंत व वैज्ञानिकांनी प्रचलित धर्मसत्तेला धक्के देण्यास प्रारंभ केला. त्यामुळे आतून किडलेल्या धर्मसंस्थेला नष्ट करुन नवीन पद्धती निर्माण करावी, असे लोकांना वाटू लागले. संतापलेल्या धर्मगुरुंनी अनेकांना वाळीत टाकले, तुरुंगात कोंडले, पाखंडी ठरविले व मृत्यूदंडासारख्या कठोर शिक्षा दिल्या. तथापि धर्मसत्तेलाच वेळोवेळी माघार घ्यावी लागले. या चळवळीत विविध देशातील धर्मसुधारणा चळवळीचे महत्त्वाचे नेते.



जॉन विक्लिफ

**१) जॉन विक्लिफ (इ.स. १३२० - इ.स. १३८४) :**

१६ व्या शतकामध्ये धर्मसुधारणा चळवळीवर प्रथम वर्गाचा मोठा प्रभाव होता. या चळवळीचा आद्यप्रवर्तक किंवा धर्मसुधारणेच्या पहाटेचा तेजस्वी तारा असे जॉन विक्लिफ याचे वर्णन केले जाते. तो स्वत: इंग्रज धर्मगुरु असून ऑक्सफर्ड विद्यापीठात धर्मशास्त्राचा प्राध्यापक होता. त्याने बायबलचे भाषांतर केले. धर्मसंस्थेतील भ्रष्टाचार व अनिष्ट प्रथा यावर टीका केल्या. त्याने येशुचा सत्य, दया, सेवा, प्रेमाचा संदेश लोकांना दिला. त्याने इंग्लंडमध्ये जी चळवळ सुरु केली तिला 'लॉर्ड चळवळ' असे म्हणतात. धर्मसत्तेपेक्षा राजसत्ता श्रेष्ठ आहे. 'टाईथ बंदीची' चळवळ सुरु केली. त्यास पाखंडी ठरवून मृत्यूदंडाची शिक्षा दिली. त्याचे प्रेत उकिरड्यावर टाकण्यात आले.

**२) प्रा. जॉन हस (इ.स. १३६९ - इ.स. १४१५) :**

विक्लिफच्याच अनुयायांपैकी प्राग विद्यापीठातील झेक प्राध्यापक जॉन हस याने विक्लिफचे कार्य पुढे सुरु केले. त्याच्या प्रयत्नाने बोटेमियामध्ये चळवळ सुरु झाली. पोपच्या सत्तेवर नियंत्रण असावे. स्वर्गप्राप्तीसाठी पोपच्या दलालांची गरज काय? चर्चला संपत्तीची गरज काय? असे अनेक प्रश्न निर्माण करुन त्याने धर्मसत्तेवर कठोर टीका केली. पोपनी त्याला जिवंत जाळून मारले.

**३) रुचलीन (इ.स. १४५५ - इ.स. १५५२) :**

धर्मसुधारणा चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम रुचलीन याने केले. हा भाषा शास्त्रज्ञ आणि हिब्रू भाषेचा पंडित होता. त्याने बायबलच्या लॅटीन आवृत्तीतील दोष दाखवून दिले. रुचलीन हा मानवतावादी होता.

**४) डेसिडेरियस इरॅसमस (इ.स. १४६६ - इ.स. १५३६) :**

हा डच पंडित असून अत्यंत गरीबीतून वर आलेला होता. सर्व आयुष्य जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, इटाली या देशांत गेले. काही काळ स्टीन येथील धर्ममठ सांभाळले. त्याची

लेखनशैली उपरोधात्मक स्वरूपाची होती. त्याने 'इन प्रेज ऑफ फोली' (मूर्ख स्तुती) या ग्रंथातून धर्मसंस्थेच्या अनिष्ठ प्रथेवर टीका केली. मार्टिन ल्यूथरच्या क्रोधापेक्षाही इरॅस्मसच्या विनोदाने पोपचे जास्त नुकसान केले असे म्हटले जाते.



आलिरच झ्विंगली

**५) आलिरच झ्विवंगली (इ.स. १४८४ - इ.स. १५३१) :**

आलिरच झ्विवंगलीने स्वीत्झर्लंडमध्ये धर्मसुधारणेला प्रारंभ केला. हा रोमन कॅथॉलिक चर्चचा सुधारणावादी धर्मगुरु होता. चर्चमधील गैरप्रकारावर त्याने टीका केली. ल्युथरचा कार्याचा व विचाराचा प्रभाव त्याच्यावर होता. त्याने कॅलव्हिन पंथाची स्थापना केली. त्याच्या कार्यामुळे शहरी विभागात प्रोटेस्टंट कॅटोन्स आणि ग्रामीण विभागात कॅथॉलिक कॅटोन्स याच्यात युद्ध सुरु झाले. कॅपेल येथील लढाईत इ.स. १५३१ मध्ये मारला गेला. त्याच्या मृत्यूनंतरही प्रोटेस्टंट पंथाचा प्रभाव वाढू लागला.

**६) जॉन नॉक्स (इ.स. १५०५ - इ.स. १५७२) :**

रोमन कॅथॉलिक पोपच्या वर्चस्वाखालून स्कॉटलंड धर्मपीठ मुक्त करण्याची कामगिरी केली. स्कॉटिश धर्मसंस्थेचा पाया घालण्याचे श्रेय नॉक्सलाच जाते. त्याचा Appellation हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. स्कॉटलंडमधील प्रोटेस्टंट हे प्युरिटन शाखेचे असून त्यांना प्रेस्बिटेरिअन असे म्हणतात.



**७) जॉन कॅलिव्हन (इ.स. १५०९ - इ.स. १५६४) :**

हा फ्रेंच विद्वान असून त्याने ल्युथरच्या प्रोटेस्टंट पंथाचा प्रसार फ्रान्स, स्वीस, हॉलंड, जर्मनी, हंगेरी, स्कॉटलंडमध्ये केला. त्याच्या कार्याचे प्रमुख केंद्र जिनिव्हा होते. इ.स. १५३६ मध्ये Institutes of christion Religion हा ग्रंथ प्रसिद्ध केला. कॅलिव्हनच्या पंथाला प्युरिटन असे नाव मिळाले. आपल्या कडक शिस्तीमुळे कॅलिव्हनला काही लोक कर्मठ हुकुमशाह म्हणून संबोधतात.

## ३.५ मार्टिन ल्युथरचे कार्य (इ.स. १४८३ - इ.स. १५४६)

युरोपातील धर्मसुधारणेचा अग्रदूत मार्टिन ल्युथरचा जन्म जर्मनीच्या सॅक्सनी प्रांतातील आईलबर्न या ठिकाणी इ.स. १४८३ मध्ये एका खाण कामगारांच्या कुटुंबात झाला. त्याने अनेक अडचणींवर मात करुन एरफर्ट विद्यापीठात उच्च शिक्षण पूर्ण केले. विटेनबर्ग विद्यापीठामध्ये धर्म व तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक झाला. त्याने रोम कॅथॉलिक धर्मसंघटनेचा काही काळ पुरस्कार केला. सेट पॉलच्या 'माणूस - श्रद्धेनेच मुक्ती मिळवू शकतो'. या उपदेशाने धर्माचे खरे रहस्य समजले. तेव्हापासून मार्टिन ल्युथरने भ्रष्ट धर्मगुरु व नीतीभ्रष्ट धर्मावर टीका सुरु केली. तो धर्मसत्तेविरुद्धचा प्रमुख बंडखोर बनला. त्याने धर्मसुधारणेसाठी कार्य पुढीलप्रमाणे केले.

### ३.५.१ पापमुक्ती दाखल्यांची विक्री प्रकरण :

मार्टिन ल्युथर विटेनबर्ग येथे आपला व्यवसाय करत असताना पोप दहावा लिओ याने सेंट पीटरच्या चर्चचे बांधकाम सुरु केले. त्यासाठी पापमुक्तीची प्रशस्तिपत्रे विकून लोकांकडून पैसा उकरण्यास प्रारंभ केला. या जगात ज्यांनी पाप केले असेल त्यांना त्या पापाबद्दल मृत्यूनंतर शिक्षा भोगावी लागते. जो कोणी पापमुक्ती दाखले पोपकडून विकत घेईल त्याला त्याच्या मृत्युनंतर अशी शिक्षा भोगावी लागणार नाही, असा धर्मसंस्थेकडून प्रचार करण्यात आला. टेटझेट नावाच्या धर्मसंस्थेच्या अधिकार्याने देणगीचा पैसा स्वत:साठी वापरला या प्रकाराचा मार्टिनने जाहीरपणे धिक्कार केला.

munotes.in




९५ हरकतीचे मुद्दे

### ३.५.२ ल्युथरचे ९५ हरकतीचे मुद्दे :

पोप दहावा लिओ याचा प्रतिनिधी टेटझेल नावाचा बिशप विटेनबर्गला आल. मार्टिनने पापमुक्तीच्या दाखल्याविषयीची आपली लेखी प्रतिक्रिया त्याने प्रसिद्ध केली. लेखी खलिताची एक प्रत विटेनबर्गच्या चर्चच्या प्रवेशद्वारावर लावली. या खलित्यामध्ये हरकतीचे ९५ मुद्दे असल्याने त्याला 'नाईन्टी फाईव्ह थेसिस' असे म्हणतात. त्यामुळे पोपने इ.स. १५१७ मध्ये ल्युथरला धर्मबहिष्कृत करण्याचा आदेश प्रसिद्ध केला. याच वेळी पोप म्हणाला ’हे आदेश, ज्या अर्थी तू येशूख्रिस्ताच्या सच्चा शिष्याची पिळवणूक करतोय त्या अर्थी हा अग्नी तुला भस्मसात करो.“

### ३.५.३ पोपचे मार्टिन ल्युथरविरोधी फर्मान :

ल्युथरने पोपच्या मुकुटावर व धर्मगुरुंच्या पोटावर प्रहार केला. इ.स. १५२० मध्ये ल्युथरवर पाखंडीपणाचे ४१ आरोप आणि इ.स. १५२१ मध्ये धर्मद्रोह व राजद्रोह केल्याचा आरोप ठेवण्यात आला. जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यात आली. रोमन सम्रट पाचवा चार्ल्स याला हुकूम दिला. त्यानेही आपले राज्य, संपत्ती आणि सर्वस्व पणाला लावून बंडखोर ल्युथरच्या चळवळीची पाळेमुळे खणून टाकण्याचा निर्धार केला.

### ३.५.४ वर्म्स परिषद :

पोपने जर्मन राजांची व धर्मगुरुंची इ.स. १५२९ मध्ये वर्म्स येथे सभा बोलवली. या सभेत ल्युथरला बोलवण्यात आले. तेथेही बाणेदारपणा कायम होता. या धर्मसभेसमोर, सद्सद्विवेक बुद्धीच्या विरोधी वर्तन करणे योग्य किंवा सुरक्षित नाही, असा युक्तिवाद केला. आपले मत बायबलमधील तत्त्वांशी सुसंगत आहे, असे ठाम प्रतिपादनही केले. या वेळी त्याला पाखंडी ठरवून जिवंत जाळले असते; परंतु सॅक्सनीचा राजा फ्रेड्रिक याने त्याला आपल्या वाड्यात काही दिवस लपवून ठेवले. या काळात बायबलचे जर्मन भाषेत भाषांतर केले.

### ३.५.५ स्वतंत्र चर्चची स्थापना :

धर्मक्षेत्रात धर्मगुरुंनी निर्माण केलेल्या भ्रमक समजुती व अनाचार लोकांच्या निदर्शनास आणल्या. धर्माचे शुद्ध स्वरूप स्पष्ट झाले. जर्मनीतील राजे, सरदार, सामान्य लोक आणि काही धर्मगुरु यांचा ल्युथरला पाठिंबा होता. त्यांच्या जोरावरच ल्युथरने आतापर्यंत पोपशी संघर्ष केला. शेवटची इ.स. १५२२ मध्ये नवीन चर्चची स्थापना केली. या चर्चमध्ये मध्यस्थ धर्मगुरुची लुडबूड नव्हती किंवा कर्मकांडाचा बुजबुजाट नव्हता. त्यामुळे अनेकांनी नवीन चर्च व धर्माला पाठिंबा दिला.

### ३.५.६ ल्युथरवाद / ल्युदॅरनिझम :

जर्मनीचा राजा पाचवा चार्ल्स हा स्पेनविरुद्ध मोहिमेवर असताना ल्युथरने आपले विचार जर्मनीमध्ये सामान्य माणसापर्यंत पोहोचवले. त्या विचारांना 'ल्युथरवाद' असे म्हणतात. त्याने जर्मनीतील सरदारांना जे आवाहन केले ते 'अॅड्रेस दुदी नोबिलिटी ऑफ दी जर्मन नेशन' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यास सरदाराने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. ल्युथरवादाचे महत्त्वाचे सिद्धांत पुढीलप्रमाणे -

१) ख्रिस्ती धर्मियांनी बायबल व त्यातील तत्त्वावर संपूर्ण विश्वास ठेवून ते प्रमाणभूत मानावे.
२) धर्मगुरुंना विवाह करण्यास परवानगी असावी.
३) मठ ही संस्था आणि त्यामधील भिक्षू व भिक्षूणी ही पद्धत बंद करावी.
४) धर्मसंस्थेतील पोप, आर्च बिशप, बिशप ही पदे रद्द करावी.
५) जर्मन चर्चमधील प्रार्थना व उपासना जर्मन भाषेतून करण्यात यावी.

रोमन कॅथॉलिक चर्चचा प्रमुख रोमन सम्रट याने असे फर्मान काढले की, 'जर्मनीतील कोणत्याही राजाने हा पंथ स्वीकारू नये'. ल्युथरवाद्यांनी याचा निषेध केला. तेव्हा कॅथॉलिक त्यांना बंडखोर पाखंडी - प्रोटेस्टंट म्हणून लागले. त्यामुळे ल्युथरच्या धर्मचर्चला प्रोटेस्टंट पंथ असे नाव प्राप्त झाले.

munotes.in

### ३.५.७ जर्मनीतील शेतकरी चळवळ :

दक्षिण जर्मनीतील शेतकर्याने जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध चळवळ सुरु केली. ल्युथरने सरदार, जमीनदार यांना पाठिंबा दिला व सैन्य बळाचा उपयोग करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे एक लाख शेतकरी मरण पावले. त्यामुळे शेतकरी ल्युथरच्या विरोधात गेले. नंतर त्याने या चळवळीतून अंग काढून घेतले; परंतु त्याचा परिणाम झाला. साधारणत: उत्तरेकडे ल्युथरचा पक्ष तर दक्षिणेकडे रोमन कॅथॉलिक पक्ष निर्मान झाला.

### ३.५.८ ऑम्जबर्ग येथे शांतता तट :

जर्मनीमध्ये प्रोटेस्टंट व रोमन कॅथॉलिक यांच्यात वारंवार संघर्ष घडून येऊ लागले. इ.स. १५५५ मध्ये ऑम्जबर्ग येथे जर्मन राज्यांनी एकत्र येऊन सर्वानुमते असे ठरविले की, कॅथॉलिक व प्रोटेस्टंट यापैकी कोणत्या चर्चचा स्वीकार करायचा हे ठरविण्याचे अधिकार प्रत्येकाला दिला. त्यानुसार प्रत्येक राजाला स्वातंत्र्य मिळाले.

**आपली प्रगती तपासा :**

१) मार्टिन ल्युथरच्या कार्याचा आढावा घ्या.

## ३.६ धर्मसुधारणा चळवळीचे स्वरूप :

मध्ययुगात जगात धर्मसत्तेचा पगडा सर्व क्षेत्रावर निर्माण झालेला होता. अनेक देशात राजसत्तेवर धर्मसत्तेचे वर्चस्व होते. तर काही देशात राजसत्ताच धर्मगुरुंच्या हाती होती. धर्मगुरुंच्या चैनी व ऐषारामी जीवनाला पायबंद घालणे आणि सामान्य जनतेला खर्या धर्मतत्त्वांची प्रचीती आणून देणे, ही या चळवळीची उद्दिष्टे होती. सोळाव्या शतकाच्या प्रारंभी ही चळवळ केवळ हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या थोड्या विचारवंतापुरतीच मर्यादित होती. तिचा प्रसार नव्याने उदयास आलेल्या राज्यातील राजे, सम्रट आणि मध्यमवर्ग व शेतकरी वर्ग अशा समाजाच्या सर्व थरामध्ये झाला. काही छोट्या धर्माधिकार्यांनी बड्या धर्माधिकार्याच्या विरोधी चळवळीत भाग घेतला. या विरोधकांनी रोमन कॅथॉलिक पंथातील प्रचलित वाईट चालीरीतीचा निषेध - (प्रोटेस्ट) करुन धर्मपंथाचा त्याग केला. असा निषेध करणार्यांना प्रोटेस्टंट्स या नावाने ओळखले जाऊ लागले.

## ३.७ युरोपमध्ये धर्मसुधारणा चळवळीचा प्रसार

**३.७.१ जर्मनीत धर्मसुधारणा चळवळीचा प्रसार :**

धर्मसुधारणा चळवळीचा उगम जर्मनीमध्ये झाला. त्याची विविध कारणे म्हणजे जर्मन लोकांमध्ये रोमन कॅथॉलिक पंथाविषयी जास्त आस्था नव्हती. रोम-जर्मन यांच्यात खूप अंतर असल्याने रोमन चर्चचा प्रभाव जर्मनीवर पडला नाही. त्यांच्या हुकमाचे पालन करणारी मध्यवर्ती संस्था नव्हती. जर्मन राजे पोपला आपला प्रतिस्पर्धी समजत असे. मार्टिन ल्युथरने जर्मनीत उदयाला आलेल्या राष्ट्रवादास प्रोत्साहन दिले. जर्मनीतून पोपकडे जाणारा पैसा बंद करुन लोककल्याणासाठी राजे लोकांनी खर्च केला. सामान्य लोकांना पोपच्या भ्रष्टाचारी जीवनाचा कंटाळा आलेला होता. वरील सर्व कारणांमुळेच जर्मनीत धर्मसुधारणा चळवळीचा उगम झाला. त्याचा प्रसार सर्व युरोपमध्ये झाला.

**३.७.२ स्वीत्झर्लंडमधील धर्मसुधारणा चळवळीचा प्रसार :**

स्वीत्झर्लंडमध्ये प्रसार पावलेल्या कॅलव्हिन पंथाचा संस्थापक अलरिच झ्विंगली होता. त्याने रोमन कॅथॉलिक धर्माविरुद्ध बंड पुकारले. धर्मोपदेशकांचे ब्रह्मचर्य आणि धार्मिक विभूतीचे अवास्तव पूजन यावर टीका केली. धर्मसुधारणेच्या चळवळीत ल्युथरनंतर जॉन कॅलव्हिन याचा क्रमांक लागतो. त्याने ज्या विचारांचा व मतांचा प्रसार केला त्यास कॉल्विनिझम म्हणतात. त्याच्या मतांचा प्रभाव हाॅलंड, बेल्जियम, दक्षिण फ्रान्स, पोलंड, हंगेरी इ. देशांत होता.

**३.७.३ इंग्लंडमधील धर्मसुधारणा चळवळ :**

इंग्लंडमध्ये जॉन विक्लिफच्या काळापासून धर्मसंस्थेविरुद्ध आवाज उठवला होता. परंतु प्रत्यक्षात हे काम इंग्लंडचा राजा आठवा हेन्री याने केले. त्याला त्याची पत्नी कॅथेराईन हिच्यापासून घटस्फोट हवा होता. पण पोपने त्यास नकार दिला. त्यामुळे राजाने घटस्फोटाला पार्लमेंटमध्ये मान्यता मिळवली. तसेच राजा हा इंग्लंडचा धर्मप्रमुख व त्यास बिशपची नेमणूक करण्याचे अधिकार आहेत, असे पार्लमेंटने जाहीर केले. सहाव्या एडवर्डच्या काळात इंग्लंड हे प्रोटेस्टंट पंथीय बनले. चर्चमध्ये म्हटली जाणारी स्त्रोत्रे इंग्रजी भाषेत भाषांतरीत केली. इ.स. १५५३ मध्ये मेरी गादीवर आली. तिच्या काळात रोमन कॅथॉलिक बलिष्ठ बनण्याचा प्रयत्न करत होते. एलिझाबेथ राणीच्या काळात अँग्लिकन चर्च भक्कम पायावर स्थिर झाले. तिने स्वत:ला सुप्रीम गव्हर्नर हा हुद्दा घेतला. या काळात पार्लमेंटने ॲग्लिकन चर्चची धर्मसूत्रे विस्तृत स्वरूपात तयार केली. '३९ कलमे' या नावाने ही सूत्रे ओळखली जातात.

**३.७.४ फ्रान्समधील धर्मसुधारणा चळवळ :**

फ्रान्समध्ये राजा हेन्री दुसरा याने प्रोटेस्टंट पंथीय लोकांचा छळ केला. तरी पण त्यांची संख्या वाढली. कॅलव्हिनच्या प्रभावामुळे प्रोटेस्टंट पंथीय चर्चची स्थापना झाली. कॅलव्हिनच्या अनुयायांना 'ह्युजेनॉट' असे म्हणतात.

munotes.in

### ३.७.५ स्कॉटलंडमधील धर्मसुधारणा चळवळ :

स्कॉटलंड रोमन कॅथॉलिक चर्चपासून मुक्त करण्याची कामगिरी जॉन नॉक्स याने केली. इंग्लंडपूर्वी या चळवळीचा प्रारंभ झाला होता. स्कॉटलंडमधील प्रोटेस्टंट पंथियांना 'प्रेस बिटेरियन' असे म्हणतात.

## ३.८ रोमन कॅथॉलिक पंथाची प्रतिधर्मसुधारणा चळवळ

रोमन कॅथॉलिक धर्मसंस्थेविरुद्ध जॉन विक्लिफ व मार्टिन ल्युथरनी धर्मसुधारणा चळवळीला प्रारंभ करुन प्रोटेस्टंट पंथाची स्थापना केली. थोड्याच काळात जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, स्वीस, हॉलंड इ. देशात लोकप्रियता मिळाली. अनेक राजांनी हा पंथ राजधर्म म्हणून स्वीकार केला. याचा परिणाम कॅथॉलिक पंथावर झाला.

### ३.८.१ प्रतिधर्मसुधारणा चळवळ म्हणजे काय?

ख्रिश्चन धर्माच्या कट्टर पुरस्कर्त्यांनाही धर्माचे स्वरूप बदलण्याची गरज वाटू लागली. ख्रिश्चन धर्मातील दोष दूर करता येतील असे त्यांना वाटत होते. रोमन कॅथॉलिक धर्म कायम ठेवून त्यात सुधारणा केल्या. धर्मसंस्था संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यालाच 'प्रति धर्मसुधारणा' (Counter Reformation) असे म्हणतात. प्रति धर्मसुधारणा चळवळीचा मुख्य हेतू म्हणजे - प्रोटेस्टंट पंथाच्या प्रसाराला पायबंद घालणे. धर्मसंस्थेतील दोष दूर करुन दर्म प्रबळ बनवणे. या चळवळीच्या प्रमुख नेत्यांनी चार कलमी कार्यक्रम हाती घेतला तो म्हणजे १) रोमन कॅथॉलिक पंथाच्या विरोधकांना शिक्षा करणे २) धर्मसंस्थेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे ३) सुधारीत धर्माचा प्रसार करणे. ४) निरनिराळ्या मार्गाने समाजाची सेवा करणे होय. त्यांनी आपल्या कामाच्या जबाबदार्या पुढीलप्रमाणे सोपवल्या होत्या. इन्क्विजिशन या संस्थेकडे विरोधकांना शिक्षा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. कॉन्सि ऑफ ट्रेंट या धर्मसभेने धर्मसंस्थेमध्ये सुधारणा करण्याचे काम हाती घेतले. सोसायटी ऑफ सेंट जिझस या संघटनेने धर्मप्रसार व समाजसेवा यासंबंधीची जबाबदारी आपल्याकडे घेतली.

### ३.८.२ इन्क्विजिशन संस्थेचे कार्य :

प्रति धर्मसुधारणा चळवळीपूर्वी ही संस्था स्पेनमध्ये स्थापन झाली होती. स्पॅनिशराजाने तिचा उपयोग पाखंडीचा बंदोबस्त करणे, टीकाकार व विरोधकांवर कारवाई करणे. कॅराफा यांच्या सूचनेनुसार धर्मविरोधकांचा बंदोबस्त करण्यासाठी जुलै १५४२ मध्ये पोपने रोमन इन्क्विजिशन या संस्थेची स्थापना केली. या संस्थेची कार्यपद्धती रानटी असल्याने सामान्य लोकांना तिची दहशत वाटत असे.

### ३.८.३ प्रतिसुधारणा चळवळीस पोपची मदत :

मध्ययुगात सेंट फ्रान्सिस व सेंट डॉमिनिक यांच्या अनुयायांनी कॅथॉलिक धर्मसंस्थेत विविध सुधारणा घडविण्याच्या दिशेने प्रयत्न केले. तिसरा व चौथा पॉल, पाचवा पायस, पाचवा सिक्स्ट्स या सर्व पोपनी धर्मसंस्थेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन,

अधिक नीतिमान बनवण्याचा प्रयत्न केला. पंधराव्या शतकामध्ये भरलेल्या कॉन्स्टन्स येथील धर्म परिषदेमध्ये काही सुधारणा स्वीकारल्या. धर्माधिकार्यांना ज्ञानप्राप्तीचे शिक्षण देणे. धर्माधिकार्यांना नियम व निर्बंध घालून दिले. बायबलचे विविध भाषेत भाषांतरे केली. इटालीमध्ये प्रार्थना मंडळे आणि छोटी धर्ममंडळे स्थापन केली. या माध्यमातून व्यापक व संघटित असा प्रयत्न केला.

### ३.८.४ ट्रेंट धर्मपरिषद आणि निर्णय :

पोपच्या सत्तेची पुर्नप्रतिष्ठापना करणे आणि प्रोटेस्टंट झालेल्यांना पुन्हा कॅथॉलिक पंथात आणणे, या हेतूने इ.स. १५४५ मध्ये ट्रेंट येथे एक धर्मपरिषद बोलावण्यात आली. इ.स. १५४५ ते ६३ अशी १८ वर्षे ही परिषद कार्य करीत होती. तिचे अध्यक्षस्थान पोप तिसरा पॉल हा होता. या परिषदेने पुढीलप्रमाणे घोषणा / निर्णय घेतले. १) कॅथॉलिक धर्मतंत्रात निर्माण झालेली विसंगती, संदिग्धता, मिथ्यामार हे दोष काढून टाकण्यात आले. २) कॅथॉलिक पंथ हाच अधिकृत ख्रिस्ती धर्म पंथ होय. ३) पोप हाच एकमेव धर्मगुरु होय. ४) पापमुक्तीचे दाखले देणे बंद करण्यात आले. ५) पाखंडी मताचा व विचारांचा प्रचार करणारी पुस्तके निष्ठावंतांनी वाचू नये. ६) अनैतिक आचरण व भ्रष्टाचार करणार्या धर्मगुरुंना जरब बसविण्यासाठी कडक नियम तयार करण्यात यावे. ७) धर्म न्यायालय पुन्हा सुरु करण्यात येईल.

### ३.८.५ इग्नेशियस लायोलाच्या सोसायटी ऑफ जीझसचे कार्य :

रोमन कॅथॉलिक पंथाची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळविण्यासाठी आणि अंतर्गत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक संप्रदाय स्थापन करण्यात आले. स्पॅनिश धर्मोपदेशक इग्नेशियस लायोला याने इ.स. १५४० मध्ये सोसायटी ऑफ जीझस ही संस्था स्थापन केली. सैनिकी विचारांचा व शिस्तीचा संघटनेवर प्रभाव होता. या पंथाच्या अनुयायांनाच जसुईट असे म्हणतात. पुढे लायोलाच्या या पंथाला जेसुईट पंथ म्हणून लोकप्रियता मिळाली. हा सुधारणावादी पंथ प्रोटेस्टंटचा या कट्टर शत्रू व कॅथॉलिकांचा पाठिराखा बनला. धर्मरक्षण, त्याग, सदाचरण, सेवा, भूतदया, जनकल्याण, साधी राहणी व मानवतावाद ही या धर्मपंथाची तत्त्वे होती.

कॅथॉलिक धर्म व पोप यांच्यावर निष्ठा व्यक्त केली. ठिकठिकाणी मिशन्स सुरु केल्या. शाळा, कॉलेजद्वारे शिक्षणाचा प्रसार केला. प्राणिमात्राची सेवा करण्यासाठी शुश्रूषा पथके, रुग्णालये, अनाथालये इ. सुरु केले. या पंथाचा प्रसार स्पेन, इटली, ऑस्ट्रिया, फ्रान्स, पोलंड, बेल्जियम, अमेरिका, चीन, भारत, आफ्रिका येथे झाला.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रतिधर्मसुधारणा चळवळीचा आढावा घ्या.

## ३.९ धर्मसुधारणा चळवळीचे परिणाम

### ३.९.१ ख्रिश्चन धर्माची विभागणी :

धर्मसुधारणा चळवळीमुळे रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट अशा दोन गटात ख्रिश्चन धर्म व समजा विभागला गेला. त्यांची स्वतंत्र धर्मपीठे स्थापन झाली. काळाच्या ओघात त्यामध्ये अनेक उपपंथ निर्माण झाले. इंग्लंड व जर्मनीसारखी प्रमुख राष्ट्रे प्रोटेस्टंट बनली.

### ३.९.२ मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती :

धर्मसुधारणा चळवळीमुळे सामान्य माणसाला धर्माची माहिती झाली. सर्वसामान्यांपर्यंत आपल्या धर्माचे, पंथाचे विचार व तत्त्वज्ञान पोहोचवण्यासाठी अनेकांनी ग्रंथरचना केली. त्यामुळे प्रचंड प्रमाणात ग्रंथनिर्मिती झाली.

### ३.९.३ धर्मसंस्थेचे व पोपचे महत्त्व कमी झाले :

धर्मसंस्थेतील अनाचार, अनागोंदी, कारभार, विलासी जीवन, धर्मगुरुंचे बहुचर्चित व तथाकथित ब्रह्मचर्य, भोंदू संताची बुवाबाजी, धर्मसंस्थेत गैरप्रकार यावर धर्मसुधारकांनी व विरोधकांनी टीका केली. त्यामुळे धर्मसंस्थेचे व पोपचे महत्त्व कमी झाले.

### ३.९.४ युरोपमध्ये शांतता व सुव्यवस्था नष्ट झाली :

युरोपमध्ये ख्रिस्ती समाजात दोन पंथ निर्मान झाले. एकमेकांनी एकमेकांवर अन्याय व अत्याचार सुरु केला. कॅथॉलिक इन्किन, मिशनकडून प्रोटेस्टंटचा छळ करुन जिवंत जाळले. राणी मेरीने इंग्रज प्रोटेस्टंट लोकांची प्रचंड कत्तल केली म्हणून ती 'रक्तपिपासू मरी' म्हणून कुप्रसिद्ध झाली. सहावा एडवर्ड, पहिली राणी एलिझाबेथ यांनी कॅथॉलिकांचा छळ केला. त्यामुळे युरोपात शांतता व सुव्यवस्था नष्ट झाली.

### ३.९.५ राजसत्ता मुक्त व प्रबळ बनली :

प्रोटेस्टंट पंथ स्वीकारलेल्या देशात चर्चच्या संस्था व त्यांची मालमत्ता सरकार जमा झाली. अनेक देशात राजा हा राज्याचा व धर्माचा प्रमुख बनला. अनियंत्रित

राजसत्तेच्या तत्त्वाला चालना मिळाली. त्यामुळे धर्माचा राजसत्तेला असलेला शह गेला. राजसत्ता मुक्त व प्रबळ बनली.

### ३.९.६ धर्मगुरुचे श्रेष्ठत्व व मक्तेदारी संपली :

धार्मिक व सामाजिक क्षेत्रात धर्मगुरुंची मक्तेदारी होती. त्यावरच धर्मसुधारणा चळवळीने प्रहार केला. त्यांची जुलमी व अन्यायी राजवट नष्ट केली. धर्मसुधारकांनी धार्मिक क्षेत्रात नवे विचार मांडले. त्यामुळेच युरोपात बौद्धिक क्रांती सुरु झाली. परिणामी धर्मगुरुंचे श्रेष्ठत्व व मक्तेदारी नष्ट झाली.

### ३.९.७ कला व कलावंत यांची हानी :

पूर्वीच्या काळी चर्चची इमारत कलाकौशल्ये नटलेली व थाटात बांधत. परंतु प्रोटेस्टंट पंथाच्या शिकवणीमुळे, त्यांनी बांधलेल्या चर्चेमध्ये अत्यंत साधेपणा ठेवला. त्यामुळे कला व कलावंतांना स्वत:ची कसब दाखविण्याचे एक उत्कृष्ट क्षेत्र नष्ट झाली. परिणामी त्यांची हानी झाली.

### ३.९.८ चर्चच्या राष्ट्रीयीकरणास चालन :

प्रोटेस्टंट पंथ स्वीकारलेल्या देशात चर्चची सर्व मालमत्ता सरकार जमा झाली. त्या क्षेत्रातील कामे व नीती सरकारच्या अधिकारात गेली. जे सरकारचे धोरण असेल ते सर्व चर्चला बंधनकारक असे. त्यामुळे चर्चच्या राष्ट्रीयीकरणास चालना मिळाली.

### ३.९.९ शिक्षणाचा प्रसार :

धर्मसुधारकांच्या प्रयत्नामुळे शाळा, कॉलेज यांच्याद्वारे शिक्षणाचा प्रसार झाला. लोकांची धार्मिक फसवणूक होऊ नये यासाठी प्रत्येक व्यक्तीस बायबल वाचता आले पाहिजे, असे ल्यथर व कॅलव्हिन यांनी सांगितले होते. त्यामुळेच युरोपमध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला.

### ३.९.१० उद्योग व्यापार वाढ :

मध्ययुगीन परंपरेची बंधने नाहीशी झाल्यामुळे उद्योगधंदे आणि व्यापार वाढू लागला. सावकारी हा कायदेशीर व्यवहार ठरला. खाजगी मालमत्ता परमेश्वरी कृपाप्रसाद व मानवी श्रमाचे फळ अशी भावना निर्माण झाली. खाजगी मालमत्ता, हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य, उदारमतवाद ही तत्त्वे कमीअधिक प्रमाणात सर्व पंथांनी स्वीकारली होती.

### ३.९.११ प्रतिसुधारणा चळवळ :

धर्मसुधारणा चळवळीमुळे ख्रिश्चन धर्मात अनेक सुधारणा घडून आल्या. प्रोटेस्टंट चळवळीला शह देण्यासाठी रोमन कॅथॉलिक पंथाने प्रति धर्मसुधारणा चळवळ सुरु केली. त्यांनी धर्माचा प्रसार करण्यासाठी 'सोसायटी ऑफ जीझस' यासारख्या संघटना स्थापन केल्या. चर्चची पुनर्रचना व लोककल्याणाची कामे केली.

**३.९.१२ विज्ञान व व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास :**

धर्मसुधारणेच्या चळवळीमुळे जनमानसावरील धर्मसंस्थेचे वर्चस्व कमी झाले. आध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रात व्यक्तीचे सार्वभौमत्व प्रोटेस्टंट पंथाला मान्य असल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा व विज्ञानाचा विकास झाला.

**३.९.१३ धार्मिक असहिष्णुता निर्माण झाली :**

धर्मसुधारणेचा वाईट परिणाम म्हणजे काही ठिकाणी धार्मिक असहिष्णुता निर्माण झाली. अनेक ठिकाणी वेगवेगळे पंथ उदयाला आले. आपलाच पंथ श्रेष्ठ, सभ्य, सुसंस्कृत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न सुरु झाला. शुद्धतेच्या तीव्रतेवरुन काही ठिकाणी प्युरीठनस पंथ उदयास आला. अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पंथात लढाया झाल्या. धर्माच्या नावाखाली अन्य पंथियांचा छळही सुरु झाला.

**३.९.१४ आधुनिक काळाचा प्रारंभ :**

प्रबोधन चळवळ, नवीन जगाचा शोध आणि धर्मसुधारणा चळवळ यामुळे अंधारयुगाचा शेवट होऊन आधुनिक काळाचा प्रारंभ झाला. धर्मसुधारणा चळवळीने धर्म, धर्मसंस्था, समाजजीवन आणि त्यातील अंधश्रद्धा यांच्यात बदल घडवून आला. धर्माची अनेक बंधने दूर केली. धर्मगुरुंच्या जीवनाला पायबंद घातला. त्यामुळे सर्व क्षेत्रात वैचारिक क्रांती निर्माण झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) धर्मसुधारणा चळवळीचे परिणाम सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ३.१० सारांश

मध्यमयुगिन कालखंडामध्ये धर्मामध्ये जे दोष निर्माण झाले होते ते दूर करण्यासाठी विचारवंतांनी जे प्रयत्न केले किंवा जी चळवळ सुरु केली त्यास धर्मसुधारणा चळवळ असे म्हणतात. या चळवळीला अनेक घटक जबाबदार होते. धर्मसंस्था (चर्च) विरोधी मार्टिन ल्युथरने प्रभावीपणे कार्य करुन धर्मातील दोष दूर करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे ख्रिश्चन धर्मामध्ये दोन पंथ निर्माण झाले. दोन्हीही पंथाने युरोपमध्ये आपल्या पंथाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्यातून अनेक वाद झाले. सनातनी पंथानेही आपल्यातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिधर्मसुधारणा चळवळ म्हणतात.

munotes.in

या धर्मसुधारणा चळवळीचा सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला.

## ३.११ प्रश्न

१) धर्मसुधारणा चळवळ म्हणजे काय त्याची कारणे सांगा.
२) मार्टिन ल्युथरच्या कार्याचे मुल्यमापन करा.
३) धर्मसुधारणा चळवळीचा परिणामाचा आढावा घ्या.
४) टीपा लिहा.
   १) धर्मसुधारणा चळवळीचे स्वरूप
   २) युरोपमध्ये धर्मसुधारणा चळवळीचा प्रसार
   ३) प्रतिधर्मसुधारणा चळवळ
   ४) धर्मसुधारणा चळवळीचे नेते / विचारवंत

❖❖❖❖

munotes.in

# ४

# अमेरिकन राज्यक्रांती

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे
४.३ अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाची वाटचाल
४.४ अमेरिकन वसाहतीचे प्रत्यक्षात स्वातंत्र्ययुद्ध
४.५ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील यशापयशाची कारणे
४.६ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे परिणाम
४.७ सारांश
४.८ प्रश्न

## ४.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यास

१) अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे समजावून देणे.
२) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे स्वरूप त्याची वाटचाल याची माहिती प्राप्त करणे.
३) अमेरिकन राज्यक्रांतीच्या यशापयशाची माहिती समजावून देणे.
४) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने कोणकोणते परिणाम झाले याचा आढावा घेणे.

## ४.१ प्रस्तावना

युरोपीय देशांचे आशियाई देशांशी प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. कॉन्स्टॅटिनोपल हे दोन खंडाच्या व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. ते इ.स. १४५३ मध्ये तुर्कांनी जिंकले. त्यामुळे नवीन जलमार्ग शोधण्यासाठी मोहीम युरोपीय राष्ट्रांनी हाती घेतली. ख्रिस्तोफर कोलंबसने इ.स. १४९२ मध्ये अमेरिकेचा शोध लावला. १५ व्या शतकापासून वसाहतवादाला प्रारंभ झाला. १६ व्या शतकात स्पेन व पोर्तुगाल तर १७ व्या शतकात इंग्लंड व फ्रान्स यांनी वसाहती स्थापन करण्यात आघाडी निर्माण केली. उत्तर अमेरिकेत इंग्लंडने वसाहत स्थापन केली, तर सप्तवार्षिक युद्धाने फ्रान्सच्या वसाहतीवर इंग्लंडने ताबा मिळवला. या नव्या वसाहतीमध्ये अनेक लोकांनी स्थलांतर करुन स्थायिक झाले. कालांतराने अमेरिकेतील वसाहतीने इंग्लंडविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध सुरु केले. या

munotes.in

स्वातंत्र्ययुद्धाने राजकीय क्षेत्रात अनेक नव्या संकल्पना उदयास आल्या. तसेच सामाजिक व आर्थिक क्षेत्रात परिवर्तने झाली. त्यामुळे या स्वातंत्र्ययुद्धाला राज्यक्रांती म्हणजेच अमेरिकन राज्यक्रांती असे म्हणतात.

## ४.२ अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे

### ४.२.१ अमेरिकन वसाहतीचे स्वरूप :

इंग्रजांनी इ.स. १६०६ ते १७३३ पर्यंत अटलांटिक समुद्र किनार्यावर तेरा वसाहती स्थापन केल्या. प्याय माऊथ कंपनीला मेनमधील केनेवेट नदीवर वसाहत स्थापन करण्यात अपयश आले; परंतु लंडन कंपनीने जेम्स नदीवर जेम्सटाऊन येथे कायमस्वरूपाची वसाहत स्थापन केली. इंग्लंडच्या वसाहतीचे विभागणी पुढीलप्रमाणे - उत्तर भागातील वसाहती - या प्रदेशात कनेफिटकुट, न्यू हॅम्पशायर, होंड आयलंड, मॅसाच्युसेट्स या वसाहती होत्या. वसाहतीतील लोकांना इंग्लंडच्या नियंत्रणाचे व राजा स्टुअर्ट याने केलेली धार्मिक व राजकीय पिळवणूक याबद्दल प्रचंड राग होता. मध्य भागातील वसाहती - या प्रदेशात न्यूयॉर्क, न्यूजर्सी, पेन्सिल्वानिमा, मेरीलँड, डिलानेअर इ. वसाहती होत्या. येथील लोक कॅथॉलिक पंथाचे होते. दक्षिणेकडील वसाहती - या प्रदेशात जॉर्जिया, व्हर्जिनिया वसाहती होत्या. या प्रदेशात कापूस, तंबाखू पिके मोठ्या प्रमाणात होती. निग्रो शेतीची कामे करीत असे. श्रीमंत शेतमालक ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहत असे. व्यापारी, शेतमजूर, शेतमालक असे संमिश्र लोक राहत असे. इंग्लंडपेक्षा त्यांचा समाज भिन्न होता. त्यातूनच इंग्रज अन्याय, अत्याचार करीत असे.

### ४.२.२ वसाहतीबाबत दृष्टिकोन बदलला :

युरोपातील परिस्थिती वसाहतकारांना प्रोत्साहित करणारी होती. दरिद्री, बेकार, धर्मछळाला कंटाळलेल्या अनेक लोकांनी अमेरिकेत स्थलांतर केले. इंग्लंडच्या राजानेही स्वदेशातील गुन्हेगारी, बेकारी व लोकसंख्येचा प्रश्न सुटावा म्हणून विविध प्रकारच्या सनदा दिल्या. वसाहतीतील लोकांना प्रचंड स्वातंत्र्य व सवलती दिल्या. याचा फायदा घेऊन वसाहतकारांनी स्वतंत्र नवा समाज निर्माण केला. राजकीय संस्था स्थापन केल्या. यावर प्रारंभी कोणाचेही बंधन नव्हते. इंग्लंडने स्वत:च्या स्वार्थासाठी वसाहतीवर दडपशाहीचे धोरण स्वीकारले. त्याला उत्तर म्हणून अमेरिकन लोकांनी लढा दिला.

### ४.२.३ लोकशाहीप्रधान स्वयंशास्त्र व्यवस्थेवर अतिक्रमण :

नवीन वसाहतीत आलेल्या लोकांनी इंग्लंडच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या व प्रातिनिधिक लोकशाहीच्या कल्पना आपल्याबरोबर आणल्या होत्या. येथील लोकांचे स्वातंत्र्य इंग्लडंप्रमाणेच होते. सार्वजनिक कायदा, पंच पद्धती, तसेच गावांची नावे, स्थानिक स्वराज्य संस्था, पॅरिस टाऊनशीप, मॅनोरिअल पद्धती शायर वा कौंटी धर्मसंस्थेतील प्रेसबिटेरियन धर्मोपदेशक नेमण्याची प्रथा इत्यादी रचना इंग्लंडच्या धर्तीवर होती. तेथे लोकशाहीप्रधान स्वयंशासनाची निर्मिती केली. प्रशासनाच्या सोयीसाठी विधी मंडळ,

नगरसभा स्थापन केल्या. त्यामध्ये वसाहतीच्या प्रतिनिधीचा समावेश होता. राज्यपाल हा अमेरिकनच होता. त्याच्या वेतनास कायदे मंडळाची मंजुरी होती. इंग्लंडप्रमाणे राजा किंवा सरंजामदाराचा शासनावर पगडा नव्हता म्हणजे वसाहतीमध्ये स्वावलंबनाचे तत्त्व होते. आपण आपला कारभार इंग्लंडपासून स्वतंत्र करु शकतो, असा आत्मविश्वास असतानाही इंग्रजांनी लोकशाहीनिष्ठ शासनावर अतिक्रमण केले तेव्हा त्याचा धिक्कार करण्यासाठी अमेरिकेने स्वातंत्र्ययुद्ध सुरु केले.

### ४.२.४ इंग्रजांचा वाणिज्यवाद :

वसाहती या मातृभूमीच्या कल्याणासाठी आहेत असा समज युरोपीय राष्ट्रांचा होता. इंग्लंड हे पक्के वसाहतवादी व व्यापारी वृत्तीचे होते. वसाहतीवर विविध राजकीय व आर्थिक बंधने लादून त्याचे सातत्याने शोषण केले. त्यामुळे वसाहतीमधून असंतोष निर्माण झाला. १७ व्या व १८ व्या शतकात प्रत्येक देशाचे आर्थिक धोरण वाणिज्यवाद / वाणिज्य तत्त्वज्ञानावर आधारलेले होते. या तत्त्वानुसार आयातीपेक्षा निर्यात वाढीला महत्त्व दिले होते. वसाहतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन म्हणजे देशात सोने-चांदीची आयात वाढते. पैसा हा व्यापार व उद्योगात गुंतवण्यास उपयोगी पडेल. युद्धकाळात सैन्य व नौदलाच्या वाढीस उपयोगी पडेल. खरेदीपेक्षा विक्री जास्त होईल. कच्चा मालाचा पुरवठा करणारी केंद्र व पक्क्या मालाची बाजारपेठ. त्यामधून मातृभूमी समृद्ध संपन्न होईल या वाणिज्यवादाच्या प्रभावामुळेच इंग्लंडने वसाहतीवर अनेक व्यापारी बंधने घातली. त्यातूनच स्वातंत्र्ययुद्ध सुरु झाले.

### ४.२.५ शेती उत्पादन विक्रीवर इंग्रजांचे निर्बंध :

अन्न, वस्त्र, निवारा हे प्रश्न वसाहतीला भेडसावत होते. वसाहतकारांना या प्रश्नावर मात करुन विविध उद्योग व शेती व्यवसायाला प्रारंभ केला. तंबाखू, नीळ, भात या पिकांमधून प्रचंड नफा मिळाला. त्यामुळे इंग्रज शासनकर्त्यांनी या उत्पादन विक्रीवर निर्बंध घातले. त्यातून अमेरिका-इंग्लंड यांच्यात दुरावा निर्माण झाला. त्यातूनच स्वातंत्र्ययुद्धाला सुरुवात झाली.

### ४.२.६ नौकानयनविषयक कायदे :

ब्रिटिश व्यापारवादी धोरणाची अंमलबजावणी ऑलिव्हर कॉम्बेलच्या राजवटीपासून करण्यात आली. त्यासाठी ब्रिटिश संसदेने अमेरिकेतील वसाहतीसंबंधी महत्त्वपूर्ण कायदे केले. वसाहतीचा उपयोग मातृदेशाच्या व्यापारी भरभराटीसाठी व्हावा या उद्देशाने ब्रिटिश संसदेने पुढीलप्रमाणे कायदे केले. १) इ.स. १६५१ च्या कायद्यानुसार मालाची वाहतूक करण्याची मक्तेदारी इंग्लिश अथवा वसाहतीमधील जहाज वाहतूक करणार्यांनाच द्यावी. २) इ.स. १६६० च्या कायद्यानुसार कोणत्याही मालाची आयात-निर्यात ही इंग्लिश जहाजातून आणि इंग्रज शासनाच्या परवानगीने करावी. ३) इ.स. १६६३ च्या कायद्यानुसार इंग्लिश जहाजाशिवाय अन्य देशाच्या वाहतुकीवर जकात व कमिशन बसवण्यात आले. ४) इ.स. १६७३ च्या कायद्यानुसार निर्देशित माल एक वसाहतीतून दुसर्या वसाहतीत पाठविल्यास त्यावर इंग्लंडमध्ये आयात केलेल्या मालावर जो कर बसवला तोच कर त्या मालावरही बसवण्यात येईल.

**४.२.७ ग्रेनव्हील व टाऊन शेंडचे कायदे :**

वसाहतीच्या संरक्षणासाठी व प्रशासनाचा खर्च भागविण्यासाठी तसे चोरट्या व्यापाराचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने कायदे मंजूर केले. अर्थमंत्री ग्रेनव्हील व व्यापारी मंडळाचे अध्यक्ष टाऊन शेंड याने तिसरा जॉर्ज राजाच्या संमतीने वसाहतीसंबंधीचे नवे धोरण ठरवले. ग्रेनव्हील याने केलेले कायदे पुढीलप्रमाणे -

१) इ.स. १७६४ चा साखर कायदा - या कायद्यानुसार आयात साखरेवर कर आकारला तसेच इंग्लंडशिवाय अन्य देशांतून आयात मालावर जादा कर आकारला.

२) सर्व वसाहतीसाठी हॅलीपॅक्ष येथे व्हाईट ॲडमिरलरी अथवा सागरी न्यायालय स्थापन केले. वाहतूक करणार्या जहाजांच्या नोंदणी व व्यवहारावर कडक निर्बंध बसविला.

३) १ सप्टेंबर १७६४ नंतर सर्व वसाहतीमधील कायदेशीर कागदी चलन चालू ठेवण्यावर संपूर्ण बंदी घातली.

४) स्टॅम्प कायदा इ.स. १७६५ - महसूल वाढीसाठी हा कायदा मंजूर करण्यात आला. त्यानुसार अर्ध्या पेनीपासून ते १० पौडापर्यंतच्या किंमतीचे स्टॅम्प महत्त्वाच्या सर्व दस्तऐवजावर लावणे आवश्यक आहे. यामुळे प्रत्यक्ष लोकांवर हा कर लावण्यात आला. स्टॅम्प कायद्याने वसाहतीमध्ये व ब्रिटिश पार्लमेंटमध्येही गोंधळ झाला. विल्यम पिट व एडमंड बर्क याने प्रचंड टीका केल्या. व्हर्जिनिया वसाहतीने विधानसभेत या कराचा निषेधकेला. इ.स. १७६५ मध्ये ९ वसाहतींच्या ३७ प्रतिनिधींची न्यूयॉर्क शहरात परिषद भरली. या परिषदेने जाहीर केले की वसाहतीवर कर लावण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारला नाही. या कराला धोरण करण्यासाठी स्वातंत्र्य पुत्र संघटना स्थापन केली. मार्क्विस रॉकिंग हॅमचे व्हिग पक्षाचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. त्याने १८ मार्च १७६६ स्टॅम्प कायदा रद्द केला. त्याच वेळी वसाहतीसंबंधी सर्व कायदे करण्याचा अधिकार ब्रिटिश शासनाला असतील, अशी घोषणा केली. त्यालाच डिक्लेरेटरी कायदा म्हणतात.

५) निवासाचा कायदा इ.स. १७६६ - वसाहतीतील अधिकार्यांना सैन्य तयार ठेवण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने केलेल कायदे सक्तीने अमलात आणता यावेत यासाठी हा कायदा तयार केला. सैन्याला निवासाच्या व इतर सोयी उपलब्ध करुन देणे.

**चार्लस टाऊन शेंडचे कायदे :** लॉर्ड चॅथॅमच्या मंत्रिमंडळात चार्ल्स टाऊन शेंड हा अर्थमंत्री होता. चॅथॅमच्या आजारपणामुळे टाऊन शेंड हा प्रमुख होता. त्याने वसाहतीमध्ये आयात माल काच, शिसे, रंग, कागद, चहा यावर जगात कर बसवला. या कायद्याने सर्वोच्च न्यायालयाचा झडती परवाने देण्याचा अधिकार, नवी सागरी न्यायालये स्थापन, बोस्टन शहरात अमेरिकेचे जकात आयुक्त मंडळे स्थापन केले. हा कायदा २० नोव्हेंबर १७६७ पासून अमलात आला. वसाहतीमधून या धोरणाचा निषेध केला. ब्रिटिशांच्या विरोधी आंदोलन सुरु झाले.

**४.२.८ सप्तवार्षिक युद्धाने फ्रान्सची भीती नष्ट :**

इ.स. १७५६-६३ या सप्तवार्षिक युद्धात इंग्डंचा विजय झाला. त्यामुळे फ्रान्सच्या अमेरिकेतील वसाहती पॅरिसच्या तहाने इंग्रजांना मिळाल्या. या युद्धामुळे इंग्रजांना

पुढीलप्रमाणे फायदा झाला. भविष्यात फ्रान्सकडून वाटणारी भीती नष्ट झाली. वसाहतवाल्यांनी युद्धाचा अनुभव मिळाला. युद्ध खर्चासाठी वसाहतीवर कर लादण्यात आले. वसाहतीतील विधिमंडळाने संमत केलेल्या कायद्याविरुद्ध नकाराधिकार वापरण्याचा हक्क राज्यपालाला व राजाला प्राप्त झाला.

### ४.२.९ अमेरिकेतील मिश्र समाज :

अमेरिकेत युरोपातल्या इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड, बेल्जियम, जर्मनी, इटली, स्कॉटलंड, आयर्लंड इ. देशातील लोक या नवीन प्रदेशात स्थायिक झालेले होते. यामध्ये इंग्रजांची संख्या जास्त होती. त्यांच्यात वर्णसंकर होऊन मिश्र नवीन समाज निर्माण झाला. हा नवसमाज मुक्त, स्वावलंबी, कष्टाळू व स्वतंत्र प्रज्ञेने वागणारा होता. त्याला इतरांचे पारतंत्र्य किंवा दडपण नको होते. त्यांच्यामध्ये अमेरिकन भूमीबद्दल अजोड श्रद्धा होती. ज्या वेळी इंग्रजी सत्तेने त्यांच्यावर बंधने लादण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने विरोध केला.


### ४.२.१० ब्रिटिश शासनविषयी द्वेषभावना :

अमेरिका-इंग्लंड यांच्यात ३ हजार मैलांचे अंतर होते. स्थानिक इंग्रज राज्यकर्त्यांनी वसाहतीवर अत्याचार केला. त्यांच्या दडपशाहीविरुद्ध राष्ट्रवादी आंदोलने सुरु झाली याची माहिती ब्रिटिशांना इंग्लंडमध्ये कळत नसे. त्यामुळे त्यांना भविष्यात अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. तसेच वसाहतीमधील व इंग्लंडमधील कायदे मंडळ यांना समान दर्जा असावा अशी उपेक्षा वसाहतवाल्यांची होती. परंतु त्याला नकार दिला. शिवाय इंग्लंडच्या राजाने अनेक प्रकारचे कर व व्यापारविषयक कायदे केले. त्यामुळे ब्रिटिश शासनाविषयी द्वेषभावना निर्माण झाली.

### ४.२.११ ना प्रतिनिधी ना कर ही घोषणा :

वसाहतीतील लोकांनी कर लादणार्या कायद्याला विरोध केला, तर कर लादण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटला आहे असा दावा पार्लमेंटमध्ये केला. त्याउलट ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिनिधी नाही व प्रतिनिधी नसलेल्या पार्लमेंटला आमच्यावर कर आकारण्याचा अधिकार नाही असे वसाहतीतील लोकांनी सांगितले. म्हणजे ना प्रतिनिधी ना कर ही घोषणा केली ती लोकप्रिय झाली. तसेच ब्रिटिश नागरिकाप्रमाणे समान दर्जा, हक्क, प्रतिनिधित्व मिळावे ही मागणी केली. शेवटी या मागणीला इंग्लंडमधील काही नेत्यांनीही पाठिंबा दिला. लॉर्ड नॉर्थच्या मंत्रिमंडळाने चहावर नाममात्र कर ठेवून सर्व कर रद्द केले.

munotes.in




अमेरिकन : क्रांती, १७८९ मधील वसाहती

### ४.२.१२ इंग्रजांच्या जीवनपद्धतीचा वसाहतीवर प्रभाव :

वसाहतीच्या निर्मितीमध्ये इंग्लंडचा प्रमुख सिंहाचा वाटा होता. कारण इंग्रजांच्या पुढाकाराने अनेक वसाहती स्थापन केल्या होत्या. इंग्लंडची संस्कृती, भाषा, अर्थव्यवस्था, जीवनपद्धती, प्रशासन व्यवस्था याचा परिणाम मोठ्या प्रमाणात वसाहतीवर झाला. तसेच ब्रिटिशांचा कष्टाळूपणा, चिकाटी, स्वतंत्र बाणा, अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रवृत्ती इ. सद्गुणांची वाढ अमेरिकन समाजात झालेली होती. जेव्हा इंग्रजांनी स्वातंत्र्यावर आघात केला तेव्हा त्यांच्या विरोधी वातावरण अमेरिकेत तयार झाले.

### ४.२.१३ वसाहतीमधील प्रगतीमुळे राष्ट्रवादी भावनेचा उदय :

अमेरिकेत वसाहतीतील लोक हे मूळचे युरोपीय होते. या नवसमाजाने धार्मिक उन्नती, शिक्षण व सांस्कृतिक प्रगतीकडे भरपूर लक्ष पुरविले. शिक्षण व संशोधनासाठी अनेक संस्था व ग्रंथालय स्थापन केली. प्युरिठन, सपरेटिस्ट, बेकर या सुधारणावादी धर्मपंथाचा प्रसार केला. छापखाने व वृत्तपत्रे सुरु केली. कला, शास्त्र, साहित्याची निर्मिती मोठ्या शहरातून झाली. अनेक व्यक्तींनी शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीचे कार्य केले. त्यामुळे राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे थोडक्यात सांगा.

## ४.३ अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाची वाटचाल

इ.स. १७६८ पासून अमेरिकन वसाहतीचे ब्रिटनविरोधी आर्थिक आंदोलनाला नवे क्रांतिकारक वळण प्राप्त झाले. या क्रांतिकारक आंदोलनातील विविध टप्पे -

**४.३.१ मॅसॅच्युसेटची विधानसभा बरखास्त :**

या वसाहतीच्या विधानसभेने इ.स. १७६८ मध्ये परिपत्रक काढून इतर सर्व वसाहतीतील विधानसभेला पाठवले. टाऊन शेंड कायद्याने बसवलेली जकात कशी चुकीची आहे हे परिपत्रकात दाखवले होते. अमेरिकन डिपार्टमेंटच्या सेक्रेटरी ऑफ स्टेट पदावरील ब्रिटिश अधिकारी लॉर्ड हिल्सबरो याने पत्रक रद्द करण्याची आज्ञा दिली व गव्हर्नर फ्रॅन्सिस बर्नार्डने विधानसभा बरखास्त केली. त्यामुळे वसाहतीत उद्रेक निर्माण झाला.

**४.३.२ बोस्टन शहरातील दंगली :**

मॅसॅच्युसेट्स वसाहतीतील बोस्टन हे बंदर ब्रिटिशविरोधी आंदोलनाचे प्रतीक बनत गेले. येथील ब्रिटिश अधिकार्याने नौकागमन कायद्याची अंमलबजावणीसाठी शासनाकडे लष्कराची मागणी केली. इ.स. १७६८ मध्ये व्यापारी कायद्याच्या उल्लंघनाबद्दल जॉन हॅन्कॉकचे लिबर्टी जहाज पकडून त्याला शिक्षा करण्यात आली. कारण त्याच्या आंदोलनाशी संबंध होता. त्यामुळे बोस्टन शहरात भयानक दंगली उसळल्या. लॉर्ड हिल्सबरोने ऑक्टोबर १७६८ मध्ये सैनिकी पलटणी पाठवल्या. ५ मार्च १७७० रोजी बेफाम झालेल्या जमावावर गोळीबार केला. या घटनेचे 'बोस्टनची कत्तल', असे वर्णन करण्यात आले. शेवटी इ.स. १७७० मध्ये टाऊन शेंड जकात रद्द केली.

**४.३.३ र्होड आयलँडचा नवा संघर्ष :**

र्होड आयलंड वसाहतीच्या नागरिकांनी इ.स. १७७२ मध्ये नॅरागान सेट उपनगरात गॅस्पी नावाचे ब्रिटिश नाविक खात्याचे छोटे जहाज बुडविले. त्याचा कप्तान जखमी झाला. याची चौकशीसाठी ब्रिटिश शाही मंडळ पाठवले. या घटनेशी संबंधित सर्व संशयिताना खटल्यासाठी इंग्लंडला पाठविण्याचे विशेष अधिकार दिले. त्यामुळे व्हर्जिनिया वसाहतीच्या नेत्यांना संताप आला. त्यांनी सर्व वसाहतींना संघटित करण्याचा मार्ग स्वीकारला. बोस्टन शहरात इ.स. १७७२ मध्ये एक स्फोटक दस्तावेज म्हणजे बोस्टनच्या

शहर बैठकीचा वृत्तांत प्रकाशित केला. यामध्ये अमेरिकन हक्कांचे उल्लंघन ब्रिटिशांनी केले त्याची यादी प्रसिद्ध केली.

**४.३.४ बोस्टन चहा पार्टी :**

अमेरिकन वसाहतीत चहा विकण्याचा ईस्ट इंडिया कंपनीसाठी चहाचा कायदा इ.स. १७७३ मध्ये ब्रिटिश संसदेने मंजूर केला. कारण १ कोटी ७० लाख पौंड चहा शिल्लक होता. कंपनीला दिवाळखोरीतून वाचवण्यासाठी हा कायदा केला. कंपनीने आपल्या मर्जीतील व्यापार्यांना चहा विकण्याची मक्तेदारी दिली. त्यामुळे इतर व्यापारी रागावले. अनेक बंदरात कंपनीचा चहा उतरुन घेण्यास विरोध होऊ लागला. हचिनसन कुटुंबाने चहा उतरुन घेतल्याशिवाय बंदर सोडणार नाही, अशी भूमिका घेतली. त्यामुळे आंदोलकांच्या एका गटाने रेड इंडियन लोकांचा पोशाख धारण करुन १६ डिसेंबर १७७३ रोजी चहाच्या ३४२ पेट्या (किंमत अंदाजे १० हजार पौंड) बोस्टन बंदरातील सागरात फेकून दिल्या. या घटनेलाच बोस्टन चहा पार्टी असे म्हणतात.

**४.३.५ वसाहतवाल्यांची फिलाडेल्फिया येथे पहिले अधिवेशन :**

बोस्टन चहा पार्टीमुळे लॉर्ड नॉर्थ मंत्रिमंडळाने वसाहतीसाठी इ.स. १७७४ मध्ये चार जुलमी कायदे केले. या कायद्यामुळे वसाहतीत उघड बंड सुरु केले. राजाची सत्ता नष्ट करुन लोकशासन संस्था स्थापन केली. वसाहतीतील राजकीय सत्ता नव्या लोकनेत्यांकडे देण्यात आली. शेवटी सर्व वसाहतीचे एक विशाल पहिले अधिवेशन सप्टेंबर १७७४ मध्ये फिलाडेल्फिया येथे घेण्यात आले. जॉर्जिया वसाहत वगळता १२ वसाहतीतील ५५ प्रतिनिधी हजर होते. ब्रिटनमधील आयात-निर्णय आणि त्याचा व्यापार यावर बहिष्कार टाकला. त्यामुळे ब्रिटिश व्यापाराला मोठा फटका बसला. ब्रिटिशांच्या व्यापारवादी धोरणावर पहिला आघात अमेरिकेतील तेरा वसाहतीने केला.

## ४.४ अमेरिकन वसाहतीचे प्रत्यक्षात स्वातंत्र्ययुद्ध

ब्रिटिश शासनाने इ.स. १७७५ पासून वसाहतीविरुद्ध युद्धाची तयारी सुरु केली. यासाठी नॉर्थने तडजोडवादी कायदा मंजूर करुन संरक्षण खर्च वाढला. वसाहतीच्या व्यापारावर निर्बंध वाढवले. यातून इ.स. १७७५ मध्ये क्रांतीयुद्धाला सुरुवात झाली. या क्रांतीयुद्धातील घटनाक्रम पुढीलप्रमाणे होता -

**४.४.१ लेक्सिग्टंन व कॅन्कॉर्डची लढाई :**

मॅसॅच्युसेट्स वसाहतीतील गृहरक्षक दलाने कॅन्कॉर्ड येथे शस्त्रास्त्राचा साठा केला होता. याची माहिती मिळताच ब्रिटिश सेनापती गेजने ७०० सैनिक सेनापती स्मिथच्या नेतृत्वाखाली पाठवले. या सैनिकांची व शेतकरी, नागरीक यांच्यात पहिली लढाई लेक्सिंग्टन येथे झाली. त्यानंतर स्मिथने कॅन्कॉर्ड येथील सस्त्रास्त्रांचा साठा नष्ट केला. तेव्हा अमेरिकन नागरिकांनी नॉर्थ ब्रीज येथे ब्रिटिश सैन्यावर हल्ला केला. चार्लस टाऊन येथे ही लढाइ झाली. यात चार हजार अमेरिकन नागरिकांनी भाग घेतला. २७३ ब्रिटिश सैन्य, १३

अमेरिकन ठार झाले. १७४ जखमी झाले. १९ एप्रिल १७७५ रोजी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाला प्रारंभ झाला.

### ४.४.२ वसाहतीचे फिलाडेल्फियाचे दुसरे अधिवेशन :

युद्धाला प्रारंभ झाल्याचे समजताच १० मे १७७५ रोजी दुसरे अधिवेशन भरले. या परिषदेला थॉमस जेफरसन, जॉर्ज वॉशिंग्टन, जॉन अ‍ॅडम्स इ. उपस्थित होते. १३ वसाहतींची राष्ट्रसभा बनवली. या परिषदेचे अध्यक्ष जॉन हॅन्कॉक होते. वसाहतीचा सेनापती म्हणून जॉर्ज वॉशिंग्टनची निवड करण्यात आली. याच वेळी ब्रिटिश सेनापती गेजने जाहीरनामा काढून काही निर्णय घेतले. त्यामध्ये लष्करी कायदा, बंडखोर व राजद्रोही ठरवणे, राजनिष्ठा दाखवून शरण येणे यास माफी देणे.

### ४.४.३ वसाहतीचे फिलाडेल्फियाचे तिसरे अधिवेशन :

अमेरिकन क्रांती युद्धातील बंकर हिलची लढाई सर्वात जास्त रक्तरंजित म्हणून ओळखली जाते. या युद्धात पराभव झाल्याने वसाहतवाल्याने ५ जुलै १७७५ रोजी बैठक घेतली. जॉर्ज राजाकडे तडजोडवादी विनंती अर्ज पाठविला. हा अर्ज फेटाळून एका जाहीरनाम्याद्वारे अमेरिकन वसाहतींनी उघड बंडखोरी केल्याचे घोषित केले. त्यामुळे युद्धाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली.

### ४.४.४ स्वातंत्र्ययुद्ध :

जॉर्ज वॉशिंग्टनने ३ जुलै १७७५ रोजी केंब्रिज येथे सरसेनापतीपद स्वीकारले. सेनापती फिलिप श्युयरल, ब्रि. जनरल रिचर्ड मॉटगोमेरी कॅनडा जिंकला; परंतु क्युबेक मोहिमेत अपयश आले. १३ ऑक्टोबर १७७५ नाविक दल स्थापन केले. ब्रिटिशांनी अमेरिकेशी युद्ध करण्यासाठी भाडोत्री सैन्य आणले होते. याच्यावर अनेक टीका झाल्या. ४ जुलै १७७६ रोजी अमेरिकन वसाहतीच्या स्वातंत्र्य घोषणेला मान्यता दिली. म्हणून हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जातो. या वेळी स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. थॉमस जेफरसन याने स्वातंत्र्याचा जाहिरनामा तयार केला होता. प्रारंभी अनेक युद्धात अमेरिकेला पराभव पत्करावा लागला. ट्रेन्टॉन व प्रिस्टन येथे ब्रिटिशांचा पराभव झाला. त्यामुळे फ्रान्सने अमेरिकेच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. तसेच इंग्लंडच्या सर्व शत्रू राष्ट्रांनी अमेरिकेला मदत केली. त्यामुळे अनेक ठिकाणी इंग्लंडचा पराभव झाला. दक्षिण अमेरिकेत कॉनवॉलिसचा पराभव झाल्याने शरणागती पत्करावी लागली. अमेरिकन वसाहतीसी ३ सप्टेंबर १७८३ रोजी इंग्लंडने पॅरिस तह केला. त्यावर १४ जानेवारी १७८४ रोजी महासभेने सही केली.

अशा रीतीने लेक्सिंग्टची लढाई इ.स. १७७५ पासून थॉर्कटाऊन युद्धापर्यंत व पॅरिस तह इ.स. १७८४ होईपर्यंत हे युद्ध सुरु होत. या युद्ध समाप्तीनंतर अमेरिका खंडात एका नव्या स्वतंत्र संघराज्याची म्हणजे अमेरिकेची संयुक्त राज्ये स्थापन झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकन वसाहतीतील स्वातंत्र्य युद्धाचे वर्णन करा.

## ४.५ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील यशापयशाची कारणे

इ.स. १७७६ ते इ.स. १७८१ या काळात अमेरिका-इंग्लंड यांच्यात युद्ध सुरु हाते. ते कॉर्नवॉलिसच्या शरणागतीने संपले. इंग्लंड हे जगातील अत्यंत सामर्थ्यशाली व प्रचंड साम्रज्यवादी राष्ट्र होते. त्यामुळे हा पराभव इंग्लंडला अनपेक्षित होता. 'फळे पिकल्यावर फांदीपासून अलग होतात तसेचवसाहतीचेही आहे.' हे तुर्गेचे विधान प्रसिद्ध आहे. अमेरिकन वसाहतीच्या विजयाला व इंग्लंडच्या अनपेक्षित पराभवाला विविध घटक कारणीभूत ठरले ते पुढीलप्रमाणे -

### ४.५.१ अमेरिकेची भौगोलिक परिस्थिती :

हे स्वातंत्र्ययुद्ध अमेरिकेच्या भूमीवर झाले. या युद्धासाठी इंग्रजांनी लष्कर व सेनापती इंग्लंडमधून आणले होते. त्यांना येथील नद्या, पर्वत, जंगले, रस्ते, पाऊलवाटा व भूप्रदेशाची व्यवस्थित माहिती नव्हती. युद्धाचे क्षेत्र एक हजार मैल विस्तीर्ण होते. त्याचे दळणवळण जलद न झाल्याने इंग्रजांचा पराभव झाला.

### ४.५.२ अमेरिकेचे उत्कृष्ट नेतृत्व :

जॉर्ज वॉशिंग्टन हा महान देशभक्त, मुत्सद्दी व अनुभवी सेनापती, शौर्य, तत्परता इ. गुणांचा होता. त्यामुळे वसाहतीला विजय प्राप्त झाला. त्याला गनिमी काव्याची व विविध युद्धतंत्राची पूर्ण माहिती होती. तसेच थॉमस जेफर्सन, जॉन ॲडॅम्स, सॅम्युअल ॲडॅम्स, बेंजामिन प्रॅंकलिन यासारखे नेतेही वरच्या दजाचे व उच्च ध्येयवादाने व प्रागतिक विचारांनी प्रेरित झालेले होते. राजकीय व लष्करी नेतृत्वामुळेच अमेरिकेला विजय मिळाला. इंग्रजांच्या बाजूने कॉनवॉलिस, क्लिंटन बर्गाईन थॉमस गेजसारखे नावाजलेले सेनापती होते; परंतु त्यांना अमेरिकेतील परिस्थितीची पूर्ण कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांना अपयश आले.

### ४.५.३ गनिमी काव्याचे युद्धतंत्र :

वसाहतकारांच्या लष्कराला अमेरिकन भूप्रदेशाची संपूर्ण माहिती होती. ते येथेच जन्मले व मोठेही झाले. डोंगरकपार्यात राहून शत्रू पक्षावर लपून छपून हल्ले करण्याच्या

गनिमी काव्याचे तंत्र त्यांना माहित होते. त्या तंत्रांच्या आधारे इंग्रजांच्या विशाल लष्कराचा पराभव केला. त्यांनी युद्धाचे रणक्षेत्र विस्तारीत केल्याने इंग्रजांची फौज विखारली गेली. अमेरिकन लष्करात घोडदळ, पायदळ असल्याने जलदगतीने हालचाली करुन शत्रूवर विजय प्राप्त केला.

### ४.५.४ अमेरिकेला परकियांची मदत :

अमेरिकेने इंग्लंडबरोबर युद्ध सुरु केल्यानंतर एका वर्षाने फ्रान्स, स्पेन, हॉलंड या देशांनी सर्वतोपरी साह्य केले. इ.स. १७७८ मध्ये फ्रान्स सरकारने कोट्यवधी डॉलर्सचे कर्ज देऊन लाफायतेच्या नेतृत्वाखाली लष्कर पाठवणे. कारण इंग्लंडचा पराभव करुन हिंदुस्थानचा काही भाग। व कॅनडा परत प्राप्त करणे हा हेतू होता. स्पेनने आरमारी दलाची मदत केली. कारण फ्लॉरिडा, मिनोर्का, जिब्रल्टर या बेटातील आपली मालमत्ता परत प्राप्त करणे. या हेतूने इ.स. १७७९ मध्ये मदत केली. इंग्लंडचे आरमारातील श्रेष्ठत्व व व्यापारी वैभव नष्ट करण्याच्या हेतूने हॉलंडने मदत केली. युरोपातील इतर देशांनीही वसाहतीच्या स्वातंत्र्यलढ्याला मानसिक पाठिंबा दिला. त्यामुळे अमेरिकेची बाजू बळकट होऊन इंग्रजी सत्तेचा पराभव केला.

### ४.५.५ अमेरिका-इंग्लंडमधील अंतर :

या दोन खंडांमध्ये सुमारे ४८२८ कि.मी. अंतर होते. युद्ध काळातील धोरणे व योजना इंग्लंडमधून ठरत होत्या. त्यांना बुद्धभूमीची व परिस्थितीची पूर्ण कल्पनाही मिळत नसे. ॲटलांटिक महासागरातून एवढे अंतर ओलांडून ब्रिटिश सैन्याला शस्त्र व पुरेसा पुरवठा आणि संपर्क साधणे इ. अतिशय अवघड होत असे. दळणवळणासाठी साधारण एक महिना कालावधी लागत असे. यामुळे युद्धकालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे इंग्रजांना अवघड होत असे. त्यामुळे प्रचंड सामर्थ्यशाली इंग्रजांना माघार घ्यावी लागली.

### ४.५.६ वसाहतवाल्यांचे उदात्त ध्येयवाद :

अमेरिकन वसाहतीतील लोक, सैनिक हे देशभक्तीने प्रेरित झाले होते. ब्रिटिशांच्या जुलमी साम्रज्यशाहीतून मुक्त होण्यासाठी त्यांनी लढा दिला. स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करुन उच्च मूल्यांची जगाला कल्पना दिली. राष्टमुक्ती, व्यक्तिस्वातंत्र्य, नागरी हक्क, मानवतावाद, लोकशाहीच्या उच्च ध्येयाच्या पूर्तीसाठी अमेरिकन युद्ध करीत होते. त्यामुळे लोकमताचा पाठिंबा आणि अनेक राष्ट्रांची सहानुभूती व मदत मिळाली. इंग्रजांचे ध्येय साम्रज्यवादी असल्याने त्याला कोणीही नैतिक व राजकीय पाठिंबा दिला नाही त्यामुळे पराभव झाला.

### ४.५.७ साराटोगाचा विजय :

इ.स. १७७६ मध्ये युद्धाला सुरुवात झाली. पहिल्या वर्षी लहानलहान युद्धे झाली. परंतु साराटोगाची लढाई ऐतिहासिक ठरली. कारण या युद्धात इंग्लंडच्या सैन्याची दाणादाण झाली. येथेच इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. या विजयाने अमेरिकेचा आत्मविश्वास वाढला. नंतर विजय प्राप्त केला.

**४.५.८ इंग्लंडच्या शक्तीचे विभाजन :**

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे इंग्लंडच्या शक्तीचे विभाजन होय आणि अमेरिकेची संघटित शक्ती होय. या वेळी अमेरिका, वेस्ट इंडीज, पश्चिम आफ्रिका व भारत इ. ठिकाणी युद्ध सुरु होते. त्यामुळे त्यांच्या शक्तीचे विभाजन झाले. सप्तवार्षिक युद्धामुळे आरमार दलही या वेळी दुबळे होते.

**४.५.९ इंग्लंडचा फाजील आत्मविश्वास :**

या युद्धात इंग्रजांना फाजील आत्मविश्वास नडला. अमेरिकनांना ते कमी लेखत असत. त्यामुळे अमेरिकन लोकांच्या शक्तीचा व निर्धाराचा योग्य अंदाज इंग्रजांना आला नाही.

**४.५.१० इंग्रजांचा साम्रज्यवादी स्वार्थ :**

इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज हा हट्टी स्वभावाचा होता. अमेरिकेतील साम्रज्यवादी सत्ता टिकविणे व वसाहतींना पारतंत्र्यात ठेवणे या धोरणामुळे वसाहतवाले असंतुष्ट झाले. इंग्लंडमधील उदारमतवादी एडमंड बर्क, विल्यम पिटू, चार्ल्स फॉक्स इ. सदस्यांनी राजाच्या धोरणाला विरोध करुन अमेरिकेची बाजू घेतली. यामुळे परदेशीय राष्ट्रांची मदत इंग्लंडला मिळाली नाही.

**४.५.११ दोन विचारप्रणालीतील फरक :**

इंग्लंड स्वार्थासाठी तर अमेरिका मुक्तीसाठी लढले. इंग्रजांना आपल्या सामर्थ्याचा मोठा अभिमान होता. अमेरिकेला सामान्य राष्ट्र समजत असे. याऊलट अमेरिकेला आपल्या शक्तीची व सामर्थ्याची कल्पना होती. त्यामुळे ते काळजीपूर्वक व शिस्तीने लढत होते. इंग्रजी सैन्य मालकासाठी लढत होते. त्यांच्यात कमालीची बेशिस्त होती. अमेरिकन समाज व सैन्य यांच्यात उच्च प्रकारचा नि:स्वार्थी राष्ट्रवादी भाव होता. त्या भावनेने ते लढत होते. त्यामुळे इंग्रजांच्या प्रचंड पाशवी शक्तीचा धुव्वा केला.

**४.५.१२ वसाहतवाल्यांना शासकीय व राजकीय अनुभव :**

अमेरिकेतील वसाहतीतील लोकांना अनेक प्रकारच्या शासकीय व राजकीय बाबीचा अनुभव मिळाला होता. इंग्रज सैनिकांच्या व अधिकार्यांच्या मार्गदर्शनाशिवाय युद्ध करण्याची तयारी केली होती.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील यशापयशाची कारणे सांगा.

## ४.६ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे परिणाम

अर्वाचीन जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना म्हणजे अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध होय. ही घटना मूलभूत परिवर्तन व आधुनिक पर्वाचा आधारस्तंभ होता. तिने पाशवी साम्रज्यसत्तेला धक्का दिला. जगातल्या राष्ट्रवादाचे आश्रयस्थान असलेल्या क्रांतीने संघराज्य, लिखित घटना, अध्यक्षीय लोकशाही ही नवी मूल्ये जगाला दिली. अमेरिकेचा सर्वांगीण विकास होऊन संपन्न व बलशाली राष्ट्राचा उदय या क्रांतीने झाला. या क्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे झाले-

### ४.६.अ. अमेरिकन क्रांतीचे अमेरिकेवरील आर्थिक परिणाम

अमेरिकेच्या १३ वसाहतींनी आपला मातृदेश इंग्लंडविरुद्ध युद्ध करुन महान क्रांती केली व तेरा वसाहतीचे एक स्वतंत्र संघराज्य बनविणे या स्वातंत्र्ययुद्धाचा आर्थिक परिणाम पुढीलप्रमाणे -

### ४.६.अ.१ आयात-निर्यातीचे स्वातंत्र्य :

अमेरिकेच्या आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम झाला. इंग्रजांनी व्यापारवादी कायदे करुन अनेक निर्बंध लादले होते. इंग्लंडच्या मालाची आयात कमी झाली. त्यामुळे अमेरिकेच्या मालाला चालना मिळाली. आयात-निर्यातीचे जे स्वातंत्र्य होते ते बंद झाल्याने इंग्लंडची मक्तेदारी नष्ट झाली.

### ४.६अ.२ उद्योगधंद्याचा विकास :

इंग्लंडचे संबंध नष्ट झाल्याने अमेरिकेमध्ये नव्या उद्योगधंद्याला चालना मिळाली. स्वातंत्र्य युद्धकाळात ब्रिटिश मालावर बहिष्कार घातला. त्यामुळे अमेरिकेतच घराघरातून वस्त्रोद्योग सुरु झाले. क्रांतीमुळे युद्धासाठी लागणारा दारुगोळा व शस्त्रे बनविणे, पोलाद निर्माण करणे, वर्तमानपत्रांना लागणारा कागद बनविणे वगैरे उद्योगांना शासन व जनता याने मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिले त्यामुळे प्रगती झाली.

### ४.६अ.३ व्यापार-वाहतुकीला चालना :

क्रांतीमुळे सागरी व्यापारी वाहतुकीला चालना मिळाली. अमेरिकेतील बंदरे जागतिक व्यापारासाठी खुली करण्यात आली. त्यामुळे स्पेन, हॉलंड, फ्रान्स या देशातील व्यापार्यांना संधी प्राप्त झाली. त्यांनी अमेरिकेला हवा असलेला मालाचा पुरवठा. विदेशी माल आल्याने उद्योगधंद्यांचा विकास झाला. खाजगी पण सशस्त्र व्यापारी जहाजांच्या संचाराला चालना मिळाली. अमेरिकेतील व्यापारी व्यापारासाठी जगभर फिरु लागले. त्यांचे व्यापारी संबंध वाढले. त्यातून नवे उद्योजक व भांडवलदार वर्ग उदयाला आला.

munotes.in

### ४.६अ.४ परदेशी व्यापार वाढला :

क्रांतीमुळे अमेरिकेतील व्यापारी क्षेत्रावर मोठा परिणाम झाला. विविध प्रांतातील मोठ्या घराण्याने व्यापार क्षेत्रात प्रवेश केला. नव्या बाजारपेठा प्राप्त करण्यासाठी व व्यापारवाढीसाठी प्रयत्न केला. वेस्ट इंडीज बेट, दक्षिण अमेरिका, युरोपीय देश आणि आशिया खंडात चीनपर्यंत व्यापारी संबंध वाढवले. त्यामुळे परदेशी व्यापार वाढला.

### ४.६अ.५ संपत्ती निर्मितीचे नवे मार्ग :

क्रांतीकाळात युद्धाचा व शासनाचा खर्च भागविण्यासाठी पैसा कसा निर्माण करावा हा प्रश्न राष्ट्रसभेसमोर होता. राष्ट्रसभा व राज्यांनी कोणतेही व्याज न देणारे कागदी चलन सुरु केले. त्याला बिल्स ऑफ क्रेडिट म्हणतात. याचा उपयोग शासनाला पुरविलेल्या मालाचा वेळोवेळी मोबदला म्हणून करण्यात आला. कागदी चलनाची संख्या ४० कोटी डॉलर्स मूल्याइतकी वाढली होती. त्यामुळे चलनफुगवटा झाला. चलनाचे अवमूल्यन झाले. युद्धकाळात व्यापाराला चालना मिळाली. माल खरेदीसाठी आर्थिक व्यवहार केंद्र निर्माण झाली. त्यातूनच नवे उद्योजक व भांडवलदार वर्ग निर्माण झाला.

### ४.६अ.६ समताधिष्ठित समाज :

समतेच्या विचाराने अमेरिकन व्यक्ती प्रेरित झालेली होती. श्रेष्ठ-कनिष्ठ या भेदभावावर आधारित असलेल्या संस्था व संघटनांना त्यांनी विरोध केला. तसेच खाजगी सामाजिक मंडळे किंवा क्लब आणि आयात-विलासी-चैनी वस्तूंच्या वापराला विरोध केला. मिस्टर व मिसेस ही सन्मानदर्शक उपपदे लावण्याची प्रथा फक्त श्रीमंत व अतिप्रतिष्ठित लोकांतच होती. क्रांतीनंतर अमेरिकन प्रत्येक स्त्री-पुरुष यांच्या नावासोबत ही उपपदे लावू लागले. घरातील नोकरालाही आपला मदतीस समजू लागले. कोणताही व्यक्तिभाव नसलेल्या व्यावसायिक संघटना स्थापन होऊ लागल्या. त्यातूनच अमेरिकेत औद्योगिक मंडळे स्थापन होऊ लागली. त्यातून समाजाचा विकास घडून आला.

### ४.६अ.७ कुटुंबव्यवस्थेवरील परिणाम :

अमेरिकन क्रांतीने प्रजासत्ताकवादाला चालना मिळाल्याने कुटुंब व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला. कुटुंबात प्रत्येकाला एक व्यक्ती म्हणून समानतेची वागणूक दिली. मालमत्तेचा सर्व वारसा थोरल्या मुलालाच मिळाला पाहिजे हा कायदा नष्ट केला. पालकांनी मुलामुलींची लग्ने ठरविण्याऐवजी प्रेमसंबंधामुळे लग्ने ठरविण्याची नवी प्रथा सुरु झाली.

### ४.६अ.८ गुलामगिरीविरोधी भावना :

जमीनदारीच्या वाढीसाठी आफ्रिकेतून आणलेल्या निग्रोची खरेदी-विक्री होत असे. शेतमालकाकडे अनेक निग्रो कुटुंबे होती. अनेक निग्रोंनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. काहींनी बलिदान केले. इ.स. १७७६ मध्ये स्वातंत्र्याच्या घोषणेमध्ये सर्व माणसे समान घडविण्यात आली आहेत असे स्पष्ट केले असले तरी गुलामगिरी होतीच. इ.स. १७७४ मध्ये राष्ट्रीय सभेने गुलामीचा व्यापार बंद करण्याचे आवाहन केले. त्यामुळे सहा राज्यांनी व्यापार बंद केला. इ.स. १७७५ मध्ये फिलाडेल्फियातील क्वेकर्स पंथियांनी जगातील

पहिली गुलामगिरीविरोधी संघटना स्थापन केली. त्यानंतर अनेक संघटना स्थापन झाल्या. त्यातून गुलामगिरी कायमची नष्ट करण्याचे कार्य इ.स. १८६० नंतर होऊ शकते.

**४.६अ.९ स्त्रियांच्या स्थितीवरील परिणाम :**

अमेरिकेतील महिला विविध क्षेत्रात काम करत होत्या. स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी सहभाग घेतला. युद्धकाळात बहिष्कार घालून, निधी गोळा करुन, चोरट्या व्यापारावर नजर ठेवून व विविध उद्योग सांभाळून आपली जबाबदारी पार पाडलेली होती. काही कर्तबगार स्त्रिया लेखन, समाजकार्य, वृत्तपत्र व्यवसाय करत होत्या. जाहीरनामा व घटना यांनी त्यांची दखल घेतली नाही. त्यांना मतदानाचा हक्क नव्हता. कुटुंबात स्त्रीचे स्थान उंचावले. पत्नी व माता या नात्याने स्त्रीला कौटुंबिक जीवन अधिक स्थिर व सुखी बनविता आले. शिक्षण देणे, अर्थोत्पादक कामे करणे इकडे स्त्रियांनी लक्ष दिले.

**४.६अ.१० स्वातंत्र्याचा जाहीरनामा :**

जॉर्जिया वगळता इतर बारा वसाहतींच्या ५६ प्रतिनिधींची पहिली बैठक सप्टेंबर १७७४ मध्ये झाली. हक्कांचा जाहीरनामा तयार केला. ब्रिटिश पार्लमेंटला वसाहतीच्या संमतीशिवाय कोणताही कर लादता येणार नाही, अशी घोषणा केली. इ.स. १७७५ च्या दुसर्या अधिवेशनात बेंजामिन फ्रँकलिन, थॉमस जेफरसन, अलेक्झांडर हॅमिल्टन इ. समावेश असलेली एक समिती स्थापन केली. ४ जुलै १७७६ रोजी थॉमस जेफरसन याने जाहीरनाम घोषित केला. हा जाहीरनामा केवळ अमेरिकापुरताच मर्यादित न राहता तो जगातल्या मानवी मूल्यांची जोपासना करणारा ठरला. माणसाचे मूलभूत हक्क, स्वातंत्र्य, समता, संरक्षण, उन्नती, सुख, समृद्धी व शासन संस्था व नागरिकांतील विविध संबंध इ. जीवन तत्त्वे त्यातून निर्माण झाली. कोणत्याही जुलमी सखेला नेस्तनाबूत करण्याची प्रेरणा देणारा तो आधारस्तंभ होता. जेफर्सनच्या जाहीरनाम्याने भौतिक जीवनाच्या नीतीमूल्यांचा विचार प्रकट केला. जीवनमूल्यासाठी लढा देणे ही प्रेरणा जगातील मानवाला देण्याचे कार्य स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याने पार पाडले.

**४.६अ.११ राष्ट्रवादी भावनेचा विकास :**

स्वातंत्र्ययुद्धाच्या पूर्वकाळात निर्माण झालेल्या राष्ट्रवादी सामर्थ्यावरच अमेरिकेने इंग्रजांशी लढा देऊन विजय प्राप्त केला. घटना निर्मितीच्या काळात राष्ट्रवादी भावनेला ग्रहण लागले. भविष्यकाळात अमेरिकनांची अस्मिता व राष्ट्रनिष्ठा विकसित झाल्याने प्रशांत महासागरापर्यंतचे एक संपन्न व समर्थ राष्ट्राचा उदय झाला. जगात अमेरिकनांची नवीन लोकशाही सस्कृती निर्माण झाली. क्रांतीकाळातील स्वातंत्र्य, लोकशाही व राष्ट्रवाद इ. जगात प्रसार झाला. अमेरिकेतील विचारवंत पॅट्रिक हेन्रीने 'मला स्वातंत्र्य द्या नाही तर मरण द्या' असे उद्गार काढले.

**४.६अ.१२ धार्मिक व सांस्कृतिक परिणाम :**

वसाहतवादाच्या काळापासून धार्मिक सुधारणा युग निर्माण झाले होते. धर्मछळाला कंटाळून अनेक लोकांनी नव्या वसाहतीमध्ये स्थलांतर केले. यांनी धर्मबंधने व धर्मपंथ

झुगारुन दिले. प्युरिटन सेपरेटिस्ट, क्वेकर व सुधारित कॅथॉलिक पंथाचा प्रभाव होता. क्रांतीयुद्धानंतर धर्मसत्ता व राजसत्ता याचं विभाजन केले. धर्माच्या प्रभावातून शिक्षण मुक्त झाले. शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, विज्ञान, भौतिकशास्त्र, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, वृत्तपत्रे इ. प्रगती झाली. त्यामुळे अमेरिका सुविद्य व सुसंस्कृत व बुद्धिमान राष्ट्र म्हणून उदयाला आले.

**४.६ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे जागतिक परिणाम :**

**४.६.ब.१ संघराज्य या नव्या स्वतंत्र राष्ट्राचा उदय :**

अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध संपल्यानंतर ब्रिटिशांनी तेरा वसाहतींना स्वातंत्र्य व सार्वभौमत्व दिले. त्यामुळे इंग्रजीची सत्ता नष्ट होऊन स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्ययुद्धानंतर आठ वर्षाच्या काळानंतर राज्यघटना तयार झाली. तेरा वसाहतीचे अमेरिकन संयुक्त संस्थाने या नावाने स्वतंत्र राष्ट्र उदयास आले. हा देश म्हणजे जगातील पहिले लोकशाही प्रजासत्ताक संघराज्य होय.

**४.६.ब.२ इंग्लंडच्या साम्रज्यवादाचा शेवट :**

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धापर्यंत युरोपीय राजकारणात इंग्लंडची ध्येयधोरणे श्रेष्ठ मानली जात व राजकारणात मानाचे स्थान होते. इंग्लंडचे आरमार सर्वश्रेष्ठ व शक्तिशाली होते. याच्या जोरावर त्यांनी अमेरिका, आफ्रिका, आशिया खंडात वसाहती स्थापन केल्या होत्या. तिसरा जॉर्ज राजा यांच्या धोरणामुळे वसाहतीतील लोक नाराज झाले होते. त्यांनी इंग्लंडविरोधी लढा दिला. त्यातून अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या. त्यामुळे इंग्लंडच्या साम्रज्यवादाला धक्का बसला. अमेरिकन वसाहत प्रचंड फायदा मिळवून देणारी नष्ट झाली. त्याबरोबर यापूर्वीचे इंग्लंडचे मानाचे व श्रेष्ठत्वाचे स्थानही नष्ट झाले.

**४.६.ब.३ इंग्लंडचा पराभव :**

स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी अमेरिकेला फ्रान्स, स्पेन, हॉलंड या देशांनी मदत केली होती. त्यामुळेच इंग्लंडचा पराभव झाला. इंग्लंडने पॅरिस तहावर सही करुन अमेरिकेला स्वातंत्र्य दिले. अमेरिकेला पश्चिमेकडील विस्तृत प्रदेशही दिला. फ्रान्सला सेनेगल, टोबॅगो, गॉरी या वसाहती दिल्या. हॉलंडला काही व्यापारी प्रदेश व व्यापारी सवलती दिल्या. स्पेनला पालॉरिडा व मिनोकी वसाहती दिल्या. इंग्लंडला कॅनडा वसाहत देण्यात आली. या तहामुळे इंग्लंडला अमेरिकेची मोठी वसाहत व आर्थिक फायदा सोडून द्यावा लागला. त्यामुळे इंग्लंडवर आर्थिक, राजनैतिक असा दुहेरी प्रचंड आघात झाला. पॅरिस तहाला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाला ग्रहण लागले.

**४.६.ब.४ स्पेन-फ्रेंच आरमाराचा पराभव :**

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धांत स्पेन व फ्रेंच यांनी अमेरिकेला मदत केली. हे युद्ध दीर्घकाळ सुरु होते. या युद्धांत इंग्लंडचा शेवटी पराभव झाला. तरी पण इंग्लंडनेही स्पेन व

फ्रेंच या आरमारांचा पराभव केला होता. त्यामुळे स्पेन व फ्रेंच यांची आरमारी शक्ती नष्ट झाली. तसेच त्यांचे आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणात झाले.

**४.६.ब.५ फ्रेंच राज्यक्रांतीला स्फूर्ती :**

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात फ्रान्सने मदतीसाठी आपले लष्कर पाठवले. त्यामुळे इंग्लंडचा पराभव झाला. फ्रेंच सैनिकांचा आत्मविश्वास वाढला. मायदेशी परत जाताना त्यांना नवीन स्फूर्ती व जोम वाटू लागला. अमेरिकन लोकांप्रमाणे त्यांनाही मूलभूत हक्कांची जाणीव झाली. लाकायत याच्या नेतृत्वाखाली लढलेले सैनिक आपल्या पराक्रम व क्रांतीची कथा फ्रेंच लोकांना सांगत होते. त्यामुळे सोळाव्या लुईच्या अन्याय व जुलूम याविरुद्ध बंड करण्याचा हक्क आहे, असे लोकांना वाठत होते. अमेरिकन जाहीरनामाच्या धर्तीवर फ्रेंच क्रांतिकारकांनी फ्रेंचच्या जाहीरनामा प्रसिद्ध केला. इ.स. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली.

**४.६.ब.६ अध्यक्षीय लोकशाही व लिखित घटना :**

जगातील आधुनिक लोकशाहीचा उदय इंग्लंडमध्ये झाला. त्यातील त्रुटी नष्ट करुन सर्वांगीण उन्नत लोकशाहीला अमेरिकेने जन्म दिला. अमेरिकेतील विचारवंतांनी स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याच्या आधारे नवीन लिखित राज्यघटना निर्माण केली. लिखित स्वरूपाची राज्यघटना ही जगातील पहिली लिखित राज्यघटना मानली जाते. यापूर्वीच्या इंग्लंडमधील घटनेचा बहुतांश भाग अलिखित होता. घटनाकारांत बरेच जण राजनिष्ठ विचारसरणीचे असल्याने त्याने ब्रिटनमधील राजपदाच्या धर्तीवर अमेरिकन अध्यक्षपदाची निर्मिती करुन त्याला बरेच अधिकार दिले. द्विगृही काँग्रेसचे कायदे मंडळ स्थापन केले. प्रांत व केंद्र यांच्यातील वाद सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना केली. नागरिकांच्या मताधिकाराची व्याप्ती वाढली. संघराज्य, लिखित घटना, द्विगृही काँग्रेस, सर्वोच्च न्यायालय, नागरी स्वातंत्र्य, अध्यक्षीय लोकशाही इ. नवशासनाचे विशेष होय.

**४.६.ब.७ अमेरिकेचा पश्चिमेकडील विस्तार :**

अमेरिकेच्या तेरा वसाहती फक्त अटलांटिक समुद्राच्या पूर्व किनार्यावर होत्या. पॅरिसच्या तहाने पश्चिमेकडील मिसिसिपी, टेनेसी नदीपर्यंतचा विस्तृत प्रदेश अमेरिकेच्या ताब्यात आला. या प्रदेशात अनेक कायदे पास केले. जमीन, शिक्षण, रेल्वे वाहतूक, अनेक प्रकारच्या सवलती उपलब्ध करुन दिल्या. त्या प्रदेशातील लोकांना संघराज्यात प्रवेश देण्याची हमी दिली. येथील निग्रो दासप्रथेवर बंदी घातली.

**४.६.ब.८ जगातील सर्व वसाहती राष्ट्रांत क्रांतीचा पडसाद :**

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने जी महान क्रांती घडवून आणली तिचे परिणाम सर्व जगभर झाले. या युद्धाने क्रांतीयुद्धाचा प्रारंभ केला आणि सर्व जगभर क्रांतीच्या पडसाद उमटत गेल्या. या क्रांतीच्या पडसाद इटली, फ्रान्स, रशिया, पर्शिया, तुर्कस्थान आणि भारत या देशात उमटल्या. इ.स. १९१० मध्ये मेक्सिको, इ.स. १९११ चीन, इ.स. १९१७ रशिया, तुर्कस्थान, इ.स. १९६० चीन, ग्वाटेमाला इ. देशात क्रांती झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकन राज्यक्रांतीचे जगावर झालेले परिणाम सांगा.

## ४.७ सारांश

नवे भौगोलिक भूप्रदेश व जलमार्ग यांच्या माध्यमातून युरोपीयन शब्दांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. इंग्लंडने आपली वसाहत स्थापन करुन तेथे आपल्या देशातील लोकांचे स्थलांतर केले. परंतु हे स्थलांतरीत लोक त्या प्रदेशाशी एकरूप व एकनिष्ठ राहून आपली जन्मभूमी व कर्मभूमी मानू लागले. इंग्रजांनी या प्रदेशाची लुट केली तसेच अनेक अधिकार नाकारले त्यातूनच अमेरिकन राज्यक्रांती घडून आली. अमेरिकन राज्यक्रांतीने ब्रिटिश वसाहतवादाला तडा गेला शिवाय अनेक देशात वसाहतवादाला विरोधी स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला. शिवाय अमेरिकेत संसदीय अध्यक्षीय लोकशाही सुरु झाली. लोकशाहीची देणगी अमेरिकेने जगाला दिली.

## ४.८ प्रश्न

१) अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे स्पष्ट करा.
२) अमेरिकन स्वातंत्र्य युद्धातील घटनांचा आढावा घ्या.
३) अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाच्या यशापयशाची कारणे सांगा.
४) अमेरकिन राज्यक्रांतीच्या परिणामांची चर्चा करा.

❖❖❖❖

# ५

# फ्रेंच राज्यक्रांती

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

५.३ क्रांती काळातील घटना

५.४ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

५.५ सारांश

५.६ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

१) फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे याची माहिती प्राप्त करुन देणे.

२) राज्यक्रांतीच्या काळातील वेगवेगळ्या घटनांचा आढावा.

३) फ्रेंच राज्यक्रांतीने फ्रेंच व युरोप आणि जगावर काय परिणाम झाले याची माहिती मिळवणे.

४) नेपोलियनच्या जीवनचरित्राची माहिती समजावून घेणे.

५) नेपोलियनच्या अंतर्गत सुधारणांचा आढावा घेणे.

६) नेपोलियनच्या परराष्ट्रीय धोरणाची तपशीलवार माहिती सांगणे.

७) नेपोलियनच्या पराभवाची माहिती सांगणे.

## ५.१ प्रस्तावना

१८ शतकाच्या उत्तरार्धातच या नवीन कल्पनांची, सुधारणांची, मूल्यांची बीजे दृष्टोत्पत्तीस येत होती. याच वेळी जुन्या मूल्यांचे थडगे बांधले होते. परंतु त्याचबरोबर नवीन युगाची तुतारी फुंकली गेली. १९ व्या शतकाचा उदय हा अत्यंत क्रांतिकारक समजला जातो. कारण औद्योगिक क्रांती व फ्रेंच राज्यक्रांती या दोन क्रांतिकारी घटनांमुळे सारा युरोप खंड तळापासून ढवळून निघाला. त्यामुळे युरोपचा चेहरामोहरा बदलून टाकला होता. जमीनदारी, सरंजामदारी, हुकूमशाही इ. बाबी नष्ट करुन आधुनिक जगात लोकशाहीछा

पाया घातला. मानवी मूलभूत हक्कांची म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचे एक नवीन युग अस्तित्वात आले. युरोपमधील इतर राष्ट्रांतील पीडित व दडपल्या गेलेल्या लोकांससुद्धा आपल्या राष्ट्रात बदल घडवून आणण्यास स्फूर्ती प्राप्त झाली. आपल्या राष्ट्राची व समाजाची नवीन आधुनिक प्रगतीवादी तत्त्वावर उभारणी केली. त्यातून नवे पर्व सुरु झाले. राज्यक्रांतीनंतर नेपोलियन बोनापार्टने अंतर्गत सुधारणा व आपल्या परराष्ट्र धोरणामुळे फ्रान्सचा विकास घडवून आणला.

## ५.२ १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

संपूर्ण मानवी इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती अतिशय महत्त्वाची मानली जाते. फ्रेंच राज्यक्रांतीने मध्ययुगातील हुकूमशाही नष्ट करुन, समाजाला आधुनिक लोकशाहीत आणून सोडले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन मुलभूत कल्पना फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिल्या. इ.स. १६८८ च्या इंग्लंडमधील वैभवशाली क्रांतीने राजेशाहीला मर्यादित केले. हॉब्स या विचारवंतांची विचारप्रणाली फेकून लॉकीची मर्यादित राजेशाही या विचाराचा पाठपुरावा केला. १८ व्या शतकात ज्या क्रांत्या झाल्या त्यामध्ये इ.स. १७७६ मध्ये अमेरिकन राज्यक्रांतीने वसाहवतवादला व साम्रज्यवादाला पहिला तडाखा दिला. राजाची सत्ता ही ईश्वरी सत्ता आहे. हे तत्त्व इंग्लंडच्या क्रांतीने पायधुळी तुडवले आणि घटनात्मक राजेशाहीचा प्रयोग सुरु केला. याचा परिणाम फ्रेंचवर होऊन अकार्यक्षम, दुर्बल राजसत्तेचे उच्चारटनाचा प्रयत्न केला. त्यातून फ्रेंचमध्ये इ.स. १७८९ मध्ये राज्यक्रांती झाली. तिची कारणे पुढीलप्रमाणे -

### ५.२.१ राजकीय कारणे :

**१) अनियंत्रित राजेशाही :**

अनेक वर्षांपर्यंत लोकांच्या मनात असंतोष साचला होता. त्याचा उद्रेक होऊन क्रांतीत रुपांतर झाले. याला कारण म्हणजे बुरबोन राजघराण्याची सत्ता होय. हे राजे प्रजेच्या कल्याणाची काळजी न घेता राज्यकारभार करताना 'दैवी अधिकाराचा सिद्धांत' त्यांना मान्य होता. ते लोकांच्या जीविताचे व मालमत्तेचे मालक बनून स्वत:ला भाग्यविधाते समजत असे. त्यांचा शब्द म्हणजे कायदा. मन मानले तेव्हा युद्ध पुकारणे बंद करणे. १४ व्या लुईच्या काळात फ्रान्सचे युरोपच्या राजकारणात मानाचे स्थान होते. १५ व्या - १६ व्या लुईच्या काळात लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला. फ्रान्सने अमेरिकेला स्वातंत्र्ययुद्धात मदत केली. त्या वेळी 'राजाविरहित राज्य' अमेरिकेत प्रस्थापित झाले. हे फ्रेंच सैन्याने पाहिले. इंग्लंडमध्ये जनतेचे सनदशीर सरकार प्रस्थापित झाले. हे फ्रेंच जनतेला समजले तेव्हा फ्रान्समधील जनतेच्या मनात राजाबद्दल असंतोष निर्माण झाला.

**२) सप्तवार्षिक युद्धात झालेली हानी :**

इ.स. १७६१ मध्ये प्रशिया-ऑस्ट्रिया यांच्यात सातवर्षीय युद्ध झाले. या युद्धात फ्रान्सने ऑस्ट्रियाच्या बाजूने युद्धात उडी घेतली; परंतु फ्रान्सचा मोठ्या प्रमाणात पराभव



munotes.in

झाला. श्रेष्ठ प्रतीचे लष्कर नष्ट झाले. प्रचंड हानी झाली. त्यामुळे फ्रान्सच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला. राजे लोकांच्या कर्तृत्वशून्य नेतृत्वामुळे पराभ सहन करावा लागला, याची खात्री जनतेला झाली त्यातून जागृती निर्माण होऊन क्रांती झाली.

**३) १४, १५, १६ व्या लुई :**

१४ व्या लुईची कारकीर्द दोन विभागात विभागली जाते. पहिल्या विभागात प्रचंड व्हर्सय राजवाडा व इतर अनेक इमारती बांधल्या. विद्वानांना आश्रय दिला. फ्रान्सला युरोपच्या राजकारणात मानाचे स्थान प्राप्त करुन दिले. नंतर मात्र तो स्वत:च्या इच्छेनुसार व लहरीनुसार राज्यकारभार करु लागला. मी राज्यच आहे, असे तो म्हणे. त्याने ७० वर्षे सत्ता उपभोगली. त्यांच्यानंतर १५ वा लुई इ.स. १७१५ ते इ.स. १७७४ पर्यंत सत्तेवर आला. तो चैन, विलास ऐषआरामात दंग राहिला होता. वयाने लहान असून तो अविचारी, व्यसनी, दुराचारी होता. तिजोरीचा अंदाज न घेता अमाप खर्च करत असे. 'मायानंतर प्रलय' हे त्याच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होते. १६ वा लुई इ.स. १७७४-९३ या काळात सत्तेवर आला. तो सालस व सत्प्रवृत्त त्याचबरोबर लाजाळू व एकलकोंड्या स्वभावाचा होता. राज्यारोहणा वेळी 'सर्व विश्व मायावर कोसळल्यासारखे मला वाटते किंवा केवढी ही प्रचंड जबाबदारी मायावर टाकण्यात आली आहे. ती पार पाडण्याचे शिक्षण मात्र मला देण्यात आले नाही.'' मालेशर्ब्स या मंत्र्याने राजीनामा दिला त्या वेळी तो म्हणाला, 'तू किती नशिबवान आहेस! मलाही असा राजीनामा देता आला तर, किती छान झाले असते.'' त्याला मंत्रिमंडळाच्या बैठकीत रस नव्हता. तो आपल्या पत्नीच्या सल्ल्याने सर्व राज्यकारभार करीत असे.

**४) राणी मेरी ॲटाईनेटचा स्वभाव :**

बुरबोन राजघराण्यात नेहमीच स्त्रियांचा वरचष्मा असत. स्त्रियांच्या तंत्राने राज्य चालत असे. १६ व्या लुईची पत्नी मेरी ॲटाईनेट ही ऑस्ट्रियाची मेरीआ येरेसा हिची कन्या होय. लहानपण कडक बंधनात गेले होते. लग्नानंतर चैनीवर अफाट पैसा खर्च करुन, आरामात जीवन जगण्यास सुरुवात केली. राजकारणात तिने लुडबूड केल्याने फ्रान्स जनतेच्या मनात अप्रिय ठरली. भूकेने व्याकुळलेला मोर्चा राजवाड्यावर आला. त्या वेळी ती म्हणाली 'तुम्हाला ब्रेड मिळत नसेल तर केक खा' तिच्या या वागणुकीमुळे लोकांनी तुटीची राणी अथवा दी ऑस्ट्रियन या कुचेष्टापूर्व नावाने ओळखत असे.

**५) राजवाड्यातील उधळपट्टी :**

१४ व्या लुईने पॅरिस राजधानीपासून ११ मैलांवर व्हर्साय राजवाडा बांधला. त्यासाठी ३० कोटी रूपये खर्च केला. तेथे राजा-राणीच्या तैनातीला १५०० नोकर, खास राणीसाठी ५०० तर राजकन्येसाठी ८३ नोकर सेवेसाठी ठेवले होते. राजवाड्यात १८७५ घोडी व २१७ वाहने होती. राजाच्या पंगतीला रोज ३८२ अधिकारी जेवत असे. १०३ वाढपी करीत असे. याचा वार्षिक खर्च १० कोटी फ्रॅंक येत असे. २ हजार उमराव राजाच्या

दरबारात असे. त्यामुळे फ्रान्सचा खर्च सतत वाढत जाऊन सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात त्याचे ओझे पडू लागले.

**६) भ्रष्ट राज्यकारभार :**

फ्रान्सचे एकूण राज्यकारभारासाठी ४० विभाग केले होते. त्यावर उमरावाला गव्हर्नर म्हणून नेमले जात. ४० विभागाचे राज्यकारभारासाठी अनेक लहान भाग केले जात. त्यावर अटेंडंट हा अधिकारी नेमत. तो मध्यमवर्गीय भांडवलदार असे. हे सर्व अधिकारी भ्रष्ट, जुलमी, लाचखाऊ असल्याने प्रजेच्या कल्याणाकडे कोणाचेच लक्ष नसे. ते राजाची मर्जी सांभाळून राज्यकारभार करीत असे. त्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले.

**७) कायद्यातील गोंधळ :**

देशातील वायदा म्हणजे गोंधळाचे मूर्तिमंत प्रतीक होते. कायद्याच्या बाबतीत एकवाक्यता, एकसूत्रीपणा व समता नव्हती. फ्रान्समध्ये ३६०-४०० कायदा पद्धती होत्या. मैन प्रांतात १२५ प्रकारच्या कायदे पद्धती अस्तित्वात होत्या. कायदे लॅटिन भाषेत असल्याने सर्वसामान्याला समजत नसे. व्हॉल्टेअर म्हणतो की, 'फ्रान्समध्ये प्रवास करताना माणसाला जितक्या वेळा घोडी बदलावी लागतात, तितक्या वेळी कायद्याच्या पद्धतीसुद्धा बदलाव्या लागतात.“

**८) सदोष न्यायपद्धती :**

फ्रान्समध्ये न्यायदानाची पद्धत अतिशय सदोष होती. कायदे अतिशय क्रूर आणि अन्यायकारक होते. गुन्ह्याकरिता क्रूर शिक्षा दिल्या जात. त्यांचे हातपाय तोडणे, कान कापणे, हाडे मोडतील इतका मार देणे. संशयावरुन अनेक लोकांना विनाचौकशी तुरुंगात डांबले जात. परंतु कायद्यात 'हेबिअस कॉपर्स' ची तरतूद नव्हती. राज न्यायालये, लष्करी, चर्च, अर्थ न्यायालये इ. विविध प्रकारचे होते; परंतु त्याचे अधिकार क्षेत्रे निश्चित नव्हते.

**५ .२.२ सामाजिक कारणे :**

**१) फ्रान्समधील वर्ग :**

सरदार, धर्मगुरु, सर्वसामान्य लोक असे तीन वर्गात समाज विभागला होता. या प्रत्येक वर्गात वरिष्ठ व कनिष्ठ असे भेद होत. ही अन्याय व विषमतेवर आधारित होती. भूदास व गुलामांचा एक वेगळाच वर्ग अस्तित्वात होता. श्रमजीवी लोकांची संख्या ९९ टक्के होती. १ टक्के लोक सरदार, अमीर-उमराव व छोटेमोठे धर्मगुरु हे होते. हे लोक बहुसंख्य जनतेवर अन्यायय-अत्याचार करीत. चैनी, विलासी जीवन जगत असे.

**२) सरंजामदारांचे हक्क :**

सरंजामदारांचे वर्णन करताना मॉटेस्क्यू म्हणतो की, 'राजाशी बोलू शकणारा, मंत्र्याशी संपर्क साधणारा आणि ज्याला कर्ज, पेन्शन आणि वाडवडिलांचा वारसा हक्क आहे अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय.' एकूण लोकसंख्येच्या १ टक्क्याहून कमी

सरंजाम सरदारची संख्या होती. ६० टक्के जमीन त्यांच्या ताब्यात होती. कुळाकडून जबरदस्तीने शेत पिकवली जात. विनामूल्य शेतात राबवून घेणे, चर्च व सैन्यातील मोठ्या जागा सरंजामदाराला मिळत असत. या लोकांकडे खूप संपत्ती आणि अधिकारही असत.

**३) धर्मगुरुंचे हक्क :**

धर्मगुरुंना समाजात प्रतिष्ठेने स्थान असून अनेक सवलती होत्या. विधी-पूजाअर्चा हे कार्य करीत असत. सरंजामदारांप्रमाणे तेही ऐषआरामात, रंगेल, चैनी जीवन जगत असत. फ्रान्समध्ये लहान-मोठे ६४०० धर्मगुरुपैकी १८ आर्चबिशप, ११७ बिशप होते. सरासरी वार्षिक उत्पन्न १ लक्ष ७५ हजार प्रॅंक इतके धर्मगुरुंचे उत्पन्न होते. स्ट्रान्सबर्गच्या आर्चबिशपला वर्षाकाठी ३ लाख डॉलर्स इतके उत्पन्न होते. तो एका वेळी २०० लोकांना आलिशान राजवाड्यात पार्टी देऊ शकत. त्याच्याजवळ १८० घोडी होती. धर्मसंसथांचा वार्षिक खर्च ४६ कोटी प्रॅंक होता. धर्मसंस्था भौतिक सुखविलासी आणि चैनीत असल्याने अध:पतनाला सुरुवात झाली होती. वरिष्ठ-कनिष्ठ धर्मगुरुंमध्ये संघर्ष सुरु झाला होता. धर्मगुरु कायदे व करमुक्त होते. धर्मसंस्थांना प्रजेवर धार्मिक कर बसवण्याचा अधिकार होता.

**४) सर्वसामान्य लोक अथवा श्रमजीव लोक :**

या वर्गात ९९ टक्के लोक फ्रान्समधील असून त्यांच्यावर अतोनात अन्याय, अत्याचार, जुलूम होत असत. त्यांच्या ताब्यात फक्त २० टक्के जमीन होती. ९९ टक्के कराचा बोजा त्यांच्यावर होता. वरिष्ठ लोकांची सेवा करावी लागत. जमीनदार, धर्मगुरु यांना नजराणे देणे, विनावेतन काम करणे, जमीनदारांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च देणे, त्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाला खर्च सांभाळणे. स्वत: उपाशीपोटी राहून त्यांची सेवा करावी लागत. कार्लाईलने त्यांचे वर्णन करताना म्हटले की, प्रजेला वर्षातील ४ महिने नियमीत निकृष्ट प्रतीचे बटाटे खाऊनच आपली गुजराण करावी लागते. आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. कामगारांना १८-२८ तास काम करावे लागे. मजूरीही अतिशय कमी प्रमाणात मिळत असे. त्यामुळे भिकार्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

### ५.२.३ आर्थिक कारणे

या क्रांतीच्या मुळाशी आर्थिक कारणे होती, असे अनेक इतिहासकारांनी म्हटले आहे. दारुगोळा ठासून भरला. तो फ्रेंच तत्त्वज्ञानामुळे; परंतु क्रांतीचा भटका उडाला. तो तात्कालिक आर्थिक परिस्थितीमुळे असे म्हटले जाते. १४,१५,१६ व्या लुईने स्वत:च्या महत्त्वाकांक्षेपायी अनेक युद्धांत केल्याने सरकारला कर्जबाजारी आणि दिवाळखोर बनवले.

**अन्यायी व विषम करपद्धती :** फ्रान्समधील करपद्धती अतिशय दोषास्पद होती. संपत्तीचा साठा असणार्या अमीर, उमराव, धर्मगुरु हे करमुक्त असून, गोरगरीब जनतेवर कर लादले होते. ज्यांना १४ प्रॅंक कर भरावा लागे, त्यांना १५२ प्रॅंक्स भरावे लागत. सर्वसामान्य जनतेच्या उत्पन्नातील अर्धा हिस्सा कररूपाने द्यावा लागे. शिवाय मिठावरील कर,

धर्मपट्टी, अबकारी कर, स्टॅम्टड्युटी इ. कर द्यावे लागत. प्रत्येक व्यक्तीला ७ पौड मीठ वर्षाला विकत घ्यावे लागत असे. धर्मकर वाढवण्याचा अधिकार धर्मसंस्थांना असे. उमरावांचेही कर असे. ते पुलपट्टी, पाणीपट्टी, वाहतूक कर, शेतसारा इ. वसूल आपल्या कुळाकडून करीत असे. ते पुलपट्टी, पाणीपट्टी, वाहतूक कर, शेतसारा इ. वसूल आपल्या कुळाकडून करीत असे. प्रो. गुडपन - फ्रान्समधील शेतकरी दरिद्री होते किंवा मध्यमवर्गामध्ये राजकीय असंतोष होता म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांती घडून आली असे नव्हे तर फ्रान्समधील श्रीमंत वर्गाची प्रतिगामी प्रवृत्ती फ्रेंच राज्यक्रांतीस कारणीभूत ठरली, तर उमरावांवर टीका करताना म्हणतो - भयंकर अन्यायकारक आणि रक्तशोषणारी करपद्धती.

### ५.२.४ धार्मिक कारणे :

फ्रेंच जनतेच्या स्वातंत्र्याचे सर्व दृष्टीने अपहार करण्यात आलेला होता. धार्मिक स्वातंत्र्य अजिबात नव्हते. धर्मगुरुत श्रेष्ठ-कनिष्ठता ही दुफळीस व द्वेषास कारणीभूत होती. प्रोटेस्टंट धर्मावर बंदी घालण्यात आली होती. हा पंथ स्वीकारणाऱ्यास कायद्याप्रमाणे सक्तमजुरीची शिक्षा मिळत असत. शासनात व इतरत्र फक्त कॅथॉलिकांनाच नोकरी मिळत असे. ज्यू लोक व परकियांचे हाल केले जात. व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे लोप पावले होते. कोणत्याही व्यक्तीस केव्हाही तुरुंगात टाकू शकतात. अपराधी माणसाला न्यायालयात जाऊन न्याय मागता येत नसे. कनिष्ठ धर्मगुरु धर्मविधी सांभाळत. मात्र वरिष्ठ धर्मगुरु मानाने व ऐश्वर्याने राहत असे.

### ५.२.५ वैचारिक कारणे :

फ्रान्समधील सरंजामदार, धर्मगुरु यांच्या मक्तेदारीला तडा देण्याचे काम फ्रान्समधील विचारवंतांनी केले. त्यांनी आपल्या विचारप्रणालीतून समाजातील न्यूनगंड दूर करुन अनियंत्रित राजेशाही नष्ट करण्याची प्रेरणा दिली. त्यामध्ये रुसे, मॉटेक्यू, व्हॉल्टेर, रॉबेस्पियर इ. विचारवंतांनी कार्य केले.



**१) जीओ जॅक्स रूसो (इ.स. १७१२-७८) :**

फ्रेंच लोकांमध्ये क्रांतीची ज्योत पेटविण्याचे कार्य जीओ जॅक्स रूसो याने केले. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी हुकूमशाही नष्ट व्हावी, त्याबरोबर संपूर्ण समाजाचा पुर्नघटना आवश्यक वाटत होती. ज्ञान, संस्कृती आणि अध्ययन यांनी मानवाचे दिवसेंदिवस अध:पतन होत गेले, असे त्याचे मत होते. मानवाच्या दु:खाला समाज जबाबदार असे त्याने जाहीर केले. समाजात सर्व सुखसोयी श्रीमंत वर्गांना उपलब्ध असल्याने अशा समाजाची सर्व बंधने झुगारुन द्यावे.

रूसोचे प्रमुख कार्य म्हणजे त्याने लिहिलेला 'सामाजिक करार' हा ग्रंथ होय. त्यात त्याने सांगितले की, समाजाच्या प्रारंभिक अवस्थेत लोक सद्गुणी होते व स्वातंत्र्य आणि समाज हक्क उपभोगीत होते. लोकांनी आपसात करार करुन राज्य अस्तित्वात आणले. त्यामुळे सरकारने लोकांच्या कल्याणाकरिता राबले पाहिजे. जर राज्यसत्ता लोकांविरोधात असेल तर ती नष्ट करण्याचा अधिकार लोकांना आहे. हे प्रथम रूसोने मांडले होते. प्रजेचे सार्वभौमत्व ही कल्पना प्रथमच मांडली. त्याच्या आधारे सरकार योग्य की अयोग्य हे ठरवणे, ही स्फूर्ती दिली.

**२) माँटेस्क्यू (इ.स. १६८९ - इ.स. १७५५) :**

फ्रेंच राजसत्तेवर टीकेचे घाव घालण्याचा प्रारंभ प्रथम माँटेस्क्यूने केले. माँटेस्क्यू हा थोर राज्यशास्त्रज्ञ, प्रसिद्ध वकील व इतिहासाचा सखोल अभ्यासक होता. त्याने सर्व सामाजिक संस्थांचा व शासनपद्धतीचा अभ्यास करुन अनियंत्रित राजसत्तेवर हल्ला केला. त्याने इ.स. १७४८ मध्ये 'कायद्याचा खरा आत्मा' (Spirit of the Law) हा ग्रंथ लिहिला. १८ महिन्यात त्याच्या २२ आवृत्त्या निघाल्या. याच ग्रंथात सत्ताविभाजनाचे तत्त्व मांडले. समाजात मनुष्याला खर्या अर्थाने स्वातंत्र्य द्यायचे असेल तर सरकारने कार्यकारी, कायदेमंडळ, न्यायमंडळ या तीन शाखा परस्परापासून वेगळ्या पाहिजेत.



राज्यात कायद्याला सर्वश्रेष्ठ स्थान असावे, असे मत होते. म्हणजे घटनात्मक राज्याचा तो पुरस्कर्ता होता. त्याच्या ग्रंथाचा थोडक्यात सारांश म्हणजे इंग्लिश संसदीय राज्यपद्धती उत्तम आहे. कारण त्यात व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरेपूर संरक्षण केले होते आणि सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला होता. राजा ही एक आपत्ती असून ती अनिष्ट आपत्ती आहे. राजाचे दिवस संपले आहे, असे माँटेस्क्यू म्हणत असे.

**३) व्हॉल्टेअर (१६९४ - १७७८) :**

बौद्धिक गुलामगिरी नष्ट करण्याची व व्यक्तिस्वातंत्र्याची महती पटविण्याची थोर कामगिरी व्हॉल्टेअरने केल्याने त्यास 'राजा व्हॉल्टेअर' या नावाने ओळखू लागले. तो स्वत: कवी, नाटककार, शास्त्रज्ञ, इतिहासकार व अष्टपैलू विचारवंत या नात्याने केलेले कार्य अजोड होते. उपरोध, उपहास आणि विनोद या शास्त्रांच्या साहाय्याने त्याने प्रचलित सामाजिक संस्था, रूढी, चर्च, राजसंस्था इत्यादीवर प्रखर हल्ले चढविले. वयाच्या २३ व्या वर्षी आपल्या प्रतिभेने जगाला दिपविले आणि तो जगप्रसिद्ध झाला. वयाच्या ८४ व्या वर्षी त्याच्या सत्काराच्या वेळी टाळ्यांचा कडकडाट सुरु असतानाच हा जगप्रसिद्ध माणूस जगाच्या इतिहासात विलीन झाला. व्हॉल्टेअरने सतत व्यक्तिस्वातंत्र्याकरिता लढा देऊन अन्याय कधीही सहन केला नाही. तो हुकूमशाहीचा कट्टर विरोधक होता; परंतू लोकशाहीवरही त्याचा विश्वास नव्हता. कल्याणकारी हुकूमशाहीचा त्याने पुरस्कार केला. एका सिंहाचे राज्य परवडले; परंतु शंभर उंदरांचे राज्य नको, असे लोकशाहीबाबत मार्मिक उद्गार काढले. तो कॅथालिक पंथाचा अभिमानी असला तरीही अधोगतीमुळे त्याने टीका केली.



**आपली प्रगती तपासा :**

१) फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे थोडक्यात लिहा.

## ५.३ इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील घटना

फ्रान्समध्ये बुरबॉन घराण्यातील १४, १५, १६ व्या लुईची अनियंत्रित राजेशाही होती. त्यांनी समाजावर दु:खाचा डोंगर लादला. त्यांच्या अन्यायातून क्रांतीचा उद्रेग होऊन, जुनी राज्यव्यवस्था व सरंजामशाही इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने रसातलाला पोहचवली. या क्रांतीच्या घडामोडी पुढीलप्रमाणे घडल्या. इ.स. १७८९ पासून राज्यक्रांतीला प्रारंभ झाला तो इ.स. १७९५ मध्ये तिचा शेवट होऊन, प्रजासत्ताकाची घटना तयार केली. राज्यक्रांतीच्या घटनांचे दोन विभागात वर्गीकरण केले जाते. १) इ.स. १७८९-९१ २) इ.स. १७९१-९५.

**१) फ्रान्समधील आर्थिक दिवाळखोरी :**

१४ व्या, १५ व्या लुईने विनाकारण पैशांची उधळपट्टी केली. गोरगरीबावर कर लादून आर्थिक परिस्थिती सावरण्यास प्रयत्न केला. पण ते अशक्य झाले. राष्ट्रीय कर्जाची रक्कम ४,४६,७४,७८,००० लिरा एवढे वाढले. या दिवाळखोरीतून फ्रान्सला वाचवण्यासाठी १६ व्या लुईने तुर्गो इ.स. १७७४-७६ नंतर नेकर इ.स. १७७६-८१ असे अर्थमंत्री नेमले. यांनी अर्थव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. सरंजामदार व धर्मगुरुंच्या हक्कावर मर्यादा येऊ लागल्याने त्यांनी विरोध केला. नंतर कॅलोन हा नवा अर्थमंत्री नेमला. त्याने वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यासाठी वरिष्ठ वर्गाला पसंत पडेल तेच धोरण राबविण्याचे ठरवले. त्यानुसार त्याने नवीन कर्ज काढून व कर बसवून अर्थखाते सावरण्याचा प्रयत्न चालवला. पण पॅरिसच्या पार्लमेंटने या गोष्टीस विरोध केला व कर बसवण्याचा व कर वाढविण्यास अधिकार फक्त लोकप्रतिनिधी मंडळास म्हणजेच इस्टेट जनरलला आहे असे जाहीर केले. लुईने त्यास विरोध केला. पण अखेर १७५ वर्षे न बोलवलेले पार्लमेंट त्याने इ.स. १७८९ जानेवारीमध्ये निवडणुका घेऊन ५ मे १७८९ रोजी इस्टेट जनरलचे व्हर्साय राजवाड्यात पहिले अधिवेशन भरेल असे सांगितले.

**२) इस्टेट जनरल (लोकसभेची बैठक बोलावली) ५ मे १७८९ :**

फ्रान्समधील दिवाळखोरीला वाचवण्यासाठी व पैसा मिळविण्यासाठी १६ व्या लुईने जानेवारी १७८९ मध्ये निवडणुका घेतल्या आणि नवीन लोकसभा तयार केली. त्याचे ५ मे १७८९ रोजी पहिले अधिवेशन व्हर्यायच्या राजवाड्यात भरवले. लोकसभेला विश्वासात घेऊन नवीन कर्ज व नवीन कर प्रजेवर लादता येतील या अपेक्षेने राजाने ही बैठक बोलावली.

लोकसभेत उमराव सभा, धर्मगुरु सभा, सामान्य लोकांचे पतिनिधित्व करणारी सभा असे तीन वर्ग होते. सामान्यांच्या सभागृहाने कोणताही ठराव मांडल्यास उमराव व धर्मगुरु सभा आपल्या बहुमताच्या जोरांवर ठराव फेटाळून लावीत असत. त्यामुळे सामान्य जनतेला न्याय मिळत नसे. या लोकसभेत ६२१ सामान्यांचे प्रतिनिधी, २८५ उमरावांचे, ३०८ धर्मगुरुंचे सभासद असे १२१४ एकूण प्रतिनिधी या बैठकीला हजर होते.

munotes.in

**३) राष्ट्रीय सभेची स्थापना १७ जून १७८९ :**

६ मे १७८९ ला बैठकीच्या कामकाजाला सुरुवात झाली. लोकसभेच्या बैठकी नियमित भरवाव्यात, कायदे करण्याचा, करआकारणी मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार असावा व समाजातील सर्व वर्गावर समान कराची आकारणी व्हावी इ. मागण्या अधिवेशनात होत्या. आतापर्यंत उमराव व धर्मगुरु यांचे वेगळे तर थर्ड इस्टेटचे वेगळे अधिवेशन भरत. पण या वेळी तीन सभागृहाची संयुक्त बैठक व्हावी ते संयुक्त गृह असावे, अशी मागणी थर्ड इस्टेटने केली; परंतु त्यांना यश मिळाले नाही म्हणून ॲबेसिएस या क्रांतिकारकाने सर्वसामान्याचे प्रतिनिधी मंडळ हेच राष्ट्रीय मंडळ होय असे जाहीर करुन १७ जून १७८९ रोजी राष्ट्रीय सभा म्हणून जाहीर केली.

**४) टेनिस कोर्टावरील शपथ २० जून १७८९ :**

राष्ट्रीय सभेचे सभासद बैठकीकरता २० जून १७८९ रोजी सभागृहात गेले. त्या वेळी राजाने प्रवेश करण्यास नकार दिला. त्यामुळे हे सभासद राजवाड्याजवळील टेनिस क्रीडांगणावर जमले. राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष बेलच्या नेतृत्वाखाली आव्हान केले की, 'लोकांचे सार्वभौमत्व सिद्ध करणारी घटना तयार होईपर्यंत आपली एकजूट कायम ठेवावयाची' अशी शपथ येथे घेतली. ही शपथ 'टेनिस कोर्टावरील शपथ' म्हणून प्रसिद्ध आहे. जुलमी राजवटीस मूठमाती व घटनात्मक राजवटीची स्थापना या दोन गोष्टींची ही शपथ म्हणजे क्रांतीची निदर्शक होय.

**५) राष्ट्रीय सभेचे घटना समितीत रूपांतर २७ जून १७८९ :**

सत्तापिपासू आणि पिळवणूक करणार्या वरिष्ठ वर्गाने राजावर दडपण आणून सामान्य जनतेला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. २३ जूनला राजाने तिन्ही वर्गाचे मिळून एकत्र अशी इस्टेट जनरलची बैठक बोलावली; परंतु राजाने वरिष्ठ व कनिष्ठ वर्गाचे प्रतिनिधी वेगवेगळ्या सभागृहात बसतील असे जाहीर केले. थर्ड इस्टेटचे प्रतिनिधी सभागृहात बसून राहिले. त्यावेळी राजाचा अधिकारी डी ब्रीज हा आला आणि सांगितले की, 'राजाने हा सभागृह सोडून जाण्यास सांगितले.' पण मिरोबाच्या नेतृत्वाखाली थर्ड इस्टेटने निर्णय घेतला आणि डी ब्रीजला सांगितले, 'तुपया राजाला जाऊन सांग की प्रजेच्या इच्छेनुसार आम्ही या सभागृहात जमा झालो आहेत. आम्ही येथून हलण्यास तयार नाही व लोकप्रतिनिधीवर जे हात उगारतील ते महान देशद्रोही ठरतील,' असा ठराव पास केला. शेवटी १६ वा लुई हताश होऊन तिन्ही वर्गाचे प्रतिनिधी एकत्र बसण्याचा हुकूम फर्मावला. २७ जून १७८९ रोजी लोकांच्या विजय होऊन पुढे राष्ट्रीय सभेला घटना समितीत रूपांतर केले.

**६) बॅस्टिलचा पाडाव १४ जुलै १७८९ :**

राजा व थर्ड इस्टेट यांच्या संघर्षात राजाचा पराभव झाला. घटना समितीने कारभार चालवणे ही जनतेला लुडबूड वाटू लागली. ग्रामीण व शहरी लोक उपासमारीने मरू लागले तेव्हा लोकांचा ओढा शहराकडे वाढू लागला. फ्रान्स शहरात नागरिकात संताप व तिरस्कार वाढत होता. या खवळलेल्या जनसागराचे नेतृत्व मॅरट, रोबेस्पिअर, कॅमिली

munotes.in

डेरमोलिन्स इ. पुढार्यांनी केले. त्यांनी हॉटेल-दी-व्हिला हे दारूगोळ्याचे कोठार ताब्यात घेतले. त्यांनी किल्ले, तुरुंग, अमिरांच वाडे यावर हल्ले केले. त्यामुळे राजाने ११ जुलैला नेकर व इतर अधिकार पदावरुन दूर केले. सैन्यात नागरी सुरक्षा दल व पुढे राष्ट्रीय सुरक्षा दल निर्माण करण्यात आले. याचा सेनापती लाफायते होय. या राष्ट्रीय सभेच्या सैन्याने अनियंत्रित जुलमी राजसत्तेचे प्रतीक असलेल्या बॅस्टिलच्या किल्ल्यावर हल्ला चढवला. तेथे पाच तास लढाई झाली. त्यामध्ये डी लुने हा राज्यपाल ठार झाला. १४ जुलैला विजय मिळाला, तो दिवस 'राष्ट्रीय दिवस' म्हणून जाहीर केला. या वेळी ब्युरबॉन घराण्याचा जुन्या झेंड्याऐवजी लोकांनी लाल, पांढरा, निळा या तिरंगी ध्वज राष्ट्रीय ध्वज फडकवला. बॅस्टिलच्या पाडावाची बातमी १६ व्या लुईला सांगितली. तो म्हणाला, हे फार मोठे बंड आहे. तेव्हा डिलायन कोर्ट याने १६ व्या लुईला सांगितले की, नाही महाराज, ही फार मोठी क्रांती आहे. या संदर्भात प्रो. गुडवीन, 'फ्रेंच राज्यक्रांतीत या एकाच घटनेमुळे दूरगामी आणि सर्वगामी परिणाम घडून आलेत. दुसर्या कोणत्याही घटनेशी या घटनेची तुलनाच करता येत नाही.

**७) ४ ऑगस्टची सामाजिक क्रांती :**

बॅस्टिलच्या पाडावानंतर ही चळवळ सर्व फ्रान्सभर पसरली. वरिष्ठ वर्गाच्या अत्याचाराविरुद्ध फ्रेंच जनता सूडाने पेटली होती. उमराव, धर्मगुरु यांच्या घरावर हल्ले करुन लूट व उद्ध्वस्त करत होते. धान्याचे साठे, करारपत्रे जाळून टाकली. त्यामुळे वरिष्ठ वर्गाचे हाल होऊ लागले. ४ ऑगस्टला राष्ट्रीय सभेची बैठक सुरु असतानाच व्हायकाऊंट ऑफ नॉआलिसने जाहीर केले की, 'उमरावांच्या सर्व अधिकारांचा त्याग करत आहोत. राष्ट्रीय सभेने सरंजामशाहीचा शेवट करावा.' त्यामुळे उमराव, धर्मगुरु यांनी आपले सर्व अधिकार सोडून दिले. यावेळी राष्ट्रीय सभेने ३० ठराव पास केले. त्यांनाच ४ ऑगस्टचे वटहुकूम असे म्हणतात. त्यानुसारच, बिगारीची पद्धत, उमरावाचे कर, चर्च, धर्मगुरुंचा कर रद्द करावेत. नोकरीत प्रवेश देताना उच्चनीच भेदभाव करु नये. न्यायदान नि:पक्षपातीपणे करावे. सर्वांना समान लेखण्यात येईल. सामाजिक विषमता नष्ट करावी. इ. कायदे मंजूर केले. अशा रीतीने एका रात्रीतून फ्रान्समध्ये सामाजिक क्रांती घडली. अन्यायाला व जुलमाला कायमची मूठमाती देऊन ४ ऑगस्ट हा दिवस फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासात अमर झाला. राष्ट्रीय सभेने राजाला फ्रेंच स्वातंत्र्याचा संस्थापक म्हणून जाहीर केले.

**८) व्हर्साय राजवाड्यावर स्त्रियांचा मोर्चा (५ ऑक्टोबर १७८९) :**

४ ऑगस्टची सामाजिक क्रांती झाल्यानंतर अनेक सरदार, धर्मगुरु यांनी हक्कांचा त्याग करण्यास विरोध केला. १६ व्या लुईचा भाऊ काऊंट ऑफ अर्टोअस याने फ्रान्समधून पळ काढून परकीय सैन्याच्या मदतीने क्रांती चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. १६ व्या लुइने कान फुंकले. त्यामुळे त्याने सामाजिक क्रांतीच्या करारावर सही करण्यास विरोध दर्शवला. त्यामुळे फ्रेंच जनतेत मोठा असंतोष निर्माण झाला. या वेळी दुष्काळाने भेसूर थैमान घातले हाते. स्त्रियांनी एक मूक मोर्चा राजवाड्याकडे नेला. या मोर्चात दीड हजार स्त्रिया असून लफायतेचे नॅशनल गार्ड सोबत होते. 'भाकरी! भाकरी!' घोषणा देत

राजवाड्याजवळ आले. या मोर्चाने पहारेकर्यांना ठार मारुन राजवाड्यात प्रवेश केला. राज कुटुंबातील व्यक्ती कैद केल्यानंतर हा मोर्चा पॅरिस शहराकडे गेला.

**९) राजाचा पॅरिसमधून पलायनाचा प्रयत्न (२० जून १७९२) :**

मूक मोर्चाने राजा-राणी यांना ट्युलरीस राजवाड्यात नजरकैदेत ठेवले. धर्म संस्थेविषयक नवी घटना मान्य नव्हती. तेव्हा ऑस्ट्रियाची मदत घेऊन ही क्रांती चिरडून टाकावी, असा विचार केला. यासाठी २० जन रोजी वेषांतर करुन पळून जाताना वरेन्स या खेड्यात पकडले. राजाची धिंड काढून पुन्हा पॅरिसमध्ये कैदेत ठेवले. पुढे फ्रान्सच्या कारभारात गोंधळ निर्माण झाला. इ.स. १७९१ रोजी राष्ट्रीय सभा बरखास्त झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील घटनांचा आढावा घ्या.

## ५.४ इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

फ्रान्समधील अनियंत्रित राजेशाहीचा व सरंजामशाहीला फ्रेंच जनता विटली होती. त्यांच्या जुलमाला प्रत्युत्तर देण्यासाठी सर्वसामान्य जनतेने १७८९ मध्ये क्रांती केली. या क्रांतीला हिंसात्मक वळण लागल्याने फ्रान्सचे जगातील बरेच देश शत्रू बनले. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी फ्रान्समध्ये दहशतवादाची राजवट निर्माण झाल्याने अनेक पुढाऱ्यांना फासावर जावे लागले. १६ व्या लुईला फाशी देऊन जनतेने पहिले प्रजासत्ताक राज्य स्थापन केले; परंतु मध्यमवर्गाने आपल्या हक्कासाठी पुन्हा चळवळीला प्रारंभ केला. त्यामुळे जेकोबियन्स विचारसरणीकडे बरेच झुकू लागले. जरी फ्रान्समध्ये लोकशाही प्रस्थापित केली तरी जास्त काळ टिकू शकली नाही. राष्ट्रीय सभेने व नॅशनल कन्व्हेशन यांनी फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात कार्य केले आणि फ्रान्सची क्रांती घडवण्यास साथ दिली. या फ्रान्सच्या क्रांतीमुळे फ्रान्स व जगावर वेगळेच परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे -

**१) अनियंत्रित राजेशाहीचा शेवट :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे जुन्या अनियंत्रित हुकुमशाही राजवटीला कायमची मूठमाती मिळाली. 'राजा म्हणजे ईश्वराचा प्रतिनिधी' आणि तो आपल्या लहरीनुसार राज्य करु शकतो, या कल्पना कायमच्या गाडल्या गेल्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही तत्वे

पुरस्कृत करणारा राजा फक्त राज्य करु शकेल ही कल्पना लोकांच्या मनात कायमची रूजली. १६ व्या लुईला फरसावर लटकून प्रसासत्ताक स्थापन केले. नेपोलियन बोनाफार्ट, १४ वा लुई, लुई फिलीप, नेपोलियन तिसरा यांनी जरी अनियंत्रित राज्यकारभार केला तर पूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षा राजवट वेगळी होती. या अनियंत्रित सत्तेचा शेवट होऊन १८७० मध्ये फ्रान्समध्ये प्रजासत्ताक शासनपध्दती सुरु झाले.

**२) सरंजामशाहीला कायमची मूठमाती :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे उमरावशाही, सरंजामशाही यांचा कायमचा शेवट केला. धर्मगुरुंच्या सवलती रद्द केल्या. चर्चची संपत्ती जप्त केली. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. सर्वांना समान न्या, कराची आकारणी समान केली. पिढीजात पदे रद्द केली.

**३) जनमताचे श्रेष्ठत्व मान्य झाले :**

फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळे रूसोची 'लोकांचे सार्वभौमत्व' ही कल्पना कायमची रूढ झाली. राजा लोकांचा प्रतिनिधी आहे तो जर लोकांचे हित साधत नसेल तर त्याला काढून टाकता येते म्हणजे लोकांचा हक्क सर्वमान्य झाला. फ्रेंच राज्यक्रांतीने लोकशाहीचा पाया घातला गेला.

**४) राष्ट्रीयत्वाचा कल्पनेचा उदय :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपात एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला जोरदार चालना मिळाली. एकजुटीशिवाय तरणोपाय नाही, याची खात्री युरोपला पटली. अंतर्गत प्रश्नांची सोडवणूक सुद्धा एकजुटीवर आहे. इटाली, जर्मनी, तुर्कांच्या अंमलाखालील बाल्कन राष्ट्रे यांनी एकीकरणाची चळवळ सुरु केली. एकजुटीमुळे जर्मनी, इटाली, बलिष्ट राष्ट्रे उदयास आली.

**५) स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या कल्पनांचा सर्व युरोपात प्रसार :**

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही तत्त्वे फ्रान्सपुरती मर्यादित न राहता संपूर्ण युरोपने स्फूर्ती व प्रेरणा घेतली. आपल्या देशात लोक नियंत्रित सरकार असावे, असे अनेक देशांना वाटू लागले. याचा परिणाम १९ व्या शतकाच्या अखेरीस हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मजूर प्रतिनिधी निवडून आले. जर्मनी, ऑस्ट्रियात लोकशाही शासन प्रस्थापित झाले. इटालीत सांसदीय लोकशाही रूढ झाली. रशियात चळवळ होऊन ड्युमा नावाचे एक राष्ट्रीय मंडळ स्थापन झाले. तुर्कस्थानातही अनेक चळवळी होऊन शेवट इ.स. १९०८ मध्ये संसदीय सरकार प्रस्थापित झाले. फ्रान्समध्येही नेपोलियनच्या पाडावानंतर इ.स १८७१ मध्ये तिसरे गणराज्य प्रस्थापित झाले.

**६) खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होण्यास प्रारंभ :**

फ्रान्सच्या क्रांतीने समतेच्या तत्त्वाचा जोरदार पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान असावी. प्रत्येकाला न्याय मिळावा ही तत्त्वे होती. संपत्तीवर अगर

जन्मावर त्या व्यक्तीला श्रेष्ठत्व देणे अगर समाजाला अधिकार देणे मान्य नाही. हे जगासमोर फ्रेंच राज्यक्रांतीने सिद्ध केले. त्याचा परिणाम वरिष्ठ वर्गाचे विशेष हक्क नष्ट केले. धार्मिक क्षेत्रात सहिष्णुतेचा पुरस्कार केला. वृत्तपत्राना स्वातंत्र्य बहाल केले. प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क दिला. अशा रीतीने क्रांतीचा परिणाम होऊन समतेला सुरुवात झाली.

**७) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे मानवतावादी कार्याला उत्तेजन दिले :**

फ्रान्सच्या क्रांतीपासून स्फूर्ती घेऊन अनेकांनी मानवतावादी कार्ये आरंभिली. निरनिराळ्या देशात गुलामांची पद्धत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तुरुंगात खितपत पडलेल्या कैद्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करण्यात आला. आरोग्यदृष्ट्या तुरुंगाच्या इमारती नीट बांधल्या जात. अशा रीतीने मानवतावादी कार्याकडे लक्ष वेधले गेले.

**८) सौंदर्यवादी वाङ्मयाची निर्मिती :**

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, रूढीविरुद्ध बंड आणि पवित्र भावनांवर व्यक्तीच्या जीवनाची उभारणी करणे यावर विशेष भर देण्यात आलेला होता. आता सौद्यवादी वाङ्मयाची निर्मिती होऊ लागली. व्हिक्टर ह्यूगो याचे 'ला मिझरएबल' साऊथीचे 'जोन ऑफ आर्क' गटे फॉस्ट इ. अनेक सुंदर वाङ्मयीन कलाकृतीत याच काळात निर्माण झाल्या.

**९) रोमन कॅथॉलिक चर्चबाबत सहानभूती :**

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये व नेपोलियनच्या राजवटीत कॅथॉलिक धर्मियांना अपमानस्पद वागविणे व कॅथॉलिक लोकांना, धर्मगुरु, पोप यांना सतत मानहानी सहन करावी लागली. ती त्यांनी शांतपणाने सहन केली. त्यामुळे कॅथॉलिक धर्मियांबाबत युरोपात हळूहळू सहानुभूती निर्माण झाली. हा क्रांतीचा परिणाम समजला जातो.

**१०) मालमत्ता बाळगण्याच्या हक्काबाबत आदर उरला नाही :**

फ्रान्स राज्यक्रांतीने उमराव-सरदाराच्या मालमत्तेवर उघड हल्ले चढविले जे फ्रान्समधून पळून गेले. त्यांची मालमत्ता जप्त केली. त्यामुळे मालमत्ता बाळगण्याच्या व्यक्तिगत हक्काला विशेष पावित्र्य राहिले नाही. त्यामुळे ती समाजवादाच्या दिशेने प्रगती समजली जाते. राज्यातील सर्व मालमत्ता ही राज्याच्या म्हणजे लोकांच्या मालकीची आहे, ही कल्पना पक्की रूजली.

**११) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्सला सुबत्ता प्राप्त झाली :**

क्रांतीपूर्वी फ्रान्स हा दुष्काळग्रस्त आणि नाविकी प्रदेश होता. क्रांतीनंतर हजारो गरीबांना माफक किंमतीत जमिनी मिळाल्या. त्यांनी त्या जमिनी लागवडीखाली आणल्या. परिणामी १७९४ पर्यंत फ्रान्स धनधान्यांनी समृद्ध बनला. त्यामुळे प्रजासत्ताकाच्या व नेपोलियन काळात अनेक युद्धाला तोंड देऊन विजय प्राप्त केला.

**१२) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे एकराष्ट्राची कल्पना वाढीस लागली :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राष्ट्रभावना वाढीस लागली. आतापर्यंत राजाबाबत प्रेम म्हणजे देशभक्ती अशा कल्पना रुढ होत्या. आता राष्ट्र ही कल्पना समोर येऊन राष्ट्रप्रेम जागृत झाले. राष्ट्रासाठी त्याग करणे ही कल्पना रुजविली गेली. फ्रेंच राज्यक्रांतीचे राष्ट्रप्रेम ही मोठी देणगीच समजली पाहिजे.

**१३) भूदास पद्धत व वेठबिगारी नष्ट :**

फ्रेंच क्रांतीने फ्रान्समधील उमरावांच्या ताब्यातील भूदासांना स्वतंत्र केले. वेठबिगारी व गुलामगिरी बंद केली. सामाजिकता विषमतेचा पायाच उखडला जाऊन समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व या क्रांतीच्या तत्त्वावर आधारित नवसमाज निर्माण झाला.

**१४) शासकीय सुधारणा :**

समानतेचे तत्त्व हा शासकीय कारभाराचा पाया बनून फ्रान्सच्या शासनव्यवस्थेत क्रांतिकारी बदल झाला. कायदे पद्धतीतील लहरीपणा संपून एकसूत्रता आली. सर्व फ्रान्सला एक कायदेव्यवस्था, एक न्यायव्यवस्था लागू करण्यात आली. त्यामुळे सर्वसामान्य वर्गाची पिळवणूक थांबली. आर्थिक क्षेत्रात कर देणार्याच्या पात्रतेचा विचार करणारी पुरोगामी करपद्धती सुरु झाली. कर्तबगारीचा विचार होऊन नोकर्या अधिकारपदे मिळू लागली.

अशा रीतीने फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम पाहता फ्रेंच राज्यक्रांती अतिशय महत्त्वाची ठरते. युरोपातील हूकूमशाही, जुलमी राजसंस्था, विषमता, पिळवणूक एका बाजूला आणि दुसर्या बाजूला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि युरोपाची ठिकठिकाणी प्रस्थापित लोकशाही सरकारे यांच्या म्हणजे जुन्या नव्याच्या सीमारेषेवर फ्रेंच राज्यक्रांती उभी आहे. म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांतीने युरोपचा इतिहासाला नवीन वळण लावले आणि युरोपात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या नवीन कल्पनांचा उद्घोष केला असे म्हणण्यात येते. जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने फ्रेंच राज्यक्रांती ही महान घटना समजली पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :**

१) फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सांगा.

munotes.in

## ५.५ सारांश

युरोपमध्ये जी वैचारिक चळवळ सुरु झाली आणि त्यातून फ्रेंच राज्यक्रांती उदयास आली. अमेरिकन राज्यक्रांतीत साम्रज्यवादाला तर फ्रेंच राज्यक्रांतीने हुकुमशाहीला तडा दिला. फ्रेंच मधील सामाजिक आर्थिक विषमता आणि वैचारिक जागृतीमुळे क्रांती घडून आली. फ्रेंच मधील ब्युरोबान घराण्याची राजकीय सत्ता नष्ट करुन राष्ट्रीय सभेची सत्ता स्थापन झाली. परंतु तिलाही दिर्घकाळ सत्ता टिकवता आली नाही. पुढे पहिले प्रजासत्ताक (नॅशनल कन्व्हेन्शन) सत्तेवर आले. त्याने फ्रान्सच्या विकासासाठी प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय सत्ता संघर्षात नेपोलियनचा उदय झाला त्याने फ्रेंच राज्यक्रांती चिरडून टाकली. या क्रांतीचे फ्रेंच द जगावर चांगले-वाईट परिणाम झाले. स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व ही तत्त्वे फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली.

## ५.६ प्रश्न

१) फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे स्पष्ट करा.

२) फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सांगा.

❖❖❖❖

munotes.in

# ६

# औद्योगिक क्रांती

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ औद्योगिक क्रांती
६.३ औद्योगिक क्रांतीचे विविध टप्पे
६.४ औद्योगिक क्रांतीची कारणे
६.५ औद्योगिक क्रांतीचा शुभारंभ व वाटचाल
६.६ औद्योगिक क्रांतीचे परिणाम
६.७ सारांश
६.८ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस
१) औद्योगिक क्रांतीची व्याख्या समजावून देणे.
२) औद्योगिक क्रांतीचे स्वरूप, विविध टप्पे यांची माहिती प्राप्त करणे.
३) औद्योगिक क्रांतीच्या कारणांचा आढावा घेणे.
४) विविध उद्योगधंद्यातील प्रगतीची माहिती मिळवणे.
५) औद्योगिक क्रांतीचे सामाजिक, आर्थिक परिणामांची नोंद घेणे.

## ६.१ प्रस्तावना

मानवी संस्कृतीत बदल घडवून आणणारे घटक केवळ राजकीय अथवा लष्करी स्वरूपाचे असतात असे नव्हे, तर आर्थिक, सामाजिक, शास्त्रीय, वैचारिक, धार्मिक, औद्योगिक क्षेत्रातील क्रांतीकारी बदलामुळे मानवी संस्कृतीचे स्वरूप आमुलाग्र निराळे होऊ शकते. सर्वोत्कृष्ट कलाकृती, अक्षरसाहित्य, अभिनव यांत्रिक शोध व शास्त्रीय सिद्धांत यामुळे मानवी संस्कृतीच्या समृद्धीत अधिक भर पडली आहे. मानवी जीवन अधिक विलक्षण झाले आहे. व्यक्तीच्या सुखात कायमची वाढ झाली आहे. याच दृष्टीने मानवी इतिहासात औद्योगिक क्रांतीला महत्त्व आले आहे. एक यंत्र अनेक लोकांचे काम अधिक

वेगाने करत असे. त्यामुळे मानवाच्या जीवनातील विविध क्षेत्रात फार मोठी क्रांती होऊन प्रगती झाली. या सर्व प्रगतीचा व परिवर्तनाचा मानवी जीवनावर फार मोठा परिणाम झाला. या परिणामाला औद्योगिक क्रांती फार महत्त्वाची आहे. औद्योगिक क्रांतीमधून कामगारांचे अनेक प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नासंदर्भात विचार करण्याचा जो प्रयत्न झाला त्यातून समाजवादाचा उदय झाला. प्रारंभी समाजवादाचे स्वरूप आदर्शवादी होते. जसजसे प्रश्नाचे स्वरूप बदलत जाऊन गंभीर स्वरूपात निर्माण झाले त्यातून आक्रमक स्वरूपाचा साम्यवाद अथवा शास्त्रीय स्वरूपाचा समाजवाद निर्माण झाला.

## ६.२ औद्योगिक क्रांती

'औद्योगिक क्रांती' हा शब्दप्रयोग प्रथम जेरीम ए. ब्लॅन्की या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने उपयोगात आणला. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीवर भाष्य करणारा, १९ व्या शतकातील ब्रिटिश लेखक अर्नाल्ड टॉयन्बी याने हा शब्द समाजात रूढ केला. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंड व एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीस वर्षात पश्चिम युरोपात जे अनेक यांत्रिकी शोध लागले त्यामुळे युरोपात उत्पादन पद्धतीत बदल झाले, त्यामध्ये मनुष्यबळाऐवजी यंत्राच्या साहाय्याने उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ लागले. या सर्व बदलांना व घटकांना औद्योगिक क्रांती असे म्हणतात.

### ६.२.१ औद्योगिक क्रांतीचे स्वरूप :

मध्ययुगातील सरंजामशाहीवर आधारित अर्थव्यवस्था हळूहळू नष्ट होऊन ती व्यापारावर आधारित बनू लागली. शहरांची, व्यापाराची, उत्पादन साधनांची व गरजांची वाढ होऊ लागली. त्यातून अनेक भौगोलिक व विज्ञान शोध लागते. त्यातून औद्योगिक क्रांती झाली. क्रांती या शब्दाचा अर्थ म्हणजे अचानक व अनपेक्षित किंवा हिंसेने होणारा बदल परंतु हा अर्थ येथे अभिप्रेत नाही. औद्योगिक क्रांतीने समाजाच्या जीवनातील विविध क्षेत्रात केलेले बदल, अतिशय संथगती ही प्रक्रिया अजूनही सुरुच आहे. त्यामुळे याला औद्योगिक क्रांती म्हणजे कितपत योग्य वाटते किंवा त्या क्रांतीऐवजी उत्क्रांती, असे म्हटले तर योग्य होईल. कारण क्रांती पूर्वी व नंतरच्या काळात समाजरचना, उत्पादन व वितरण पद्धती, अर्थव्यवस्था, व्यापार यामध्ये फार मोठा बदल झाला आहे. म्हणून औद्योगिक क्रांतीच्या काळाला उत्क्रांतीचे स्वरूप प्राप्त झाले होते. औद्योगिक क्रांतीतील बदलांवर आधारित नवी आधुनिक संस्कृती निर्माण झाली. सामाजिक संबंध, आर्थिक व्यवहार व कार्यपद्धती व राजकीय तत्त्वप्रणाली यामध्ये आमूलाग्र बदल होऊ लागले. पूर्वीची विविध वस्तू उत्पादने कुटिरोद्योग स्वरूपाचे होते. तर या काळात वस्तूंचे उत्पादन ठराविक कारखान्यात होऊ लागणे ही उत्पादनाची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची व अवघड होती. बर्नस यांच्या मते 'औद्योगिक क्रांतीमध्ये पुढील घटकांचा समावेश होता. उद्योग व शेतीचे यांत्रिकीकरण, उद्योगक्षेत्रात शक्तीचा वापर, कारखाना पद्धतीचा विकास, दळणवळण व संपर्काच्या क्षेत्रातील आश्चर्यकारक व वेगवान प्रगती, अर्थव्यवहाराच्या सर्व शाखांवर वाढलेली भांडवलशाही प्रभाव.'

## ६.३ औद्योगिक क्रांतीचे विविध टप्पे

लंडन येथील हाइडपार्कमध्ये १ मे १८५१ रोजी आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरले होते. त्याचे उद्घाटन व्हिक्टोरिया राणीच्या हस्ते झाले. यामध्ये निरनिराळ्या राष्ट्रातील यांत्रिक प्रगतीचे नमुने ठेवण्यात आले होते. यावरुन इंग्लंड हे उद्योगधंद्याचे जागतिक केंद्र आहे असे दिसून आले. हे प्रदर्शन म्हणजे औद्योगिक क्रांतीची सुरुवात किंवा शेवट असे मानता येणार नाही. औद्योगिक जी प्रगती झाली त्यावरुन त्याचे कालखंड / टप्पे निर्माण केले आहे.

**१) औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा (इ.स. १७५० ते इ.स. १८५०) :**

या काळात क्रांतीचा प्रभाव इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी दिसून येतो. वाफेचे इंजिन व यंत्रे यावर आधारित कारखाना पद्धत अस्तित्वात आली.

**२) औद्योगिक क्रांतीचा दुसरा टप्पा (इ.स. १८५० - इ.स. १९५०) :**

या काळात क्रांतीचा प्रसार पूर्व युरोपीय देश, सोविएत रशिया, भारत, जपान या देशात झाला. विद्युत शक्ती ही यंत्रे चालविणारी महत्त्वाची ऊर्जा बनली. वीजेवर चालणार्या वस्तू, अवजारे तयार करणे. रासायनिक पदार्थ बनविले. या उद्योगांचा विकास झाला. उत्पादनाची पद्धत अधिक विकसित झाली. स्वयंचलित यंत्रांचा उत्पादन पद्धतीत वापर होऊ लागला. त्यामुळे उत्पादन वाढले व श्रमशक्ती कमी झाली.

**३) औद्योगिक क्रांतीचा तिसरा टप्पा (इ.स. १९५० नंतर) :**

आशिया व आफ्रिका खंडातील नवोदित राष्ट्रांत हे औद्योगिक क्रांतीचे तिसरे पर्व सुरु झाले. ते अजूनही चालूच आहे. या टप्प्यात औद्योगिक क्रांती घडवून आणण्यासाठी राज्य आर्थिक व्यवहारात मोठा भाग घेत असल्याचे दिसून येते. या टप्प्यात इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, यंत्रमानव याचा उपयोग केल्याने क्रांतीची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. श्रमापेक्षा बौद्धिक ज्ञानावर आधारित काम करणार्या कामगारांची संख्या वाढू लागली.

## ६.४ औद्योगिक क्रांतीची कारणे

औद्योगिक क्रांतीची सुरुवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये प्रथम झाली. नंतर तिचा प्रसार सर्व जगभर झाला. त्यामुळे इंग्लंडबरोबर सर्व जगात औद्योगिक क्रांतीच्या कारणांचा एकत्रित विचार करणे योग्य ठरले. औद्योगिक क्रांतीस अनुकूल असणारे घटक ज्या देशामध्ये उपलब्ध नव्हते त्यांनी ते प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. त्यातून व्यापारवाढ व वसाहतवाद ही स्पर्धा सुरु झाली. औद्योगिक क्रांतीला जे जबाबदार घटक / कारणे होती ती पुढीलप्रमाणे -

**१) नवे जलमार्ग व भौगोलिक प्रदेशांचा शोध :**

प्राचीन काळापासून आशिया-युरोप यांचा भूमार्गाने व्यापार व दळणवळण सुरु होते. इ.स. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅटिनोपल हे जगप्रसिद्ध शहर जिंकले. त्यांनी आशिया, आफ्रिका, युरोपवर आपले साम्रज्य निर्माण केले. कॉन्स्टॅटिनोपल हे तिन्ही खंडांच्या सीमेवर असून जागतिक भूमार्ग बंद झाला. व्यापार व त्यातून प्रचंड संपत्ती प्राप्ती करण्यासाठी नवीन जलमार्गाची गरज होती. पोर्तुगीज, हॉलंड, स्पेन, इटाली या देशांच्या प्रयत्नांमुळे व धाडसी दर्यावर्दी खलाशांमुळे अनेक नवे जलमार्ग शोधून काढले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दळणवळणात महत्त्वपूर्ण बदल झाले. प्रबोधन, विज्ञान व वसाहतवाद याला गती प्राप्त झाली आणि औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला.

**२) प्रबोधन चळवळ :**

पंधराव्या शतकात जलमार्ग व भौगोलिक शोध याबरोबरच युरोपात प्रबोधन चळवळ सुरु झाली. साहित्य, शास्त्र, कला, विज्ञान, धर्म ई. क्षेत्रात प्रबोधन घडूनआले. त्यामुळे धर्माचा पगडा कमी होऊन ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. राजसत्ता, मानवी कर्तृत्व, विचारस्वातंत्र्य, बुद्धिवाद, विवेकनिष्ठा, तर्कशुद्धता, वैज्ञानिक दृष्टिकोन व प्रयोगशिलतेला महत्त्व प्राप्त झाले. काही तरी नवीन करण्याची जिद्द लोकांच्यात निर्माण झाली. दैववाद, रूढीप्रियता, स्थितीशीलता, धर्म अडथळे, सरंजामी वृत्ती नष्ट होऊन मानवी विचार व मन मुक्त झाले. मानवतावादाला प्राधान्य मिळाले. मानवी जीवन महत्त्वाकांक्षी, भौतिकवादी बनले व पारलौकिकवादाला कालबाह्य ठरवणे ही वैचारिक क्रांती प्रबोधनामुळे झाली. इटाली, जर्मनी, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड या देशात प्रबोधन चळवळी सुरु झाल्या. अनेक प्रतिभाशाली विचारवंत, संशोधक, कलावंत, सुधारक यांच्या प्रयत्नातून विविध क्षेत्रात उन्नती झाली. साहित्य व विज्ञानामुळे औद्योगिक क्रांतीला मोठी चालना मिळाली. कारण वैज्ञानिक शोधामुळे यंत्राची निर्मिती व औद्योगिकरणाला गती प्राप्त झाली.

munotes.in

**३) नैसर्गिक साधनसंपत्तीचे विपुल साठे :**

यंत्राचे शोध लागल्याने कारखानदारीला प्रारंभ झाला. विविध प्रकारचे यंत्र बनविले व चालविणे यासाठी उर्जेची व कच्च्या मालाची गरज होती. लोखंड, कोळसा, रबर, कापूस व विविध प्रकारचा कच्चा माल प्राप्त झाल्याने कारखानदारी मोठ्या प्रमाणात सुरु झाली. या कच्चा मालाचे साठे इंग्लंडमध्ये होते. शिवाय वसाहतीमधूनही ते प्राप्त करत असत. त्यामुळे इंग्लंडमध्ये औद्योगिक प्रारंभ झाला.

**४) भांडवलदार उद्योगपतीचा उदय :**

मध्ययुगातील बदललेल्या परिस्थितीमुळे जमीनदार वर्गाने जमिनी विकून शहरात स्थायिक झाले. त्यांनी व्यापार व कारखानदारीमध्ये पैसा गुंतवला. त्यातूनच शहरात व्यापारी व उद्योगपती असलेल्या भांडवलदाराचा उदय झाला. त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी विविध कंपन्या स्थापन केल्या. विश्वस्त मंडळे, महामंडळे, कंपन्या स्थापन

करुन विविध उद्योग सुरु केले व त्यांचा विकास केला. त्यातून श्रीमंत भांडवलदार वर्गाचा उदय झाला. त्यांनी देशात औद्योगिक क्रांतीला प्रारंभ केला.

**५) जागतिक राज्यक्रांत्या :**

प्रबोधन चळवळीमुळे समाजात मुक्त विचार स्वातंत्र्याचे युग निर्माण झाले. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण झाली. जी गोष्ट आपल्या बुद्धीला पटते, तिचा स्वीकार करणे हा कानमंत्र मिळाला. प्रबोधन चळवळीतून क्रांतिकारी तत्त्ववेत्ते, विचारवंत, साहित्यिक यांचा उदय झाला. त्यांनी जुलमी राजवटीविरोधात राष्ट्रनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही याचे महत्त्व समाजाला पटवून दिले. त्यामुळे इ.स. १६८८ ची इंग्लिश क्रांती, इ.स. १७७६ अमेरिकन क्रांती, इ.स. १७८९ ची फ्रेंच क्रांती झाली. युरोप व आशियातील क्रांत्या, राष्ट्रवादी संघर्ष यामुळे परिवर्तन झाले. सरंजामशाही नष्ट झाली. वरील सर्व बदल औद्योगिक क्रांतीला पोषक ठरते. त्यामुळे अनेक देशांत राज्यक्रांतीनंतर औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला.

**६) सामाजिक व राजकीय शांतता आणि स्थैर्य :**

मध्ययुगातील राजकीय अस्थिरता राज्यक्रांतीमुळे संपुष्टात आली आणि शांतता व भरभराटीच्या युगाला प्रारंभ झाला. राजसत्ता व धर्मसत्ता आणि धर्मासाठी राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष आणि राष्ट्र-राज्य व अनियंत्रित राजेशाहीचा उदय, या कारणामुळे अस्थिरता निर्माण झाली होती; परंतु राज्यक्रांतीनंतर शांतता प्रस्थापित झाली. या शांततेच्या काळात शिक्षण, संशोधन साहित्य, विज्ञान यांची प्रगती झाली. राजसत्तेने आर्थिक प्रगतीला उत्तेजन दिले. त्यामुळे नवीन उद्योग सुरु होऊन औद्योगिक क्रांती झाली. व्यापार व उद्योग यांच्यात प्रगती झाली.

**७) बाजारपेठांची उपलब्धता :**

कारखान्यातून तयार झालेल्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध असणे ही औद्योगिकरणाची गरज आहे. इंग्लंडमध्ये स्वत:ची मोठी बाजारपेठ होती. इ.स. १७०७ मध्ये इंग्लंड व स्कॉटलंडचे एकीकरण होऊन व्यापारासाठी मोठी बाजारपेठ अस्तित्वात आली. इ.स. १८०० मध्ये आयर्लंड प्राप्त झाले. याशिवाय अमेरिका, हिंदुस्थान, आफ्रिका, स्पॅनिश वसाहतीशी व्यापार सुरु केला. मोठ्या देशांनी आपल्या व शेजारी राष्ट्रांशी व्यापार करुन ही गरज भागवली. भौगोलिक शोधामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. वसाहती कच्च्या माल व बाजारपेठ या दोन गरजा पूर्ण करीत होत्या. त्यामुळे औद्योगिक क्रांती झाली.

**८) वसाहतवाद व व्यापारवाद यातून संपत्तीची वाढ :**

मध्ययुगात नवीन जलमार्गाच्या शोधामुळे युरोपियांना नवीन भूप्रदेशाचा शोध लागला. त्यांनी थेट त्या प्रदेशाची म्हणजे भारत, अमेरिका, आफ्रिका, आग्नेय आशिया यांच्याशी व्यापार सुरु केला. राष्ट्राचे हित डोळ्यांसमोर ठेवून अनेक राज्यकर्त्यांनी व्यापाराला प्रोत्साहन दिले. इंग्लंडचे स्टुअर्ट राजे, फ्रान्सचे लुई राजे, नेपोलियन यांनी

परदेशी व्यापारासाठी मोठी मदत केली. त्यातून व्यापारी-उद्योगपती-भांडवलदार वर्ग उदयास आला. त्यांनी वेगवेगळ्या व्यापारी कंपन्या स्थापन केल्या. त्यांनी व्यापाराचा विकास केला. कंपन्यांनी व्यापाराबरोबरच अनेक देशांत वखारी-वसाहती स्थापन केल्या. वसाहतवादातून भारत, अमेरिका, चीन, इंडोनेशिया, इजिप्त, व्हिएतनाम, ब्रह्मदेश, फिलिपाइन्समध्ये साम्रज्य स्थापन झाली. व्यापार व वसाहतीमुळे औद्योगिक क्रांतीला लागणारा कच्चा माल व बाजारपेठ प्राप्त झाली. त्यातून मोठ्या प्रमाणात संपत्तीची वाढ झाली. वाढलेल्या संपत्तीचा उपयोग नवीन उद्योगधंद्यात गुंतवला त्यामुळे क्रांती घडून आली.

**९) कुशल व संपन्न कारागीर वर्ग :**

युरोपियन देशातील धार्मिक असहिष्णुतेच्या व विरोधकांना नष्ट करण्याच्या धोरणामुळे अनेक कुशल व संपन्न कारागीर वर्ग स्थलांतर झाला. इंग्लंडमधील सरकार व समाज यांनी त्यांचे स्वागत केले. औद्योगिक क्रांतीच्या माध्यमातून जे अनेक नवीन कारखाने निर्माण झाले, त्यामध्ये कुशल कारागीरांचा, त्याच्या कुशल कामगिरीचा व उपक्रमशीलता आणि व्यापारी ध्येयधोरणे इ. गुणांचा उपयोग झाला. स्पेन, हॉलंडमधील असहिष्णू धार्मिक धोरणाचा फायदा इंग्लंड व इतर देशांना झाला.

**१०) नव्या शक्तिसाधनांचा शोध :**

औद्योगिक क्रांतीपूर्वी मंदगतीने चालणारे गृहउद्योग व लघुउद्योग अस्तित्वात होते. सर्व उद्योगधंदे व उत्पादन मनुष्यबळावरच चालत होते. युरोप खंडामध्ये व प्रामुख्याने इंग्लंडमध्ये नामवंत शास्त्रज्ञ व संशोधक होते. त्यांनी विविध क्षेत्रात संशोधन करुन नवे शोध लावले. नवी तंत्रे-यंत्रे शोधून काढली. न्यू कामेनने बाष्पयंत्राचा, बेंजामिन, फँकलीनने विजेचा, जेम्स हारग्रीव्हज, आर्क राईट, कार्ट राईट याने वस्त्रोद्योगात जेम्स वॅटने वाफेचे इंजिन इ. शोध लावले. त्यामुळे औद्योगिक क्रांती घडून आली.

**११) मुबलक कामगार वर्गाचा पुरवठा :**

औद्योगिक क्रांतीसाठी मजूर प्रमुख घटक आहे. इंग्लंड व इतर देशात वेगवेगळ्या कारणांमुळे मुबलक मजूर वर्ग उपलब्ध झाला. जमीनदारी पद्धत नष्ट झाली. कृषी क्रांती व शेतीचे यांत्रिकीकरण व व्यापारीकरण झाले. त्यामुळे शेतकरी-शेतमजूर बेकार झाले. अनेक मजूर खेडी सोडून कामासाठी शहराकडे आले. त्यामुळे कारखानदारीला मोठ्या प्रमाणात मजुरांचा पुरवठा झाला. तसेच धर्मछळामुळे असंख्य लोकांनी देशांतर केले. त्यांचा उपयोग मजूर म्हणून झाला. नेदरलँडमध्ये कुशल विणकर, फ्रान्समध्ये रेशीम कापड बनवणारे, स्कॉटलंड व जर्मनीत कातडी व फर्निचर बनविणारे होते. यांचा उपयोग औद्योगिक क्रांतीस झाला. स्वस्त व मुबलक मजूर वर्ग उपलब्ध झाल्याने औद्योगिक क्रांतीला गती प्राप्त झाली.

**१२) दळणवळणाची साधने-व्यवस्था :**

औद्योगिक क्रांतीच्या काळात पारंपरिक दळणवळणाची साधने कालबाह्य झाली. रेल्वे, मोटारी, तारायंत्रे, पोस्ट, विमान, बोटी, संगणक, रेडिओ, टेलिव्हिजन इ. शोध

लावला. लोहमार्ग, सडका, पनामा-सुवेझ जलमार्ग, भूमार्गाची निर्मिती झाल्याने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. जगभर औद्योगिक क्रांतीचा प्रसार व विस्तार झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) औद्योगिक क्रांतीची कारणे थोडक्यात स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ६.५ औद्योगिक क्रांतीचा शुभारंभ व वाटचाल

१८ व्या शतकात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीला प्रामुख्याने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवे शोध उपयोगी पडले. गरज ही शोधाची जननी आहे. कारण नव्या यंत्राचा शोध गरजेपोटी लागला. त्यातून औद्योगिक क्रांती घडून आली. ही क्रांती परिवर्तनवादी व विधायक मागी होती. नवीन शोधामुळेच क्रांती घडून आली. या क्रांतीचा शुभारंभ कापड धंद्यापासून झाला. औद्योगिक क्रांतीची वाटचाल अथवा या काळात विविध लागलेले शोध आणि त्यांची प्रगती म्हणजे औद्योगिक क्रांतीची वाटचाल होय.

**१) कापड उद्योग व्यवसायाची प्रगती :**

सर्वप्रथम कापड उद्योगात महत्त्वाचे व क्रांतीकारक बदल झाले. इंग्लंडमध्ये लोकरीचे तंतू किंवा धागे बनविणे आणि वस्त्र विणण्याचा घरगुती उद्योग जुना होता. त्यासाठी चाती (चरखा) हेच एकमेव यंत्र होते. या उद्योगात नवे तंत्र निर्माण झाले. त्यामुळे त्याची प्रगती झाली. जॉन के. या इंग्रज विणकर्याने इ.स. १७३३ मध्ये धावता धोटा (फ्लाइंग शटल) या यंत्राचा शोध लावला. त्यामुळे कापड विणण्याची प्रक्रियेचा वेग वाढला. इंग्लंडमधील लॅकेशायर शहरातील जेम्स हार ग्रीव्हज याने इ.स. १७६४ मध्ये स्पिनिंग जेनी या सूत कातणी यंत्राचा शोध लावला. त्यामुळे कापसाचा धागा बनविण्याची क्रिया अधिक वेगाने होऊ लागली. प्रेस्टन शहरात रिचर्ड आर्कराईट याने इ.स. १७६९ मध्ये वॉटरफ्रेम हे सूत कातणी यंत्र तयार केले. या यंत्राच्या मदतीने कापसातून अधिक पिळदार व मजबूत धागा बनविणे शक्य झाले. सॅम्युएल कॉम्पटन येन इ.स. १७७९ मध्ये स्पिनिंग म्यूल यंत्र बनविले. त्याच्या मदतीने धागा अधिक तलम व मजबूत सूत कातणे शक्य झाले. केंट शहरातील डॉ. एडमंड कार्टराईड या धर्मगुरुने पॉवरलुम यंत्रमाग तयार केला. त्यामुळे विणकामाचा वेग शेकडो पटीने वाढला. दक्षिण अमेरिकेतील एलिव्हिटने इ.स. १७९३ मध्ये कॉटन जीन नावाचे यंत्र बनविले. त्यामुळे कापसापासून सरकी अलग काढणे सुलभ झाले.

munotes.in

इ.स. १८४६ मध्ये एलियास हॉब या अमेरिकन संशोधकाने शिवणयंत्राचा शोध लावला. वरील शोधामुळे कापड उद्योगात सर्व प्रकारची प्रगती झाली.

**२) कोळसा व लोखंड निर्मितीचे उद्योग :**

औद्योगिक क्रांतीच्या काळात यंत्र निर्माण करण्यासाठी लोखंडाचा उपयोग होतो. त्यामुळे लोंखड उत्पादन वाढविण्याची गरज भासू लागली. परिणाम अनेक ठिकाणी जंगलतोड झाली. अठराव्या शतकाच्या मध्याला कोलबुकडे हे लोखंड व्यवसायाचे महत्त्वपूर्ण केंद्र होते. अशुद्ध लोखंड शुद्ध करण्यासाठी कोळशासाठी गरज होती. त्यामुळे कोळसा खाणीचा शोध लागला. इ.स. १७५० मध्ये लोखंडाच्या खनिजाला वितळविण्यासाठी दगडी कोळशाचा वापर करण्याची नवी पद्धत शोधून काढली. इ.स. १७६० मध्ये स्मीटरने वर्तुळाकार फिरणारे भाता यंत्र तयार केले. त्यामुळे कोळशाच्या भट्ट्यातील अडचण दूर झाली. इ.स. १७९० मध्ये बाष्पशक्तीवर चालणारे नवे इंजिन तयार केले. त्यामुळे कोळशाच्या भट्ट्यांवर सतत वार्याचा झोत टाकण्याची मोठी सुधारणा झाली. इ.स. १७६६ ते ८४ या काळात लवचिक लोखंड निर्माण करण्याच्या पद्धतीत प्रगती झाली. इ.स. १७८३ मध्ये तापलेल्या लोखंडाला हातोड्याने ठोकून त्याला हवा तो आकार देण्याच्या पद्धतीऐवजी तयार ठेवलेल्या खाचामधून लोखंडाचा रस ओतून लोखंडी बीम तयार करण्याची पद्धत विकसित झाली. इ.स. १८१६ मध्ये सर हंफ्रे डेव्हीने बिनधोक्याचा कंदिल शोधून काढला. त्यामुळे खाणीत काम करणे सुरक्षित झाले. अब्रहम डर्बी याने ब्लास्ट फर्नेस (भट्टी) साठी कातड्याच्या भात्याचा उपयोग प्रथम केला. जॉन स्मिटन याने इ.स. १७६० मध्ये वायूपंप शोधून काढला. हेन्री कॉर्ट याने इ.स. १७८४ मध्ये अशुद्ध लोखंड शुद्ध करण्याची खास भट्टी तयार केली. इ.स. १७९४ मध्ये मॉडस्लेने स्लाईड रेस्ट शोधून काढले. इ.स. १८२८ मध्ये जेम्स नेल्सनने भट्टी तापविताना भात्यातून उष्ण वायूझोत टाकणे अधिक फायदेशीर असल्याचे सिद्ध केले. इ.स. १८४२ मध्ये बाष्प शक्तीवर चालणारा घण व हातोडा तयार केला. इ.स. १८५६ मध्ये हेन्री बेसामेर याने लोखंड शुद्धीकरणाची व पोलाद निर्मितीची पद्धती शोधून काढली.

**३) बाष्पशक्ती व विद्युतशक्ती :**

नवीन यंत्रे चालविण्यासाठी प्रारंभी जलशक्तीचा उपयोग करण्यात आला. नंतरच्या काळात त्याची जागा बाष्पशक्तीने घेतली. इ.स. १७०० मध्ये थॉमस सॅव्हेरी याने खाणीतील पाण्याचा निचरा करण्यासाठी बाष्पयंत्राचा सर्वप्रथम वापर केला. इ.स. १७०५ मध्ये थॉमस न्यूकॉमेन याने वाफेच्या शक्तीवर चालणारे सर्वप्रथम बाष्पयंत्र तयार केले. जेम्स वॅट व ब्रिमंगहॅम यांनी म्युकॉमिनच्या यंत्रातील तांत्रिक दोष दूर करुन इ.स. १७६९ मध्ये बाष्पयंत्र तयार केले. इ.स. १७८५ मध्ये कार्टराईटने बाष्पशक्तीवर चालणारे यंत्रमाग सुरु केले.

१९ व्या शतकात बाष्पशक्तीऐवजी विजेचे सहाय्य घेण्यात आले. व्होल्टा याने इ.स. १८०० मध्ये व्होल्टिक सेल (कोरडी विजेरी) शोध लावला. ॲम्पियर याने विद्युत चुंबकीय शास्त्राचा पाया घातला. मायकेल फॅरेडे याने डायनोमाचा शोध इ.स. १८८२ मध्ये लावला. बेंजामीन फ्रॅंकलिनने (इ.स. १७०६-९०) विजेचा शोध लावला. मायकेल फॅरेडेने १७२१ मध्ये विजेची मोटार व विद्युत जनित्र तयार केले. मोर्स याने इ.स. १८३७ मध्ये

टेलिग्राफचा शोध लावला. सायरस फिल्ड याने इ.स. १८६६ मध्ये पहिली ट्रघन्स अटलांटिक केबल घातली. इ.स. १८९६ मध्ये मार्कोनी याने बिनतारी तारायंत्राचा शोध लावला.

**४) दळणवळणातील सुधारणा :**

इंग्लंडमध्ये नव्या यंत्राच्या मदतीने मालनिर्मितीचा वेग वाढला. त्याची वाहतूक जलदगतीने करण्याचा प्रश्न निर्माण झाला. लँकेशायरात सुती वस्त्राचा उद्योग केंद्रित झाला होता. जगाची बाजारपेठ उपलब्ध झाल्याशिवाय हा उद्योग दीर्घकालीन विकास होणे शक्य नव्हते. त्यामुळे दळणवळणाची गरज निर्माण झाली. त्यातून नवे तंत्रज्ञान विकसित होऊन दळणवळणात सुधारणा झाली.

**अ) रस्ते :** इंग्लंडमधील रस्ते जुने व खाचखळग्यांमुळे निरुपयोगी होते. नवे पक्के रस्ते तयार करण्याचे काम खाजगी कंपन्यांनी घेतले. जॉन मॅक अॅडॅम याने खडी व चिखल याचा वापर करुन पक्के रस्ते बांधण्याचे तंत्र शोधून काढले. १८३९ मध्ये चार्ल्स गुडडअर याने रबर व्हल्कनाईज करण्याचे तंत्र शोधून काढले.

**ब) रेल्वे :** सर्वप्रथम इ.स. १८१० मध्ये ट्रेव्ही थिकनेने वाफेचे इंजिन तयार केले. इंग्लंडचा जॉर्ज स्टिफन्सन व विल्यम हेडले यांनी इ.स. १८१४ मध्ये बॉयलर च्या वाफेवर चालणारे रॉकेट नावाचे रेल्वे इंजिन तयार केले. जगातील पहिली रेल्वेगाडी इ.स. १८३० मध्ये लिव्हरपुल ते मँचेस्टर धावू लागली. या इंजिनचा वेग ताशी २९ मैल होता. इ.स. १८३० मध्ये पीटर कूपरने हामथंब नावाचे इंजिन असलेली सुधारित रेल्वे गाडी तयार केली.

**क) जहाज / आगबोट व विमानसेवा :** रेल्वेने बंदरापर्यंत आणलेला माल आगबोटीतून परदेशी पाठवला जात असे. आता शिडांच्या जहाजाऐवजी बाष्पशक्तीवर चालणार्या बोटीचा उपयोग होऊ लागला. अमेरिकेच्या रॉबर्ट फुलटॉन याने इ.स. १८०७ मध्ये बाष्पशक्तीवर चालणारी पहिली क्लेरेमेंट नावाची नौका हडसन नदीवर सुरु केली. तिने ३२ तासाचे १५० मैलांचे अंतर कापले. इ.स. १८३८ मध्ये ग्रेट वेस्टर्न हे जहाज अमेरिकेतून निघून कोठेही कोळसा न घेता १५ दिवसांत इंग्लंडला पोहोचले. इ.स. १८४० मध्ये सॅम्युएल कुनार्ड याने अटलांटिक महासागरावरुन अमेरिकेत जाण्याची नियमित जहाज वाहतूक सुरु केली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ऑरव्हिल व राईट या दोघांनी पहिले हवेत उडणारे यंत्र इ.स. १९०३ मध्ये तयार केले. इ.स. १९०८ मध्ये त्याचे यशस्वी उड्डाणही केले.

**ड) बिनतारी तारायंत्र व टेलिफोन्स :** या सर्व शोधात संदेश वाहनाच्या पद्धतीत जी क्रांती घडून आली ती अतिशय महत्त्वाची ठरली. चार्ल्स व्हिटस्टोन या इंग्रज व्यक्तीने विद्युत बिनतारी तारायंत्राचा शोध लावला. इ.स. १८६६ मध्ये अटलांटिक महासागरात पहिली केबल टाकण्यात आली. इ.स. १८७० मध्ये जर्मन माणसाने टेलिफोनवरुन दूरच्या माणसाशी संभाषण करता येऊ शकेल, असा शोध लावला. इ.स. १८४४ मध्ये मोर्सने तारायंत्राचा आणि अलेक्झांडर बेल व पहिल्या एडिसनने टेलिफोनचा शोध लावला. मार्कोनीने रेडिओचा शोध लावला. इ.स. १८४० मध्ये पोस्टकार्ड योग्य स्थळी पोचविणारी

पेनीपोस्ट योजना सुरु केली. गणकयंत्र, रडार, दूरदर्शन, उपग्रह, अवकाशयाने, प्रयोगशाळा, अत्याधुनिक दुर्बिन दळणवळणाच्या साधनात क्रांती घडविली. त्यामुळे सर्व जग जवळ येऊ लागले.

**५) कृषी क्षेत्रातील क्रांती :**

अनेक क्षेत्रातील उद्योगधंद्यात बदल घडून येत असताना कृषी क्षेत्रात ही क्रांती घडून आली. त्यामुळे जगात कृषीप्रधान व उद्योगप्रधान अर्थव्यवस्थांचा विकास झाला. पूर्वीची शेती गरजेपुरती व पोटापुरती होती. जास्त उत्पादन करुन शेतीचे व्यापारीकरण करावे, ही संकल्पना औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झाली. त्याला विमान व व्यापाराची जोड मिळाल्याने शेतीचे औद्योगिकरण झाले. लॉर्ड टाऊन शेंड याने शेतीतील पीक बदलल्याने जमिनीचा कस कायम राहतो, हा महत्त्वाचा शोध लावला. रोड, ऑर्थर यंग, बेकवेल यांनी शास्त्रीय पद्धतीने संशोधन करुन अनेक प्रयोग यशस्वी केले. खतांच्या मदतीने सुपिकता वाढविण्यात आली.

प्रत्येक शेतकर्याने आपल्या शेतीला कुंपण घालावे, असा कायदा पार्लमंटने मंजूर केल्याने, अनेक शेतकर्यांना आपल्या जमिनीवरील हक्क गमवावा लागला. यालाच इंग्लंडच्या इतिहासात वंपणाची चळवळ असे म्हणतात. याशिवाय सरकारने अनेक कायदे मंजूर केले. शेती संशोधनातून अनेक प्रकारची बियाणे, कीटकनाशके, औषधे, खते, कृषीपंढरी इ. मुळे प्रगती झाली. याशिवाय इ.स. १७३७ मध्ये जॉन डिअरने पोलादी नांगर, मॉशने मळणी यंत्र, अपलबीने कापणी व भारे बांधणारे यंत्र, कॉर्मिकचे कापणी यंत्र इ. शोध लागले. ऑर्थर यंगच्या ब्रिटिश बोर्ड ऑफ ॲग्रीकल्चर या संस्थेने विविध उपक्रम राबवले. त्यामुळे कृषीक्षेत्रात मोठी प्रगती झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) औद्योगिक क्रांतीची वाटचाल स्पष्ट करा.

---

---

---

---

## ६.६ औद्योगिक क्रांतीचे परिणाम

औद्योगिक क्रांतीने जन्म दिलेली यंत्रसंस्कृतीचा प्रसार इंग्लंडप्रमाणेच सर्व जगात हळूहळू झाला. मानवी जीवनाच्या अंगोपांगाचे आमूलाग्र, परिवर्तन करणारी सर्वस्पर्शी घटना म्हणजे क्रांती होय. क्रांतीमुळे मानवी जीवनात एकाच वेळी सुखसंपत्ती व दु:खदारिद्र्य आले. इंग्लंडप्रमाणे नेपोलियननेही क्रांतीचा पाठपुरावा केला. फ्रान्सप्रमाणेच इतर राष्ट्रांनीही क्रांतीचा प्रकार केला. या क्रांतीचा जीवनाच्या विविध पैलूंवर परिणाम झाला.

**अ) औद्योगिक क्रांतीचे आर्थिक परिणाम :**

**१) उत्पादनाच्या तंत्रातील बदल व उत्पादन वाढ :**

औद्योगिक क्रांतीचा प्रामुख्याने आर्थिक जीवन व अर्थव्यवस्था यावर परिणाम झाला. कारखान्यातून वस्तू उत्पादनाचे नवीन तंत्र वापरल्याने उत्पादन पद्धतीत फार मोठा बदल झाला. परंपरागत घरगुती उद्योग बंद पडले व विविध वस्तूंचे उत्पादन विविध प्रकारच्या कारखान्यात सुरु झाले. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढला. तो औद्योगिक क्रांतीस अनुकूल ठरला.

**२) भांडवलदार वर्गाचा उदय :**

कारखाने सुरु करणे व ते चालवणे यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाली. त्यामध्ये भांडवलदार हा महत्त्वाचा घटक होता. भांडवल पुरविणारा नवा व्यापारी, उद्योगपती, पुंजीपती यांचा श्रीमंत वर्ग निर्माण झाला. तयांनी एका कारखान्यापासून अनेक कारखाने सुरु केले व औद्योगिक विस्तार केला. या गुंतवणूकीतून एका बाजूला प्रंचड नफा तर दुसऱ्या बाजूस मजुरांचे आर्थिक शोषण केल्याने समाजातील श्रेष्ठ व श्रीमंत वर्ग बनला. अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्यवादी भांडवलदाराने पुढीलप्रमाणे मागण्या केल्या. उद्योगावरी राज्याचे सर्व निर्बंध रद्द करावे. चोरी, खून, राजद्रोह असे गुन्हे होऊ नयेत यासाठी राज्यात केवळ रक्षकाचे काम करावे. मध्ययुगीन कारागीर संघ, सनदी कंपन्या आणि त्यांची मक्तेदारी नष्ट करुन खुले धोरण ठेवावे.

**३) श्रमविभाजन व मजुरांची दयनीय स्थिती :**

औद्योगिक उत्पादन पद्धतीत श्रमविभाजन हा महत्त्वाचा घटक होय. गृहउद्योग पद्धतीत कारागीर सर्वच दृष्टींनी स्वतंत्र असे उत्पादन साधनांवर त्याची मालकी होती. तो आपल्या इच्छेनुसार उत्पादन करते असे. याउलट क्रांतीनंतर उत्पादनाच्या साधनांवरील कामगारांची मालकी नष्ट होऊन, व्यवस्थापन वर्गाच्या नियंत्रणाखाली नेमून दिलेले काम करावे लागत असे. त्यामुळे श्रमविभाजनाला मदत झाली. कामगारांच्या कामातील सर्जनशील आनंद नष्ट झाला. कारखान्यातील वातावरण आरोग्यदृष्ट्या विघातक होते. अनेक अपघात होऊन प्रसंगी मृत्युही ओढवत असत. कामगारांना राहावयास मिळालेली घरे अत्यंत गलिच्छ व कोंदट असत. कामगारांच्या कुटुंबातील स्त्रिया, मुले पोटासाठी काम करत असे. अतिश्रमामुळे जीवनातील आनंद नष्ट झाला होता. संसारी दु:ख विसरण्याकरिता मजूर दारु, जुगार या व्यसनांना बळी पडू लागले. दुराचार, गुप्तराग, अनैतिकता यांचा प्रादुर्भाव वाढला.

**४) गृहउद्योग व ग्रामीण जीवनाचा र्‍हास :**

मध्ययुगीन अर्थव्यवस्थेवरच औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला. क्रांतीपूर्वी जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणारा विविध व्यावसायिक वर्ग खेड्यात राहत होता. क्रांतीमुळे त्यांचे व्यवसाय बंद पडले. व्यावसायिक मालक-मजूर वर्ग बेकार झाला. तो स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी शहराकडे वळला. जमिनदारी पद्धत नष्ट झाल्याने जमीनदार शेतकरी, शेतमजूर यांनाही शहराकडे धाव घेतली. परिणाम खेडी ओस पडली. त्याचा परिणाम गृहउद्योगावर व ग्रामीण जीवनावर झाला.



munotes.in

**५) नवनी अर्थव्यवस्था :**

मध्ययुगातील सरंजामशाहीची शेतीवर आधारित अर्थव्यवस्था हळूहळू मागे पडली. तिच्या जागी उद्योगप्रधान, भांडवलशाही, मुक्त अर्थव्यवस्था अशी नवी अर्थव्यवस्था उदयास आली. या अर्थव्यवस्थेत कारखानदारी, व्यापार, उद्योगधंद्यांना महत्त्व प्राप्त झाले. उत्पादन क्षमता वाढत गेल्याने त्यामध्ये अर्थव्यवहार गुंतागुंतीचे झाले. जमीन, श्रम, भांडवल व व्यवस्थापक असे सर्व घटक मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने अनेक प्रकारच्या कंपन्या स्थापन झाल्या. त्यामुळे नफ्याचे व आयातीचे प्रमाण वाढले. परंतु या व्यवस्थेत विषमतेची दरी निर्माण झाली. संपत्तीचे अमर्याद केंद्रीकरण झाले. धातूचे चलन बंद होऊन कागदी चलन सुरु झाले. शेअर बाजाराला अतिशय महत्त्व प्राप्त झाले.

**६) कृषीक्षेत्राकडे दुर्लक्ष :**

मध्ययुगात शेतीउद्योग हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ होता. औद्योगिक क्रांतीने या उद्योगावर चांगले व वाईट परिणाम झाले. जमीनदारी पद्धत नष्ट होऊन शेतीचे वैज्ञानिकीकरण व व्यापारीकरण होऊन हरितक्रांती झाली. धान्याचे उत्पादन वाढल्याने उपासमारीचा प्रश्न सुटला. तथापि शेती उद्योगापेक्षा उद्योगधंदे जास्त फायदेशीर असल्याने समाज व शासनाचे शेतीकडे दुर्लक्ष झाले. शेतीला दुय्यम स्थान प्राप्त झाले. शेतीमालाच्या किंमती, वाहतूक, महागडी अवजारे, खते-बियाणे, कीटकनाशके अशा अनेक समस्या शेतकऱ्यांना भेडसावू लागल्या.

**ब) औद्योगिक क्रांतीचे सामाजिक परिणाम :**

**१) सुखसमृद्ध व आराम जीवन :**

औद्योगिक क्रांतीच्या काळात अनेक वैज्ञानिक शोध लागल्यामुळे कारखानदारी पद्धत निर्माण झाली. त्यातील नव्या उत्पादनामुळे मानवाच्या सुखसोयीमध्ये वाढ झाली. सुखी व चैनी असंख्य साधनांचे उत्पादन झाले. स्वस्त व दर्जेदार माल लोकांना प्राप्त झाला. लोकांचे जीवनमान उंचावले. यंत्रयुगामुळे परंपरागत खडतर व कष्टमय जीवन नष्ट होऊन सुखी व समृद्ध जीवनाला प्रारंभ झाला. दैनंदिन समाज जीवन, अर्थव्यवस्था, दळणवळणाची साधने व सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठा बदल झाला. वीजेची उपकरणे, विविध यंत्रे, वैद्यकीय शोध, औषधे, प्रचंड धान्योत्पादन, मौल्यवान कलाकृती, उंची कापड, रेल्वे, मोटारी, जहाजे, टेलिफोन, सिनेमा, टीव्ही, रेडिओ इ. साधनांमुळे मानवी जीवन संपन्न, सुसह्य, समृद्ध व चैनी-विलासी-आरामदायी बनले. हे सर्व बदल औद्योगिक क्रांतीने घडवून आणले.

**२) नवीन समाजरचनेची जडणघडण :**

औद्योगिक क्रांतीने जुनी सरंजामशाही अर्थव्यवस्था नष्ट करुन भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे मानवी जीवन व समाजरचना यांच्यात पूर्णपणे बदल झाला.समाजातील जुना वर्ग राजा, राजपरिवार, उमराव, धर्मगुरु, शेतमजूर, भूदास, गुलाम हे नष्ट होऊन त्याच्याऐवजी भांडवलदार, उद्योगपती, व्यापारी, कारखानदार, कर्मचारी, कारागीर, कलावंत, डॉक्टर, प्राध्यापक, वकील, शास्त्रज्ञ, साहित्यिक, विचारवंत आणि शेतकरी व मजूर असा नवा समाजवर्ग निर्माण झाला. बहुजन समाज हा

कामगार वर्गाचा बनला. यामधून जागृत असा मध्यमवर्ग निर्माण झाला. तो प्रभावशाली होता. गरीब-श्रीमंत, शोषित-शोषक, सहनशील-अन्यायी, उपेक्षित-प्रतिष्ठित हा परस्परविरोधी समाजरचनेतून सामाजिक विषमता वाढीस लागली. त्यातून सामाजिक अनेक प्रश्न निर्माण झाले.

**३) संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास आणि स्त्रीमुक्ती :**

शेतीव्यवसायाशी निगडित असलेली संयुक्त कुटुंबपद्धतीचा र्हास औद्योगिक क्रांतीमुळे झाला. वाढते शहरीकरण, त्यामध्ये जागेची अडचण, व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पना याच्या प्रभावामुळे लहानलहान कुटुंब (विभुक्त कुटुंबे) संख्या वाढली. क्रांतीचा जसा विकास होत गेला, तसाच व्यक्ती-व्यक्तीमधील प्रेम नष्ट होऊन त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. परिणामी संयुक्त कुटुंब पद्धतीचा र्हास झाला.

औद्योगिक क्रांतीमुळे शरीर सामर्थ्याची गरज कमी झाली. त्यामुळे उत्पादन क्षेत्रात स्त्री-पुरुषांच्या बरोबरीने काम करु लागली. त्यांनी आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यामुळे परंपरागत कुटुंब व सामाजिक बंधनातून मुक्त झाली.

**४) समाजावरील धर्माचा प्रभाव कमी :**

मध्ययुगात समाजावर धर्माचा व धर्मगुरुंचा प्रभाव होता. त्यामुळे समाजात अंधश्रद्धा, परंपरा व धार्मिक समजुती निर्माण झाल्या. प्रबोधन व धर्मसुधारणा चळवळीमुळे विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव सतत वाढत गेला. त्यामुळे एकूण समाजजीवनावरील धर्माचा प्रभाव कमी झाला. सर्व समाज हा सुखी-चैनी विलासी म्हणजेच भौतिकवादी बनला.

**५) जागरूक व प्रभावशाली मध्यमवर्गाचा उदय :**

औद्योगिक क्रांतीमुळे समाजात मध्यमवर्गाचा उदय झाला. यामध्ये प्राध्यापक, डॉक्टर, वकील, इंजिनीअर, संशोधक, कारागीर, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यांचा समावेश होतो. हा वर्ग श्रीमंत नसला तरी तो जागरूक, प्रयत्नवादी, चिकाटीचा असून त्याने क्रांत्याचे व समाजप्रबोधन व सुधारणा चळवळीचे नेतृत्व केले. भांडवलदारांनी आर्थिक सामर्थ्याच्या बळावर राजकीय वर्चस्व निर्माण करीत होता. त्यामुळे राजकीय भांडवलदार व मध्यमवर्ग प्रतिस्पर्धी बनले. आधुनिक लोकशाही शासनामध्ये या वर्गाला अतिशय महत्त्व होते.

**६) भूदास पद्धती व गुलामगिरी नष्ट :**

औद्योगिक क्रांतीमुळे यंत्र-तंत्र याची वाढ झाली. त्यामुळे शारीरिक श्रमाचे महत्त्व कमी झाले. शिवाय सरंजामशाहीचाही शेवट झाला. नवीन समाज निर्माण झाला. त्यामध्ये भूदास पद्धती, गुलामगिरी या पिळवणूक करणार्या प्रथेच्या विरोधात चळवळी सुरु झाल्या. त्यामुळे क्रांतीनंतर भूदास पद्धत व गुलामगिरी पद्धत नष्ट झाली.

### क) औद्योगिक क्रांतीचे राजकीय व इतर परिणाम :

#### १) राजेशाहीचा ऱ्हास :

औद्योगिक क्रांतीने समाजाच्या अनेक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. मानवाला अनेक विवेचनातून व अडचणीतून मुक्त केल्याने तो स्वतंत्र बनला. तत्कालिन एकत्र कुटुंबपद्धतीचा व राजकारणातील प्रचलित राजेशाहीचा ऱ्हास होत गेला. त्यामुळे जगाची वाटचाल लोकशाहीच्या दिशेने सुरु झाली. औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंडमध्ये जलदगतीने लोकशाहीचा विकास व विस्तार झाला. त्यांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. पुढील काळात स्त्रियांनाही हा हक्क प्राप्त झाल्याने लोकशाहीचा विकास व विस्तार झाला.

#### २) आर्थिक राष्ट्रवादाचा उदय :

आपल्या राष्ट्राच्या आर्थिक भरभराटीसाठी करावे लागणारे प्रयत्न म्हणजे आर्थिक राष्ट्रवाद होय. आपल्या देशातील उपलब्ध खनिजसंपत्ती, मनुष्यबळ, उद्योगधंदे, देशांतर्गत व देशाबाहेर व्यापार या सर्वांच्या विकासाला उत्तेजन देणे. याचा आर्थिक राष्ट्रवादामध्ये समावेश होतो. आपल्या देशाबरोबर स्पर्धा करणार्या इतर देशांच्या व्यापारावर निर्बंध घालणे, आयात-निर्यात व्यापारावर बंदी घालणे. त्यांच्या मालावर जकात जास्त बसवणे, तसेच आपल्या देशासाठी परदेशात व्यापारासाठी वसाहती स्थापन करणे. देशातील अतिरिक्त भांडवल वसाहतीत गुंतवणे, या सर्वांच्या आधारे आपल्या देशाचे हित साधणे या धोरणाचा अनेक युरोपीय राष्ट्रांनी वापर केला.

#### ३) युरोपीय राष्ट्रांचा नवा साम्रज्यवाद :

आत्यंतिक राष्ट्रवाद, औद्योगिकीकरण, वांशिक श्रेष्ठत्व, बलिष्ठ राष्ट्रांची आक्रमक प्रवृत्ती यांच्या संयोगातून निर्माण झालेले सत्ता विस्ताराचे धोरण म्हणजे साम्रज्यवाद होय किंवा एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर सर्व प्रकारचे अधिकार निर्माण करणे म्हणजे साम्रज्यवाद होय. बाजारपेठ, कच्चा माल, धर्मांतराचा हेतू व धर्मप्रसार, लोकसंख्येचे पुनर्वसन या हेतूने आफ्रिका, आशिया खंडात साम्रज्यविस्तार केला. इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगाल, स्पेन, इटली, जर्मनी, रशिया, जपान, अमेरिका ही राष्ट्रे साम्रज्यवाद व वसाहतवाद यामध्ये आघाडीवर होती.

#### ४) राजकीय हक्काची प्राप्ती :

मजुरांची आपल्या संघटना स्थापन करुन आपल्या दु:खाचे निवारण करण्याचा प्रयत्न केला. आपणाला मतदानाचा हक्क मिळावा यासाठी इ.स. १८४४ मध्ये चार्टिस्ट चळवळ सुरु केली. याद्वारे कामगारांची पार्लमेंटमधये प्रवेश करुन राजकीय सत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला; परंतु शासनाने त्यांच्या मागण्या मान्य केल्या. इ.स. १८६७ चा कायदा पास करुन कामगारांना त्यांची मालमत्ता व धर्म याचा विचार न करता त्यांना मतदानाचा हक्क देण्यात आला.

#### ५) कामगार संघटना व चळवळीचा उदय :

औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी वाढली. तसे कामगारांचे प्रश्नही वाढले. त्यांच्यावर अनेक प्रकारचे अन्याय होत असे. आपल्यावरील अन्याय दूर करणे व हक्क प्राप्तीसाठी कामगाराने संघटना स्थापन केल्या. या संघटनांनी व समाजवादी पक्षांनी

भांडवलशाही व त्यांना मदत करणार्या शासनाविरोधी लढा दिला. त्यातूनच कामगार चळवळ उदयाला आली. इंग्लंडमध्ये चार्टिस्ट चळवळ, अमेरिकेत पॉप्युलिस्टांची चळवळ ही कामगार लढ्याची ठळक उदाहरणे होती. कामगार चळवळींमुळे अनेक हक्क व सुधारणा झाल्या.

औद्योगिक क्रांती म्हणजे इतिहासातील एक अपूर्व व महान युगप्रवर्तक प्रक्रिया आहे. या क्रांतीने दु:खासह अनेक शारीरिक कष्टाच्या चक्रातून मानवाची सुटका केली. पण अनेक नव्या जटिल समस्या निर्माण केल्या. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता प्राथमिक अवस्थेतील मानवाच्या जनावरांना माणसाळविले व शेतीव्यवस्थेला सुरुवात करणे. या प्रक्रियांशी या क्रांतीची तुलना करावी लागते. औद्योगिक क्रांतीने आधुनिक जगाला जन्म दिला, असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) औद्योगिक क्रांतीची परिणाम सांगा.

## ६.७ सारांश

मध्ययुगात प्रबोधन चळवळीमुळे सामाजिक व आर्थिक बदल मोठ्या प्रमाणात झाले. तसेच जूनी समाज व्यवस्था नष्ट होऊन नवीन समाज रचना तयार झाली. वैज्ञानिक क्षेत्रात नवनवीन शोध लागले. त्यातून औद्योगिक क्रांती घडून आली. त्यामुळे देशाची सर्व क्षेत्रात प्रगती झाली. तसेच वसाहतवाद मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. त्यातून वसाहतीची पिळवणूक, अन्याय, अत्याचार मोठ्या प्रमाणात होऊ लागली. औद्योगिक क्रांतीतून समाजात आर्थिक विषमता निर्माण झाली. भांडवलदार वर्गाकडून कामगारांची पिळवणूक झाली. ती नष्ट करण्यासाठी आणि नवीन समाजरचना कशी असावी या संदर्भात जे विविध मतप्रवाह होते त्यातून समाजवाद हे तत्त्वज्ञान उदयास आले. समाजवादाचे दोन प्रवाह आहेत. आदर्शवादी व साम्यवादी विचारप्रवाह आहेत. त्याचा जागतिक इतिहासावर फार मोठा प्रभाव पडला.

## ६.८ प्रश्न

१) औद्योगिक क्रांती म्हणजे काय ते सांगून क्रांतीचे स्वरूप सांगा.

२) औद्योगिक क्रांतीची कारणे स्पष्ट करा. क्रांतीचा विस्तार करा.

३) औद्योगिक क्रांतीचे परिणाम स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ७

# युरोपमधील राष्ट्र-राज्यांची निर्मिती

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टये
७.१ प्रस्तावना
७.२ राष्ट्र-राज्य संकल्पना
७.३ राष्ट्र राज्याची वैशिष्ट्ये
७.४ फ्रान्स व इंग्लंड मधील राष्ट्र राज्याचा उदय
७.५ इंग्लंड
७.६ फ्रान्स
७.७ सारांश
७.८ प्रश्न

## ७.० उद्दिष्टये

१) एका विशिष्ट भूभागावर राजकीयदृष्ट्या संघटित झालेले लोकांचा अभ्यास करणे.

२) राज्याच्या उदयामागील कार्यकारणभाव शोधून काढणे.

३) त्यांच्या तात्विक विवेचनातून राज्याच्या उद्याचे सिद्धांत मांडणे.

४) सभोवतालच्या परिस्थितीचे विवेचन करून राज्य-राज्य संकल्पनेचा आढावा घेणे.

## ७.१ प्रस्तावना

राष्ट्र-राज्य या विचाराचा पुरस्कार पाहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन यांनी १४ कलमी जाहीरनामा जाहीर केला व व्हर्सायच्या तहात तो ठेवला. एका राष्ट्रीयत्वाच्या लोकांचे एक राज्य असावे व आपले स्वतःचे शासन व स्वत: चालविण्याचा स्वनिर्णयाचा अधिकार प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रीयत्व असलेल्या लोक्सामुदायास असावा. या विचारांचा प्रभाव पाहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९२० साली आयोजित करणात आलेल्या पॅरिस परिषदेवर पडला. युरोप खंडात काही साम्राज्याचे विघटन होऊन युरोप खंडात राष्ट्र राज्ये.

## ७.२ राष्ट्र-राज्य संकल्पना

प्राचीन रोमन काळातील राज्याची कल्पना आणि मध्ययुगीन सरंजामशाहीतील विकेंद्रित राज्याची कल्पना या राजकीय प्रशासनाच्या दृष्टीने कुचकामी ठरल्या. मध्ययुगाच्या उत्तरार्धात उत्तरार्ध एक नवीन व्यवस्था उदयाला आली. तिला राष्ट्र-राज्य व्यवस्था असे संबोधले जाते.

राष्ट्रराज्य या विचाराचा पुरस्कार पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकन प्रेसिडेंड विड्रो विल्सन यांनी १४ कलमी जाहीरनामा केला व व्हासार्यच्या तहात १९९१ मध्ये तो ठेवला. एका राष्ट्रीयत्वाच्या लोकांचे एक राज्य असावे व आपले स्वत:चे शासन व स्वत: चालविण्याचा स्वयनिर्णयाचा अधिकार प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रीयत्व असलेल्या लोकसमुदायास असावा. या विचाराचा प्रभाव पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९२० साली आयोजित करण्यात आलेल्या परिस परिषदेवर पडला. ऑटोमन, ऑस्ट्रो हंगेरियन आणि जर्मन साम्रज्याचे विघटन होऊन युरोप खंडात पोलांड युगोस्लाव्हिया बल्गेरिया समानिया इत्यादी राष्ट्रांमध्ये स्थापन करण्यात आली. दरम्यानच्या काळात रशियन राज्यक्रांतीनंतर रशियन साम्रज्य विघटन होऊन बिगर रशियन राष्ट्रीयत्वाच्या लोकसमुदायाची स्वातंत्र्य राष्ट्र राज्य अस्तित्वात आली.

**राष्ट्र-राज्याचे आवश्यक घटक :**

१) समान हेतूसाठी एकत्र येऊन संघटनात्मक स्वरूप प्राप्त केलेला लोकसमुदाय

२) या लोकसमुदायाला स्वत:चे घर वाटणारा निश्चित असा भूभाग, लोक या भूभागावर कायम स्वरूपात वास्तव्य करुन राहतात.

३) बाह्य नियंत्रणापासून स्वतंत्र व अंतर्गत सार्वभौत्व

४) राजकीय संघटना किंवा संस्था ज्याद्वारे लोक संघटीत राहून कार्यवाही होते.

या चारही घटकांचे महत्त्व एवढे आहे.

राष्ट्रीयत्वासाठी आवश्यक असलेल्या घटकांचा पाया मध्ययुगातच घातला गेला होता. समान संस्कृती, समान भाषा, समान परंपरा या गोष्टी राष्ट्रीयत्वाचे निदर्शक मानल्या जातात. भौगोलिक दृष्ट्या सलग असा प्रदेशात एका विशिष्ट मानवी समूहात या गोष्टी दिसून आल्या व अन्य अशाच स्वरूपाच्या मानवी समूहापासून त्याचे भिनत्व दर्शविता आले. म्हणजे त्या प्रदेशाशी निष्ठा ठेवणार्यांचे राष्ट्र-राज्य निर्माण होते. युरोप खंडात इंग्लंड, फ्रान्स, स्पेन आदी राज्यांमधून राष्ट्र राज्याची कल्पना बनवली.

## ७.३ राष्ट्र राज्याची वैशिष्ट्ये

राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा प्रारंभ १६४८ च्या वेस्टफालिया करारापासून झालेला आहे. साधारणपणे राज्यसंस्था व राष्ट्रराज्य व्यवस्था या दोन्हीही संकल्पना समान अर्थाने



munotes.in

वापरल्या जातात. त्यामुळे त्यांची काही मूलभूत स्वरूपाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. जाती : राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी जनसमुदायाच्या जातीत एकता असणे अतिशय आवश्यक असते. एका जातीपासून निर्माण झालेल्या जनसमूहाला राष्ट्र म्हटले जाते. एका जातीतून निर्माण झालेल्या जनसमूहामध्ये अनेक गोष्टी एकसमान असतात. त्यात सांस्कृतिक एकता असणे अतिशय आवश्यक असते. आजच्या स्थितीत राष्ट्रीयता किंवा राष्ट्रवाद विभिन्न जातीच्या आणि समुदायांच्या एकतेतून निर्माण झालेली आहे.

### ७.३.१ धर्म :

राष्ट्राज्याच्या निर्मितीसाठी जातीय समानतेबरोबरच समान धर्म असणे अतिशय महत्त्वाचे असते. एका धर्मामुळे प्रचंड जनसमुदायाल एकत्र करता येवू शकते. युरोपात राष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी रोमन, कॅथालिक आणि प्रोस्टेट धर्माचे महत्त्वाचे योगदान आहे.

### ७.३.२ भौगोलिक एकता :

भौगोलिक एकता हे राष्ट्र-राज्याचे एक वैशिष्ट्य मानले जाते. कारण यातूनच राष्ट्र-राज्याचे स्थायित्व टिकून राहत असते. त्यामुळे भौगोलिक एकता टिकवून ठेवणे आणि आपल्या सीमेअंतर्गत राहणार्या नागरिकांचे संरक्षण करणे ही राष्ट्र-राज्याची जबाबदारी मानले जाते. भौगोलिकतेतूनच सार्वभौमत्व व राष्ट्रवादाच्या भावना मजबूत होतात.

### ७.३.३ सार्वभौमत्व :

सार्वभौमत्व किंवा प्रभुत्व हे राष्ट्र-राज्य पद्धतीचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाते. आपल्या कार्य क्षेत्रांतर्गत सर्व नागरिक व संस्थांना व्यवहारांना नियंत्रण करणारी शक्ती म्हणजे राज्याची सार्वभौम शक्ती होय. आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्र-राज्याचे सार्वभौमत्व म्हणजे प्रत्येक राज्याला आपल्या इच्छेनुसार आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्यवहार करण्याचे स्वतंत्र होय.

### ७.३.४ राष्ट्रवाद :

राष्ट्रवाद या घटकाने राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे मजबूत केले आहे. त्यामुळे हे राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य आहे. समान भौगोलिक जाणीवेतून लोकांना राष्ट्र-राज्य व्यवस्थेबद्दल अभिमान निर्माण होतो. राज्यसंस्था व्यक्तीच्या विभिन्न गरजा पूर्ण करते. त्यामुळे व्यक्ती तिच्या आज्ञाचे पालन करत आपली कर्तव्य पार पडतात त्यामुळे तेथील जनतेत जो राष्ट्रवाद निर्माण होतो. तो राष्ट्र-राज्याच्या अस्तित्त्वासाठी महत्त्वाचा ठरत असतो.

### ७.३.५ वैधानिक समानता :

जगातील सर्वच राष्ट्र-राज्ये आकार, लोकसंख्या, सैनिक शक्ती, आर्थिक उत्पादन क्षमता या बाबतीत समान नसली तरी त्यांना समान वैयक्तिक समानतेचा दर्जा प्राप्त असतो.

हे राष्ट्र राज्याचे वैशिष्ट आहे.

## ७.४ फ्रान्स व इंग्लंड मधील राष्ट्र राज्याचा उदय

प्राचीन रोमन काळातील राज्याची कल्पना आणि मध्ययुगीन सामंतशाहीच्या काळातील विकेंद्रित राज्याची कल्पना या राजकीय प्रशासनाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने कुचकामी ठरल्या. मध्ययुगाच्या उत्तरार्धात एक नवीन व्यवस्था आकाराला आली, ती राष्ट्र राज्य प्रादेशिक भाषांना आलेला जोम या घटकांमुळे मध्ययुगाच्या अखेरच्या टप्प्यात राष्ट्रवादी भावना बळावली त्यामुळे फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रिया, इंग्लंड, रशिया यासारखी राष्ट्र-राज्ये उदयाला आली.

## ७.५ इंग्लंड

१६०० साली ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करुन व्यापाराच्या निमित्ताने इंग्लंडने साम्रज्यवादाची नांदी केली. पोर्तुगीजांच्या पावलांवर पाऊल ठेवून इंग्लंडने मुघल राजवटीच्या काळात सुरत येथे पहिली व्यापारी वखार सुरु केली. हिंदुस्थानातील छोट्या-मोठ्या राजवटींचा दुबळेपणा, मागासलेपणा पाहून सुमारे तीन शतकाच्या अवधीत आपल्या राजकीय कौशल्याचा आणि मुत्सदेगिरीच्या जोरावर इंग्लंडने १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानावर आपले अधिराज्य स्थापन केले.

### ७.५.१ साम्रज्य विस्ताराची गरज :

आफ्रिकेतील सर्वात महत्त्वाचा प्रदेश ब्रिटीशांच्या वाट्याला आला होता. इंग्लंडला बिनी कोस्ट आणि केप ऑफ गुड होपपासून ते वर थेट इजिप्तपर्यंतचा प्रदेश मिळाला. औद्योगिक क्रांतीचा प्रसार इंग्लंडमध्ये झालेला असल्याने इंग्लंडने सुरुवातीपासूनच साम्रज्यविस्ताराच्या धोरणाचा अवलंब केला होता. आशिया व अमेरिका खंडातील अनेक प्रदेशात इंग्लंडने वसाहती स्थापन केल्या होत्या. जसजशी औद्योगिक प्रगती साध्य होवू लागली तसतशी इंग्लंडलाही साम्रज्यविस्ताराची गरज भासू लागली.

### ७.५.२ साम्रज्य विस्ताराच्या स्पर्धेत सहभाग :

साम्रज्य विस्ताराची गरज निर्माण झाल्याने युरोपियन राष्ट्रांमध्ये सुरु झालेल्या साम्रज्यविस्ताराच्या स्पर्धेत इंग्लंड सर्व सामर्थ्यासह सहभागी झाला. हा साम्रज्यविस्तार करताना प्रसंगी इंग्लंडने युद्धे केली. आफ्रिकेत साम्रज्यविस्ताराची मोहिम दक्षिणेकडील भागापासून सुरु केली. दक्षिणेकडच्या प्रदेशात केप ऑफ गूड होप, नाताळ, ट्रान्सवाल व ऑरेंज या चार प्रमुख वसाहती होत्या.

### ७.५.३ बोअर युद्ध :

केप ऑफ गुड होप पासून उत्तरेकडे साम्रज्यविस्तार करण्यास डचांनी सुरुवात केली होती; त्यामुळे या प्रदेशात वसाहती स्थापन करताना ब्रिटिशांना त्यांच्या बरोबर व बुशमेन, काफिर्स, झुलू या मातीबरोबर संघर्ष अपरिहार्य होते. येथे वसाहती स्थापन

करण्याकरता डच आणि इंग्रज यांच्यात जे युद्ध झाले. त्याला 'बोअर युद्ध' म्हणतात. युद्धात ब्रिटीशांचा विजय झाला. परंतु हा भाग साम्रज्याला जोडण्याऐवजी डचांना अंतर्गत स्वायत्ता बहाल केली.

**७.५.४ आशिया व आफ्रिका खंडातील साम्रज्य विस्तार :**

नाताळ, ट्रान्सवात, ऑरेंजफी स्टेट व कॅम्प कॉलनी या सर्व प्रदेशांचे मिळून युनियन ऑफ साऊथ आफ्रिका हे राज्य बनविण्यात आले त्यावर अप्रत्यक्ष वर्चस्व कायम टिकवले. आशिया खंडाला (भारताला) जोडणारा सुएझ कालवा हा जवळचा मार्ग अस्तित्वात आल्यानंतर त्यांच्या शेअर्सची मोठ्या प्रमाणावर खरेदी इंग्लंडने केली. पुढील काळात इजिप्तवरही वर्चस्व मिळविण्यासाठी हालचाली सुरु केल्या. ग्ल-अलगबर या युद्धात इजिप्तचा पराभव करण्यात इंग्लंडला यश आले. याच पद्धतीने इंग्लंडने सुदानचाही ताबा मिळवला, इंग्लंडच्या वसाहती फ्रेंचांपेक्षा कमी असल्या तरी अतिशय महत्त्वपूर्ण व नैसर्गिक साधनसामग्रीच्या दृष्टाने समृद्ध होत्या.

## ७.६ फ्रान्स

पोर्तुगाल व इंग्लंड यांच्या मागोमाग फ्रान्सने नेपोलियनच्या काळात साम्रज्य आकांक्षा ठेवून वसाहती मिळविण्यासाठी धडपड सुरु केली. त्यांच्या प्रयत्नामुळे हिंदुस्थानात आणि आग्नेय आशियातील काही भागात व्यापारी ठाणी सुरु करुन वसाहती मिळवल्या.

**७.६.१ बाजारपेठेसाठी वसाहतीची गरज:**

औद्योगिक क्रांतीनंतर फ्रान्सला कच्या आणि पक्या मालासाठी बाजारपेठेची आवश्यकता होती. त्याकरिता नवीन वसाहती मिळवणे गरजेचे होते. त्यासाठी जवळचा आफ्रिका खंड त्यांना फायद्याचा होता. संशोधकांच्या मदतीने आफ्रिका खंडाची माहिती घेऊन युरोपिय राष्ट्रांबरोबर फ्रान्सने स्पर्धेत शिरकाव केला.

**७.६.२ आफ्रिका खंडात प्रवेश :**

ब्रन्झा या संशोधकाने मिळवलेल्या माहितीच्या आधारावर कांगो नदीच्या उगमकडून कांगो खोरे मिळवण्यास सुरुवात केली. यावेळी बेल्जियम या राष्ट्रानेदेखील कांगो खोऱ्यात प्रवेश केला. कांगो नदीच्या मुखाकडून बेल्जियम व उगमाकडून फ्रान्स कांगो खोरे व्यापू लागले. दोन राष्ट्रात संघर्षाची परिस्थिती उद्भवली अखेरीस समझोता होऊन उत्तर-दक्षिण कांगोखोरे फ्रान्सला मिळाले.

**७.६.३ फ्रान्सचा साम्रज्यविस्तार :**

आफ्रिकेच्या प्रदेशावर युरोपीय राष्ट्रांनी अधिराज्य प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेत सुरुवात फ्रान्सने केली. इंग्लंडच्या विरोधामुळे फ्रान्सला सुरुवातीला यश मिळाले नाही. आफ्रिकेच्या उत्तर किनार्यावर अल्जेरिया येथे पहिली वसाहत स्थापन केली. त्यानंतर कांगो प्यूनिशिया, मैनेगल, मोरोस्को व सहारा हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणले. फ्रेंचांना आफ्रिकेतील मादागास्कर, सोमाली लँड या प्रदेशावर वर्चस्व मिळवायचे होते परंतु त्यांना

युरोपियन राष्ट्रांबरोबर संघर्ष करावा लागला. या संघर्षात फ्रान्सने तडजोडीचा दृष्टिकोन स्विकारला त्यामुळेच फ्रेंचांना कांगोतील काही प्रदेश जर्मनीला देणे भाग पडले. थोडक्यात युरोपातील साम्रज्यवादी राष्ट्रानी आफ्रिकेतील वसाहती मिळविताना प्रसंगी संघर्ष वा तडजोड स्विकारुन आपला हेतू साध्य केला.

## ७.७ सारांश

राष्ट्र (Nation) आणि राज्य (State) या दोन भिन्न संस्था आहेत. त्यांची वैशिष्ट्ये देखील भिन्न स्वरुपाची असून भिन्न पद्धतीने विकसित झालेली आहेत. राज्य एक राजकीय आणि भूक्षेत्रीय एकेक आहे. तर राष्ट्र हे ऐतिहासिक आणि सार्वभौमत्व यांचा राज्यास समानार्थी अथवा पर्यायी मानले जाते. तथापि राष्ट्र आणि राज्य या विभिन्न प्रकारच्या संकल्पना आहेत.

## ७.८ प्रश्न

१) राष्ट्र –राज्यांची संकल्पना सांगून वैशिष्ट्ये सांगा.

२) फ्रान्स व इंग्लंड मधील राष्ट्र राज्यांचा आढावा घ्या.

**आपली प्रगती तपासा :**

१) राष्ट्र-राज्य संकल्पनेची वैशिष्ट्ये सांगा?

❖❖❖❖

# ८

# इटली व जर्मनी मधील राष्ट्रवादी चळवळी

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टे
८.१ प्रस्तावना
८.२ इटलीमधील राष्ट्रवादी चळवळी
८.३ इटालियन एकीकरणाच्या समस्या
८.४ इटालीच्या एकीकरणातील प्रमुख टप्पे
८.५ इटालीच्या एकीकरणातील प्रमुख नेते
८.६ इटली एकीकरणाचे महत्त्व
८.७ जर्मनीमधील राष्ट्रवादी चळवळी
८.८ सारांश
८.९ प्रश्न

## ८.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस
१) इटालीची पार्श्वभूमी आणि नेपोलियनची कारकीर्द याची माहिती.
२) इटालीची एकीकरणातील विविध टप्प्यांची माहिती.
३) प्रमुख नेत्यांची माहिती.
४) जर्मनी एकीकरणाची पार्श्वभूमी व समस्या.
५) जर्मन एकीकरणाचे विविध टप्पे
६) जर्मनीचे एकीकरण आणि त्यामध्ये असणारे प्रमुख नेते यांची माहिती सांगणे.

## ८.१ प्रस्तावना

राष्ट्रवाद ही आधुनिक काळातील सर्वशक्तिमान चळवळ असून याच चळवळीतून आजच्या जगाची जडणघडण झाली. राष्ट्रवादातूनच ऐक्याची भावना अभिव्यक्त होते. ती एक मानवी मनाची आध्यात्मिक अवस्था आहे. आधुनिक जगात मानवतेचा कल विश्वराज्याच्या प्रस्थापनेचा आहे. विश्वराज्याची कल्पना मानवाच्या जास्तीत जास्त कल्याणासाठी सुचविण्यात आली. विश्वराज्याची कल्याणकारी योजना राष्ट्रवादाच्या प्रखर जाणिवेमुळे फलद्रुप होऊ शकत नाही. राष्ट्रवादाने मानवाच्या इतिहासामध्ये क्रांतिकारक



munotes.in

बदल केले. १८ व्या शतकात अमेरिकन, फ्रेंच राज्यक्रांती घडली तसेच १९ व्या शतकात इटली व जर्मनीचे एकीकरण हे राष्ट्रवादाचेच फलस्वरूप आहे.

इटली हे युरोपच्या दक्षिण भागात असलेले राष्ट्र उत्तरेकडे आल्प्स पर्वत आणि दक्षिणेकडे भूमध्य समुद्राने वेढलेल्या इटली हा निसर्गरम्य देश आहे. प्रबोधन काळात इटलीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. दोन महायुद्धांच्या दरम्यान इटलीत बेनिटो मुसोलिनी या हूकूमशहाची सत्ता होती. या काळात इटलीला युरोपच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान निर्माण झाले होते.

## ८.२ इटलीमधील राष्ट्रवादी चळवळी

### ८.२.१ इटलीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी :

इटली हे प्राचीन काळातील रोमन संस्कृती व रोमन साम्रज्याचे उगमस्थान आणि महत्त्वाचे केंद्र होते. रोमन साम्रज्याची वैभवशाली परंपरा इटलीला लाभलेली होती. काही काळ संपूर्ण युरोपवर रोमन साम्रज्याची सत्ता होती. तसेच युरोपच्या इतिहासात इटलीला महत्त्वाचे स्थान असण्याचे आणखी एक कारण म्हणजे ख्रिस्ती जगाचे मुख्य धर्मपीठ रोम येथे होते. प्रबोधनकाळात वाङ्मय, व्यापार, कला या क्षेत्रात इटलीची कामगिरी अत्यंत महत्त्वाची होती. प्राचीन काळापासून इटलीच्या नगर राज्यात प्रजासत्ताक पद्धती होती. परंतु प्राचीन युगाच्या अखेरीस रोमन साम्रज्याचे विघटन झाले व अनेक छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. रोमन साम्रज्याच्या ऱ्हासानंतर मात्र इटलीचे राजकीय महत्त्व संपुष्टात आले. राजकीय ऐक्याच्या अभावामुळे इटलीत छोटी छोटी राज्ये तयार झाली. यानंतर १५ व्या शतकात प्रबोधनकाळात इटलीने व्यापार, उद्योग, वाङ्मय, शास्त्र या क्षेत्रात भरीव प्रगती केली. यानंतर एकीकरण अस्तित्वात येईपर्यंत इटलीत कोणतीही प्रगती घडून आलेली नव्हती.

**१) नेपोलियनची कारकीर्द :**

इ.स. १७९७ मध्ये नेपोलियनने इटलीचा बराचसा भाग जिंकून घेतला. ताब्यात घेतलेला प्रदेश शासनाच्या सोयीसाठी त्याने एकत्र केला. त्यामुळे इटालियन जनतेला राष्ट्रीय ऐक्याचा अनुभव आपोआप मिळाला. नेपोलियनच्या राजवटीमुळे रूढी, भाषा, वाङ्मय हे घटक एकीकरणात पायाभूत ठरु शकतील असे इटालियन जनतेला वाटू लागले. नेपोलियनमुळे इटालियन लोकांना स्वातंत्र्य, राष्ट्रवाद आणि लोकशाही या तत्त्वांची प्रेरणा मिळाली. नेपल्सच्या फ्रेंच राजाने संपूर्ण इटलीच्या एकीकरणाचे प्रयत्न केले होते; परंतु नेपोलियनने त्याचा पराभव केल्यामुळे ते प्रयत्न फसले होते.

**२) व्हिएन्ना परिषद आणि इटली :**

व्हिएन्ना परिषदेच्या प्रतिगामी धोरणामुळे इटालियन लोकांच्या राष्ट्रवादी आकांक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. या परिषदेने इटलीच्या राष्ट्रवाद मारण्यासाठी इटलीचे छोटे छोटे तुकडे केले. मेटर्निकने काही भाग स्वत:कडे (ऑस्ट्रिया) घेतले आणि काही भाग आपल्या अंकीत राज्याच्या ताब्यात दिले. मेटर्निकच्या धोरणाकडे इटलीला विघटनाबरोबरच

munotes.in

पारतंत्र्यालाही तोंड देण्याची वेळ आली. इटलीच्या एकीकरणाला विरोध करण्याची प्रमुख भूमिका इथे मेटर्निक (ऑस्ट्रिया) आणि पोप यांनी बजावली. या अडथळ्यांबरोबरच सर्व संस्थानाचे प्रतिगामी स्वरूपाचे धोरण हाही एक प्रमुख अडथळा एकीकरणास होता.

**३) रिसॉर्जिमेंटो :**

मेटर्निकच्या दडपशाहीमुळे इटालियन राष्ट्रीय भावना नष्ट होण्याऐवजी उफाळून वर आली. इटालीचा सुप्त राष्ट्रभिमान, एकतेची भावना व संस्कृतीचा अभिमान पुन:प्रज्वलित करण्यासाठी साहित्य, कला, वक्तव्य, संघटन इ. मार्गांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून अनेक प्रयत्न सुरु झाले होते. या विविध प्रयत्नांनाच समुच्चयाने रिसॉर्जिमेंटो असे म्हटले जात होते. इटलीच्या अस्मितेची पुनर्स्थापना करण्यासाठी ही प्रक्रिया सुरु झाली होती. या चळवळीमुळे लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. अंधश्रद्धेकडून लोक शास्त्रीय विचारांकडे वळले. रोमन साम्रज्य, डान्टेच्या कविता, प्रबोधन काळातील इटलीतील कला, विज्ञान यांचा इतिहास पुन्हा सजीव होऊ लागला.

राष्ट्रवाद, सौंदर्यवाद, औद्योगिक अर्थवाद या तीन भागांत रिसॉर्जिमेंटोचे तत्त्वज्ञान विभागले होते. अँटोनिओ जीनोव्हेसी, जोसेफ पॅरिनी, जी, कार्लो, व्ही. अल्फेरी या विचारवंतांनी भूतकालीन इतिहास जागृत करुन इटलीला राष्ट्रवादी प्रेरणा दिली. जोसेफ परिनीने पोपच्या दुटप्पी वागण्यावर प्रखर टीका केली. पोप हाच इटलीची राष्ट्रीय वृत्ती दडपण्यास आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेण्यास जबाबदार आहे, असे त्याचे मत होते. समाजाची प्रगती किंवा अध:पतन ही केवळ सरकारवर अवलंबून असते, असे त्याचे मत होते. प्रादेशिक विभाजनाच्या विरोधी जी. कार्लो ची मते होती. त्यांच्या मते, इटलीतील माणसे या प्रादेशिक विभाजनामुळे एकमेकांना परकी असल्यासारखी आहेत. इटालियनच्या नेमक्या दोषांवर बोट ठेवून प्रादेशिक विभाजन नष्ट करण्याचे आवाहन त्याने केले होते.

सरदार घराण्यात जन्मलेल्या व्ही. अल्फेरी या विचारवंताने फ्रेंच राज्यक्रांतीला पाठिंबा दिला होता. इटालियन संस्कृतीबद्दल त्याला प्रचंड अभिमान होता. संस्कृती काळातले वैभव इटलीला पुन्हा प्राप्त व्हायला पाहिजे असे त्याला वाटत असे. तो म्हणत असे की, ज्याप्रमाणे प्रबोधन काळात इटलीत सांस्कृतिक पुनरुज्जीवन झाले तसेच राजकीय पुनरुज्जीवनही होईल आणि पुन्हा इटली एक राजकीय शक्ती म्हणून पुढे येईल.

**४) इ.स. १८३० आणि १८४८ च्या राष्ट्रवादी चळवळी :**

प्रत्यक्ष एकीकरणापूर्वी इटलीत काही राष्ट्रवादी आणि उदारमतवादी चळवळी झाल्या. होत्या; परंतु ऑस्ट्रियाच्या दडपशाहीने या चळवळींना अपयश आले होते. इ.स. १८२० मध्ये काबेनिरी या संघटनेने नेपल्समध्ये उठाव केला. स्वत:ची घटना आणवली पण मेटर्निकने ती घटना रद्द केली व उठाव दडपला. इ.स. १८३० मध्ये फ्रान्समध्ये क्रांती झाल्यावर इटलीत पोपच्या राज्यातही ठिकठिकाणी बंडे होऊ लागली. परंतु ऑस्ट्रिया आणि फ्रान्सच्या सैन्याने ही बंडे मोडून काढली.

munotes.in

इ.स. १८४८ मध्ये फ्रान्समध्ये पुन्हा क्रांती झाली. या क्रांतीने पडसाद त्वरित इटलीत उमटले. पिडमाँट, सार्डिनिया, पोपची राज्ये येथे लोकनियुक्त सरकारे आली. अनेक राजे इटलीचे वर्चस्व झुगारुन द्यायला तयार होती. परंतु ऑस्ट्रियाने या राज्यातील बंडाळी मोडून तेथे पुन्हा अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) इटालीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी सांगा.

## ८.३ इटालियन एकीकरणाच्या समस्या

१) इटलीत अनेक छोटी छोटी संस्थाने होती, ती सहजतेने एकीकरणात सहभागी होणार नव्हती.

२) इटलीचे व्हेनिस आणि लोंबार्डी हे प्रांत ऑस्ट्रियात होते. तसेच इटलीच्या अनेक प्रांतावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व होते. प्रबळ ऑस्ट्रियाची इटलीच्या मार्गातून हकालपट्टी कशी करायची हा मोठा प्रश्न होता.

३) रोम हे पोपचे संस्थान होते. पोपचे राज्य सहज हाती येणार नाही. पोपच्या राज्याला धक्का लावायचा म्हणजे कॅथॉलिक प्रजेचा रोष पत्करावा लागणार.

४) व्हेनिस, लोंबार्डी येथे ऑस्ट्रियाचे गुप्त पोलीस मोठ्या प्रमाणावर असल्याने अंतर्गत कारभार होती असूनही काही उपयोग नव्हता.

अशा सर्व एकापेक्षा एक जटिल समस्या इटलीच्या एकीकरणापुढे होत्या.

## ८.४ इटालीच्या एकीकरणातील प्रमुख टप्पे

**एकीकरणाचे टप्पे :**

इटलीच्या एकीकरणास सुरुवात करण्यापूर्वी पिडमाँट सार्डिनियाचे संस्थान आदर्श बनवणे आवश्यक आहे याची काव्हूरला जाणीव होती. काव्हूरने मुख्यमंत्री होताच त्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. त्याने क्रांतीकारी सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. राज्यातील प्रजा ही अंधश्रद्ध असल्याने धर्माचा मोठा पगडा प्रजेवर असल्याने, प्रत्येक सुधारणांना धर्मगुरुंचा होणारा विरोध लक्षात घेऊन त्याने प्रथम धर्मगुरुंच्याच अधिकारांवर मर्यादा घातल्या. व्यापार, उद्योग, शेती यांच्या विकासास चालना दिली. दळणवळण



munotes.in

वाढवले, राज्याराज्यात संबंध वाढवले, सैन्याची पुनर्रचना केली आणि अल्पावधीत सार्डिनियाला एक आदर्श आणि बलाढ्य संस्थान म्हणून नावलौकिक मिळवला आणि सार्या इटलीचे लक्ष वेधून घेतले.

### ८.४.१ क्रिमियन युद्धात इटालीची मदत :

ऑस्ट्रियाच्या विरोधात काव्हूरला परकीय मदत असावी असे वाटत होते. इ.स. १८५३ मध्ये इंग्लंड व फ्रान्स विरुद्ध रशिया असे क्रिमियन युद्ध सुरु झाले. इटलीचा युद्धाशी काहीही संबंध नसताना काव्हूरने पिडमाँट सार्डिनियाचे सैन्य इंग्लंड, फ्रान्सच्या मदतीला पाठवले. याचा अपेक्षित परिणाम झाला आणि युद्धानंतर पॅरिस येथे भरलेल्या शांतता परिषदेस काव्हूरला बोलावले. तेथे काव्हूरने इटलीच्या एकीकरणास इंग्लंड आणि फ्रान्स यांची नैतिक मान्यता घेतली. इतकेच नव्हे तर काव्हूरने मुत्सद्दीपणाने इ.स. १८५८ मध्ये फ्रान्सशी प्लॉम्बिअर्स येथे गुप्त मैत्री करार केला. लुई नेपोलियनने एकीकरणास मान्यता दिली आणि जर ऑस्ट्रियाने प्रथम आक्रमण केले तर मदतीचे आश्वासन दिले.

### ८.४.२ ऑस्ट्रियाशी युद्ध :

शस्त्रास्त्रे वाढवून, ऑस्ट्रियन सीमेवर तंटे घडवून आणि ऑस्ट्रियाविरुद्ध प्रचार करुन काव्हूरने शेवटी ऑस्ट्रियाला युद्ध पुरारायला लावले. करारान्वये फ्रान्स मदतीस उतरला. ऑस्ट्रियाचा पराभव झाला. तशी प्रशियाने हालचालीस सुरुवात केली. प्रशया ऑस्ट्रियाच्या मदतीस आपला पराभव होईल तसेच इटलीचे एकीकरण झाल्यास तो बलाढ्य देश होईल या भीतीने त्याने (लुई नेपोलियनने) माघार घेतली आणि ऑस्ट्रियन सम्राटाशी काव्हूरला न विचारता युद्धबंदी घोषित करुन तह केला. तो व्हिलाप्रॅंकाचा तह काव्हूरने या विश्वासघाताने राजीनामा दिला. त्यापूर्वी त्याने फ्रान्सची मदत बंद झाल्याने ऑस्ट्रियाविरुद्धचे युद्ध थांबवले आणि पयुरीच येथे ऑस्ट्रियाशी तह केला.

### ८.४.३ मध्य इटलीतील संस्थाने :

मध्य इटलीतील पार्मा, मोदेना, टस्कनी, रोमॅम्नो इ. संस्थांनामधील जनता पयुरीच आणि व्हिलाप्रॅंका तहानी प्रक्षुब्ध झाली. कारण या तहान्वये वरच्या सर्व संस्थानांच्या राज्यकर्त्यांना गादी द्यायची होती. ज्या राज्यकर्त्यांना जनतेने उठाव करुन बाजूला केले होते त्यांना पुन्हा राजपद द्यायला प्रजा तयार नव्हती. सर्व राज्ये पिडमाँट, सार्डिनियात सामील व्हावीत असे प्रजेला वाटत होते. इंग्लंडने या राज्यांच्या स्वयंनिर्णयाला पाठिंबा दिला. परिणामी वरील सर्व संस्थाने संघराज्यात सामील झाली.




### ८.४.४ दक्षिण इटलीतील संस्थाने :

दक्षिणेतील नेपल्स व सिसिलीमध्येही युद्ध काळात स्वातंत्र्य व ऐक्य या मागणीने जोर धरला होता. प्रजेने उठाव केला. काव्हूरच्या गुप्त पाठिंब्याने गॅरिबाल्डीने सिसिलीचा कारभार हाती घेतला आणि नेपल्सवर हल्ला केला. नेपल्सच्या राजाला पळवून लावून सर्व सूत्रे व्हिक्टर इमॅन्युअलच्या हाती दिली.

### ८.४.५ रोम आणि व्हेनेशिया :

इटलीच्या एकीकरणात आता फक्त दोनच अडथळे राहिले होते. इ.स. १८६६ जर्मन एकीकरणाच्या संदर्भात ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात युद्ध उद्भवले. ऑस्ट्रियाला एकाकी पाडण्यासाठी बिस्मार्कने व्हिक्टर इमॅन्युअलशी व्हेनेशिया देण्याच्या बदल्यात मैत्री करार केला. बिस्मार्कने युद्ध जिंकले आणि कराराप्रमाणे व्हेनेशिया इटलीला दिला.

फक्त रोम इटलीत समाविष्ट होण्याचे राहिले होते. इ.स. १८७० मध्ये जर्मन एकीकरणाच्या संदर्भात फ्रान्स व प्रशिया यांच्यात युद्ध सुरु झाले. लुई नेपोलियनने रोमच्या रक्षणासाठी असणारी फौज काढून घेतली. व्हिक्टर इमॅन्युअलने ही सुवर्णसंधी साधली आणि रोम जिंकले. इटलीची राजधानी रोमला हलवली आणि या मार्गाने इटलीचे एकीकरण पूर्ण झाले.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) इटालीच्या एकीकरणातील महत्त्वाचे टप्पे सांगा.

## ८.५ इटालीच्या एकीकरणातील प्रमुख नेते

### ८.५.१ जोसेफ मॅझिनी (१८०५ ते १८७२) :

मॅझिनी हा इटालियन एकीकरणाचा प्रणेता होय. त्याचा जन्म १८०५ मध्ये जिनेव्हा येथे झाला. त्याचे वडील क्रांतिकारक होते. वडिलांपासून क्रांतीचे बाळकडू त्यास मिळाले. मॅझिनी हा रिसॉर्जिमेंटोमधला एक विचारवंत, साहित्यिक होता. कवी वृत्तीच्या आणि भावनाप्रधान मनाच्या मॅझिनीला इटलीचे पारतंत्र्य, विघटन, प्रजेचे दारिद्र्य खटकत होते. परिणामी त्याने आपले जीवन स्वतंत्र, एकसंध व प्रजासत्ताक इटलीच्या निर्मितीसाठी वाहण्याचा निश्चय केला. या वेळी इटलीत कार्बोनेरी (निखारे) नावाची गुप्त संघटना राष्ट्रीय भावना वाढवण्याचे कार्य करत होती. मॅझिनी या संघटनेचा सदस्य झाला. या संघटनेची आततायी कृत्ये आणि नकारात्मक कार्यक्रम त्याला न पटल्याने त्याने या संघटनेचा राजीनामा दिला. इ.स. १८३१ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतीपासून स्फूर्ती घेऊन त्याने यंग इटली नावाची गुप्त संघटना स्थापन केली. या संघटनेत युवकांचाच भरणा होता. मॅझिनीला असा विश्वास वाटत होता की, युवकशक्तीचे इटलीला स्वातंत्र्य मिळवून देईल. या संघटनेला इटलीच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कारण एकीकरणात या संघटनेचा वाटा सिंहाचा होता. या संघटनेचे उद्देश खालीलप्रमाणे होत -

१) इटली हा इटालियनांसाठीच आहे. ऑस्ट्रियाची येथून हकालपट्टी करणे.
२) पारतंत्र्य घालवणे तसेच इटलीचे एकीकरण साधणे.
३) प्रजासत्ताकाची स्थापना करणे.
४) पोपची राज्यव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न करणे.

या संघटनेने केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे इटलीत जागृती घडवून आणली. इटलीच्या एकीकरणासाठी फक्त विचार पुरेसे नाहीत हे ओळखून त्याने यंग इटली या संघटनेद्वारे तरुणांची एक सेना उभी केली.

इ.स. १८४८ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या तिसर्या क्रांतीचा प्रभाव इटलीवरही पडला. मॅझिनीने या काळात गॅरिबाल्डीच्या मदतीने रोमवर स्वारी केली आणि प्रजासत्ताकाची स्थापना केली. यावेळी फ्रान्समध्ये लुई नेपोलियन सत्तेवर आला होता.

munotes.in

त्याने फ्रान्समधील कॅथॉलिक पक्षाचा विश्वास संपादन करण्यासाठी पोपच्या रक्षणार्थ रोमला सैन्य पाठवले. मॅझिनी देश सोडून इंग्लंडला गेला. इटलीचे एकीकरण मॅझिनीला अपेक्षित मार्गाने न झाल्याने तो एकीकरणापासून अल्पित राहिला. परंतु त्याचे विचार मात्र एकीकरणाची भावना जनमानसात वाढवण्यास पोषक ठरते.

### ८.५.२ गॅरिबाल्डी (इ.स. १८०७ - १८८२) :

गॅरिबाल्डीचा जन्म १८०७ मध्ये नाईस प्रांतात झाला होता. मॅझिनीचा मोठा प्रभाव त्याच्यावर होता. यंग इटलीमध्ये कार्यरत होता. शेवटी तो यंग इटलीचा प्रमुख झाला. लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या प्रभावाने तो भारावून गेला होता. इ.स. १८३४ मध्ये सेव्हॉय येथे झालेल्या बंडात त्याने भाग घेतला परंतु बंड अयशस्वी झाल्यामुळे त्याला देशत्याग करावा लागला. त्याने दक्षिण अमेरिकेत पलायन केले. परंतु त्याने इटलीच्या स्वातंत्र्याचा आणि एकीकरणाचा ध्यास सोडला नाही. तेथे त्यांनी लाल डगलेवाल्यांची सेना उभारली. दक्षिण अमेरिकेत त्याने तेथील यादवी युद्धातही भाग घेतला. इ.स. १८४८ मध्ये राष्ट्रवादी उठाव सुरु झाले. गॅरिबाल्डी ससैन्य इटलीत आला. मॅझिनीच्या मदतीने त्याने रोमवर आक्रमण करुन रोमची सत्ता काबीज केली आणि तेथे प्रजासत्ताक स्थापन केले. परंतु हे प्रजासत्ताक अधिक काळ टिकू शकले नाही. पुढे पिडमाँट सार्डिनियाच्या नेतृत्वाखाली जो एकीकरणाचा लढा सुरु झाला त्यास गॅरिबाल्डीचा पाठिंबा होता. नेपल्स आणि सिसिलीमधील प्रजा अनियंत्रित राजेशाहीला कंटाळली होती आणि सार्डिनिया पिडमाँटमध्ये सामील होण्याचे स्वप्न पाहात होती. त्यांनी गॅरिबाल्डीची मदत मागितली. गॅरिबाल्डी स्वत:च्या लाल डगलेवाल्यांच्या सेनेसह सिसिली व नेपल्सवर चालून गेला. सिसिली व नेपल्स त्याने सहजतेने जिंकले आणि तो रोमवर चालून गेला. रोम जिंकल्यावरच सिसिली व नेपल्स पिडमाँटला जोडले जाईल असे त्याने जाहीर केले. हे पाहून काव्हूर गोंधळून गेला. रोम जिंकण्याचा ताबडतोब प्रयत्न केल्यास फ्रान्सचा राग ओढवेल आणि गॅरिबाल्डी स्वतंत्र राज्य स्थापन करेल की काय असे काव्हूरला वाटू लागले. परंतु गॅरिबाल्डी अत्यंत निष्ठावान व थोर मनाचा होता. त्याने सिसीली व नेपल्स व्हिक्टर इमॅन्युअलला बहाल केले आणि स्वत: राजकारणातून निवृत्त झाला. गॅरिबाल्डीस व्हिक्टर इमॅन्युअलने अनेक मानाच्या जागा देऊ केल्या पण त्याने आदरपूर्वक त्या नाकारल्या आणि निवृत्ती स्विकारली.

### ८.५.३ काऊंट कॅमिलो डी काव्हूर (इ.स. १८९० - १८६९) :

काव्हूरचा जन्म पिडमॉटमध्ये एका उमराव घराण्यात १८९० मध्ये झाला होता. प्रथम तो सैन्यात नोकरी करत होता. नंतर ती नोकरी सोडून त्याने शेती व्यवसाय सुरु केला. प्रथम मंत्री व नंतर पिडमॉटचा मुख्यमंत्री झाला. त्याचा युरोपियन राजकारणाचा सखोल अभ्यास होता. तसेच प्रत्यक्ष राजकारणाशी संबंध असल्याने इटलीच्या एकीकरणाबाबत त्याचे विचार वास्तववादी होते. तर मॅझिनीचा दृष्टिकोन हा अत्यंत आदर्शवादी होता. अर्थातच एकीकरणाबाबत दोघांचे मार्ग भिन्न असल्याने त्यांच्यात मतभेद झाले. मॅझिनीला काव्हूर हा इटलीच्या स्वातंत्र्याचा आणि एकीकरणाचा शत्रू वाटत असेट इटलीचे एकीकरण हे फक्त एकट्या इटलीच्या बळावर होऊ शकते ही मॅझिनीची कल्पना काव्हूरला मान्य नव्हती. त्यासाठी त्याने प्रजासत्ताकाचा मार्ग सोडून पिडमाँटचे नेतृत्व स्वीकारले. त्याच्या कुशल संघटन कौशल्यामुळे मॅझिनीचा राष्ट्रवाद आणि गॅरिबाल्डीचे

चैतन्य यांचा मिलाफ घडून आला आणि ध्येयवादाला व्यवहाराची जोड मिळाली. एकीकरण झालेले पाहण्यास मात्र काव्हूर नव्हता.

**८.५.४ व्हिक्टर इमॅन्युअल :**

इटालियन राष्ट्रवादाला दृश्यस्वरूप देणारा पिडमाँट सार्डिनियाचा राजा. इटलीचे स्वातंत्र्य आणि इटालियन राष्ट्रवादाच्या विकासासाठी त्याने आपल्या सत्तेचा वापर केला. काव्हूरला सतत मदत करुन आपले संस्थान आदर्श बनवण्याचा प्रयत्न केला. एकीकरणाचा पुरस्कर्ता व एकीकरण घडवणारा असा देशभक्त राजा. एकीकरणातील व्हिक्टर इमॅन्युअलचे स्थान असाधारण आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) इटालीच्या एकीकरणातील जोसेफ मॅझिनी माहिती द्या.

## ८.६ इटली एकीकरणाचे महत्त्व

राष्ट्रवादी भावनेचा विजय होऊन इ.स. १८७१ मध्ये एक स्वतंत्र आणि बळकट राष्ट्र इटलीच्या रूपाने जन्मले. प्रखर राष्ट्रवादाने इटली युरोपातील दखलपात्र राष्ट्र बनले. इटलीच्या निर्मितीने व्हिएन्ना परिषदेची व्यवस्था संपूर्णपणे नष्ट झाली. मॅझिनी, गॅरिबाल्डी, इमॅन्युअल यांच्या कार्यामुळे इटलीत संसदीय शासनव्यवस्था निर्माण झाली. उदारमतवाद वाढीस लागला. इटलीच्या निर्मितीने नवे सत्तासंतुलन निर्माण झाले. ऑस्ट्रियाचे महत्त्व कमी झाले. इटली साम्रज्यवादाच्या स्पर्धेतही इतर स्पर्धकांच्या बरोबरीने वाटचाल करु लागले.

## ८.७ जर्मनीमधील राष्ट्रवादी चळवळी

पवित्र रोमन साम्रज्याचे विभाजन होऊन लहान-मोठी संस्थाने अशा स्वरूपात ते टिकून होते. १८ व्या शतकाच्या शेवटी जर्मनवंशीय, जर्मन भाषा बोलणारे लोक ३०० पेक्षा अधिक लहानमोठ्या संस्थांनात विभागलेले होते. या ३०० संस्थांनात ऑस्ट्रिया आणि प्रशिया ही प्रबळ राज्ये होती. इ.स. ८०० मध्ये शार्लमेन या राजाने स्वबळावर प्रचंड साम्रज्य निर्माण केले आणि त्याने या राज्याला पोपचा आशिर्वाद घेतला. पोपने (शार्लमेन) या फ्रान्सच्या राजाला स्वत: मुकुट बहाल केला आणि त्याच्या राज्याला 'पवित्र रोमन साम्रज्य' हा बहुमान दिला. तेव्हापासू हे राज्य 'पवित्र रोमन साम्रज्य' म्हणून ओळखले

जाऊ लागले. शार्लमेननंतर हे साम्रज्य नष्ट झाले. पोपच्या कृपेने या नष्ट झालेल्या साम्रज्याच्या सम्रटपदावर जर्मन राजांना बसवण्यात येऊ लागले. त्यामुळे ऑस्ट्रियाच्या राजाल 'पवित्र रोमन राज्याचा सम्राट' असा किताब होता. तसेच या किताबाप्रमाणे ३०० संस्थानात ऑस्ट्रिया प्रबळही होते आणि त्याचा विस्तारही मोठा होता. ऑस्ट्रियानंतर प्रशियाचे राज्य प्रबळ होते. आज जो प्रदेश जर्मन राष्ट्र म्हणून ओळखला जातो तो प्रदेश एकीकरणापूर्वी बव्हेरिया, फ्रँकोनिया, सॅक्सनी, स्वाबिया व लोरेन या पाच राज्यांमध्ये विभागला होता. पूर्वी हा विस्कळीत असा राज्यसंघ होता. इ.स. ९१९ मध्ये सॅक्सनीचा ड्यूक हेन्रीने जर्मनीवर सत्ता स्थापन केली आणि जर्मन एकीकरणाचा पाया घातला. त्याच्यानंतर राज्यावर आलेल्या ओटीने जर्मन राष्ट्र प्रबळ केले. इ.स. ९६२ मध्ये पोपने ओटोने 'पवित्र रोमन सम्राट' हा किताब बहाल केला. या पवित्र रोमन साम्रज्य कल्पनेमुळे जर्मनीच्या एकीकरणाची कल्पना आपोआप मागे पडली परंतु १९ व्या शतकात मात्र या कल्पनेने पुन्हा वेग धारण केला आणि १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अखेर जर्मनीचे एकीकरण साकार झाले.

### ८.७.१ जर्मन एकीकरणाच्या समस्या :

१) जर्मनीत अनेक सार्वभौम संस्थाने होती. ही सर्व संस्थाने सहजपणे एकीकरणास मान्यता द्यायला तयार नव्हती. संस्थानांचे राजे आपली अनियंत्रित सत्ता जाऊ नये म्हणून एकीकरणास विरोध करत होते.

२) जर्मन राज्यसंघात इंग्लंडच्या ताब्यातील व्हॅनोव्हर आणि डेन्मार्कच्या ताब्यातील हॉल्सिटन याचाही समावेश होता. या दोन्ही स्वतंत्र भूप्रदेशांचा एकीकरणास विरोध होता.

३) जर्मन प्रदेशात ऑस्ट्रिया हा एकीकरणाचा शत्रू अत्यंत प्रबळ होता. जर्मनीच्या राज्यसंघावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व असल्याने एकीकरणासाठी ऑस्ट्रियालाच नमवणे जरूरीचे होते; परंतु ऑस्ट्रिया बलवान असल्याने तसे करणे प्रशियाला शक्य नव्हते.

४) फ्रॅंकफर्ट पार्लमेंट निर्माण करुन मेटर्निकने एकीकरणाचे सर्वच मार्ग बंद करुन टाकले होते.

अशा परिस्थितीत प्रशियात फ्रेडरिक विल्यम चौथा गादीवर आला तो उदारमतवादी असल्याने एकीकरणासाठी फ्रेडरिकची मदत होईल, अशी अपेक्षा जर्मन जनतेची होती. परंतु फ्रेडरिकवर असलेल्या मेटर्निक प्रभावामुळे या कार्यात त्याची जनतेला पर्यायाने एकीकरणाला मदत होऊ शकली नाही. या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन मेटर्निक व ऑस्ट्रिया यांना बाजूला करुन जर्मनीला अंतिम ध्येयापर्यंत, एकीकरणापर्यंत नेण्याचे महान कार्य प्रिन्स ऑटो व्हान बिस्मार्क या सामर्थ्यवान, धुरंदर मुत्सद्याने पार पाडले.

### ८.७.२ जर्मनीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी :

नेपोलियनच्या आक्रमणामुळे जर्मनीत ऐक्याचे महत्त्व उमगले आणि तेथे राष्ट्रवादी भावना वाढीस लागल्या. सुशिक्षित जर्मन तरुणांनीही राष्ट्रवाद जनतेत निर्माण करण्याचे कर्म कठीण काम केले. जर्मन विचारवंतांनी राष्ट्रीय जागृती निर्माण होण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. विचारवंतांमध्ये फिश्ते या विचारवंतांचे कार्य महत्त्वाचे ठरते.

**१) जेना विद्यापीठ :**

ऑस्ट्रिया आणि मेटर्निकने जरी प्रतिकूल मार्ग वापरुन एकीकरणास अडथळे आणलेले असले तरी एकीकरणाच्या ध्येयाने प्रेरित झालेले जर्मन राष्ट्रभक्त नवीन मार्ग शोधू लागले. जर्मनीतील सर्व संस्थांनामध्ये ऑस्ट्रिया आणि मेटर्निक यांच्या प्रभावाने राष्ट्रवादी, एकीकरणवादी यांच्यावर गुप्तपणे लक्ष ठेवलेले होते. अशा परिस्थितीत एकीकरणाची भावना वाढण्याचे कार्य जेना विद्यापीठाने मोठ्या प्रमाणात केले. जेना विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थी राष्ट्रप्रेमाने भारावलेले होते. जर्मनीचे एकीकरण व्हावे हे त्यांचे ध्येय होते. एकीकरणास लोकमत अनुकूल करण्यावर त्यांनी भर दिला. ही वैचारिक चळवळ हळूहळू जर्मनीतील सर्वच्या सर्व विद्यापीठांमध्ये पसरली आणि संपूर्ण जर्मन प्रदेशात एकीकरणास मत अनुकूल होण्यास मदत झाली.

**२) मेटर्निकचा राष्ट्रवाद्यांना विरोध :**

अर्मन संस्थानात वाढत असणारा राष्ट्रवाद आणि एकीकरणाची भावना पाहून ऑस्ट्रियाचा राष्ट्रवाद विरोधी चॅन्सेलर मेटर्निक हवालदील होऊन गेला. या पुरोगामी चळवळींचा धोका ऑस्ट्रियाला पोहोचू नये यासाठी मेटर्निकने त्वरित प्रयत्न सुरु केले. मेटर्निकने सर्व जर्मन संस्थानांच्या प्रतिनिधींना 'कार्लसबॅड' येथे बोलावले आणि चळवळ दडपण्याचा दृष्टीने जहाल प्रयत्न सुरु केले. मेटर्निकने कालसबॅड येथे जर्मन संस्थानातील राष्ट्रवादी व उदारमतवादी चळवळी दडपण्यासाठी अनेक अन्यायकारक ठराव मंजुर केले ते पुढीलप्रमाणे -

१) जर्मन प्रदेशातील शाळा, विद्यापीठे सरकारी नियंत्रणाखाली आणली गेली.
२) प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या हालचालींवर बंधने घातली गेली.
३) विद्यापीठ प्रकाशनांवर कडक निर्बंध लादण्यात आले.

राजसत्तेविरुद्ध कट कारस्थाने होऊ नयेत म्हणून संपूर्ण जर्मन संस्थानांमध्ये दक्षता समित्या स्थापन केल्या गेल्या. या सर्व ठरावांचे इ.स. १८२४ च्या कायद्यात रूपांतर करुन मेटर्निकने जर्मन राज्यसंघावरचे नियंत्रण अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला.

**३) जकात संघटना - झॉलफेरिन :**

जर्मन संस्थानांमध्ये चलन, जकातदर, व्यवसायकर, इतर कायदेकानून हे सर्व ठिकाणी वेगवेगळे होते. या कारणांमुळे व्यापारावर प्रतिकूल परिणाम होत होता. संस्थानांना अनेक वेगवेगळ्या कायद्यांमुळे अनेक प्रकारच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत असे. व्यापारासंदर्भात प्रशियाला अनेक प्रकारांनी झळ पोहोचत असे. करांच्या प्रमाणामुळे आयात-निर्यात चोरट्या मार्गाने होत असे. सरकारलाच हा फटका सहन करावा लागत असे. या सर्व किचकट गोष्टींवर उपाय म्हणून एका प्रशियन मंत्र्याने प्रशियन प्रदेशात खुल्या व्यापाराचे तत्त्व स्विकारले. सर्व प्रकारच्या व्यापारावरील जकाती रद्द करण्यात आल्या. प्रशियाने सरहद्दवर असणार्या २८ संस्थानांशी व्यापारी, आर्थिक वाटाघाटी करुन खुल्या व्यापाराचे तत्त्व त्यांनाही स्विकारायला लावले. यामुळे आर्थिक दृष्टीने का होईना या २८ संस्थानांमध्ये ऐक्य निर्माण झाले. सभासद संस्थाने वगळता इतर प्रदेशांशी जर व्यापार केला तर आयात-निर्यातीवर जकात स्वीकारली जात असे. हे जकात उत्पन्न सर्व सभासद संस्थानामध्ये विशिष्ट प्रमाणात वाटले जात असे. हे कार्य करणारी संघटना म्हणजेच जकात

संघटना किंवा झॉलिफेरिन होय. प्रशियाच्या नेतृत्वाखाली इ.स. १८४२ मध्ये सर्व जकात संघटना एकत्र आल्या आणि व्यापाराच्या सोयीसाठी या संघटनांनी देशभरातील सर्व ठिकाणे जोडली जातील असे रस्ते, लोहमार्ग, कालवे बांधले. या संघटनांचा हेतू आर्थिक असल्याने ऑस्ट्रियाला त्यापासून काहीही धोका नाही म्हणून मेटर्निकने या जकात संघटनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले होते. असे असले तरी या जकात संघटनांच्या कार्यामुळे जर्मनीच्या एकीकरणास निश्चित अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली.

**४) इ.स. १८३० आणि १८४८ च्या राष्ट्रवादी चळवळी :**

इ.स. १८३० मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद संपूर्ण युरोपमध्ये उमटले आणि सर्वत्र राष्ट्रवादी चळवळींना वेग आला. जर्मनीतही या काळात राष्ट्रवादी चळवळींचा उद्रेक झाला. बर्तस्विक, व्हॅनोव्हर, सॅक्सनी या जर्मन सस्थानांत उठाव होऊन घटनात्मक राजवटीची मागणी केली गेली. सत्ताधारी राजांनीही जनतेचा असंतोष शमवण्यासाठी जनतेला काही अधिकार देऊ केलेही, परंतु मेटर्निकच्या अन्यायी, दडपशाहीच्या धोरणामुळे सर्व राज्यातील घटनात्मक चळवळी संपुष्टात आल्या.

इ.स. १८४० मध्ये प्रशियात फ्रेडरिक विल्यम चौथा याने जनतेला काही अधिकार बहाल केले. इ.स. १८४७ फ्रेडरिक विल्यम चौथा याने सर्व जर्मन संस्थानांच्या प्रतिनिधीना बोलावून 'प्रातिनिधिक परिषद' भरवली. या परिषदेला जमलेल्या प्रतिनिधींनी घटनात्मक राज्यपद्धतीचा पुरस्कार तर केलाच; परंतु त्याचबरोबर 'कार्लसबॅड' चे अन्यायी कायदे रद्द करण्याची मागणी केली. धार्मिक सहिष्णुता, लेखन, भाषण-स्वातंत्र्य, सामाजिक समता, लष्करी सुधारणा अशा अनेक मागण्या मांडल्या गेल्या. या परिषदेला प्रचंड यश मिळून अनेक जर्मन संस्थानांमध्ये घटनात्मक राज्यपद्धतीचा स्वीकार केला गेला. फ्रेडरिक विल्यम चौथा हा खरे तर घटनात्मक शासन देण्यास राजी नव्हता. पण जनमतापुढे त्याने अखेर आपला निर्णय बदलला. तो जर्मन संस्थानांचे नेतृत्व स्विकारण्यासाठी तयार झाला.

**५) प्रँाकफर्ट पार्लमेंट (मे १८४८ ते जून १८४९) :**

इ.स. १८४८ मध्ये फ्रान्समध्ये पुन्हा क्रांती होऊन तेथे प्रजासत्ताक राजवट सुरु झाली. या क्रांतीचे लोण युरोपात सर्वच पोहोचले. ऑस्ट्रियातही क्रांती पोहोचली आणि मेटर्निकची राजवट उद्धवस्त झाली. यापुढे जनमत दडपता येणार नाही याची जाणीव युरोपियन राज्यकर्त्यांना झाली.

प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने राष्ट्रीय संसद स्थापन करण्यासाठी मे १८४८ रोजी प्रँाकफर्ट येथे जर्मन संस्थानाच्या प्रतिनिधींची परिषद बोलावली. या परिषदेस जनतेच्या सर्व थरांतून आलेले विविध राज्यांचे सुमारे ५५० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत जर्म एकीकरणावर बरीच चर्चा झाली. ऑस्ट्रिया सोडून इतर सर्व संस्थाने ही एकीकरणाचा हिरीरिने पुरस्कार करणारी होती. या परिषदेने द्विगृही पार्लमेंटची स्थापना करुन संयुक्त जर्मनीचे राज्य स्थापन केले. फ्रेडरिक विल्यम चौथा याने संयुक्त जर्मनीचे राजपद स्वीकारावे असे परिषदेने ठरवले. परंतु फ्रेडरिक विल्यम चौथा याने राजपद नाकारले आणि प्रँाकफर्ट परिषदेवर बहिष्कार टाकला. येथेच प्रँाकफर्ट परिषदेचे एकीकरणाचे प्रयत्न अपयशी ठरले.

munotes.in

वास्तविक फ्रेडरिक विल्यम चौथा याला जर्मनीचे राजपद हवे होते आणि असे असूनही ते राजपद मिळत असतानाही त्याने नाकारले. कारण (१) पार्लमेंटने दिलेला राजमुकुट स्वीकारल्यास ईश्वरदत्त राजसत्तेला संकोच होईल असे त्यास वाटत होते. (२) संसदीय राज्यपद्धतीविषयी त्याच्या मनात आकस होता. (३) जर्मन राज्याचा मुकुट स्वीकारुन ऑस्ट्रियाशी वैर स्विकारण्याची त्याची तयारी नव्हती. या कारणांनी त्याने राजपद नाकारले. जून १८४९ ला फ्रॅंकफर्ट परिषद बरखास्त केली. या परिषदेने जर्मनांना दोन गोष्टींची जाणीव झाली. एक संसदीय पद्धतीने एकीकरण कधी साध्य होणार नाही. दोन ऑस्ट्रियाचा विरोध मोडल्याशिवाय एकीकरण होणे शक्य नाही.

**६) एरफोर्ट पार्लमेंट (इ.स. मार्च १८५०) :**

फ्रेडरिक विल्यम चौथा याला संयुक्त जर्मनी हवा होता. पण राजसत्तेवर कोणत्याही मर्यादा येणे त्याला मान्य नव्हते. संस्थानांनाही फ्रेडरिक विल्यमचे नेतृत्व मान्य होते, पण संस्थानिकांना आपले अधिकार गमवायचे नव्हते. फ्रेडरिक विल्यमने संयुक्त जर्मनीच्या स्थापनेसाठी व्हॅनिव्हर, सॅक्सनी, वुर्टम्बर्ग, बव्हेरिया या संस्थानांशी संपर्क साधला. रॅण्डो विझ या प्रशिय प्रधानाने ऑस्ट्रिया वगळून नव्या संयुक्त जर्मनीची राज्यघटना तयार केली. फ्रेडरिक विल्यम चौथा याने इ.स. मार्च १८५० मध्ये एरफार्ट येथे पार्लमेंट बोलावले. परंतु ऑस्ट्रियाचया दडपणाने परिषदेचा हेतूच बारगळला.

आता संयुक्त जर्मनी निर्माण करायचा असेल तर ऑस्ट्रियाला मार्गातून बाजूला काढला पाहिजे आणि ते काम फक्त प्रशिवाय करु शकतो याची जाणीव जर्मन संस्थानांना झाली.

**७) प्रशियाचे नेतृत्व :**

सर्व जर्मन संस्थानांमध्ये प्रशियाचे महत्त्व अनन्यसाधारण होते. पुरोगामी आचारविचार आणि सुधारणा राबवल्यामुळे प्रशियाचे महत्त्व आणखीनच वाढले होते. प्रशियाने लष्करी आणि शैक्षणिक बदल घडवून प्रबळता वाढवली. या सगळ्या पुरोगामी विचारांपुढे प्रतिगामी ऑस्ट्रिया अगदीच खुजा वाटत असल्याने संस्थानांही प्रशियाचे नेतृत्व मान्य केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) जर्मन एकीकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

### ८.७.३ जर्मनीचे एकीकरणातील विविध टप्पे :

इ.स. १८५७ मध्ये फ्रेडरिक विल्यम चौथा याचा बुद्धिभ्रंश झाल्याने त्याचा भाऊ विल्यम पहिला राज्याचा सूत्रधार बनला. इ.स. १८६१ मध्ये फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या मृत्यूनंतर विल्यम पहिला गादीवर बसला. जर्मन एकीकरणाविषयी त्यास आस्था होती. जर्मन एकीकरणात ऑस्ट्रिया हाच मुख्य अडथळा असून युद्धानेच हा अडथळा बाजूला करता येईल. असे त्याचे मत होते. राजपदावर येताच त्याने एकीकरणाच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. त्याने प्रशियाचे लष्करी बल वाढवायला सुरुवात केली. परंतु त्याला प्रशियन लँडटॅग या सभेने विरोध करायला सुरुवात केली. त्यामुळे विल्यम आणि लँडटॅक सभा यांच्यात सतत खटके उडू लागले. या संघर्षातून त्याला मार्ग दाखवला तो प्रिन्स ऑटो व्हान बिस्मार्कने.

**१) बिस्मार्कचे धोरण आणि एकीकरणास प्रारंभ :**

मुख्यमंत्री होताच बिस्मार्कने एकीकरणाच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. त्याने प्रशियाला प्रबळ बनवण्यास सुरुवात केली. क्रांतिकारी सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. प्रशियास लष्करसज्ज करण्यास सुरुवात केली. लोकप्रतिनिधींचा सर्व विरोध धाब्यावर बसवून लष्करी सुधारणा त्याने सुरु केल्या. युद्धाशिवाय कोणताही प्रश्न सुटत नाही असे बिस्मार्कचे मत होते. पार्लमेंटमधील पहिल्याच भाषणात बिस्मार्क म्हणतो, प्रशियाने आजवर कल्याणाच्या अनेक संधी दवडल्या, आता तसे करता काम नये. व्हिएन्ना परिषदेने ठरवलेल्या सरहद्दी प्रशियास तारण्यास योग्य नाहीत. म्हणून प्रशियाने लष्करी बळ वाढवले पाहिजे. कारण प्रश्न मोठमोठ्या भाषणांनी अथवा मतैक्याने सुटत नाहीत तर ते फक्त तलवारीच्या धारेने आणि रक्तपाताने सुटतात. जर्मन एकीकरण केवळ युद्ध आणि रक्तपात या मार्गानेच होईल अशी त्याला खात्री होती. त्यासाठी त्याने कणखर मार्ग स्विकारला आणि एकीकरण साध्य करुन दाखवले. तसेच जर्मनीला त्याने एक बलाढ्य राष्ट्रही बनवले.

**२) डेन्मार्कशी युद्ध (इ.स. १८६४) :**

मुख्यमंत्री झाल्यानंतर बिस्मार्कने प्रशियाची लष्करी सिद्धता तर मोठ्या प्रमाणात केलेली होती. वाढलेले लष्करी सामर्थ्य अजमावून पाहणे आणि एकीकरणास सुरुवात करणे, यासाठी बिस्मार्कने एकीकरणाच्या टप्प्यातील पहिले पाऊल टाकले. ते पहिले पाऊल म्हणजे डेन्मार्कशी युद्ध होय. कारण बिस्मार्कच्या मते युद्ध हा कोणत्याही ठिकाणी पोहोचण्याचा जवळचा मार्ग होता.

जर्मन राज्यसंघात श्लेस्विग आणि होलस्टिन नावाची दोन संस्थाने होती. डेन्मार्कशी या दोनही संस्थानांचा राजकीयदृष्ट्या अतिशय निकटचा संबंध होता. श्लेस्विगमध्ये निम्मे लोक जर्मन तर निम्मे डॅनिश होते तर होलस्टिनमध्ये बहुसंख्य जर्मन लोक होते. व्हिएन्ना परिषदेने हे जर्मन भाषिक प्रदेश डेन्मार्कच्या राजाच्या निगराणीखाली आणले. इ.स. १८४८ मध्ये हे प्रांत डेन्मार्कला जोडण्याचा प्रयत्न केला गेला; परंतु या प्रांतातील जर्मनांनी क्रांतिकारी चळवळी केल्यानंतर डेन्मार्कचा राजा फ्रेडरिक सातवा याने हे परगणे डेन्मार्कला जोडले जाणार नाहीत असे आश्वासन दिले. इ.स. १८६३ मध्ये राजा फ्रेडरिक सातवा याच्या मृत्यूनंतर ख्रिश्चन नववा डेन्मार्कचा राजा झाला आणि त्याने

श्लेस्विव व होलस्टिन डेन्मार्कला जोडले. बिस्मार्कने या संधीचा फायदा उठवायचे ठरवले. परंतु येथेही बिस्मार्कने मुत्सद्देगिरीचे राजकारण साधले. ऑस्ट्रियाला होलस्टिन देण्याचे आश्वासन दिले आणि आपल्या पक्षात ओढून घेतले. ऑस्ट्रिया खरे तर प्रशियाचा शत्रू परंतु बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीने ऑस्ट्रियाला प्रशियाच्या बाजूने युद्धात उतरवले. ऑस्ट्रिया व प्रशियाच्या संयुक्त फौजांनी डेन्मार्कचा पराभव केला. ऑस्ट्रियाला होलस्टिन दिले. प्रशियाला श्लेस्विग मिळाले आणि एकीकरणाचा एक टप्पा पूर्ण झाला.

**३) बिस्मार्कचे ऑस्ट्रियाविरुद्धचे धोरण व ऑस्ट्रियाशी युद्ध (इ.स. १८६६) :**

जर्मन एकीकरणात एकमेव अडथळा ऑस्ट्रिया आहे आणि ऑस्ट्रियाशी युद्ध अटळ आहे याची जाणीव बिस्मार्कला होती. ऑस्ट्रिया ही एक बडी सत्ता होती आणि या युद्धात ऑस्ट्रियाच्या बाजूने युरोपियन राष्ट्रे उतरण्याची शक्यता होती. यासाठी कूटनीतीचा वापर करुन बिस्मार्कने प्रथम ऑस्ट्रियाला एकाकी पाडण्यासाठी प्रयत्न सुरु केले. व्हिएन्ना परिषदेने रशियाला पोलंड मिळाले होते. रशियन दडपशाही विरुद्ध पोलंडमध्ये बंड सुरु झाले. संभाव्य ऑस्ट्रियाविरुद्धच्या युद्धात रशियाची मदत मिळवण्यासाठी प्रशियन जनमत पोलंडच्या जनतेच्या बाजूने असतानाही बिस्मार्कने रशियाला मदत केली आणि पोलीस बंड दडपले गेले. यातून रशियाला बिस्मार्कने आपल्या बाजूस वळवले. ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध झाल्यास फ्रान्सला तटस्थ ठेवण्यासाठी त्याने तिसर्या नेपोलियनशी इ.स. १८६५ मध्ये बॅरीट्झ येथे बोलणे केले. नेपोलियनचा समज असा झाला की तटस्थतेचे बक्षीस म्हणून बेल्जियम, लक्झेंबर्गचा भाग मिळतील. परंतु बिस्मार्कने नेपोलियनला कोणतेही आश्वासन दिले नाही. उलट इटलीला ऑस्ट्रियाकडून व्हेनेशिया मिळाल्यास नेपोलियनने त्यास मान्यता द्यावी असे वचन बिस्मार्कने त्याच्याकडून घेतले. इटलीलाही एकीकरणात ऑस्ट्रियाच शत्रू होता. म्हणून इटलीशी गुप्त करार केला. इटलीने जर प्रशिया व ऑस्ट्रिया यांचे ३ महिन्यात युद्ध झाले तर ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हेनेशिया प्रांत त्यांना देण्याच्या मोबदल्यात इटलीने प्रशियाला ऑस्ट्रियाविरुद्ध मदत करायची.

बिस्मार्कने ऑस्ट्रियाला नमवण्याची तयारी पूर्ण केली होती. आता युद्ध बाकी होते. कुरापत शोधण्यातही बिस्मार्कने वेळ घालवला नाही. ऑस्ट्रिया होलस्टिनमध्ये नवे प्रश्न निर्माण करत आहे असा आरोप त्याने केला. हेच तात्कालिक कारण चिघळले आणि ऑस्ट्रो-प्रशियन युद्ध इ.स. १८६६ मध्ये सुरु झाले. ऑस्ट्रियाच्या बाजूने व्हंनोव्हर, संवसनी, बव्हेरिया, बर्टुम्बर्ग इ. जर्मन संस्थाने असूनही प्रशियाच्या बिस्मार्कने करुन घेतलेल्या तयारीने अल्पकाळात प्रशियाने हे युद्ध जिंकले. बोहेमिया संस्थानातील सॅडोवा येथील लढाईत ३ जुलै १८६६ रोजी ऑस्ट्रियाचा प्रचंड पराभव झाला. अखेर २३ ऑगस्ट १८६६ मध्ये प्रेग येथे तह होऊन युद्ध संपले.

**४) फ्रँको-प्रशियन युद्ध आणि एकीकरणाची पूर्णता (इ.स. १८७०-७१) :**

प्रशियाची वाढती ताकद पाहून युरोपचा सत्तामतोल बिघडला असे लुई नेपोलियनला वाटू लागले. प्रशियाने आपल्याला तटस्थ ठेवून प्रेगच्या तहाने काहीही दिले नाही, याचे शल्यही नेपोलियनच्या मनात होतेच. नेपोलियनने तटस्थतेसाठीचे बक्षीस म्हणून फ्रान्सला र्हाइनचा भाग मिळावा म्हणून बिस्मार्ककडे मागणी केली. एकीकरणासाठी ऱ्हाईनचा हा भाग उपयुक्त असल्याने तो देण्यास बिस्मार्कने नकार दिला. यानंतर

नेपोलियनने फ्रेंच भाषिक अधिक असलेला बेल्जियम जिंकण्यास प्रशियाची मदत मागितली; परंतु बिस्मार्कने पुन्हा नकार दिला. यातून दक्षिणेकडची काही संस्थाने जी बिस्मार्कविरोधी ती बव्हेरिया, बुर्टेम्बर्ग देखील बिस्मार्कच्या बाजूला वळली.

**अ) स्पेनच्या गादीचा प्रश्न :**

इ.स. १८७० मध्ये स्पेनमध्ये लष्करी उठाव झाला व राणी पळून गेली. त्यामुळे गादी रिकामी झाली. या गादीवर प्रशियन राजाचा नातेवाईक लिओपोल्ड याने गादीवर बसू नये असा फ्रान्सने आग्रह धरला. प्रशियनांचे बळ वाढू नये ही भावना त्यामागे होती. फ्रान्सने असे आश्वासन प्रशियाला मागितले की, यापुढे केव्हाही प्रशिया स्पेनच्या गादीवर नातेवाईक बसवणार नाहीत. यातून युद्धमय वातावरणाची निर्मिती बिस्मार्कने पाठवलेल्या संदिग्ध, द्वर्थी तारेतून झाली व युद्ध सुरु झाले. बिस्मार्कने तार अशी पाठवली की, फ्रेंच जनतेला असे वाटावे की प्रशियन राजाने फ्रेंच वकिलाचा अपमान केला आहे आणि प्रशियन जनतेला असे वाटावे की फ्रेंच वकिलाने प्रशियन (जर्मन) राजाचा अपमान केला आहे. ही तार प्रसिद्ध होताच फ्रेंच जनतेने लुई नेपोलियनला प्रशियाविरुद्ध युद्ध सुरु करायला लावले, तर जर्मनीत राजाचा अपमान धुवून काढण्यासाठी उत्तर व दक्षिण जर्मन संस्थाने एकत्र झाली आणि एकीकरण पूर्ण झाले.

**ब) फ्रँको-प्रशियन युद्ध :**

बिस्मार्कने युक्तीने फ्रान्सला एकटे पाडले आणि इ.स. १८७० मध्ये फ्रान्सनेच प्रशियावर युद्ध लादले असा कांगावा केला. फ्रान्सला युरोपियन राष्ट्रापासूनही बाजूला ठेवले आणि दुसऱ्या बाजूने नेहमीची विरोधक असणारी उत्तरेकडील संस्थानेही आपल्या बाजूस वळवून बिस्मार्कने तीही मदत फ्रान्सला मिळू दिली नाही. परिणामी फ्रान्सचा पराभव झाला. २८ जानेवारी १८७१ रोजी पॅरिसमध्ये जेव्हा प्रशियन फौजा पोहोचल्या तेव्हा तिसऱ्या प्रजासत्ताकाने पराभव मान्य केला आणि फ्रँकफर्ट येथे तह करुन युद्ध संपले. तहातील तरतुदी पुढीलप्रमाणे -

१) आल्सेस, लॉरेन्स प्रशियास मिळाले.
२) फ्रान्सने २० कोटी फ्रँक्स युद्धखंडणी प्रशियाला द्यावी.
३) प्रशियन फौजा वाजत गाजत पॅरिसमध्ये गेल्याने दक्षिणेकडील संस्थाने, बिस्मार्कच्या अंदाजानुसार स्वत:हून एकीकरणात सामील झाली.

**७) एकीकरण पूर्ण :**

फ्रँको-प्रशियन युद्ध सुरु असतानाच उत्तर जर्मन राज्यसंघ व दक्षिणेकडील संस्थाने यांची बैठक भरली व एकीकरण पूर्ण झाले. व्हर्सायच्या राजवाड्यात विल्यमला जर्मन सम्रट ही पदवी बहाल केली गेली. अशाप्रकारे बिस्मार्कने आपल्या मुत्सद्दीपणाने जर्मनीचे एकीकरण घडवून आणले. पुढे बिस्मार्कने जर्मनीला युरोपातील एक बडी सत्ता म्हणून नावारूपास आणले. ज्या राष्ट्रवादी भावनेतून जर्मनीची निर्मिती झाली होती त्याच राष्ट्रवादाने बिस्मार्कनंतर जहाल स्वरूप धारण केले आणि त्यामुळे जगाला दोन जागतिक महायुद्धांना तोंड द्यावे लागले.

**आपली प्रगती तपासा :**

१) जर्मन एकीकरणातील विविध टप्पे सांगा.

## ८.८ सारांश

मध्ययुगात इटलीच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. जोसेफ मॅझिनी, गॅरिबाल्डि काऊंट काव्हूर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे इटालीचा एक राष्ट्र म्हणून उदय झाला व पुढच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये इटालीने आपले स्वत:चे एक स्थान निर्माण केले.

रोमन साम्रज्याचे विघटन होऊन अनेक छोटी मोठी राष्ट्रे उदयास आली. जर्मन भाषा, वंश एकत्र करण्याचे प्रयत्न सुरु झाले. परंतु त्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या. प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. बिस्मार्कने जर्मनीमध्ये अनेक सुधारणा करुन सामर्थ्यशाली जर्मन बनविण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रमाणे युरोपमध्ये सहभाग घेऊन राजकारणात स्वत:चे वर्चस्व निर्माण केले. त्यांच्या गुंतागुंतीच्या करार पद्धतीमुळे जागतिक, पहिले महायुद्ध घडुन आले.

## ८.९ प्रश्न

१) इटालीच्या एकीकरणातील प्रमुख टप्पे स्पष्ट करा.

२) इटलीच्या एकीकरणातील काऊंट काव्हूर, गॅरिबाल्डि व जोसेफ मॅझिनीच्या योगदानाचे मूल्यमापन करा.

३) जर्मनीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी सांगा.

४) जर्मनीचे प्रशियाच्या नेतृत्वाखाली एकीकरण पूर्ण झाले भाष्य करा.

❖❖❖❖

# ९

# आशियातील साम्रज्यवाद

**घटक रचना :**

९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ साम्रज्यवाद
९.३ चीनमधील साम्रज्यविस्तार
९.४ जपानचा साम्रज्य विस्तार
९.५ सारांश
९.६ प्रश्न

## ९.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यास

१) साम्रज्यवादाचा अर्थ समजावून देणे.
२) साम्रज्यवादाच्या कारणाविषयी माहिती उपलब्ध करुन देणे.
३) चीनमध्ये पाश्चामात्यांचा प्रवेशाविषयी माहिती देणे.
४) अफू युद्धाची कारणे - स्वरूप - परिणामांची चर्चा करणे.
५) तायपिंग बंडाविषयी माहिती देणे.
६) जपानमध्ये युरोपियनांचा प्रवेश आणि त्यांचे करार याविषयी माहिती देणे.
७) जपान-चीन, जपान रशिया युद्धाची कारणे, स्वरूप, परिणाम याची माहिती सांगणे.
८) जपान-इंग्लंड कराराविषयी तपशीलवार घटना स्पष्ट करुन देणे.
९) आफ्रिका खंडाच्या विभाजनाची माहिती घेणे.

## ९.१ प्रस्तावना

साम्रज्यवादाला प्रारंभ १५ व्या शतकात झाला आणि १६ व्या शतकाच्या प्रारंभी आधुनिक साम्रज्यवादाला सुरुवात झाली. प्रगत राष्ट्रांनी अप्रगत राष्ट्रावर आपले राजकीय, वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करुन पिळवणूक केली. साम्रज्यवादाच्या उदयाची विविध कारणे आहेत. आधुनिक साम्रज्यवादाची तंत्रे व पद्धती वेगवेगळी आहेत.



munotes.in

त्याचप्रमाणे साम्रज्यवादाचे स्वरूपही वेगवेगळे आहे. आफ्रिका खंडाचे प्रथम वसाहतवाद्यांनी विभाजन केले त्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी इ. प्रमुख राष्ट्रे होती. आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागांमध्ये आपल्या वसाहती स्थापन केल्या. आफ्रिकेप्रमाणेच आशिया खंडात हिंदुस्थान आणि चीनमध्ये साम्रज्य विस्तार केला. प्रारंभी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रांच्या नंतर जपान, अमेरिका यांनी साम्रज्यवाद स्पर्धेत भाग घेतला. साम्रज्यवादाचे फायदे व तोटेही झाले याशिवाय साम्रज्यवादाचा युरोपवरही परिणाम मोठ्या प्रमाणात झाला.

## ९.२ साम्राज्यवाद

१६ व्या शतकाच्या सुरुवातीस आधुनिक साम्रज्यवाद व वसाहतवाद याची सुरुवात झाली. १५ व्या शतकाच्या अखेर स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड इ. जगाच्या इतर देशांत जलमार्गाद्वारे आपल्या वसाहती स्थापन केल्या. व्यापार वाढवून तो प्रदेश नियंत्रणाखाली आणला त्यामध्ये भांडवल गुंतवले. कच्चा व पक्का मालासाठी हक्काची बाजारपेठ निर्माण केली. त्याबरोबर वाढत्या लोकसंख्येचा प्रश्नही सोडवला.

**आधुनिक साम्रज्यवाद :**

साम्रज्यवाद म्हणजे प्रगत देशाने अप्रगत देशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे, एवढेच नव्हे तर भिन्न वंश, भाषा, धर्म, संस्कृती इ. बाबतीत वर्चस्व निर्माण करणे.औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक आशय पुढे आल्याने त्यालाच आर्थिक साम्रज्यवाद / आधुनिक साम्रज्यवाद असे म्हणतात.

### ९.२.१ आधुनिक साम्रज्यवादाच्या उदयाची कारणे :

**१) कच्च्या मालाची गरज :**

औद्योगिक क्रांतीमुळे प्रगतीच्या नव्या कल्पना निर्माण झाल्या. कारखान्यासाठी अनेक प्रकारच्या मूलद्रव्यांची व कच्चा मालाची गरज होती. त्याचे प्रमाण देशात कमी असल्याने ते प्राप्त करण्यासाठी नव्या देशांची / वसाहतींची गरज निर्माण झाली.

**२) पक्क्या मालासाठी बाजारपेठांची गरज :**

औद्योगिक क्रांतीने उत्पन्न वाढले, परंतु उत्पादित मालाची विक्री होऊनही देशात माल शिल्लक राहात असे. तेव्हा पक्क्या मालाच्या विक्रीसाठी नवीन बाजारपेठेची गरज निर्माण झाली. बाजारपेठेवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी राजकीय वर्चस्व असलेल्या वसाहतींची गरज निर्माण झाली.

**३) वाढती लोकसंख्या व अन्नधान्याची समस्या :**

युरोपियन राष्ट्रांमध्ये लोकसंख्येची प्रचंड वाढ झाली. तसेच उद्योगधंद्यावर लक्ष केंद्रित झाल्याने शेतीकडे दुर्लक्ष झाले. परिणामी अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. अन्नधान्यवाढीसाठी, प्राप्तीसाठी आणि वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी नव्या प्रदेशाची गरज निर्माण झाली.

**४) दळणवळणाच्या व्यवस्था :**

भौगोलिक शोधामुळे दूरच्या प्रदेशांकडे जाण्याचे मार्ग लोकांना माहित झाले. त्यामुळे व्यापार वाढला. वैज्ञानिक व औद्योगिक प्रगतीमुळे दळणवळण व संपर्क या क्षेत्रात अनेक सुधारणा घडून आल्या. आगगाड्या, आगबोटी व विमान या साधनांमुळे मालाची व माणसाची वाहतूक जलद होऊ लागली. दूरच्या प्रदेशात संदेश व सैन्य पाठवून त्यावर नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ झाले.

**५) आर्थिक भरभराट :**

व्यापार आणि संपत्तीप्राप्तीसाठी युरोपियन देशांनी आपले लक्ष वसाहतींकडे वळवले. आफ्रिका, अमेरिका हे राजकीयदृष्ट्या दूर होते; परंतु या देशात खनिज संपत्ती मोठ्या प्रमाणात होती. सोने, चांदी, हिरे, कोळसा, तेल इ. नैसर्गिक साधनसामग्री मोठ्या प्रमाणात होते. या प्रदेशात वसाहत स्थापन करुन संपत्तीचे मालक बनून श्रीमंत होणे या हेतूने वसाहत मिळवण्याचा प्रयत्न सुरु झाला.

**६) धर्मप्रसार करणे :**

मागासलेल्या वसाहतीत सुधारणा करणे हे आद्यकर्तव्य तर येशूचा संदेश रानटी लोकांपर्यंत पोचवणे हे आपले परमकर्तव्य आहे असे मानत असे. ख्रिस्ती धर्म हा सर्वश्रेष्ठ असून तो मानवाला मुक्ती देऊ शकतो अशी धारणा होती. यातून आपला धर्म, संस्कृतीचा प्रसार करावा या हेतूने नव्या प्रदेशाची गरज होती.

**७) प्रखर राष्ट्रवादाची भावना :**

फ्रेंच राज्यक्रांतीपासून राष्ट्रवादाची भावना वाढू लागली. औद्योगिक प्रगतीमुळे त्यात वाढ झाली. आपल्या श्रेष्ठत्वाची व सामर्थ्याचे प्रदर्शन करण्याची संधी प्राप्त करण्यासाठी साम्रज्यवादाचा मार्ग स्विकारला. राष्ट्रवादी नेते, लेखक, विचारवंत, पत्रकार इ. साम्रज्यवादाला उत्तेजन दिले. आपल्या देशाची प्रतिष्ठा, कीर्ती वाढवण्याचया हेतूने साम्रज्य विस्ताराचे धोरण स्विकारले.

**८) आरमारी सत्तेची वाढ :**

आफ्रिका खंडातील व अति पूर्वेकडील देशातील अनेक भागांचा व बंदरांचा विकास झाल्याने आरमारी केंद्रे स्थापन करण्यात आली. व्यापार, उद्योगधंदे, वसाहत यांची वाढ व संरक्षण यासाठी आरमाराची गरज निर्माण होऊन त्याआधारे वसाहतवादाचे धोरण राबवले.

**९) पाश्चत्यांची स्वभाव वैशिष्ट्ये :**

युरोपियन लोक धाडसी, जिज्ञासू आणि महत्त्वाकांक्षी होते. अज्ञात प्रदेशांचे संशोधन करुन तेथे वर्चस्व निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी संशोधक वृत्ती, धाडस, पराक्रम त्यांच्यामध्ये होता. या स्वभाव वैशिष्ट्यांमुळेच साम्रज्यवादाचे धोरण आखले.

**१०) नवोदित राष्ट्रांची भूक :**

१५ व्या शतकापासून साम्रज्यविस्ताराला प्रारंभ झाला. त्याचा इंग्लंडला फायदा झाला. १९ व्या शतकात अनेक राष्ट्रे उदयाला आली. त्यांची महत्त्वाकांक्षा होती की जागेच्या वाटणीत आपणाला हिस्सा मिळावा, त्यातूनच स्पर्धा सुरु झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) साम्रज्यवादाची कारणे सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ९.३ चीनमधील साम्राज्यविस्तार

१९ व्या शतकात आशिया खंडात पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपला साम्रज्यविस्तार मोठ्या प्रमाणात केला. या साम्रज्याविस्ताराला चीन, भारत, जपान इ. राष्ट्रे बळी पडले. इंग्लंडने चीनमध्ये अफूचा व्यापार सुरु केला. त्यामुळे चीनची अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली. त्यामुळे इ.स. १८४२-६० या काळात चीनमध्ये दोन अफूची युद्धे झाली. या युद्धांत चीनचा पराभव झाला. हा अपमान मांचू राजवटीमुळे झाला त्यामुळे चीनमध्ये तायपिंग बंड, बॉक्सर बंड झाले. चीनचा दुर्बलतेचा फायदा घेऊन जपाननेही चीनमध्ये विस्तारवादी धोरणाचा स्वीकार केला. त्यामुळे चीन-जपान युद्ध झाले. चीनमध्ये सुधारणावादी गटाने १०० दिवसांच्या सुधारणा हा कार्यक्रम राबवला. त्यामुळे चीनमध्ये राष्ट्रवाद निर्माण झाला.

### ९.३.१ पहिले अफूचे युद्ध इ.स. १८३९-१८४२ :

चिनी समाज आपली संस्कृती इतरांपेक्षा श्रेष्ठ आणि पुरातन संस्कृतीचा अभिमान बाळगणारा होता. चीनचा बाह्य जगाशी संबंधही नव्हता. त्यामुळे त्यांच्यात श्रेष्ठत्वाची भावना निर्माण झाली. चीनचे पाश्चात्यांशी व्यापारी व सांस्कृतिक संबंध मध्ययुगीन कालानंतर नव्याने सुरु झाले. पोर्तुगीजांनी इ.स. १५७६, स्पॅनिशांनी इ.स. १५९८, डचांनी इ.स. १६२२, इंग्रजांनी इ.स. १६३५, रशियांनी इ.स. १६५१, अमेरिकनांनी इ.स. १७८४ मध्ये चीनबरोबर व्यापार सुरु केला. युरोपियनांनी संघटनेमार्फत व्यापार करावा यासाठी कोहाँग व्यापारी संघटना इ.स. १७५२ मध्ये मांचू राजाने स्थापन केले. या संघटनेचे कार्य म्हणजे - पाश्चिमात्य व्यापारी आणि चिनी राज्यकर्ते व प्रशासक यांच्यात मध्यस्थी करणे, आयात-निर्यातीवर नियंत्रण ठेवणे व कराचे प्रमाण ठरवणे. चीनच्या अंतर्गत भागात संघटनेच्या परवानगीशिवाय प्रवेश करु नये.

**अ) पहिल्या अफूच्या युद्धाची कारणे :**

**१) अफूचा व्यापार आणि चीन :**

चीनने सर्व राष्ट्रांच्या बरोबर अनुकूल व्यापारी धोरण ठेवले होते. कारण चीन स्वयंपूर्ण असून चीनमधून रेशीम, भांडी, चहा याची निर्यात होत होती. आयात केली जात नसे. चीनमध्ये व्यापार करावयाचा असल्यास राजाने नेमलेल्या कमिशनच्या परवानगीने व्यापार करावा लागत असे. इंग्लंडच्या अफू धोरणामुळे चीनमध्ये युद्धास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली ती पुढीलप्रमाणे -

**चीनमध्ये अफूचा प्रवेश आणि व्यापारवाढ :** चीनमध्ये तांग घराण्याचया राजवटीपासून औषधोपचारासाठी अफूचा व्यापार होत असे. १७ व्या शतकापासून अफून पाईपमधून ओढण्याची पद्धत रूढ झाली. ब्रिटिशांमार्फत भारतातून अफूची निर्यात होऊ लागली. १९ व्या शतकात अफूचा व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. तो पुढीलप्रमाणे दिसून येतो. १८ व्या शतकात - ७५ किलोच्या १ हजार पेट्या, इ.स. १८१० मध्ये ४५०० पेट्या. इ.स. १८३० मध्ये १६,००० पेट्या. इ.स. १८३९ मध्ये २०,००० पेट्या. एका बा ॅक्समध्ये १३३ पौंड अफू असे. अफूच्या वाढत्या व्यापारामुळे चीनमधील चांदीचा साठा कमी होऊ लागला.

**अफू युद्धाची परिस्थिती :** कॅंटोन शहराचा कमिशनवर लीन याने अफू साठे जप्त करण्याचे आदेश दिले. पाश्चिमात्त्यांच्या वसाहतीचा पाणीपुरवठा, अन्नपुरवठा बंद केला. इंग्रज कप्तान इलिपट याने सर्व साठा दिला. लीनने २०,००० पेटारे समुद्रात फेकून दिले. चिनी ग्रामवासी याचा खून झाल्याने गोंधळ झाला. इ.स. १८४० मध्ये इंग्लंडनी १६ जहाजे व १०० सैनिक चीनमध्ये पाठवले. त्यामुळे संघर्ष सुरु झाला आणि पहिले अफूचे युद्ध इ.स. १८४१ ला सुरु झाले.

**२) इंग्रज व्यापाऱ्यांची भूमिका :**

इंग्रज व्यापारी अतिशय महत्त्वाकांक्षी होते. केवळ व्यापाराची वृद्धीच त्यांना अभिप्रेत नसून व्यापाराची सर्वोच्चता स्थान स्थापन करावी अशी इच्छा होती. चिनी सम्राटाने बरोबरीने व सन्मानाने व्यवहार करावा अशी इच्छा व्यापार्यांची होती, त्यास चीनची तयारी नव्हती.

**३) चीनची आर्थिक परिस्थिती :**

चिनी लोक अफूच्या आहारी गेल्यामुळे चीनवर आर्थिक ताण निर्माण झाला. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ३ प्रामाणिक, कठोर कर्तव्यनिष्ठ अधिकार्यांची नेमणूक कॅन्टोन येथे केली. त्यामुळे संघर्ष अधिकच वाढला.

**४) पाश्चिमात्यांची समानतेची मागणी :**

चीन स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असे. परंतु अफूच्या व्यापारामुळे आर्थिक परिस्थिती पूर्ण नष्ट झाली. १९ व्या शतकात परकियांनी प्रवेश केला. त्यांना समानतेची

वागणूक मिळावी असे वाटत होते. पण चीनचा नकार होता. यातून स्पर्धा सुरु झाली आणि अफूचे युद्ध त्यामुळे झाले.

**५) युद्धाचे तात्कालिक कारण :**

७ जुलै १८३९ रोजी एका चिनी नाविकाचा मृत्यू झाला. कॅन्टोन कमिशनर लिन याने चिनी कायद्याप्रमाणे इलियट याला अपराधी व्यक्तीला हवाली करा असा आदेश दिला. परंतु त्याने नकार दिल्याने अफूच्या युद्धाला प्रारंभ झाला. ब्रिटीशांनी तिघाई येथे हल्ला करुन चीनचा पराभव केला. त्यामुळे चिनी सम्राटाने लीनच्या ऐवजी किशान याला अधिकारी नेमला. सन १८४०-४२ या काळात युद्ध झाले. शेवटी नानकिंग तहाने युद्धाचा शेवट झाला.

**ब) नानकिंगचा तह :**

डी.ई. ओवानच्या मते, नानकिंग तहामुळे चीनमध्ये एक नवे पर्व निर्माण झाले. आतापर्यंत झोपी गेलेला चीन जागा झाला आणि वाटाघाटी केल्या. तहातील तरतुदी :

१) हाँगकाँग बेट चीनने इंग्रजांना कायमचे द्यावे.

२) ॲमॉय, फुची, निंगपो, शांघाय, कॅन्टोन ही शहरे व्यापाराकरता खुली केली.

३) परकीय व्यापाऱ्यांना वास्तव्य, स्थायिक होण्यास चीनमध्ये परवानगी द्यावी.

४) युद्धखर्च म्हणून २१० लक्ष चांदीचे डॉलर्स इंग्लंडला द्यावे.

५) चिनी व्यापार्यांचे मक्तेदारीचे हक्क नष्ट करावेत.

६) बेकायदेशीर व्यापार थांबवण्यास ब्रिटिशांनी चीनला मदत करावी.

७) आयात-निर्यातीवर ५ टक्के जकात द्यावी.

**आपली प्रगती तपासा :**

१) पहिल्या अफूच्या युद्धाचे वर्णन करा.

__________________________________________________________________________________

**९.३.२ दुसरे अफूचे युद्ध व त्याची कारणे - परिणाम :**

पहिल्या अफूच्या युद्धात पाश्चात्यांच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या पुढे चीनचा पराभव झाला नानकिंगच्या तहाने इंग्रजांना विशेष अधिकार प्राप्त झाले होते. चीनवर व्यापारी वर्चस्व, प्रभुत्व आणि सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. चीनच्या दुर्बलतेचा



munotes.in

फायदा घेऊन पाश्चात्यांनी चीनवर अनेक अटी लादल्या. त्याचा परिणाम म्हणजे इ.स. १८५६ ते १८६० पर्यंत अफूचे दुसरे युद्ध झाले.

**अ) दुसऱ्या अफूच्या युद्धाची कारणे :**

**१) तह-अंमलबजावणीत चीनची कुचराई :**

पहिल्या अफू युद्धाच्या वेळी नानगकिंगचा तह २९ ऑगस्ट १८४२ रोजी चीनबरोबर झाला. हा तह लष्करी सामर्थ्याने लादला होता. चीनने हा तह मनापासून स्वीकारला नव्हता. त्यामुळे तहाच्या अमंलबजावणीत कुचराई केली. त्यामुळे पाश्चिमात्यांना त्याचा राग आला आणि युद्ध झाले.

**२) चीन मध्ये युरापियनांचा प्रभाव :**

नानकिंगच्या तहानंतर विशेष अदिकार पाश्चिमात्य राष्ट्रांनी प्राप्त करुन घेतले. चीनमधील प्रभाव युरोपियन लोकांचा लवकर नष्ट करावा, अशी इच्छा चिनी लोकांची होती, त्यामुळे युद्ध झाले.

**३) अफूचा चोरटा व्यापार :**

अफूच्या व्यापारातून प्रचंड नफा मिळत होता. त्यामुळे ते अफूचा व्यापार बंद करण्यास तयार नव्हते. चीनची दुर्बलता पाहून अफूचा चोरटा व्यापार सुरु केला. सन १८५० नंतर या अफूच्या चोरट्या व्यापारामुळे इंग्लंड व अमेरिका यांना ७ लक्ष पौड फायदा झाला. त्यामुळे चीनने शक्य तेथे पाश्चात्यांना विरोध करायला सुरुवात केली म्हणून युद्ध झाले.

**४) युरोपियनांचे अधिकार हेच चीनचे दु:ख :**

चिनी प्रशासनाच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन विदेशी व्यापार्यांनी अधिकाराचा दुरुपयोग केला. युरोपियन अपराध्यांसाठी युरोपियन मॅजिस्ट्रेट समोर खटला चालत होता. जर कोणी पाश्चिमात्याने चिनी लोकांवर अपराध केला तर त्यास अपराधातून मुक्त करण्यात येत होते. या कारणांमुळे चिनी प्रशासन व चिनी जनता नाराज होऊन विदेशी लोकांना धडा शिकवण्यासाठी तयार होती. त्यामुळे युद्ध झाले.

**५) इंग्रज व्यापाऱ्यांच्या मागणीला नकार :**

कॅन्टोनमधील चीनचा व्हाईसरॉय येह-मिन-चिंग असून तो साहसी होता. इ.स. १८५४ मध्ये त्याच्याकडे व्यापार्यांनी काही सवलतींची मागणी केली; परंतु त्याने त्यास नकार दिला. या वेळी इंग्लंड क्रिमियन युद्धात होते. युद्धानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यातुन युद्ध झाले.

**६) तात्कालिक कारण :**

कॅन्टोन बंदरातील चिनी अधिकाऱ्यांनी लोची एरी नावाच्या जहाजावरील १४ पैकी १२ खलाशांना चाचेगिरीच्या संदर्भात अटक केली. ब्रिटिश वाणिज्य दूत हैरी पार्क्स यांनी चिनी शासनाला खलाशांच्या सुटकेची मागणी केली. इंग्रजांच्या मतानुसार लोची एरो जहाज

हाँगकाँगमध्ये नोंदविण्यात आले होते. त्यावर ब्रिटिश ध्वज होता. चिनी अधिकार्यांनी ध्वज उतरवून ब्रिटिश शासनाचा अपमानकेला. त्यामुळे चिनी शासनाने दिलगिरी व्यक्त करावी व भविष्यकाळात अशा घटना घडणार नाहीत असे आश्वासन द्यावे. असे ब्रिटिश वाणिज्य अधिक्षक सर जॉन ब्रऊनिंग याने सांगितले.

याविरुद्ध चिनी अधिकाऱ्यांचे मत असे होते की, एरो जहाजाचा मालक चिनी असून छापा टाकण्याच्या वेळेस जहाजावर ब्रिटिश ध्वज नव्हता. यावर मोठा वाद झाला. त्यामुळे दुसऱ्या आंम्ल-चिनी (अफू) युद्धाला सुरुवात झाली. फ्रेंच कॅथॉलिक मिशनरी चॅपडीलेन व रोमन कॅथालिक पाद्र यांना इ.स. १८५६ मध्ये चिनी पोलिसांनी अटक केली. त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली त्यामुळे फ्रान्सला राग होता. ते इंग्रजांना सामील झाले. इ.स. १८५६ मध्ये चिनी नागरिकांनी ब्रिटिश वसाहत कॅन्टोनवर हल्ला करुन ताब्यात घेतले. टिएन्स्टीन येथे चीनचा या युद्धात पराभव झाला त्याच्याबरोबर तह केला. कॅ

**ब) टिएन्स्टीनचा तह (२६ जून१८५८) :**

१) चीन-ब्रिटन राष्ट्रांत संबंध स्थापन करावेत

२) चीनची ११ बंदरे व्यापारासाठी नव्याने खुली करावीत.

३) जकातदर ५ टक्के असावा.

४) मिशनर्यांना चीनमध्ये कोठेही, केव्हाही धर्मप्रसार व धर्मांतर करण्याची परवानगी द्यावी.

५) ब्रिटिश जहाजांना सर्व बंदरांत मुक्तद्वार असावे.

६) अफूच्या व्यापाराला मान्यता द्यावी.

७) पेकिंग दरबारात एक ब्रिटिश रेसिडेंट मंत्री नेमला जावा.

८) यांग-त्से-यांग खोरे व्यापारासाठी खुले करावे.

९) ब्रिटिश नागरिकांना ब्रिटिश कायद्याप्रमाणे न्यायदान करण्यास मान्यता द्यावी.

**९.३.३ ताईपिंग (तायपिंग) बंड इ.स. १८५०-१८६४ :**

इ.स. १८५० ते ६४ या काळात तायपिंग बंडाला अतिशय महत्त्वाचे स्थान होते. बंडामुळे मांचू सत्ता कमकुवत बनली. प्रारंभीच्या काळात बंडाला पाश्चात्त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे चीनमधील बराच प्रदेश ताब्यात घेऊन नानकिंग ही आपली राजधानी बनवली. इ.स. १८५३ मध्ये तायपिंग-ति-एन-कुओ (स्वर्गीय शांततेचे राज्य) स्थापन केले. पाश्चिमात्त्यांच्या मदतीने माचू सत्तेने बंडाचा बिमोड केला. या बंडाला चीनच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

**अ) तायपिंग बंडाची कारणे :**

**१) मांचू सत्तेविरुद्ध असंतोष :**

इ.स. १८४२ नंतर मांचू राजवटीवर परकियांचा प्रभाव वाढत होता. अफूच्या युद्धामुळे अनेक व्यापारी सवलती दिल्या. त्यामुळे देशाचे वैभव, स्थैर्य, आर्थिक समृद्धी नष्ट

झाली व या सर्वांना मांचू जबाबदार आहेत अशी भावना झाली. हे जुलमी, भ्रष्टाचारी शासन बदलण्याची गरज आहे. त्यामुळे मांचू सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण झाला.

**२) आर्थिक क्षेत्रातील दैन्यावस्था :**

अफूच्या युद्धाने आर्थिक परिस्थिती खालावली होती. त्याबरोबरच मानहानी स्वीकारुन तह व युद्ध खर्चाचा प्रचंड बोजा स्विकारला होता. चीनमध्ये दुष्काळ, महापूर यामुळे शेतीचे उत्पन्न घटले त्यामुळे चीनची बिकट परिस्थिती झाली. सर्वसामान्यांना जीवन जगणे अशक्य झाले. अकार्यक्षम शासनाबद्दल चीड निर्माण झाली. उत्पन्न वाढले त्यापेक्षा जादा लोकसंख्येत वाढ झाली. श्रीमंतांकडून कर घेतला जात नसे, फक्त गरीबांकडून कर गोळा केला जात असे. त्यामुळे त्यांनी जमिनी विकून कर दिला. श्रीमंत अधिक श्रीमंत झाले.

**३) सुशिक्षित वर्ग बेकार :**

वाढत्या लोकसंख्येबरोबर बेकारी वाढली. नोकर्या नसल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या. शासनाचा खर्च अमाप वाढला. दुष्काळ, महापूर यामुळे महसूल कमी झाला. आर्थिक अडचणीमुळे शासनाला नोकर्या देणे अशक्य झाले. त्यामुळे असंतुष्ट वर्ग उठावास तयार झाला.

**४) सैन्यात असंतोष :**

सैन्याची संख्या मर्यादित असूनही त्यांना वेतन कमी होते. कारण लष्करी अधिकार्यांकडून सैन्याचा वापर वाढवला जात नसे. कित्येक अधिकारी बोगस सैन्य दाखवून पगार स्वतःच घेत असत. त्यामुळे उठाव झाला.

**५) वांशिक कारणे :**

मांचुरियातील मांचूने मिंग राजाचा पराभव करुन सत्ता स्थापन केली. लगेच प्रशासनातील मिंग अधिकारी बदलून मांचूने अधिकारी नेमले. मांचूने आपला वंश टिकवण्याचा प्रयत्न केला. अकार्यक्षम मांचूविरुद्ध उठाव करुन पुन्हा मिंग घराण्याची स्थापना करणे यासाठी उठाव झाला.

**ब) तायपिंग बंडाची सुरुवात :**

**१) तायपिंग बंडाचा उद्देश :**

शेतकर्यांचे आर्थिक शोषण होत असल्याने प्रशासनात सुधारणा करुन जनतेच्या आर्थिक परिस्थितीचा स्थर उंचावणे. मांचू साम्रज्याचा अस्त करुन एक स्वायत्त सरकारची स्थापना करणे. आर्थिक व सामाजिक स्वरूपात बदल करुन नवा समाज निर्माण करणे असा उद्देश होता.

**२) तायपिंग बंडाची सुरुवात व प्रगती :**

तायपिंग बंडाची सुरुवात क्वांगटुंग प्रांतात झाली. सैन्याचे चार विभाग केले. सैन्याचे नेतृत्व स्वत: चुआनकडे होते. १८५० जुलैमध्ये चुआनच्या नेतृत्वाखाली उठाव

झाला. क्वांगटुंगवर ताबा मिळवून पेकिंगकडे सैन्य पाठवले. मांचूचा पराभव करुन चुआनने युगान चौ नावाचे गाव जिंगले आणि तेथेच स्वर्गीय शांततेचे राज्य स्थापन केले.

तायपिंग सेना सिओ-चिओ-कुई यांच्या नेतृत्वाखाली तयार केली. इ.स. १८५२ मध्ये सिओ-चिओ-कुईच्या नेतृत्वाखाली उठाव झाला. सैन्याचे हाजयांग, हॅको, बुचांग इ. शहरे जिंकली. सिआओ शाहिब फौजांशी लढताना तो ठार झाला. त्याच्यानंतर नेतृत्व यांग-सिअ-चिंग यांच्याकडे आले. त्याने नानकिंग जिंकले व स्वर्गीय शांततेचे राज्य याची राजधानी म्हणून जाहीर केले. पाश्चात्त्यांनी तायपिंगला मदत केली.

आपण येशू ख्रिस्ताचे धाकडे बंधू आहोत, असे हुंगने सांगितल्याने पाश्चात्त्यांनी आपला पाठिंबा तायपिंग बंडाऐवजी मांचू राजवटीला दिला. हुंगने स्वत:चा राज्याभिषेक करवून घेतला आणि स्वत: विलासी जीवन जगण्यात दंग झाला.

**क) तायपिंग बंडाचा शेवट :**

तायपिंग शासनव्यवस्थेत अंतर्गत यादवी, भ्रष्टाचार हे सुरु झाले. लोकांना मोठ्या प्रमाणात आश्वासने दिली, परंतु त्यांची पूर्तता केली नाही. मांचू सेनापती लोंग-कुओ-फांन याने परकीयांची मदत घेऊन जून १८६४ मध्ये नानकिंग येथे बंडाचा पराभव केला. इ.स. १८६६ मध्ये हुगने विष प्राशन करुन आत्महत्या केली आणि बंडाचा शेवट झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) तायपिंग बंडाची माहिती सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ९.४ जपानचा साम्राज्य विस्तार

जपान देश तीन ते चार बेटांचा समूह असून त्याला 'उगवत्या सूर्याचा देश' असे म्हटले जाते. जपान स्वत:ची संस्कृती, स्वत:चे ज्ञान व स्वत:चा वंश सर्वश्रेष्ठ आहे असे मानणारा होता. जपानचा बाह्य देशांशी संबंध न आल्याने त्यांच्यात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक असा कोणताही विकास झालेला नव्हता. दुसर्या समाजातील व्यक्ती म्हणजे रानटी जमाती आहेत. त्यांच्याशी संबंध न ठेवणे हा विचार त्यांच्यात होता. चीन आणि जपान या देशांची साधारण परिस्थिती सारखीच होती. राज्यकारभारामध्ये सत्ता शोगुणांच्या हाती होती. याच्या माध्यमातून देशाचा सर्व कारभार चालत असे. राजा किंवा सम्रट हा केवळ नामधारी असे. इ.स. १८५३ मध्ये अमेरिकेचा लष्करी अधिकारी पेरी हा जपानच्या किनारी आला असताना त्याने प्रथम शोगुण याच्याशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने नकार दिला. आपले वर्चस्व मान्य करण्यासाठी पेरीने जपानला एक

वर्षाची मुदत दिली. त्यानुसार पेरी इ.स. १८५४ मध्ये १० लष्करी बोटींसह तो जपानच्या किनारी आला. शेवटी इ.स. १८५४ मध्ये पेरीबरोबर करार केला. व्यापार व धर्मप्रसार करण्याची परवानगी घेतली. इ.स. १८५५ मध्ये टाऊन हॅरिस हा दुसरा अधिकारी जपानमध्ये आला. त्याने अनेक कष्ट सहन करुन शोगुणांकडून अनेक सवलती इ.स. १८६३ मध्ये मिळविल्या.

इ.स. १८६५ च्या दरम्यान देशामध्ये गोंधळ निर्माण झाला. या परिस्थितीला हे परकीय व शोगुण कारणीभूत आहेत अशी लोकांची धारणा झाली. शोगुणांच्या विरोधात लोकमत झाले. पर्यायाने ८ फेब्रुवारी १८६७-६८ रोजी शोगुणांनी आपली सर्व सत्ता १५ वर्षे वयाच्या राजाकडे दिली. या बदलालाच जपानी इतिहासामध्ये मैजी / मेईजी क्रांती असे म्हणतात. मेईजी क्रांतीनुसार जपानच्या परिस्थितीमध्ये मोठा बदल घडून आला. राजाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा मोठ्या प्रमाणात केल्या.

**९.४.१ जपानमध्ये युरोपीयनचे आगमन :**

**१) अमेरिकेचे कामोडोर मॅथ्यू पेरीचे आगमन - ८ जुलै १८५३ :**

अमेरिकेच्या अध्यक्षांनी इ.स. १८५० मध्ये कामोडोर मॅथ्यू पेरीची नियुक्ती केली. उद्देश - इंग्लंडचे वर्चस्व वाढण्यापूर्वी व्यापारी सवलती प्राप्त करणे, पॅसिफिक सागरात एखादे बंद असावे यासाठी सन १८४६ ला पहिली मोही जेन्स बिडलच्या नेतृत्वाखाली पाठवली होती पण अपयश आले होते. कामोडोर पेरी केप ऑफ गुड होपच्या जलमार्गाचे जपानमध्ये ८ जुलै १८५३ मध्ये यडोच्या आखातात आला. डॉक्टर वेल्स हा दुभाषिक त्याच्या सोबत होता. शोगून याने आपले दोन अधिकारी भेटीस पाठवले. पेरीने राष्ट्राध्यक्षाचे पत्र सम्राटाकडे दिले. त्यामध्ये मैत्री, शांतता, मुक्त व्यापार, जहाज फुटून किनार्यावर आल्यास खलाशांना माणुसकीची वागणूक द्यावी, कोळसा, पाणी भरण्याची परवानगी द्यावी इ. मागण्या सादर केल्या व एक वर्षाची मुदत दिली. परत अमेरिकेत गेला. पेरी पुन्हा १३ फेब्रुवारी १८५४ रोजी येडीच्या आखातात आला. कानागाव येथे ३१ मार्च १८५४ रोजी तह झाला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे.

१) अमेरिकन खलाशांना चांगली वागणूक मिळावी.

२) शिमोदा व हाकोदाते बंदरे व्यापारासाठी खुली करावीत.

३) अमेरिकन जहाजांना कोळसा, पाणी पुरवण्याची व्यवस्था करावी.

४) दोन राष्ट्रांमध्ये शांततेचे संबंध प्रस्थापित करावेत.

५) व्यापारी संघ प्रस्थापित करावेत.

६) शिमोड्याला अमेरिकन प्रतिनिधी ठेवावा.

**२) युरोपियन देशाबाहेर तह :**

अमेरिकेने जपानचे दरवाजे पाश्चिमात्त्य राष्ट्रांसाठी खुले केले. पेरीच्या नंतर ब्रिटिश, रशियन, डच यांनी इ.स. १८५६ मध्ये तह करुन आपल्याला जपानमध्ये अधिकार प्राप्त करुन घेतले. त्या करारातील तरतूदी पुढीलप्रमाणे.

१) शिमोडा, हाकोदात्ते, नागासाकी येथे कोळसा व इतर आवश्यक पुरवठा करणे.



munotes.in

२) जपानी अधिकार्यांच्या देखरेखीखाली व्यापार करणे.

३) नागासाकी बंदरात परकीय व्यक्तींना व्यापाराकरीता राहण्याचे अधिकार देणे.

४) शिमोडा व हाकोदाते येथे वकील नेमण्याचा अधिकार असावा.

**३) अमेरिकेच्या टाऊनशेड हॅरिसचे आगमन व करार - २९ जुलै १८५८ :**

जपानमधील अमेरिकेचा पहिला वकील म्हणून टाऊनशेड हॅरिस याची ऑगस्ट १८५६ मध्ये नियुक्ती झाली. कानागावच्या तहामुळे जपानची जनता नाराज होती त्यामुळे हॅरिसचे स्वागत केले नाही. त्याला जपानमध्ये मोठा त्रास सहन करावा लागला. ज्या सवलती मिळाल्या होत्या, त्यामध्ये हॅरिसन समाधानी नव्हता. येडो येथे हॅरिस व शोगून यांच्यात भेट २९ जुलै १८५८ रोजी झाली. त्याच वेळी त्यांच्यात करार झाला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे.

१) दोन्ही देशांनी राजधानीच्या शहरात राजनैतिक प्रतिनिधी ठेवावेत.

२) नागासाकी, कानागावा, निगाता, ह्युगो ही चार बंदरे व्यापाराकरिता खुली करावीत.

३) ओसाका व येडो येथे राहण्याची परवानगी द्यावी.

४) पाश्चिमात्त्य नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य असावे.

५) आयात-निर्यातीवरील कर निश्चित करावा.

६) अमेरिकन नागरिकांचे खटले अमेरिकन कोर्टात अमेरिकन कायद्याप्रमाणे चालवावेत हे मान्य करावे.

**४) जपान आणि ब्रिटन संबंध :**

जपानमध्ये ब्रिटनचा वकील रिचर्डसन याच्यावर हल्ला करुन सन १८६२ मध्ये ठार मारले. त्यामुळे संतप्त होऊन ब्रिटनने जपानकडे पुढील मागण्या केल्या -

१) जपान सरकारने दिलगिरी व्यक्त करावी.

२) शासनाने १ लाख पौडांची नुकसान भरपाई द्यावी.

३) सत्सुमा कुटुंबाकडून २५०० पौंडाची मागणी केली.

४) रिचर्डसनच्या खुन्याला ब्रिटिश अधिकार्याच्या उपस्थितीत वध करावा.

जुन १८६३ मध्ये जपानमध्ये अंतर्गत कलह सुरु झाला. ब्रिटिशांच्या मागण्या शोगूनाने मान्य केला. चोशू कुटुंबाचे पाश्चिमात्त्यांना हाकलून देण्याचे ठरवले. इ.स. १८६४ मध्ये चोशू कुटुंबाचा पराभव झाला व ३० लाख पौडांची मागणी केली. त्यांनी सत्सुमांचा पराभव केला. त्यामुळे ब्रिटिशांच्या मागण्या बादशहाने मान्य केल्या त्या पुढीलप्रमाणे -

१) जपानच्या बादशहाने नुकसान भरपाई देण्याचे कबुल केले.

२) आयात-निर्यात कर ५ टक्के मान्य केला.

३) ओसाका आणि हयोगी ही बंदरे खुली करण्यास विरोध केला.

४) करारनाम्याला मान्यता दिली.

munotes.in

तोकुगाव शोगूनाची सत्ता नष्ट करुन राजसत्तेची पुनर्स्थापना झाली. ३ जानेवारी १८६८ रोजी शोगूनाला दिलेले अधिकार व जमीन परत घेतली, असे सम्राटाने जाहीर केले. मुत्सुहितो या १५ वर्षाच्या युवराजाला राजपद दिले. त्याने 'मैजी' ही पदवी धारण करुन राज्य कारभार सुरु केला. मैजी याचा अर्थ सुसंस्कृत शासन म्हणजे कल्याणकारी शासन होय. इ.स. १८६८ ते १९१२ पर्यंत जपानमध्ये मैजीचा काळ होता. मैजी काळापासून जपानच्या आधुनिक युगास प्रारंभ झाला. त्यामुळे जपान एक जागतिक सत्ता म्हणून पुढच्या काळात उदयास आले.

**आपली प्रगती तपासा :**

१) जपानमध्ये युरोपियनचे आगमन स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**९.४.२ जपान - चीन युद्ध - १८९४-९५ :**

अतिपूर्वेकडील राजकारणात चीन-जपान युद्धाला महत्त्वाचे स्थान आहे. हे युद्ध कोरियावरुन झाले. मैजी सुधारणेमुळे जापनचा विकास झाला. वसाहतीची गरज होती. साम्रज्यविस्तारासाठी जपान-चीन यांच्यात इ.स. १८९४-९५ मध्ये युद्ध झाले. जपानच्या अंतर्गत विकासामुळे व्यापारपेठेची गरज होती. त्यास चीनने विरोध केला. जपानी प्रवासी, नागरिक यांना त्रास होत असल्याने मैजीने पुढाकार घेतला. इ.स. १८७१ मध्ये काऊंट इनो व लि-हंग-चांग यांच्यात तिटएन्स्टिन करार झाला. त्यामुळे त्यांच्यात मैत्री संबंध स्थापन झाले. लुछू बेटावरुन जपान-चीन यांच्यात वाद सुरु झाला. या बेटावरील लोक आपले आहेत असा दावा दोघांनी केला. इ.स. १८७८ मध्ये फोर्मासा बेटाजवळ रानटी लोकांनी गलबत फोडले. त्या लोकांची हत्या केली त्याबद्दल जपानने चीनकडे नुकसान भरपाई मागितली. त्यातून युद्धाची पार्श्वभूमी तयार झाली.

**अ) जपान-चीन युद्धाची कारणे :**

**१) जपानच्या दृष्टीने कोरियाचे महत्त्व :**

जपान-कोरियामध्ये कोरियाची सामुद्रधुनी असून १०० मैलांचे अंतर होते. कोरियात कोळसा, लोखंड, ग्रॅफाईट, जस्त, इतर महत्त्वाची साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर होती. नैसर्गिक बंदरे, नद्यांचे जाळे, जलप्रवाहाचा जलविद्युत शक्तीसाठी उपयोग करणे या सर्वांचा उद्योगिकरणाच्या दृष्टीने उपयोग होता. त्यामुळे जपानच्या साम्रज्यवादी धोरणाला कोरिया बळी पडला.

**२) कोरिया एक स्वतंत्र राष्ट्र-चीनची भूमिका :**

इ.स. १८७५ मध्ये जपानने चीन-कोरियात शिष्टमंडळ पाठवले. कोरियात तहाची मागणी केली. नकार दिल्याने लष्कर पाठवले. २६ फ्रेब्रुवारी १८७६ मध्ये जपान-कोरिया यांच्यात कानागावाच्या तह झाला व मैत्री संबंध स्थापन केले. कोरिया स्वतंत्र राष्ट्र असून त्याला सार्वभौम अधिकार आहे याला चीनने विरोध न करता मान्यता दिली. त्यामुळे कोरिया चीनपासून वेगळा झाला. कोरियावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी जपानचे प्रयत्न सुरु झाले.

**३) कोरियाबाबत अमेरिकेचे धोरण :**

जपानने कोरियाशी करार केल्यानंतर अमेरिकन संबंध निर्माण केले. जपानचे वर्चस्व वाढू नये या हेतूने चीनने कोरियाला पश्चिम राष्ट्राबरोबर संबंध ठेवण्यास प्रोत्साहन दिले. इ.स. १८८२ ला चीनच्या प्रयत्नाने कोरिया-अमेरिका करार झाला. इंग्लंड, जर्मनी, इटली, रशिया, फ्रान्स इ. राष्ट्रांनी कोरियाला सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली. त्यामुळे जपानला संधी मिळाली.

**४) कोरियामधील अंतर्गत परिस्थिती :**

कोरियाच्या राजघराण्यात गृहकलहाची आग निर्माण झाली. त्यामुळे जपानच्या आक्रमणाला प्रतिकार केला नाही. दरबारात दोन गट असल्याने सत्तास्पर्धा, कारस्थाने, खून, रक्तपात याला ऊत आला होता. सामान्य जनता कष्ट करुनही त्यांच्याकडे पैसा नसे. कारण दरबारी मंडळी, नोकरशाही अधिकारी, राजा इ. त्यांचे शोषण करत असत. स्थानिक जनता उठाव करत असे तेव्हा अधिकारी बदलत असत. चीनमध्ये राणीने सत्ता हाती घेतली. तिने अलिप्ततेचे धोरण सोडून इतर राष्ट्रांशी संबंध जोडले. त्यामुळे जपानला धोका निर्माण झाला. इ.स. १८८१ मध्ये मोठा दुष्काळ पडला याचा फायदा घेऊन तैबुकनने राणीविरुद्ध उठाव केला. परकियांमुळे देवाचा कोप झाला म्हणून देशात मोठा दुष्काळ पडला, ही भावना जनतेत निर्माण केली. राणीला मारण्यासाठी लोक राजवड्यावर आले त्यावेळी संघर्ष झाला. जपानने या संधीचा फायदा घेऊन ९ जानेवारी १८८५ मध्ये कोरियाबरोबर तह केला.

**५) रशियाचा हस्तक्षेप :**

रशियाने उत्तर आशियावर प्रभुत्व निर्माण केले. दक्षिण आशियावर आपले प्रभुत्व असावे असा रशियाचा विचार होता. सन १८७१ च्या टिएन्स्टीन करारानुसार कारियात सैन्याचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात केली. कोरियाने रशियाला नाविक दलाला लाझारेफचे बंदर दिले. रशियाने लष्करी अधिकारी पाठवले. त्यामुळे जपानला भीती वाटू लागली. कोरियाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला. यामुळे जपान-चीन वाद मिटवून लाझारेफ बंदराविषयीचा करार रद्द करावा ही मागणी केली. वाद मिटवण्यासाठी अमेरिकेने सल्लागार नेमले. कोरिया हे चीनचे मांडलिक राष्ट्र अमेरिकेने अमान्य केले.

**६) जपान-चीन युद्धाचे तात्कालिक कारण :**

कोरियामध्ये तोंग-हाक पंथाने उठअव केला. कोरियाने या पंथावर बंदी घातली होती ती उठवण्यासाठी इ.स. १८७४ मध्ये उठाव केला. कोरियाने चीनची लष्करी मदत मागितली. चीनने कोरियात लष्कर पाठवले. ही बातमी जपानला समजताच जपाननेही सैन्य पाठवले. कोरिया शासनाने उठाव नष्ट केला. दोन्ही देशांना सैन्य परत घेण्यास सांगितले. परंतु सैन्य परत न घेता सैन्यात वाढ केली. जपानने चीनसमोर कोरियाबाबत प्रस्ताव मांडला. चीनने अमान्य केल्याने युद्ध झाले. मालू नदीच्या तोंडाशी चिनी आरमारावर हल्ला चढवून जपानने चीनचा पराभव केला. शेवटी तह झाला.

**ब) शिमोनोसेकीचा तह - १७ एप्रिल १८९५ :**

१) चीनने कोरियाचे स्वातंत्र्य पूर्णत: मान्य करावे.

२) चीनने फॉर्मोसा, पेस्काडोर्स, दक्षिण मांचुरियातील लिआतुंग द्वीपकल्प जपानला द्यावे.

३) चीनने २० कोटी ताएल (टेल्स) युद्धखंडणी द्यावी.

४) चीनने जपानशी व्यापारी करार करुन १७ बंदरे खुली करावीत.

**क) इ.स. १८९४-९५ जपान-चीन युद्धाचे परिणाम :**

**१) पश्चिमी शक्तीवर प्रभाव :**

पाश्चिमात्त्य राष्ट्रांनी चीनबरोबर आतापर्यंत तह केले होते आणि अनेक सवलती मिळवल्या होत्या. परंतु जपान विजय आणि शिमोनोसेकीचा तह यामुळे चीनचा प्रदेश जास्तीत जास्त आपल्या वर्चस्वाखाली असावा हा विचार पाश्चिमात्त्य राष्ट्रांनी केला.

**२) जपानमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला :**

जपानने चीनवर मोठा विजय प्राप्त केल्याने जपानला आपल्या शक्ती व सामर्थ्याचा प्रत्यय आला. विशाल व कार्यक्षम सैन्याची अत्यंत आवश्यकता आहे याची जाणीव जपानला झाली. एवढेच नव्हे तर प्रशिक्षित सैन्य, देशप्रेम, आधुनिक शस्त्रास्त्रांची सुद्धा आवश्यकता आहे ही जाणीव जपानला झाली.

**३) चीनचे पाश्चिमात्त्यीकरण :**

युद्ध व पराजय यामुळे स्वत:चे आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात करीत असतात. चीनमध्ये असेच परीक्षण सुरु झाले. चुका नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. चीनच्या देशभक्तांनी पाश्चिमात्त्य संस्कृतीचे अध्ययन करुन नवीन सुधारणेची मागणी केली. याचाच परिणाम म्हणजे चीनमध्ये सुधारणावादी आंदोलन सुरु झाले. चीनने कोरियाला स्वतंत्र दर्जा दिल्याने असंतोषाची लाट निर्माण झाली. त्यातून पाश्चिमात्त्य योजना तयार केल्या.

**४) जपान-इंग्लंड यांच्या तह - १९०२ :**

जपानच्या विजयामुळे जपान-इंग्लंड यांच्यात जवळचे संबंध निर्माण होऊ लागले. जपानला लाओतुंग प्रदेश मिळाला. याला रशिया, जर्मनी, फ्रान्स यांचा विरोध होता. या प्रदेशावर आपले वर्चस्व असावे असे रशियाला वाटत होते. या तीन शक्तींशी लढण्याचे सामर्थ्य नाही म्हणून जपानने इंग्लंडशी तर युरोपच्या राजकारणात एकटे पडल्याने इंग्लंडने जपानशी मैत्री तह इ.स. १९०२ मध्ये केला.

**आपली प्रगती तपासा :**

१) जपान-चीन युद्धाची कारणे सांगा.

**९.४.३ जपान - इंग्लंड करार - ३० जानेवारी १९०२ :**

मैत्री क्रांतीनंतर दिवसेंदिवस जपान आक्रमक व साम्रज्यवादी बनू लागले होते. जपानने इ.स. १८९४-९५ मध्ये चीनचा पराभव करुन आशियाई देशात सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून मान मिळवला. जपानमध्ये शांततावादापेक्षा साम्रज्यवादाला जास्त महत्त्व होते. मांचूरिया-कोरिया ताब्यात घेतल्यानंतर गरज वाढली. त्यानुसार पाश्चिमात्त्य राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध जोडावेत, चीन-कोरियाबरोबरच संबंध दृढ मैत्रीचे संबंध ठेवावेत. रशियाशी मैत्रीचे संबंध प्रस्तावित करुन हितसंबंध निश्चित करावे, पण रशियाने अमान्य केल्यामुळे इंग्लंडशी मैत्रीचे संबंध जोडले. त्याची कारणे

**अ) जपानला मित्र मिळवण्याची गरज :**

**१) लिओतुंग व पोर्ट ऑर्थर परत दिल्याचे दु:ख :**

१७ एप्रिल इ.स. १८९५ रोजी चीनबरोबर शिमोनोसेकीचा तह केला. त्यावेळी दोन बंदरे जपानला मिळाली; परंतु रशियाला भीती वाटू लागल्याने रशिया, जर्मनी, फ्रान्स या तीन राष्ट्रांमुळे लिओतुंग व पोर्ट ऑर्थर चीनला परत करावे लागले आणि ३ कोटी नुकसान भरपाई घेतली याचे जपानला दु:ख होते. रशियाचा पराभव करण्यासाठी इंग्लंडशी तह केला.

**२) रशियाचे आशियातील साम्रज्य विस्तारवादी धोरणास बंदी :**

रशियाने इ.स. १८९७ मध्ये चीनकडून पोर्ट ऑर्थरचा प्रदेश ताब्यात घेतला. ट्रान्स सैबेरियन रेल्वेसाठी चीनकडून नवीन सवलती मिळवल्या. रशियाची कृती पाहून जपानने रशियाला प्रतिबंध करण्याचे धोरण निश्चित केले. मांचुरियावर वर्चस्व रशिया स्थापण्याची जपानला भीती वाटू लागल्याने, रशियाचे धोरण थांबवण्यासाठी इंग्लंडशी युती केली. त्याचप्रमाणे चीनमधली बॉक्सर बंडाचे निमित्त करुन चीनला लष्करी मदत दिली. सैन्य परत न घेता मांचुरियातील रेल्वेच्या रक्षणासाठी सैन्य कायम ठेवावे आणि मांचुरिया कायम ताब्यात घ्यावा, हा रशियाचा विचार होता.

munotes.in

**३) रशियाच्या पराभवासाठी :**

जपानमधील साम्रज्यवादी गटांच्या प्रमुखांना एकट्या रशियाशी युद्ध करुन पराभव करणे अवघड नव्हते, पण रशियाने जर इतर राष्ट्रांशी मैत्री केल्याने अवघड होते म्हणून मित्र मिळवणे गरजेचे होते.

**४) इंग्लंडविषयी आपुलकीमुळे :**

तीन राष्ट्रांच्या हस्तक्षेपात इंग्लंड नव्हते. आतापर्यंत संघर्ष नव्हता म्हणून मैत्रि करणे शक्य झाले.

**ब) इंग्लंडलाही मित्र मिळवण्याची गरज :**

१९ व्या शतकात आंतरराष्ट्रीय कराराच्या संदर्भातील अलिप्ततेच्या धोरणाचे पालन केले. याच काळात इ.स. १८७९ ऑसिट्रिया-जर्मनी, इ.स. १८८२ ऑस्ट्रेलिया-जर्मनी-इटली तर इ.स. १८९४ रशिया-फ्रान्स करार झाला. इंग्लंड-युरोपच्या राजकारणात एकटेच भासू लागले त्यामुळे मित्र मिळवण्याची गरज होती. त्याची कारणे पुढीलप्रमाणे -

**१) आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थान टिकविण्यासाठी :**

आफ्रिकेतील कॅशोदा व बोअर युद्धाच्या वेळी पाश्चिमात्त्य लोकांनी बोअरची बाजू घेऊन इंग्लंडवर टीका केल्या. म्हणून स्थान टिकविण्यासाठी मित्राची गरज होती.

**२) जर्मनीने आरमारात प्रचंड सुधारणा :**

कैसर विल्यमने इंग्लंडबरोबर संघर्ष करण्यासाठी नाविक सामर्थ्यास प्रचंड स्वरूपाची वाढ केली. त्यामुळे युरोपियन राष्ट्रांत आरमारी स्थान कायमचे टिकवण्यासाठी गरज इंग्लंडला वाटू लागली. आरमारी दल, वसाहतीच्या संरक्षणासाठी पॅसिफिक महासागर महत्त्वाचा होता. जपानसारख्या कार्यक्षम राष्ट्राशी तह केल्यास पॅसिफिकमधून आरमार परत मायदेशी आणणे इंग्लंडला शक्य होणार होते.

**३) रशियाची स्थिती :**

रशियाच्या अतिपूर्वेकडील साम्रज्यविस्तारामुळे ब्रिटिशांत मोठा प्रश्न निर्माण झाला. मांचुरिया, कोरिया ताब्यात घेतल्यास रशिया ब्रिटिशांच्या ताब्यातील भारत व इतर वसाहतीवर आक्रमण करणार ही भीती वाटू लागली. चीन असामर्थ्य असल्याने जपानशी मैत्री.

**४) जर्मनीकडून धिक्कार :**

इंग्लंडने अलिप्ततेचा त्याग करुन जर्मनीशी मैत्रीचे संबंध जोडण्याचा प्रयत्न केला; परंतु कैसर विल्यमने अमान्य केले. त्यामुळे जपानशी मैत्रीचा तह.

**क) जपान - इंग्लंड मैत्री करार ३० जानेवारी १९०२ :**

ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॅन्सडाउन आणि जपानीहून हायशी तादासू यांच्यात वाटाघाटी होऊन करार झाला. त्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे.

१) दोघांनी चीन-कोरियाची परिस्थिती कायम ठेवणे.
२) इंग्लंडने चीनमध्ये तर जपानने चीन-कोरियात सत्ता वाढ.
३) हितसंबंधाच्या रक्षणासाठी एकत्र उपाययोजना करावी.
४) युद्धात एकापेक्षा जास्त उतरण्यास आपल्या मित्राला सैन्यासह मदत करावी.
५) आपल्या हितास बाधा येईल असा तह दुसर्याबरोबर करु नये.
६) परस्परात मतभेद झाल्यास एकत्र येऊन विचारविनिमय करुन दूर करावे.

इ.स. १९०५ मध्ये या तहात दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर इ.स. १९१०, इ.स. १९१२ पर्यंत हा करार टिकून राहिला. इ.स. १९२१ च्या वॉशिंग्टन परिषद बोलावली त्या वेळी या कराराचा शेवट झाला.

**९.४.४ जपान-रशिया युद्ध - १९०४-०५ :**

रशिया आणि जपान यांच्यात इ.स. १७८० मध्ये प्रथम संबंध आला. सेमेरिया किनारपट्टीवर जपानी बोट वादळात सापडल्याने रशियाने त्यामध्ये असणार्या खलाशांना इवूर्टस्क या शहरात आश्रय दिला. भूमध्य सागरापासून ते प्रशांत महासागरापर्यंत आपले वर्चस्व निर्माण करण्याचा विचार जपानी खलाशांच्या पुढे मांडला. परत आल्यानंतर शोगुनाला ही सर्व हकीकत सांगितली. इ.स. १८५३ ते इ.स. १८५४ मध्ये अमेरिकेचा लष्करी अधिकारी कमोडोर मॅथ्यू पेरी हा जपानमध्ये आला. त्याने जपानबरोबर इ.स. १८५४ मध्ये कानागावचा तह करुन व्यापारी आणि धर्मप्रसाराच्या सवलती मिळविल्या. या वेळी रशियाने जपानशी मैत्रीचे संबंध ठेवून इ.स. १६६२ मध्ये मैत्री करार केला. ६ फेब्रुवारी १८६७ रोजी जपानमध्ये मेईजी क्रांती होऊन सर्व सत्ता जपानचा सम्रट मुत्सोहितो याकडे आली. त्याने ६ एप्रिल १८६७ रोजी आपल्या कारकिर्दीचा आढावा देण्यासाठी पंचसूत्री कार्यक्रम जाहीर केला. त्याच्याआधारेच आपला सर्वांगीण विकास करुन परराष्ट्रीय धोरण खंबीरपणे राबविण्याची योजना घेतली व धोरण स्विकारले. आपल्या शेजारीच असणार्या चीन या देशात साम्रज्यविस्तार करण्याचा प्रयत्न सुरु केला. यातून इ.स. १८९४-९५ मध्ये चीन-जपान युद्ध झाले. शिमोनो-सिकीचा तह होऊन चीन-जपान युद्धाचा शेवट झाला. या तहाच्या वेळी लिओतुंग हा प्रदेश जपानला देण्यात आला. परंतु हा प्रदेश चीनच्या राजधानीजवळ असल्याने त्याला धोका निर्माण होऊ शकेल. यामुळे रशिया, फ्रान्स आणि जर्मनी या तीन बड्या राष्ट्रांनी मध्यस्थी करुन लिओतुंग हा प्रदेश परत चीनला दिला. याचे दु:ख जपानच्या मनामध्ये होते.

**अ) रशिया-जपान यांच्या युद्धाची कारणे :**

**१) तीन बड्या राष्ट्रांचा हस्तक्षेप :**

चीन-जपान युद्धाच्या वेळी रशियाने फ्रान्स आणि जर्मनीच्या मध्यस्थीने जपानवर दडपण आणले. जपानला मिळालेला प्रदेश लिओतुंग हा परत चीनला द्यावा लागला. याचे दु:ख जपनाच्या मनात होते. या संधीची वाट पाहत असताना माँचुरिया प्रकरणावरुन संधी उपलब्ध झाली आणि युद्धाला सुरुवात झाली.

**२) कोरियातील परिस्थितीचा फायदा घेऊन रशिया वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते :**

रशिया आणि जपान दोन्हीही देश चीनमध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते. जपान आपले वर्चस्व कोरियामध्ये प्रस्थापित करु पाहत होते. या विचाराला रशियाने विरोध केला. इ.स. १८९६ मध्ये कोरियात अंतर्गत बंडाळे निर्माण झाले. याचा फायदा घेउन रशियाने आपले सैन्य कोरियातील सेऊल या ठिकाणी पाठविले आणि वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. याच वेळी म्हणजे इ.स. १८९६ मध्ये यामागाता लोबानोव्ह येथे दोघांच्यात करार होऊन कोरियाबाबतचा वाद त्या ठिकाणी मिटविला. इ.स. १८९८ मध्ये उभयतांमध्ये नवीन करार झाला. या करारानुसार कोरियाचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडत्व राखावे हे मान्य केले. औद्योगिक आणि व्यापारी विकासाला रशियाने जपानला विरोध करु नये. तरी पण, रशियाने रेल्वे बांधकामाला सुरुवात केली. रेल्वे बांधकामाच्या नावाखाली मजुरांच्या स्वरूपात कोरियामध्ये प्रचंड लष्कर पाठविले. बाल्टिक समुद्रापासून, प्रशांत महासागरापर्यंत रशियाने आपली सत्ता वाढविली. परिणामी, जापनला त्याची भीती वाटू लागली. यातूनच युद्ध झाले.

**३) इंग्लंड-जपान मैत्री करार ३० जानेवारी १९०२ :**

रशियाच्या चीनमधील हालचाली रोखण्यासाठी आणि आपणाला एक सख्खा-पक्का मित्र मिळावा या दृष्टीने जपानने मैत्री करार केला तर इंग्लंडलाही जर्मनीबरोबर मैत्री करण्यास अपयश आले. शिवाय साम्यवादी रशियाच्या हालचाली रोखण्यासाठी व युरोपच्या राजकारणातील एकटेपणा दूर करण्यासाठी नव्या मित्राची गरज होती. दोघांच्या एकमेकांच्या गरजेतून ३० जानेवारी १९०२ रोजी इंग्लंड -जपान मैत्री करार झाला. हा मैत्री करार इंग्लंडचा परराष्ट्र मंत्री लॅन्स डाऊन व जपानचा प्रतिनिधी इन-हायाशी-तादासू यांच्यात बैठक होऊन सहकार्याच्या तत्त्वावर करार झाला. त्यामुळे जपानला एक सामर्थ्यशाली मित्र मिळाल्याने जपानमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

**४) जपानच्या रशियाकडे मागण्या जुलै १९०३ :**

रशियाचा माँचुरिया आणि कोरियात वाढता प्रभाव पाहून जपानने मुक्त व्यापारी धोरणाच्या माध्यमातून विरोध दर्शविला. कोरियाचे प्रादेशिक अखंडत्व, संरक्षण करुन माँचुरियातून सैन्य केव्हा माघार घेणार या संदर्भाचा खुलासा मागितला आणि शेवटी जपानचा प्रधानमंत्री कात्सुरा याने रशियाकडे आपल्या मागण्या सादर केल्या. त्या पुढीलप्रमाणे -

१) मांचुरियाचे प्रशासन चिनी सरकारकडे सोपवावे आणि रेल्वे संरक्षणासाठी रेल्वे संरक्षक ठेवावेत.
२) माँचुरियातील चीनचे सार्वभौमत्व मान्य करावे.
३) उभयतांनी मान्य केलेल्या करारानुसार रशियाचे माँचुरियातील हक्क जपान मान्य करील. इंग्लंड-जपान मैत्री करारानुसार जपानचे कोरियातील अधिकार राजकीय, सामाजिक, आर्थिक, व्यापारी रशियाने मान्य करावे.

**५) रशियाच्या जपानकडे मागण्या :**

१) दोन्ही राष्ट्रांनी कोरियाची एकात्मता मान्य करावी.

२) जपानचे कोरियातील खास हितसंबंध मान्य केले जातील. परंतु या मोबदल्यात जपानने माँचुरियात कोणत्याही प्रकारचे हस्तक्षेप करु नयेत.

**६) तात्कालिक कारण :**

जपानने रशियाचे अधिकार माँचुरियातील मान्य केले. परंतु रशियाने जपानचे कोरियातील अधिकार पूर्णपणे मान्य केले नाहीत. यामुळे दोघांच्यात समझोता झाला नाही. ६ फेब्रुवारी १९०४ रोजी जपानने रशियाचे राजनैतिक संबंध तोडून टाकले. ८ फेब्रुवारी रोजी जपानने पोर्ट आर्थरवर हल्ला चढविला आणि युद्धाला सुरुवात झाली. १० फ्रेबुवारी १९०४ ते ऑगस्ट १९०५ पर्यंत हे युद्ध सुरु होते. फ्रान्स, जर्मनी यांची रशियाला सहानुभूती होती तर इंग्लंड, अमेरिका यांनी जपानला आर्थिक मदत केली.

जपानी लष्कर अधिकारी कूरोकीन याने पोगथॉन येथे रशियन तुकडीचा पराभव केला. यालू नदीपर्यंत त्याने प्रवास करुन पूर्व कोरिया स्वतंत्र केला. १ मे १९०४ रोजी यालू नदी ओलांडून माँचुरियातील लिआवोतुंग या प्रदेशापर्यंत मजल मारली. २६ मे राजी जपानी लष्कराने नान्शान येथे रशियन लष्कराची रसद बंद केली. ऑगस्ट १९०४ मध्ये रशिया-जपान यांच्या मुख्य लष्करामध्ये संघर्ष होऊन रशियाने या युद्धात माघार घेतली.

**ब) पोर्ट स्माउथ करार - ६ सप्टेंबर १९०५ :**

जपान जसजसे आपल्या मुख्य तळापासून दूर जाऊ लागले तसतसे त्यांना आपल्या लष्कराला रसद पुरविणे अशक्य होऊ लागले. रशियाने सुद्धा या युद्धात मध्यस्थी करावी असे प्रयत्न सुरु केले होते. जपान आणि रशिया यांनी शांततेसाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना विनंती केली. त्यानुसार अमेरिकने आपल्या भावी जीवनाचा विचार करुन, पॅसिफिक महासागराचे महत्त्व ओळखून दोघांच्यात समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार पोर्टस्माउथ येथे बैठक होऊन ५ सप्टेंबर १९०५ रोजी करार झाला. त्यानुसार -

१) रशियाने १८७५ मध्ये घेतलेले जपानचे साखलीन बेट जपानला परत द्यावे.
२) कोरियामधील जपानचे विशेष हक्क रशियाने मान्य करावेत.
३) रशियाने लिओतुंग हे बेट जपानला परत द्यावे.
४) दोन्ही राष्ट्रांनी माँचुरियातील आपले लष्कर पाठीमागे घ्यावे आणि रशियाने रेल्वे संरक्षणासाठी रेल्वे गार्ड ठेवावेत.
५) माँचुरियातील रेल्वेचा दक्षिण विभाग जपानला द्यावा.
६) चीनचे माँचुरियातील सार्वभौमत्व मान्य करावे, परंतु चीनने व्यापार-उद्योग वाढविताना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करु नये.

**आपली प्रगती तपासा :**

१) जपान-रशिया युद्धाची कारणे सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

**९.४.५ जपान - आंतरराष्ट्रीय संबंध / महासत्ता म्हणून उदय :**

**१) जपान - फ्रान्स संबंध करार १० जून १९०७ :**

इंग्लंडने युरोपच्या राजकारणामध्ये एकटे असतानाच जपान बरोबर इ.स. १९०२ मध्ये करार केला. चीनमध्ये फ्रान्स आपले वर्चस्व निर्माण करत असतानाच, जपानला धोका निर्माण झाला. या भीतीमुळेच जपानने फ्रान्सबरोबर मैत्रीचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच १० जून १९०७ रोजी करार झाला. त्यानुसार

१) दोनी देशांनी चीनचे स्वातंत्र्य व प्रादेशिक अखंडत्व मानावे.
२) चीनमध्ये सर्व परकीय नागरिकांना समानतेची वागणूक द्यावी.
३) चीनमध्ये शांतता व सुरक्षितता राखण्याचे हक। दोघांनीही मान्य करावे.
४) फ्रान्सने चीनच्या क्वांग-तुंग-क्यासंग व युनान प्रांतामध्ये तर जपानने फुकिएन व मांगोलिया प्रांतांवर वर्चस्व प्रस्थापित करावे.

**२) जपान-रशिया संबंध :**

जपान-रशिया यांच्यात इ.स. १९०७, इ.स. १९१० आणि इ.स. १९१६ असे वेगवेगळे मैत्री करार होऊन त्या करारानुसार पुढीलप्रमाणे तरतुदी ठरल्या -

व्यापार व मासेमारी याबाबत राजकीय स्वरूपाचे दोन करार केले. चीनच्या साम्रज्याचे स्वातंत्र्य व प्रादेशिक हक्क मान्य करुन चीनमध्ये जैसे-थे परिस्थिती राखण्याचा प्रयत्न दोघांनी केला. रशिया, जपान करार नष्ट करण्याचा अमेरिकेने डॉलर राजनीतीचे तत्त्व वापरुन चीनमधील रशिया, जपान यांचे प्रभावक्षेत्र नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेच्या या प्रयत्नांमुळे इ.स. १९१६ मध्ये रशिया-जपान यांच्यात लष्करी करार झाला. हा करार रशियाने इ.स. १९६८ मध्ये जगाच्या नजरेसमोर आणला.

**३) जपान - कोरिया संबंध :**

इ.स. १९०४ मध्ये रशिया-जपान युद्धाच्या वेळी कोरिया तटस्थ राहिलेला होता. युद्ध संपल्यानंतर जपानने आपले लक्ष कोरियाकडे वळविले. कारण कोरिया राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा होता. रशिया-जपान यांच्यात इ.स. १९०५ मध्ये पोर्ट ऑर्थर करार झाल्यानंतर जपानने आपले लष्कर कोरियाच्या दिशेने पाठविले. तेव्हा इ.स. १९०५ मध्येच कोरियाबरोबर करार करुन काही तरतुदी जपानने कोरियावर लादल्या. कोरियामध्ये जपानचे वर्चस्व निर्माण होऊ लागल्याने अमेरिकने आपले शिष्टमंडळ कोरियामध्ये

munotes.in

कोरियाचे पालक म्हणून पाठविले. या वेळी जपानने अमेरिकेच्या धोरणाला विरोध केला आणि जपानने कोरियाबरोबर २९ ऑगस्ट १९१० रोजी करार करुन कोरियावर आपले वर्चस्व निर्माण केले.

**४) जपान-अमेरिका संबंध :**

अमेरिकेला चीनमध्ये स्वत:चे प्रभावक्षेत्र निर्माण करण्यासाठी कोणताही प्रदेश शिल्लक नव्हता. म्हणून अमेरिकेने चीनमध्ये मुक्तद्वार धोरणाचा स्वीकार केला. मुक्तद्वार धोरण म्हणजे ज्या देशाच्या ताब्यामध्ये जो प्रदेश असेल त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करणे. परंतु प्रत्येक राष्ट्राला प्रत्येक प्रांतामध्ये जाऊन मुक्तपणे व्यापार करता यावा, प्रत्येक प्रांतामध्ये प्रत्येक राष्ट्राला एकाच प्रकारची जकात व इतर कर असावेत.

या धोरणामधूनच पुन्हा माँचुरियाच्या संदर्भात अमेरिका व जपान यांच्यात ५ मे १९०८ मध्ये लवाद करार झाला. या करारानुसार जपानने शांतता धोरणाचा स्वीकार करुन आपले नाविक दल सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न सुरु केला. अमेरिकेने जपानच्या नाविक सामर्थ्य धोरणाला पाठिंबा दिला. कारण अमेरिकेला पॅसिफिक महासागरातील आपल्या नाविक दलाबद्दल जपानची भीती नष्ट होईल, यामुळे दोघांच्यात मैत्रीचे संबंध हळूहळू निर्माण होऊ लागले. परंतु अमेरिकेच्या डॉलर राजनीतीमुळे पुन्हा त्यांच्यात मतभेद झाले. अमेरिकेची डॉलर राजनीती म्हणजे शेजारील प्रांताला किंवा देशाला आर्थिक मदत देऊन आपले गुलाम बनविणे.

**५) जपान आणि पहिले महायुद्ध :**

युरोपमध्ये राजकारणात पहिले जागतिक महायुद्ध सुरु झाले. यावेळी जपानने आपला स्वार्थ साधण्यासाठी मांचुरिया, मंगोलियाबरोबर संपुर्ण आशियावर आपले नियंत्रण असावे. चीनवर कोणाचे वर्चस्व निर्माण होऊ नये यासाठी चीनला कोंडीत पकडण्यासाठी जपानने चीनकडे २१ मागण्या सादर केल्या. यावेळी जपानचा पंतप्रधान कौंट औकूमा याने जपानचा परराष्ट्रीय वकील हिओकी याच्यामार्फत २१ मागण्या चीन राष्ट्राध्यक्ष युआन-शिकाई याच्याकडे १८ जानेवारी १९१५ रोजी सादर केल्या. या मागण्यांचे पाच विभागात विभागणी केली आहे. ती पुढीलप्रमाणे -

**६) जपान आणि शांतता परिषद (१९१८) :**

दोस्त राष्ट्रांना विजय मिळाल्यानंतर त्यांनी ११ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीबरोबर शस्त्रबंदीचा शेवटचा करार करुन युद्धाचा शेवट केला. फ्रान्समधील पॅरिस येथे व्हर्साय राजवाड्याच्या आरसे महालात शांतता परिषद भरली. या परिषदेत जपानचा मॅकिनो-ताबू-आवो व व्हायकाऊंट हे दोन प्रतिनिधी हजर होते. या दोघांनी शांतता परिषदेमध्ये आपल्या मागण्या सादर केल्या. इ.स. १९१७ च्या गुप्त कराराने पॅसिफिक महासागरात असणारी जर्मनीच्या वर्चस्वाखालील मार्शल, कारोलिन्स बेटे जपानला द्यावीत. जर्मनीकडून जपानने चीनचा जो शाटुंग प्रदेश मिळविला आहे तो जपानच्या स्वाधीन करावा. राष्ट्रसंघाच्या प्रतिज्ञापत्रात समानतेचा अंतर्भाव करावा. म्हणजे जर्मनी व इतर पराभव राष्ट्रांच्या बरोबर करण्यात येणार्या तहांमध्ये त्या तत्त्वाला आपोआप स्थान मिळेल.

जपानने शांतता परिषदेवर बहिष्कार टाकू नये म्हणून सर्व राष्ट्रांनी जपानच्या मागण्या मान्य केल्या.

**७) लष्करवादाचा उदय व शेवट :**

जपानचा महासत्ता म्हणून उदय होत असताना लष्करवादाला पायबंद घालण्याचा वॉशिंग्टन परिषदेत प्रयत्न करण्यात आला. नंतरच्या दशकामध्ये जपानमध्ये लष्करवाद व अतिराष्ट्रवाद मोठ्या प्रमाणात उदयास आला. ब्लॅक ड्रॅगन सोसायटी व चेरी ब्लॉसम सोसायटी यांनी लष्करवाद व साम्रज्यवाद धोरण सुरु केले. त्याचप्रमाणे जपानमध्ये लष्करी शिक्षण, युद्धसाहित्य इत्यादीस प्रोत्साहन दिले. लष्करी सामर्थ्याचा जोरावर इ.स. १९३१ मध्ये माँचुरिया प्रकरण, इ.स. १९३७ मध्ये चीन-जपान दुसरे युद्ध झाले. दुसर्या महायुद्धाच्या काळात इ.स. १९३९ मध्ये पर्ल हार्बरवर आक्रमण केले. यातून लष्करवादाचे धोरण दिसून येते. दुसर्या महायुद्धात एक महासत्ता म्हणून भाग घेतला; परंतु पराभवामुळे महासत्तेचा शेवट झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) जपानचा महासत्ता म्हणून उदय स्पष्ट करा.

## ९.५ सारांश

युरोपियन शास्त्रज्ञांच्या व प्रवाशांच्या प्रयत्नाने आशिया व आफ्रिकेचा शोध लागला. सतत २०-२५ वर्षे संघर्ष करुन विभाजन केले. युरोपीय राष्ट्रांत प्रदेश विस्तारावरुन संघर्ष घडून आले. अखेर त्यांनी आपले वर्चस्व तेथे निर्माण केले. परंतु युरोपियन राष्ट्रांमुळे आफ्रिकेचा विकास झाला. तेथे औद्योगिक प्रगती व दळणवळणात सुधारणा झाली. लोकांतील रानटीपणा जाऊन राहणीमान सुधारले. त्यांची व्यापारी प्रगती होऊन आर्थिक पाठबळ वाढले. परंतु युरोपीय लोकांच्या स्वार्थीपणामुळे आशिया व आफ्रिकेतील लोकांत असंतोष निर्माण झाला. त्यांच्या गुलामगिरीतून मुक्ततेसाठी झगडू लागले. यामुळे या खंडातील राष्ट्रामध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला.

१९ व्या शतकामध्ये युरोपीयन राष्ट्रानी आशिया खंडात मोठ्या प्रमाणात साम्रज्य विस्तार केला. चीनमध्ये इंग्लंडने आपले वर्चस्व स्थापन केले. त्यातून अफू युद्ध झाले. इंग्लंडचे पिळवणुकीच्या धोरणामुळे चीनमध्ये जनजागृती मोठ्या प्रमाणावर झाली. त्यातून पाश्चात्त्यांना चीनमधून हाकलून लावण्यासाठी अनेक उठअव चळवळी झाल्या.

## ९.६ प्रश्न

१) साम्रज्यवादाचा अर्थ सांगून त्याची विविध कारणे सांगा.
२) साम्रज्यवादाचे फायदे व तोटे सांगा.
३) पहिल्या अफू युद्धाची कारणे व परिणाम सांगा.
४) दूसर्या अफू युद्धाचे स्वरूप स्पष्ट करा.
५) तायपिंग बंडाची कारणे स्वरूप सांगून परिणाम सांगा.
६) जपानमध्ये युरोपियनांचा प्रवेश या संदर्भात चर्चा करा.
७) जपान चीन युद्धाचे स्वरूप स्पष्ट करा.
८) जपान रशिया युद्धाची कारणे परिणाम सांगा.
९) जपानचा महासत्ता म्हणून उदय स्पष्ट करा.
१०) आशिया खंडातील वसाहतिक विस्तारावर चर्चा करा.

❖❖❖❖

munotes.in

# १०

# पहिले महायुद्ध

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्टे
१०.१ प्रस्तावना
१०.२ पहिले महायुद्ध
१०.३ पॅरिस शांतता परिषद
१०.४ व्हर्सायचा तह
१०.५ सारांश
१०.६ प्रश्न

## १०.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

१) महायुद्धास जबाबदार असणाऱ्या कारणाची जाणीव करुन घेणे.
२) महायुद्धाच्या काळातील दोस्त राष्ट्रांची व शत्रू राष्ट्रांची भूमिका बजावून घेणे.
३) महायुद्धाचे युरोप व जगावर झालेले परिणाम याचा अभ्यास करणे.
४) शांतता परिषदेसंदर्भात असणार्या अडचणी त्याची ध्येयधोरणे याची माहिती मिळवणे.
५) दोस्त राष्ट्रांनी परिषदेच्या माध्यमातून शत्रू राष्ट्रावर लादलेले तह त्यातील तरतुदीच्या परिणामांची माहिती मिळवणे.
६) राष्ट्रसंघाचा उगम व त्याची सनद व कलमे याची माहिती घेणे.
७) राष्ट्रसंघाच्या रचनेची माहिती घेऊन त्याच्या कार्याविषयी माहिती देणे.
८) राज्यक्रांती जबाबदार असणार्या घटकांची तपशीलवार नोंद घेणे.
९) राज्यक्रांतीचे परिणाम काय याचा अभ्यास करणे.

## १०.१ प्रस्तावना

बिस्मार्कच्या संघपद्धतीमुळे युरोपची दोन गटात विभागणी झाली. या दोन गटामध्ये सत्ता संघर्ष, वसाहतवाद, लष्करवाद, वंशवाद मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. त्यातूनच युरोपमध्ये पहिले महायुद्ध सुरु झाले. जर्मनीने विल्सनच्या शब्दावर विश्वास ठेवून युद्धबंदी



munotes.in

करारावर सही केली आणि पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. युरोपमध्ये शांतता आणि युरोपची पुनर्रचना करण्यासाठी पॅरीस येथे शांतता परिषद भरली. या परिषदेमध्ये जर्मनी आणि तिच्या दोस्त राष्ट्राबरोबर चर्चा न करता अनेक तह केले. जर्मनीसाठी व्हर्साचा तह केला. या तहाने जर्मनीची प्रादेशिक, आर्थिक, लष्करी शक्ती कमी करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाला. तसेच जगातील वाद, संघर्ष शांततेने सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना म्हणजे राष्ट्रसंघाची स्थापना केली. राष्ट्रसंघाच्या माध्यमातून राजकीय व आराजकीय कार्य मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

हे युद्ध सुरु असतानाच रशियात लेनीनच्या नेतृत्वाखाली राज्यक्रांती घडून आली. या क्रांतीने रशियातील झारची राजेशाही नष्ट करुन कामगारांचे राज्य स्थापन झाले. या रशियन राज्यक्रांतीचा रशियाबरोबरच जगाच्या राजकारणावरही मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

## १०.२ पहिले महायुद्ध

२० व्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे पहिले महायुद्ध होय. बाल्कन युद्धे संपली तरी लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान बनण्याचा प्रयत्न युरोपात चालू होता. साम्रज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षामुळे महायुद्ध पेटले होते. महायुद्ध म्हणजे १९ व्या शतकातील मानवी संस्कृतीने केलेल्या असामान्य प्रगतीतील अडथळा होय. इ.स. १९१४-१८ या काळात दोन युरोपियन राष्ट्रांच्या गटात झालेल्या युद्धाला जागतिक महायुद्ध म्हटले आहे. हे अतिशय विनाशकारी होते. युद्ध जवळजवळ ४ वर्ष ११ महिने म्हणजे १५६५ दिवस लढले. युद्धात बॉम्ब हल्ले, कत्तली, रोगराई, दुष्काळ मोठ्या प्रमाणात निर्माण झाला.

### १०.२.१ पहिल्या महायुद्धाची कारणे :

**१) बिस्मार्कची संघपद्धती जगाला शाप ठरली :**

बिस्मार्कने परराष्ट्रीय धोरणात फ्रान्सला एकाकी पडण्याचा प्रयत्न करत असताना, आपल्याला मित्र मिळवले. त्यातूनच इ.स. १८७९ जर्मनी-ऑस्ट्रिया यांच्यात लष्करी व मैत्री करार घडून आला तर इ.स. १८८२ इटालीला सामील करुन तीन देशांचा मैत्री करार घडवून आणला. याच वेळी रशिया व फ्रान्सची मैत्री होऊन दिली नाही; परंतु इ.स. १८९० मध्ये त्यांच्या जवळीक होऊन इ.स. १८९४ मध्ये फ्रान्स-रशिया मैत्री करार झाला. इंग्लंडला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकीपणाचे धोरण जाणवल्याने भीती वाटू लागली. त्याने जर्मनीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला. पण अपयश आले. इ.स. १९०२ मध्ये इंग्लंड-जपान मैत्री होऊन इ.स. १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स यांच्यात मैत्री झाल तर इ.स. १९०७ मध्ये यात रशिया सामील झाला. त्यामुळे इंग्लंड-फ्रान्स, रशिया, जपान हा एक गट झाला तर दुसरा जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, तुर्कस्थान, इटाली असा गट झाला. या दोन गटात परस्पर स्पर्धा व द्वेषभावना निर्माण झाली. बिस्माकने युरोपात तो गुप्त कराराचा

डोलारा उभारला. त्याची परिणती इ.स. १९१४ च्या महायुद्धात घडून आली व एकमेकातील गुप्त करार हा युरोपला शाप ठरला.

**२) राष्ट्रवादाची भावना उफाळू लागली :**

माणसाच्या मनात कुठे तरी खोलवर दडलेले काही विकार असतात. वेळप्रसंगी ते तो व्यक्त करुन अनेक हिंसक स्वरूपही धारण करते. आंतरराष्ट्रीय प्रश्न सहकार्याने व शांततेने न सुटल्याचे मुख्य कारण म्हणजे आंत्यतिक राष्ट्रवाद होय. राष्ट्राराष्ट्रांच्यातील संघर्ष सोडविण्यासाठी न्यायालयात त्यात नव्हते. युद्ध सज्ज, शस्त्रास्त्रनिर्मिती आणि युद्ध पेटविण्याचे प्रयत्न इ. स्वत:च्या राष्ट्राचे सत्य व मानवी श्रेष्ठतेपुढे अन्य समाजाला व नागरिकाला तुच्छ मानते. राष्ट्रवादामुळेच फ्रान्स अल्सेस-लॉरेन परत मिळवण्यासाठी धडपड करत तर इंग्लंड-जर्मनीचे वैर याच भावनेमुळे निर्माण झाले.

**३) लष्करीकरणाचे अतिरेकी धोरण :**

युरोपातील प्रमुख राष्ट्रात एकमेकांबद्दल विश्वास न राहिल्याने लष्करीकरणाचे धोरण अमलात आले. त्यामुळे खर्च वाढला. गुप्त करारामुळे परस्परविषयी संशय व अविश्वास निर्माण झाला. युरोप एक लष्करी छावणी बनली. बिस्मार्कच्या राजकारणाचे प्रमुख सूत्र म्हणजे लष्करीदृष्ट्या स्वायंपूर्ण बनवणे त्यामुळे इतरांना भीती वाटू लागल्याने त्यानेही लष्कराची वाढ केली. विनाशक व विध्वंसक शस्त्रांची निर्मिती केली. जर्मनीच्या विल्यम कैसरने नाविक दल अजिंक्य करुन इंग्लंडशी वैर निर्माण केले. त्यातूनच युद्धाला जवळ बोलवले.

**४) आर्थिक साम्रज्यवाद फोफावला :**

युरोपमध्ये १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती जन्माला आली आणि १९ व्या शतकात तिचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. त्यातूनच वसाहती, बाजारपेठा, कच्चा माल मिळविण्यासाठी सार्या युरोपात स्पर्धा सुरु झाली यातूनच त्यांच्या द्वेष निर्माण होऊन तो विकोपास गेला. प्रत्येकाला साम्रज्याची हाव सुटली. त्यातून आर्थिक संघर्षाला सुरुवात झाली. जर्मनीने आफ्रिकेत व अतिपूर्वीकडे वसाहती मिळवण्याच प्रयत्न सुरु केला त्यामुळे इंग्लंडने त्यास विरोध केला. त्यामुळे जर्मनी-इंग्लंड यांच्यात वैर झाले.

**५) कूटनीतीतील कमालीचा गुप्तपणा :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात कमालीचा गुप्तपणा होता. देशातील मंत्र्यांनाही कराराची माहिती नसे. त्यामुळे परस्पर अविश्वास व संशय निर्माण झाला. इ.स. १९०६ इंग्लंडचा विदेशी मंत्री सर एडवर्ड ग्रंथाने फ्रान्सशी लष्करी करार केला तरी पार्लमेंटला माहिती नव्हता. गुप्त नीतीमुळे विरोधी राष्ट्रे त्यांना आक्रमक व लष्करी करार समजून आपली युद्ध सिद्धांतात वाढवीत होते. महायुद्धानंतर ऐतिहासिक संशोधनानंतर हे कराराचे संरक्षण स्वरूप होते हे सिद्ध केले.

### ६) महत्त्वाकांक्षी कैसर विल्यम :

उद्योगप्रधान जर्मनीचे नेतृत्व कैसर विल्यम करत होता. तो विलक्षण महत्त्वाकांक्षी सत्ताधीश होता. युरोपात जर्मनीच्या नेतृत्वाखाली जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बाल्कन राष्ट्रे, तुर्कस्थान यांचे संघराज्याचे स्वप्न पाहत होता. तो अतिशय गर्विष्ठ, रागीट स्वभावाचा, जबर महत्त्वाकांक्षी होता. 'जर्मनी सर्वश्रेष्ठ बनावे किंवा सर्व नष्ट व्हावे', या घोषणेवर नितांत श्रद्धा होती. इंग्रजांबद्दल वाईट भावना होती. इ.स. १८७० नंतर नाविक दलाची प्रचंड वाढ करुन इंग्लंडला शह देण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या स्वभावामुळे पहिल्या महायुद्धाच्या खाईत जग लोटले.

### ७) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :

देशादेशातील संबंधावर नियंत्रणासाठी आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात होता; परंतु अंमलबजावणीसाठी संघटना अस्तित्वात नव्हती. पण गुप्त करार, कायदे मंडळ अंधारात ठेवले होते. हेग परिषदेने अनेक ठराव मांडले व पास केले. पण त्यांच्या नियंत्रणाला अर्थ नव्हता. सर्वमान्य सुप्रीम कोर्ट अस्तित्वात नव्हते. हेग परिषदेने युद्ध रोखण्याचे नियम पाळले नाही. त्यामुळे ते अपयशी ठरले. अनेक करार झाले, पण त्याविरोधी कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही.

### ८) वर्तमानपत्रांचा विषारी प्रचार :

युरोपातील वृत्तपत्रांनी जो प्रक्षोभक आणि विषारी प्रचार केला. त्यांनी एकमेकांविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध केले. वर्तमानपत्रांनी देशाची राष्ट्रीय भावना भडकविण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही प्रश्नांचा विचार शांतपणे न करता वर्तमानपत्रांनी अतिरिक्त वृत्त कथन केले. त्याचा लोकमतावर विपरीत परिणाम झाला. बिस्मार्कने वर्तमानपत्रांना दोष देताना सांगितले की, युरोपीय राजकारणातील सौहार्द वर्तमानत्रांनी विषारी लिखाणामुळे शांतता नाहीशी झाली व त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठा कटुपणा निर्माण झाला आहे. इंग्लंड -फ्रान्स, जर्मनी-इंग्लंड यांच्यातील वाद मोठ्या प्रमाणात निर्माण केला.

### ९) जर्मनीत प्रशियन संस्कृतीचे प्राबल्य :

इ.स. १८७० मध्ये जर्मनीचे एकीकरण करुन जर्मनीने प्रशियन संस्कृती आपलीशी करुन घेतली. त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. प्रशियाचा युद्धावर मोठा विश्वास होता. युद्धात जो विजय होईल त्याच्या बाजूने सत्य असते असे मत प्रशियन लोकांचे होते. युद्ध हीच सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे असे प्रशियाला वाटते. मिराबो म्हणतो की, 'प्रशियाचा राष्ट्रीय उद्योग युद्ध आहे', तर नित्शे म्हणतो की, 'युद्ध हे नेहमी चांगल्या कारणाकरिताच होत असते.' या तत्त्वज्ञानाचा जर्मन तरुण कोवळ्या मनावर मोठा सखोल ठसा उमटला होता. जगातील सर्व प्रश्न पाशवी बळानेच सुटतात ही जर्मन तरुणांत श्रद्धा होती. या तत्त्वज्ञानाची परिणती महायुद्धात घडून आली.

**१०) अस्लेस-लोरेनचे दु:ख फ्रान्सच्या मनात :**

इ.स. १८७१ जर्मनीचे पाशवी बळाचा उपयोग करुन फ्रान्सपासून अल्सेस-लॉरेन परगणे जबरदस्तीने हिसकावून घेतले होते. त्यामुळे फ्रान्स दुखावला होता. तो परत मिळवण्याकरिता कटिबद्ध झाला. फ्रान्सने सूडाची भावना सतत जागृत ठेवण्यासाठी, पॅरिसमध्ये स्ट्रास्टबर्गचा पुतळा उभारल्याने सतत आठवण राहिली. पॉल डेरुलीडच्या गीतामुळे सूडाची भावना जागृत झाली. मोरोक्को मिळवण्यात जर्मनीने अडथळा आणला. त्यामुळे सूडाची भावना फ्रान्समध्ये निर्माण झाली.

**११) तात्कालिक कारण - महायुद्धाला प्रारंभ :**

युरोपात स्फोटक वातावरणात भयंकर घटनेची ठिणगी पडली आणि महायुद्धाने पेट घेतला. ऑस्ट्रियन राजकुमाराचा खून हे त्याचे कारण होय. बाल्कन प्रदेशातील सर्बिया व ऑस्ट्रिया-हंगेरी यांच्यात अत्यंत कटु स्पर्धा निर्मान झाली. स्लाव्ह जमातीचे एकीकरणासाठी अनेक गुप्त करार झाले. ऑस्ट्रियन सम्राटाचा पुतण्या आर्यड्यूक फ्रान्सिस फर्डिनंड व त्यांची पत्नी हे दोघे बोस्निया प्रांताची राजधानी सरजेव्होला भेट देण्यासाठी गेले. तेव्हा २८ जून १९१४ रोजी भर रस्त्यात खून झाला. त्यामुळे मोठा प्रक्षोभ निर्माण झाला. या प्रकरणाची चौकशीअंती खुनी सर्बियन वंशाचा व सर्बियन अधिकार्यांनी शस्त्रे पुरविली ते स्पष्ट झाले. त्यामुळे ऑस्ट्रियन जनतेत सर्बियाविरुद्ध युद्धाची मागणी केली. अखेर २३ जुलै सर्बियास निर्वाणीचा संदेश पाठवला की, खुनाची चौकशी व ऑस्ट्रिया-हंगेरीविरोधी प्रचार बंद झाला पाहिजे, ही मागणी केली आणि त्याचे उत्तर ४८ तासात द्यावे; परंतु सर्बियाने या अटी अमान्य केल्या. हा वादाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर ठेवण्याला सर्बियाने तयारी दर्शविली. पण ऑस्ट्रियाने फेटाळून लावली. इंग्लंड, फ्रान्स, रशिया मध्यस्थीने ऑस्ट्रियाची मुदत वाढवण्याचा प्रयत्न केला, पन ते अमान्य केले. शेवटी फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, इटाली यांच्या बैठकीची मागणी केली. पण याला जर्मनीने विरोध केला. शेवटी ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बिया विरुद्ध युद्ध पुकारले.

**१२) युद्धात भाग घेण्याचे इतर देशांची कारणे :**

स्लाव्ह जमातीचे संरक्षण करणार्या रशियाला सर्बियाबाबत सहानुभूती वाटत होती. त्यामुळे बाल्कन प्रदेशातून तुर्कस्थानची हकालपट्टी करण्यास मदत केली तर आता बाल्कन प्रदेशातून ऑस्ट्रिया-हंगेरीची हकालपट्टी करण्यास रशियाने ३० जुलैला सर्बियाच्या मदतीसाठी फौजा पाठवल्या. त्यामुळे जर्मनीने रशियाला खलिता पाठवून १२ तासांच्या आत फौजा परत घेण्यास सांगितले; परंतु रशियाने अमान्य केले. त्यामुळे जर्मनीने १ ऑगस्टला रशियाविरुद्ध युद्ध पुकारले. जर्मनीने ऑस्ट्रियाला मदत केली म्हणून, फ्रान्सने रशियाला सर्व प्रकारचे सहकार्य केले. त्यामुळे जर्मनीने ३ ऑगस्ट रोजी फ्रान्सविरुद्ध युद्ध घोषित केले.

इ.स. १८३२ च्या करारानुसार बेल्जियमच्या तटस्थेची हमी इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया, ऑस्ट्रिया, रशियाने घेतली होती. परंतु जर्मनी बेल्जियममधून सैन्य नेण्याचे

munotes.in

ठरविले. त्यावेळी बेल्जियमला राजा अल्बर्टने विरोध केला; परंतु जर्मनीने न जुमानल्याने इंग्लंडने बेल्जियमच्या मदतीसाठी ४ ऑगस्टला जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. यावेळी इंग्लंड-फ्रान्स, रशिया विरुद्ध ऑस्ट्रिया हंगेरी जर्मनी असे दोन गट निर्माण झाले. जर्मनीच्या प्रभावामुळे ३ नोव्हेंबर १९१४ ला तुर्कस्थान जर्मन गटात सामील झाला. २३ ऑगस्ट १९१४ ला जपान इंग्लंड-फ्रान्सच्या गटात मिळाला. इटाली युद्ध सुरु झाल्यापासून तटस्थ होती. जर्मनीच्या त्रिमित्र करारात अर्थ वाटत नव्हता. कारण इटालीला ऑस्ट्रिया वर्चस्वाखाली इटालियन प्रदेशाची मुक्तता करावयाची होती. युद्ध सुरु झाल्यानंतर ९ महिन्यानंतर करार रद्द केला. मे १९९५ दोस्तांना इटाली मिळाला. इ.स. १९१७ रशियन क्रांती झाल्याने युद्धातून अंग काढून घेतले. त्यामुळे दोस्त दुबळे झाले. अमेरिकने जर्मनीविरुद्ध ३ एप्रिल १९१७ युद्धात प्रवेश केला व अनियंत्रित पाणबुड्यांवर युद्ध शेवटी जिंकले.

**आपली प्रगती तपासा :**

१) पहिल्या महायुद्धाची कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**१०.२.२ पहिल्या महायुद्धाचे परिणाम :**

**१) पहिल्या महायुद्धात अफाट प्राणहानी :**

हे युद्ध युरोपियन राष्ट्रे, आफ्रिका, आशिया खंडात झाले. तसेच ते जमीन, आकाश, पाणी या तिन्ही ठिकाणी लढले. या युद्धात जगातील २८ देशांनी भाग घेतला होता. १/१६ जगातील लोक अलिप्त राहिले होते. दोस्तांच्या बाजूने ४ कोटी २० लाख तर जर्मनीच्या बाजूने २ कोटी ३० लाख लोक लढले होते. या युद्धात १ कोटी ३० हजार सैन्य ठार झाले. २ कोटी २० लाख लोक जखमी झाले. यातील १/३ लोक कायमचे निकामीच झाले. ७० लाख शिपाई कैदीत पडले. या युद्धाचा एकूण खर्च ९५० अब्ज होता. त्यात एकट्या जर्मनीच्या ४ हजार कोटी पोंड खर्च झाला.

**२) पहिल्या महायुद्धामुळे आर्थिक हलाखी :**

युद्धकाळात शेती, उद्योगधंदे बंद पडले. युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी पैसा व माणसे खर्ची पडली. आवश्यक वस्तूंचा तुटवडा पडला. त्यामुळे महागाई, चलन फुगवटा मोठ्या प्रमाणात वाढला. परिणामी अमेरिकेकडून पैसा घेतला. युरोपातील कारखाने, खाणी, कालवे, रेल्वे सर्व उद्ध्वस्त झाले. त्यामुळे उत्पादन क्षमता कमी झाली.

**३) अमेरिकेचा बलाढ्य सत्ता म्हणून उदय :**

अमेरिकेमुळे दोस्त युद्धात विजयी झाले. अमेरिकेने अनेक राष्ट्रांशी व्यापारी करार केले होते. ती रक्कम परत मिळविण्यासाठी ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिका महायुद्धात उतरली आणि राजकारणात आपले प्रस्थ बसविले. दोस्तांना मदत करुन अर्थकारणावरही प्रभाव निर्माण केला. प्रत्येक गोष्टीत अमेरिकेशिवाय घडामोडी होत नसे. त्यामुळे अमेरिकेचे स्थान उंचावले. शिवाय ते युरोपचे धान्याचे कोठार होते. त्यामुळे अमेरिकेने जगाचे नेतृत्व करण्यास प्रारंभ केला.

**४) जर्मनीची दुरवस्था :**

जर्मनीचा युद्धात पराभव झाल्याने दोस्तांनी दंड जबरदस्त लादला होता. तहाच्या वाटाघाटीच्या वेळी जर्मनीचे म्हणणे ऐकून घेतले नाही. किरकोळ बाबतीतही जर्मनीचा अपमान केला जात असे. जर्मनीच्या वसाहती लुटल्या. शिवाय शस्त्रकपातीची सक्ती केली. जर्मनीचे सार्वभौमत्व संपवले त्यामुळे जर्मनीच्या मनात चीड निर्माण झाली.

**५) स्वयंनिर्णयाचे तत्त्व व सार्वमताचा कौल :**


विल्सनच्या स्वयंनिर्णयाचे तत्त्व दोस्तांनी आपल्या फायद्याचे होईल असेच राबवले. कोणत्याही प्रश्नावर सार्वमत घेऊन जनतेचा कौल असेल. त्याप्रमाणे सोडविणे जास्त इष्ट मानले. त्यानुसार जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान इ. साम्रज्य कोसळून नवीन लॅटिव्हिया, लियुवानिया, इस्टोनिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हाकिया इ. राष्ट्रे निर्माण झाली एकूण २१ राष्ट्रे नवीन झाली.

**६) युद्धाचा धसका राष्ट्रसंघाची निर्मिती :**

कोणताही प्रश्न संघर्ष युद्धाने सोडविण्यापेक्षा व सहकार्याने सोडविण्यासाठी आणि विल्सनच्या प्रेरणेने व प्रयत्नाने राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० झाली. कायम स्वरूपाची आंतरराष्ट्रीय संघटना प्रथम अस्तित्वात आली.युद्धातील हानी व वातावरणाचा धसका मनावर बसल्याने राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

**७) औद्योगिक क्रांतीस सुरुवात :**

युरोपातील सर्व कारखानदारी युद्धाच्या काळात उद्ध्वस्त झाली. त्यामुळे जगाच्या बाजारपेठेत पक्क्या मालाची गरज भासू लागली. ही युरोपची गरज भागवण्यासाठी अविकसित देशात औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली.




**८) हुकूमशहाचा उदय :**

युद्धानंतर अनेक देशात हुकूमशहांचा उदय झाला. त्याचे नवे तत्त्वज्ञान उदयाला आले. रशियाने बोल्शेव्हिकचे तत्त्वज्ञान सांगितले. त्यात कामगारांची हुकूमशाही अभिप्रेत केली होती. कार्ल मार्क्सच्या तत्त्वाप्रमाणे लेनिनचे नवे प्रयोग सुरु केले. नवे राजकीय व आर्थिक सिद्धांत मांडले. इटालीत मुसोलिनीने फॅसिझमचा पाया घातला. जर्मनीत हिटलरने नाझी पक्षाची हुकूमशाही अस्तित्वात आणल. यातून अनेक संघर्ष निर्माण झाले. त्यांनी प्रगतीत वाढ करण्यासाठी नवे संशोधन निर्माण केले. हायड्रोजन, अणुबॉम्बचा शोध लावला.

**९) वसाहतीमध्ये स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ :**

विल्सनच्या १४ तत्त्वानुसार स्वयंनिर्णयानुसार स्वातंत्र्याची मागणी वसाहतीने केली. त्यासाठी त्यांनी लोक जागृती करुन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न सुरु केला. राष्ट्रसंघाने ही वसाहतीचा राज्यकारभार सुधारण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे वसाहतीने स्वातंत्र्याची मागणी केली.



munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) पहिल्या महायुद्धाचे परिणाम स्पष्ट करा.

## १०.३ पॅरिस शांतता परिषद

२८ जुलै १९१४ रोजी जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली. जर्मनी ऑस्ट्रियाच्या बाजूने तुर्क, बल्गेरिया, हंगेरी यांनी भाग घेतला तर इंग्लंड फ्रान्सच्या बाजूने त्यांच्या वसाहती. चीन, जपान, इटाली, अमेरिका होती. अमेरिकेच्या युद्ध प्रवेशाने युद्धाचे चित्र बददले. १९ सप्टेंबर १९१८ रोजी बल्गेरियाने, ३१ ऑक्टोबर तुर्कस्थानने, ४ नोव्हेंबर ऑस्ट्रियाने शरणागती पत्करली. आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू, या विल्सनच्या शब्दावर विश्वास ठेवून १८ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने युद्धबंदी केली. यावेळी जो करार झाला त्यानुसार

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांनी जिंकलेला प्रदेश सोडून द्यावा.
२) जर्मनीने र्हाईन नदीपर्यंत फौजा मागे घ्याव्यात.
३) जर्मनीने ताबडतोब मोठी जहाजे व मोठ्या तोफा व युद्धसाहित्य दोस्तांच्या हवाली करावे.
४) जर्मनीने रशियाबरोबर केलेला ब्रेस्टील टोव्हास्क तह रद्द करावा.

शस्त्रबंदी सुरुवातीस ३६ दिवसांची होती. या काळात युरोपची पुनर्रचना केली जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु दोस्तांना शक्य न झाल्याने १३ डिसेंबर, १६ जानेवारी, १६ फेब्रुवारी अशी पुन्हा युद्धबंदी स्वीकारण्यात आली. या प्रत्येक वेळी ३३ दिवसांची मुदत स्विकारली होती. परंतु जानेवारी १९१९ मध्ये परिषदेच्या कामकाजास सुरुवात पॅरिस शहरात केली. कारण युद्धाचा जास्त ताण सहन केल्याने पॅरिसची निवड करुन फ्रान्सचा सन्मान केला. पराभूत राष्ट्रासह रशियाला परिषदेला बोलावले नव्हते. दोस्त आणि त्यांच्या वसाहती अशी एकूण ३२ देश या परिषदेला हजर होते.

**१) परिषदेचे ध्येय :**

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थानमधून राजेशाहीचे उच्चाटन करुन साम्रज्य नष्ट करायचे. तेथील प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देऊन युरोपची पुनर्रचना करायची.

२) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांच्या युरोपबाहेरील वसाहतीचे भवितव्य निश्चित करणे.

३) जर्मनी व तिच्या मित्रांकडून युद्धखंडणी वसूल करणे.

४) सर्व देशात शस्त्रकपात घडवून आणणे.

५) युद्धानंतरच्या समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करणे.

**२) परिषदेसमोरील अडचणी :**

१) परिषदेत उघड चर्चा यामुळे लोकमताचा दबाव येत असल्याने निर्णय घेणे कठीण होत असे.

२) परिषदेत भाग घेतलेली प्रचंड संख्या उपस्थित होती.

३) अनेक योजना व गुप्त तह यामुळे प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे अवघड होते.

४) पॅरिसची निवड हीच मुख्य अडचण होती.

५) युद्धखंडणी घेण्यावरुन वादविवाद निर्माण होत असे.

६) शस्त्रकपातीबाबत मतभेद होते.

७) निर्णय कमिटीतील राष्ट्रांचा सहभाग व चर्चा

**३) परिषदेतील महत्त्वाच्या व्यक्ती :**

१८ जानेवारी १९१९ रोजी व्हर्सायच्या प्रसिद्ध आरसे महालात परिषदेचे उद्घाटन झाले. या परिषदेतील फक्त नेत्यांना न्याय मिळाला. रशिया व पराभूत राष्ट्रांना प्रदेश नाकारला होता. एकूण ३२ देशांचे प्रतिनिधी हजर होते. निर्णयास विलंब पाहून १० बड्याने निर्णय घ्यावे त्यास सर्व प्रतिनिधींनी मान्यता द्यावी; परंतु पुन्हा विलंब लागला. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटाली, जपान या पाच बड्या राष्ट्रांनी निर्णय घ्यावे.

**अ) अमेरिकेचा अध्यक्ष विड्रो विल्सन :**

विल्सन हा सर्वात महत्त्वाची व्यक्ती असून अमेरिका युद्धात पडल्यापासून शांतता तह पूर्ण होईपर्यंत सर्व महत्त्वाची जबाबदारी विल्सनने पार पाडली. विल्सन ध्येयवादी, स्वप्नाळू वस्तुस्थितीकडे डोळे झाकणारा आदर्शाच्या मागे धावणारा नेता होता. काही काळ त्याने राज्यशास्त्राचा प्राध्यापकाचे काम केल्याने लबाड्या, फसवेगिरी माहीत नव्हती. लोकांच्या चांगुलपणावर विश्वास होता. साहजिकच विल्सनला व त्याच्या शब्दांना परिषदेत वजन प्राप्त झाले. विल्सनला शांततेचे वेड असल्याने जगात कायमची शांतता नांदावी यासाठी १४ कलमी योजना जाहीर केली. दोस्ताने व इंग्रज-फ्रेंचाने त्याच्या योजनेतील राष्ट्रसंघाची कल्पना उचलून धरली. राष्ट्रसंघ स्थापन झाला. जर कोणाला न्याय हवा जर अन्याय झाला तर राष्ट्रसंघाच्या माध्यमातून दूर करता यावे, असा विश्वास होता. पुढे व्हर्सायचा तह अमेरिकन सिनेटने फेटाळून राष्ट्रसंघावर बहिष्कार टाकला ही कृती जगाच्या दृष्टीने चुकीची ठरली.

**ब) फ्रान्सच्या पंतप्रधान जॉर्ज क्लेमेन्सीओ :**

हा पॅरिस शांतता परिषदेचा अध्यक्ष होता जर्मनीच्या आक्रमण धोरणामुळे फ्रान्समध्ये सतत सरकार कोलमडले जात होते; परंतु क्लेमेन्सीओने पराभूत फ्रान्सला युद्धोत्सुक बनवले. त्यामुळे शेवटपर्यंत युद्धात फ्रान्सने तग धरला त्याला अध्यक्ष बनवले. तो तिक्ष्ण बुद्धीचा, वृद्ध, अनुभवी, कुणाबद्दलही दयामाया नसलेला राजकारणी वाघ म्हणून ओळखला जात होता. तो स्वप्नाळू वृत्तीचा, भांडखोर स्वभावाचा परिषदेत बहुतेक वेळा झोपलेला असत. फ्रान्सच्या हितसंबंधाला धोका निर्माण होताच तो चवताळून उठत असे. जर्मनीबाबत तो अतिशय आग्रही होता. जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू बनवावे, जबर युद्धखंडणी लादून आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवावे, जर्मनी कधीच स्वत:च्या पायावर उभा राहू

नये, असे मत होते. तो मुत्सद्दी व राजकारणी डावपेच यात तरबेज होता. त्याला विनोदाची साथ लाभली होती. विनोद करुन सर्वांची टर उडवत असे.

**क) इंग्लंडचा लॉईड जॉर्ज :**

लॉईड जॉर्ज इंग्लंडचा प्रतिनिधी, परिषदेतील सर्वोत्तम नेता आणि लोकशाहीचा चाहता उदारमतवादाचा भोक्ता होता. साहजिकच जर्मनीला उदार वागणूक मिळेल अशी त्याच्याबद्दल अपेक्षा होती. मात्र तो वास्तववादी व लवचिक धोरणाचा असल्याने त्याने उदारमतवादाला मुरड घातली. कारण युद्धखंडणी वसूल करु यावर निवडणुका जिंकल्या होत्या.



त्यामुळे त्याच्या धोरणात बदल झाला. जर्मनीचे खच्चीकरण झाले पाहिजे, असे क्लेमेन्सीओचे मत तर जर्मनीला उदार व सन्मानाने वागवले पाहिजे, असे विल्सनचे मत. या दोन भिन्न विचारांतून समन्वय साधून जर्मनीवर तह लावला.

**ड) इटालीचा पंतप्रधान ओरलँडो :**

इटालीचा पंतप्रधान, विद्वान, कसलेला राजकारणी, फर्डा वक्ता, कायद्याचे विशेष अभ्यास असलेला म्हणून तो प्रसिद्ध होता. दुर्दैवाने परिषदेवर फारसा प्रभाव पाडता आला नाही. इ.स. १९१५ च्या लंडन तहानुसार जो प्रदेश प्राप्ती होणार होता तो विल्सनमुळे मिळाला नाही.

वरील चार देशांच्या प्रमुख नेत्यांशिवाय जपानचाही युद्ध जिंकण्यात वाटा होता. साहजिकच प्रतिनिधींचा बड्यांच्यात समावेश केला होता. मात्र जपानने युरोपच्या पुनर्रचनेबाबत रस घेतला नाही आणि अतिपूर्वेकडे आपले निर्विवाद श्रेष्ठत्व मिळावे अशी जपानची महत्त्वाकांक्षा होती. या गोष्टीची पूर्तता झाली. मात्र अमेरिकेने जपानला तीव्र विरोध केला होता.

**४) शांतता परिषदेचा आधारभूत गोष्टी :**

१) गुप्त तहांची अंमलबजावणी करणे अवघड
२) रशियन क्रांतीनुसार विचारविनिमय
३) अल्पसंख्याकांचा प्रश्नासंदर्भात चर्चा

४) बड्या राष्ट्रांच्या हितसंबंधातील गुंतागुंत
५) विल्सनच्या योजना

अमेरिकेचा अध्यक्ष विल्सन लोकशाहीवादी व शांततेचे वेड असलेला होता. साहजिकच त्याने अमेरिका युद्धापासून दूर ठेवण्याचा, युद्ध मिटवण्याचा, शांतता प्रस्थापित करण्याचा युद्धकाळात प्रयत्न केला. दुर्दैवाने या बाबतीत यश आले नाही. एवढेच नव्हे तर अगतिकपणे विल्सनला युद्धामध्ये उतरावे लागले. अमेरिकेच्या युद्ध प्रवेशावेळी १४ कलमी योजना, चार तत्त्वे, चार युद्ध ध्येय व वैशिष्ट्ये अशा विविध योजना जाहीर केल्या.

**१४ कलमी योजना ८ जानेवारी १९१८ :**

विल्सनने अमेरिकेच्या युद्ध घोषणेनंतर सिनेटपुढे भाषण करताना ८ जानेवारी १९१८ रोजी आपली १४ कलमी योजना जाहीर केली. या योजनेप्रमाणात जगाची आदर्श तत्त्वावर पुनर्रचना व्हावी. युद्ध कल्पनेला कायमचे तडीपास करता यावे व जगात कायमची शांतता नांदावी, अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार योजनेत तरतुदी केल्या.

१) गुप्त राजनीतीचा त्याग
२) सागर संचार स्वातंत्र
३) अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापार
४) वसाहतीचे संरक्षण व त्याची प्रगत राष्ट्रापुढे विश्वस्त म्हणून न्यायी वाटणी.
५) शस्त्रकपात
६) रशियातून दोस्तांनी फौजा परत बोलावणे
७) बेल्जियमच्या तटस्थेला सर्वांनी मान्यता द्यावी.
८) १८७१ मध्ये फ्रान्सवर झालेला अन्याय दूर करावा.
९) ऑस्ट्रिया हंगेरी यातील लोकांना
१०) राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वावर इटालीची स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा इटालीची फेररचना करावी.
११) सर्बिया, मॉटेनिग्रो व रुमानिया यांना परकीयांच्या जोखडातून मुक्त करावे.
१२) तुर्की साम्रज्याच्या प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा.
१३) स्वतंत्र पोलंडची निर्मिती करावी व पोलंडला समुद्रकिनारा मिळवून द्यावा.
१४) राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात यावी.

विल्सनने युरोपचा पुनर्रचनेबाबत या योजना जाहीर केल्या होत्या. विल्सनमुळे दोस्तांनी युद्ध जिंकले असल्याने या योजना वाऱ्यावर सोडून देता येत नव्हत्या. मात्र त्या जशाच्या तशा अमंलात आणता येत नव्हत्या. कारण एक तर या योजना प्रचारित स्वरूपाच्या होत्या. त्यात अनेक गोष्टी परस्परविरोधी असल्याने त्यांची अंमलबजावणी अशक्य होती.

**५) शांतता परिषदेचे कामकाज - १८ जानेवारी १९१९ :**

१८ जानेवारी १९१९ रोजी फ्रान्सच्या व्हर्साय येथील आरसे महाल राजवाड्यात जर्मन एकीकरणाच्या ४८ व्या वर्धापन दिनी फ्रान्सचा अध्यक्ष पॉईन केअर याने उद्घाटन केले. या परिषदेने मध्य युरोप, मध्य आशिया, अतिपूर्वेकडील प्रदेशाबाबत पुनर्रचना केली. या परिषदेने

१) जर्मनी बरोबर व्हर्सायचा तह २८ जून १९१९
२) ऑस्ट्रिया बरोबर सेंट जार्मेनचा तह १० सप्टेंबर १९१९
३) बल्गेरिया बरोबर न्यूलीचा तह २७ नोव्हेंबर १९१९
४) हंगेरी बरोबर टॉयनॉनचा तह ४ जून १९२०
५) तुर्कस्थान बरोबर सिव्हर्सचा तह १० ऑगस्ट १९२०.

या पाच तहांपैकी ४ तह पराभूत राष्ट्रांनी स्वीकारले. मात्र तुर्कस्थानच्या केमाल पाशाने सुलतानाला बडतर्फ करुन सिव्हर्सचा तह फेटाळून लावला.

**आपली प्रगती तपासा :**

१) विल्सनची १४ तत्त्वे सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १०.४ व्हर्सायचा तह

युद्धबंदीपूर्वी तह सन्मानाने व वाटाघाटीने करण्याचे आश्वासन विल्सनने दिले होते; परंतु प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटीसाठी बोलावले नाही. मसुदा जर्मनी पोचवण्यापूर्वी यातील तरतुदी समजल्याने जर्मनीने दुय्यम दर्जाचे अधिकार पाठवले. हा दोस्तांत अपमान वाटला शेवटी जर्मनीचा परराष्ट्रमंत्री रॅण्ड्यूझ पॅरिसला पाठवला. त्याचा अतिशय अपमान करण्यात आला. युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनीवर लादली. अखेर नाखुशीने व्हर्सायचा तह जर्मनीने स्वीकारला. या परिषदेत ३२ राष्ट्रांचे एकूण ७० प्रतिनिधी व त्यांचे सल्लागार मंडळ हजर होते. अखेर २८ जून १९१९ रोजी जर्मनीने तहावर सही करुन युद्ध संपवले.

### १०.४.१ व्हर्साय तहाच्या तरतुदी - २८ जून १९१९ :

पॅरिस शांतता परिषदेने जर्मनीवर लादलेला हा व्हर्सायचा तह अत्यंत महत्त्वाच्या आहे. कारण या तहाने जर्मनीवर भयंकर अन्याय केला. त्यामुळे जर्मनी सूडाने पेटली. यातूनच दुसरे महायुद्ध उद्भवले. म्हणूनच दुसर्या जागतिक महायुद्धाची बीजे व्हर्साय तहात होती, असे म्हटले जाते. व्हर्साय तह सुमारे १५ भागात २३० पानांचा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी त्याचे प्रादेशिक तरतुदी, लष्करी तरतुदी, आर्थिक तरतुदी, कायदेशीर तरतुदी व इतर तरतुदी अशा प्रकारे त्याचे वर्गीकरण केले जाते.

**अ) प्रादेशिक तरतुदी :**

व्हर्सायच्या तहाने जर्मनीला पश्चिम, उत्तर, पूर्व सीमेवर फार मोठ्या प्रदेशावर पाणी सोडावे लागले. जर्मनीला स्वत:च्या देशातील प्रदेश पुढीलप्रमाणे सोडावा लागला.

**१) जर्मनीची पश्चिम सीमा :**

जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत नैसर्गिक सरहद्द नव्हती. दोन वेळी जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केल्याने फ्रान्सने र्‍हाइनलँड प्रदेशाची मागणी केली व र्‍हाईन नदी नैसर्गिक सरहद्द ठरवावी परंतु १०० टक्के जर्मन असल्याने ते अमान्य केले व फ्रान्सच्या संरक्षणासाठी संरक्षण फळी तयार केली ती पुढीलप्रमाणे.

१) ऱ्हाईन नदीच्या पश्चिमेकडे ५२ किलोमीटर रुंदीचा जर्मन प्रदेश निर्लष्करी बनवावा.
२) या प्रदेशात १५ वर्षासाठी दोस्तांच्या फौजा ठेवाव्यात दर पाच वर्षाच्या अंतराने या फौजा काढून घ्याव्यात.
३) ऱ्हाईन नदीवरील पूल व मोक्याच्या ठिकाणी दोस्त राष्ट्रांच्या फौजांच्या ताब्यात असावीत.

**सार प्रांता संदर्भात धोरण :**

ऱ्हाईन लँड मिळवण्यात अपयश आल्याने फ्रान्सने या प्रदेशाच्या बाजूचा सार प्रांताची मागणी केली. तेथे बहुसंख्य जर्मन होते. मात्र जर्मनीने फ्रान्सच्या दगडी खाणी उद्ध्वस्त केल्या होत्या म्हणून फ्रान्सने या प्रदेशाची मागणी केली; परंतु त्याला नकार दिला. पण या प्रदेशातील दगडी कोळसा घेण्याचा अधिकार फ्रान्सला १५ वर्षांसाठी देण्यात आला. नंतर या प्रांताचे सार्वभौमत्व घेऊन फ्रान्स की जर्मनी यात सामील व्हावे हे तेथील जनतेच्या मनावर राहिली.

**२) जर्मनीची उत्तर सीमा :**

**बेल्जियमला प्रदेश :** या सीमेवर बेल्जियमची सरहद्द होती. जर्मनीने हल्ला करुन बेल्जियमचे प्रचंड नुकसान केले होते. याबद्दल बेल्जियमला नुकसान भरपाई मिळवून देण्याची गरज होती म्हणून या सरहद्दीवरील युपेन, मालमेडी मार्सनेट तीन जर्मन बंदरे बेल्लियमला दिली.

**डेन्मार्कची प्राप्ती :** व्हिएन्ना परिषदेने इलेरिवग प्रांत डेन्मार्कला दिला होता. इ.स. १८६४ मध्ये बिस्मार्कने डेन्मार्कचा पराभव करुन तो प्रांत जर्मनीला जोडला. मात्र या वेळी तो प्रांत डेन्मार्कला दिला.

**३) जर्मनीची पूर्व सीमा :**

**डॅन्मिक बंदर (डान्झिग बंदर) :** डान्झिग बंदर व परिसरातील सुमारे ७०० चौ.कि.मी. चा प्रदेश जर्मनीतून अलग करण्यात आला. हे बंदर आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सर्वांना खुले करण्यात आले. वास्तविक १३ व्या शतकात प्रशियाने वसवलेले हे बंदर वंशिक, धार्मिक, सांस्कृतिक ऐतिहासिक सर्वच दृष्टिने हे बंदर जर्मनीचे होते परंतु ते अलग करण्यात आले.

**पोलंडची निर्मिती :** या प्रदेशात पोलंड हे सर्वात दुर्दौवी राष्ट्र प्रशिया, ऑस्ट्रिया व रशिया या तीन बड्यांच्यामध्ये असलेला हा प्रदेश त्यांनी पोलंडचे अनेक वेळा आपापसात वाटणी

करुन स्वातंत्र्य नष्ट केले होते. विल्सनच्या १४ कलमी योजनेत पोलंडला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे व पोलंडला समुद्र किनारा देण्याचे आश्वासन दिले होते म्हणून व्हर्साय तहाने पूर्व प्रशियाचा फार मोठा प्रदेश पोलंडला देऊन स्वतंत्र, पोलंडची निर्मिती केली. डान्झिग बंदरचा २४० मैल लांब व ५० मैल रुंद अशी पोलंडला पोलिसांना कॉरिडॉर देण्यात आले.

**सायलेशियाची वाटणी :** सायलेशियाचा प्रदेश सार्वमताशिवाय मिळावा अशी झेकोस्लोव्हाकियाची मागणी होती; परंतु विल्सनने त्याला विरोध केला. मात्र सार्वमताच्या आधारे सायलेशियाचा काही भाग झेकोस्लोव्हाकिया व रुमानियाला देण्यात आला. मात्र या बदलामुळे जर्मन वंशाचे लोक पारतंत्र्यात होते. अनेक उद्योगधंदे, खाणी यास जर्मनीला मुकावे लागले.

**मेमेल बंदर :** व्हर्साय आणि हे बंदर तात्पुरते लिथुवानियाला दिले. इ.स. १९२३ मध्ये लिथुवानियाने आक्रमण करुन हे बंदर बळकावले. इ.स. १९२४ मध्ये राष्ट्रसंघाने याला मान्यता दिली.

**४) जर्मनीचा प्रादेशिक तोटा :**

व्हर्साय तहाने ६ दशलक्ष लोकसंख्या, २५ हजार चौ. मैलाचा प्रदेश जर्मनीला सोडून द्यावा लागला. यामुळे २ लक्ष जर्मन पारतंत्र्यात गेले. या तहामुळे ६५ टक्के लोखंड, ४५ टक्के कोळसा, ७२ टक्के झिंक व ५७ टक्के बीड उद्योगधंदे यास जर्मनीला मुकावे लागले.

**५) जर्मन वसाहती नष्ट :**

इ.स. १९१४ पर्यंत जर्मनीने इंग्लंड, फ्रान्सच्या खालोखाल प्रचंड साम्राज्य जिंकले होते. साम्रज्यवादी राष्ट्राकडून शोषण होते म्हणून त्या वसाहती काढून घ्याव्यात. विश्वस्त म्हणून राष्ट्रसंघाकडे सुपूर्द कराव्यात अशी विल्सनची मूळ कल्पना, जेत्यांनी या कल्पनेचा फायदा घेऊन जर्मनीच्या वसाहती राष्ट्रसंघाने काढून घेतल्या व विश्वस्त म्हणून त्या अन्य देशांना दिल्या त्या पुढीलप्रमाणे - १) कामेरून टोगोलँड - फ्रान्स २) जर्मनीच्या दक्षिण आफ्रिकेतील - इंग्लंडला ३) चीनमधील जर्मन प्रदेश व विषववृत्ताच्या उत्तरेकडील बेटे - जपान ४) विषवृत्ताच्या दक्षिणेकडील प्रदेश - ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड.

**तोटा :** या बदलामुळे सुमारे २५ दशलक्ष लोकसंख्या व १९ दशलक्ष चौ. मैलाचा प्रदेश याशिवाय या प्रदेशातील जर्मनीची गुंतवणूक जर्मनीच्या विविध कंपन्या, रेल्वे इ. जर्मनीला गमवावे लागले.

**ब) आर्थिक तरतुदी :**

**१) युद्धखंडणी :** व्हर्साय तहातील मुदत खंडणी ही तरतूद अतिशय अन्यायकारक व जर्मनीत संताप निर्माण करणारी होती. कारण विल्सनने आम्ही कोणावर युद्ध खंडणी लादणार नाही, असे जाहीर केले होते. मात्र जर्मनीकडे दोस्तांनी ५ नोव्हेंबर १९१८ रोजी युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी दोस्तांच्या नागरिकांची जी हानी झाली ती जर्मनीने भरुन द्यावी, अशी सूचना होती. त्यानुसार लष्कराची पेन्शन्स व मयत सैनिकाच्या विधवा

पत्नीला दिली जाणारी पेन्शन अशा मागण्या वाढत जाऊन शेवटी युद्धाचा सारा खर्च जर्मनीने भरुन द्यावा, अशी दोस्तांनी मागणी केली. व्हर्साय तहातील कलम नं. २३७ प्रमाणे दोस्त राष्ट्रे व युद्धातील त्याचे सहकारी युद्धाची जबाबदारी जर्मनीवर टाकत आहेत. जर्मनी तिचा स्विकार करत आहे. जर्मनीकडून नुकसान भरपाई घेण्याबाबत दोस्त राष्ट्रांत एकमत झाले. शेवटी जर्मनीने ५०० कोटी डॉलर्स सोने व वस्तुच्या रूपात दोस्तांना द्यावे, असे ठरले. दोस्तांच्या प्रत्येक देशाचे नुकसान भरपाईचा आकडा निश्चित करण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, इटाली, अमेरिका यांचा प्रत्येकी एक व बेल्जियम, डेन्मार्क, चीन, जपान इ. देशांचे पाच प्रतिनिधींचे कमिशन नेमले. त्या कमिशनने ६ अब्ज ७ कोटी डॉलर्स एवढी प्रचंड युद्धखंडणी जर्मनीवर लादली.

**२) व्यापारी निर्बंध :**

१) १६०० टन क्षमतेची सर्व जहाजे जर्मनीने नष्ट करावीत किंवा दोस्तांच्या हवाली करावीत.

२) यापेक्षा कमी क्षमतेची २५ टक्के व मासेमारीची २५ टक्के जहाजे नष्ट करावीत.

३) जर्मनीने पुढील पाच वर्षाच्या काळात दोन लक्ष टन क्षमतेची जहाजे दोस्तांस पुरवावीत.

४) जर्मनीचा भिल कालवा व स्टेरीन बंदर आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुले करण्यात यावे.

५) र्‍हाईन, डॅन्यूब, ओडर, निमेन एल्ब इ. जर्मनीतील मोठ्या नद्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुल्या करण्यात याव्यात.

६) जर्मनीला चीन व मोरोक्को मध्ये असलेले खास व्यापारी अधिकार काढून घेण्यात आले.

७) फ्रान्स, बेल्जियम, इटलीला १० वर्षापर्यंत दगडी कोळसा पुरवावा.

थोडक्यात जर्मनीवर प्रचंड युद्धखंडणी आणि अनेक व्यापारी निर्बंध लादून जर्मनीचे आर्थिक खच्चीकरण केले.

**क) लष्करी तरतुदी :**

जर्मनीने आपल्या लष्करी सामर्थ्याने हे युद्ध पेटवले होते. साहजिकच जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू बनवले तर पुन्हा अशी आपत्ती उद्भवणार नाही, म्हणून व्हर्साय तहाने जर्मनीवर पुढील लष्करी निर्बंध लादले.

१) जर्मनीतून सक्तीची लष्करी सेवा नष्ट करावी.

२) जर्मनीचे जास्तीत जास्त १ लाख खडी फौज ठेवावी.

३) या सैन्यातील शिपायाने कमीत कमी १२ वर्ष तर अधिकार्यांनी कमीत कमी २५ वर्षे नोकरी केली पाहिजे.

४) लष्कराबाहेर जर्मनीत कोणतेही लष्करी प्रशिक्षण देण्यात येऊ नये.

५) जर्मनीने जास्तीत जास्त १५ हजार आरमार ठेवावे व १५०० आरमारी अधिकारी ठेवावेत.

६) १० हजार टन क्षमतेपेक्षा जास्त अद्ययावत युद्धनौका नष्ट कराव्यात. ६ फुअर्स (नाव), १२ विनाशिका व १२ सुरुंग पेट्या या व्यतिरिक्त सर्व युद्ध साहित्य दोस्तांच्या हवाली करावे अथवा नष्ट करावे.

७) जर्मनीच्या पश्चिम किनार्यावर ५० कि.मी. रुंदीचा निर्लष्करी टापू बनवावा.

थोडक्यात जर्मनीच्या लष्कराचे खच्चीकरण करुन दुर्बल बनवले गेले.

**ड) कायदेशीर तरतुदी :**

व्हर्साय तहातील २३९ कलम युद्ध गुन्हेगाराबाबत आहे. जर्मन लोकांत प्रचंड संताप निर्माण करणारी ही तरतूद जर्मन नेत्यांनी युद्ध पेटवले. आंतरराष्ट्रीय निर्णय नियम करार पायदळी तुडवले म्हणून दोस्तांनी सुमारे १०० जर्मन नेत्यांची यादी तयार केली व त्याची न्यायालयीन चौकशी करण्याची तरतुदी करण्यात आली. एक नंबरचा आरोपी विल्यम कैसर हॉलडंला पळून गेला होता. हॉलंडने दोस्तांच्या ताब्यात देण्यास नकार दिला. चौकशीच्या वेळी जर्मन नेत्याच्या गुन्ह्याबरोबर दोस्तांचीही अनेक पापे चव्हाट्यावर आली असती. दोस्त सुद्धा या तरतुदीच्या अंमलबजावणीबाबत फारसे काटेकोर राहिले नाहीत. कारण नाममात्र या लोकांची न्यायालयीन चौकशी केली व जुजबी शिक्षा ठोठावल्या. या यादीतील दोन नंबरचा आरोपी रिचर्ड मार्शल, हिडेनबुर्ग होते. तो इ.स. १९२५ मध्ये जर्मन प्रजासत्ताकाचा अक्ष्यक्ष बनला. दोस्तांनी याला विरोध नव्हे तर त्याचा साधा निषेधसुद्धा केला नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्हर्साय तहातील प्रादेशिक तरतुदी स्पष्ट करा.

**१०.४.२ व्हर्साय तहाचे टीकात्मक परीक्षण :**

व्हर्साय तह हा आधुनिक जगाच्या इतिहासातील सर्वात वादग्रस्त दस्तावेज होय. या तहाचे जेवढे समर्थक आहेत तेवढेच टीकाकार आहेत. जर्मनीतील हा तह जुलमी, अन्यायी, स्वाभिमानाला धक्का देणारा, विश्वासघात करणारा असे वर्णन लोकांनी केले तर दोस्तांनी युरोपला कायमची शांतता देणारा तह असे म्हटले आहे. हा तह ध्येयवाद व व्यवहारात याची सांगड घातली जाते. यामुळे या तहाच्या वेळी अनेकांनी या तहावरुन जगात दुसर्या महायुद्धाची वाटचाल सुरु होईल, अशी भीती व्यक्त केली व पुढे ती भीती योग्य होती हे सिद्ध झाले.

**१) दोस्तांनी तह जर्मनीवर लादलेला होता :**

परस्पर देवाणघेवाण, वाटाघाटी केल्या नाहीत. जर्मन प्रतिनिधींना फक्त दोनदाच बोलावले. या परिषदेचा मसुदा स्वीकारताना व शेवटी तहावर सही करताना यामुळे हा तह आमच्यावर लादला अशी जर्मनीची भावना झाली. यामुळे जर्मनीचा स्वाभिमान दुखावला.

युद्ध करणे गुन्हा आहे पण पराभव पत्करणे गुन्हा नाही. परिषद जर्मनीला न्याय देण्यासाठी नाही तर जर्मनीची लूट करण्यासाठी आहे असे जर्मनीचे मत झाले. साहजिकच जो तह वाटाघाटीने झाला नाही तो पाळण्याचे जर्मनीवर बंधन उरले नाही. याबाबत दोस्तांचे असे मत होते की, आमच्यात पुनर्रचनेबाबत मतभेद होते. जर्मन प्रतिनिधीला बोलावले असते तर त्याने फायदा घेतला असता. जर्मनीत लोकशाही कधीच नव्हती. वाटाघाटी, चर्चा यापेक्षा त्यांना हुकूमशाहीची भाषा माहीत होती.

**२) व्हर्साय तह लोकांचा नसून मुत्सद्यांचा तह :**

युद्धकाळात सर्वसामान्य जनतेने खूप हालअपेष्टा सहन केल्या होत्या. दोस्तांनीही जनतेला अनेक प्रकारची आश्वासने दिली होती. मात्र तह करताना ही आश्वासने यांचा विचार केला नव्हता. मुत्सद्याने हवी तशी पुनर्रचना केली, जो लोकांचा नव्हे तर तो मुत्सद्यांचा तह होता, अशी टीका केली जाते.

**३) व्हर्साय तह खूप कडक होता :**

जर्मनीवर अन्याय करणारा, कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्रांनी स्वीकारावा असा तह नव्हता तर दोस्तांनी जर्मनीला वागवले असते तर कदाचित जर्मनीने या तहाचे पालन केले असते; परंतु जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू व आर्थिक दुर्बल बनवले होते. सर्व जागी अपमान केला. जोपर्यंत जर्मन दुबळा होता तोपर्यंत नाईलाजाने तह पाळला. पण लवकरच जर्मनीने तहाच्या चिंधड्या करण्यास तयार झाला.

**४) तहामध्ये देवाणघेवाण स्वीकारली नाही :**

शस्त्रकपात, सागरी संचार, स्वातंत्र्य, वसाहतीच्या शोषणाचे उच्चाटन यासारख्या अनेक आदर्श तरतुदी मांडल्या. त्याच्या आधारावरच जर्मनीतील शस्त्रकपात घडून आणली. जर्मन नद्या, बंदरे आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुली ठेवली. जर्मनीचे साम्राज्य उद्ध्वस्त केले. पण यातील एकही गोष्ट दोस्तांनी स्वीकारली नाही किंबहुना जर्मनीची जहाजे, शस्त्रास्त्र मिळवली. वसाहती वाटून घेतल्या. जर या आदर्शाचा सर्वांनी स्वीकार केला असता तर अशी जर्मनीची पुन्हा युद्धाची भाषा झाली नसती.

**५) व्हर्साय तहाने जर्मनीचा विश्वासघात :**

युद्ध समाप्तीपूर्वी आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू, वाटाघाटीने तह करु, अशी आश्वासने दोस्तांनी दिली होती. पण प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटीस बोलवणे नाही. अन्यायकारक तह लादला. त्यामुळे दोस्ताने आमचा विश्वासघात केला, अशी जर्मनीची भाषा येऊ लागली.

**६) तहाचा सर्वात महत्त्वाचा दोष म्हणजे सूडबुद्धीने लादला :**

दोस्तांनी बहुतेक वेळा वाटाघाटी, बहुमताचा निर्णय, सार्वमत यासारखे लोकशाहीचा देखावा केला. पण प्रत्यक्षात भाषा लोकशाही तर कृती हुकूमशाहीची होती, असे दिसून येते.

**७) युद्धखंडणीची तरतूदही दोस्तांना हानीकारक :**

जर्मनी दोस्तांना खंडणी देऊ लागला होता. युद्ध काळात अमेरिकेच्या घेतलेल्या कर्जाचे हप्ते या पैशातून भरु लागला. त्यावेळी जर्मनीस युद्ध खंडणी देणे शक्य नाही असे स्पष्ट झाले. त्यावेळी फ्रान्सने जर्मनीवर हल्ला केला. यावेळी अमेरिका जर्मनीला अर्थसहाय्य करु लागली. त्यामुळे अमेरिकन पैसा अमेरिकेतच परत येऊ लागला. यामुळे जगात आर्थिक महामंदीचा फटका बसला. लॉगसन - या तहाने जर्मनीचा १/८ भूभाग जर्मनीच्या सार्या वसाहती, १५ टक्के शेत जमीन, १२ टक्के पशुधन, १० टक्के कारखाने, २/५ दगडी कोळसा इ. जर्मनीला मुकावे लागले.

थोडक्यात जर्मनीला अन्यायकारक असल्यास तो तह पाळण्याची जर्मनीवर नैतिक बंधन राहिले नाही. ज्याप्रमाणे इ.स. १८७०-७१ मध्ये फ्रान्सचा पराभव व त्यातच फ्रान्स असमाधानी राहिला. त्यामुळे जगाची पहिल्या महायुद्धाकडे वाटचाल सुरु झाली. इ.स. १९१९ मध्ये जर्मनीवर अन्याय झाल्याचे व्हसार्य तहातून दुसर्या जागतिक महायुद्धाकडे वाटचाल झाली म्हणून व्हर्साय तहातच दुसर्या जागतिक महायुद्धाची बीजे होती, असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्हर्साय तहाचे परिक्षण करा.

## १०.५ सारांश

रशियामध्ये झारची सत्ता होती. त्यांच्या काळात रशियात सामाजिक, आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. त्यातच पहिल्या महायुद्धामध्ये रशियाचा पराभव झाला. याचा परिणाम रशियन जनतेवर झाला. लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियन राज्यक्रांती घडून आली. या राज्यक्रांतीचा रशियावर व संपूर्ण जगावर परिणाम झाला. लेनिनने रशियाची सुत्रे हाती घेऊन रशियाचा सर्वांगिण विकास घडवून आणला.

युरोपियन राष्ट्रांचा महत्त्वाकांक्षा धोरणामुळे २० व्या शतकाच्या प्रारंभीच पहिले महायुद्ध पेटले. या युद्धाला अनेक प्रकारची कारणे जबाबदार आहेत. त्यातील काही काही कारणे आत्यंतीक राष्ट्रवादाच्या स्वरूपाची होती. या युद्धात सर्व जग उतरले होते. या युद्धाचे सर्व जगावर अत्यंत वाईट परिणाम झाले. अशा वाईट घटना टाळण्यासाठी युद्ध समाप्तीनंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली.



munotes.in

जर्मनीच्या पराभवाने पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. जागतिक शांततेसाठी फ्रान्समधील पॅरीस या ठिकाणी शांतता परिषद भरवण्यात आली. या परिषदेमध्ये शत्रु गटातील प्रतिनिधीला बोलावण्यात आले. दोस्त राष्ट्रांनी सर्व युद्धाची जबाबदारी जर्मनी आणि तिच्या दोस्त राष्ट्रांवर टाकली. या शांतता परिषदेमध्ये व्हर्सायचा तह, सॅट जार्मेनचा तह, न्यूलीचा तह करण्यात आला त्या बरोबर राष्ट्रसंघाची स्थापनाही केली. राष्ट्रसंघाने राजकीय व अराजकीय कार्य मोठ्या प्रमाणात केले.

## १०.६ प्रश्न

१) पहिल्या महायुद्धाची कारणे स्पष्ट करा.
२) पहिल्या महायुद्धाचे परिणाम सांगा.
३) शांतता परिषदेचा आढावा घ्या.
४) व्हर्सायचा तरतूदी सांगून तहाचे टीकात्मक परीक्षण करा.

❖❖❖❖

munotes.in

# ११

# रशियन राज्यक्रांती

**घटक रचना :**


११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ रशियन राज्यक्रांती

११.३ सारांश

११.४ प्रश्न


## ११.० उद्दिष्टे

१. रशियन राज्यक्रांतीची करणे आणि परिणाम समाजतील.

२. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीमधील लेनीनची भूमिका काय होती? हे आपल्याला समजेल.

## ११.१ प्रस्तावना

१८ वे शतक क्रांतीन पेटलेले शतक म्हणून ओळखले जाते. औद्योगिक क्रांती, अमेरिकन क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती ही या शतकातील तीन ठळक उदाहरणे होय. औद्योगिक क्रांतीने उत्पादनाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल करुन जगाचा चेहरामोहरा बदलून टाकला. अमेरिकन क्रांती साम्रज्यशाहीला टोला दिला व लोकशाहीची स्थापना केली. फ्रेंच राज्यक्रांतीने राजेशाही, सरंजामशाही, धर्मगुरुची सत्ता उलटून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव याचा जगाला संदेश दिला. २० व्या शतकात सर्व जगाच्या इतिहासात इ.स. १९१७ ची रशियन क्रांती अभूतपूर्व ठरली. ती जवळजवळ ७०-७५ वर्षे ही क्रांती जिवंत राहिली. सर्व जग या क्रांतीने धास्तावले आहे. कारण जगातील भांडवलशाहीचे उच्चाटन करुन जगभर कामगारांचे राज्य प्रस्थापित करण्याचे व भांडवलशाही उलथून टाकण्याचे या क्रांतीचे स्वप्न आहे.

या क्रांतीने सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनात बदल घडवून आणला. एवढेच नव्हे तर पाश्चात्त्य जीवनमूल्य, पाश्चात्त्य अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, नीतीमूल्य यांना जबरदस्त आव्हान केले. औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी हिरवळली. नवा कामगार वर्ग उदयास आला. उत्पादन साधनांची मूठभर लोकांकडे मालकी ते कामगारांचे शोषण करत कामगाराच्या अनेक समस्या यातून या क्रांतीने एक नवा दृष्टिकोन निर्माण केला. कार्ल



munotes.in

मार्क्सचा सिद्धांत या क्रांतीने सत्यात उतरवला. या क्रांतीचे तत्त्वज्ञान जगातील कामगारांमध्ये लोकप्रिय ठरले. त्यामुळे सर्व जगातील कामगारांचे संघर्ष होऊन भांडवलशाही उलथून साम्यवाद पसरवण्याचा या क्रांतीचा प्रयत्न आहे. मात्र रशियाला आर्थिक क्षेत्रात अपयश येऊ लागल्याने रशियाने जागतिक क्रांतीचे स्वप्न सोडून साम्यवादाला मुरड घालण्यास प्रयत्न चालवला आहे. जागतिक शांततेच्या दृष्टीने ही घटना सुदैवी आहे, या प्रलयकालीन प्रभावी क्रांतीस पुढील गोष्टी कारणीभूत ठरल्या.

## ११.२ रशियन राज्यक्रांती

### ११.२.१ रशियन राज्यक्रांतीची कारणे :

**१) समाजातील विषम समाजरचना :**

क्रांतिपूर्व काळातील समाजरचना १८ व्या शतकात फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी फ्रान्समध्ये ज्या प्रकारची होती त्याच प्रकारची रशियात होती. रशियात सरंजामशाही व्यवस्था शाबूत होती. रशियन समाजात दोन वर्ग होते. पहिल्या वर्गात रशियन झार, त्याचे नातेवाईक, सरंजाम सरदार, जमीनदार यांचा वर्ग होता. देशातील उत्पन्नाची सारी साधने या मूठभर लोकांच्या हाती होती. उरलेला सारा समाज दुसर्या वर्गात मोडत होता. त्यामध्ये सरंजाम सरदाराच्या, जमीनदाराच्या जमिनीत राबणारा भूदास, छोटे शेतकरी, शेतमजूर, कारागीर इ. समावेश होता. या लोकांकडे उत्पन्नाची साधने नसत. पहिल्या वर्गाच्या मेहरबानीत या लोकांना जगावे लागत होते. इ.स. १८६१ मध्ये भूदासाची मुक्तता करण्यात आली; परंतु झारने तो प्रयत्न अर्धवट सोडल्याने खर्या अर्थाने भूदासांची मुक्तता झाली नाही.

**२) अकार्यक्षम दुर्बल झारशाही :**

क्रांती ही दारिद्र्याच्या पोटी जन्म घेत असते. रशियात कमालीचे दारिद्र्य होते. हे दारिद्र्य दूर करण्याचे सर्वसामान्यांचे जीवन सुखी बनवण्याची क्षमता झारशाहीत नव्हती. रशियात सुमारे ३०० वर्षापासून रोमॅनोव्ह घराण्याची वंशपरंपरागत सत्ता होती. रशियातील सर्वच राजे झार या नावाने ओळखले जात. वंशपरंपरागत राजेशाही एक महत्त्वाचा दोष म्हणजे अपवादात्मक चांगले राजे निपजतात. रशियातील पिटर-दि-ग्रेट याचा अपवाद वगळता सर्वच राजे अकार्यक्षम, दुर्बल, भ्रष्टाचारी होते. क्रांतीकारातील झार, निकोलस दुसरा हा सर्वांहून कळस होता. त्याने देशात भयंकर अत्याचार केले. जनतेवर अनेक युद्धे लादली. पाश्चात्त्य विचार रशियात फैलावू नये म्हणून त्याने वर्तमानपत्राची, जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारे रानटी उपाय योजले. यामुळे त्यांच्याविरुद्ध संतप्त वातावरण झाले. इ.स. १९०५ मध्ये जपानने रशियाचा पराभव केला. त्यामुळे झारचा दुबळेपणा उघड झाला. आपल्या अनियंत्रित सत्तेला फाटा द्यावा व लोकशाही प्रस्तावित करावी यासाठी लोकांनी क्रांती केली; परंतु यापासून काही बोध घेतला नाही. इ.स. १९०६ नंतर कामगाराच्यात फूट पाडून पुन्हा अनियंत्रित कारभार सुरु केला. अनियंत्रित भ्रष्ट झारशाहीला विरोध होऊ लागला. तो स्वत: अकार्यक्षम व दुर्बल होता. तो आपली पत्नी झारीना हिच्या सल्ल्याने राज्यकारभार करी. झारीनावर राजपुटीनी या साधूचा प्रभाव होता.

त्याला राज्यकारभाराचे ज्ञान नसताना कारभारात हवा तसा धुडगुस घातला. त्यामुळे देशभर असंतोष निर्माण झाला. झारच्या धोरणामुळेच रशिया-जपान युद्धात पराभव झाला. त्याचा परिणाम क्रांती स्पष्ट झाला.

**३) वैचारिक जागृती :**

रूसो, व्हॉल्टेस्यू, व्हॉल्टिअर या तत्त्ववेत्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. त्याप्रमाणे लिओ टॉलस्टॉय, गॉर्की, तुर्जेनिव्ह डोस्कोव्हस्को इ. अभिजात लेखकांनी रशियन राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. या लोकांनी क्रांतीसाठी कधी शस्त्र हातात घेतले नाही; परंतु आपल्या लिखाणातून तत्कालीन शासन संस्था कशा सडल्या, नासल्या असून अधोगतीस पोचल्या आहेत हे दाखवून दिले. त्यांनी कनिष्ठ वर्गाचे दु:ख जगाच्या वेशीवर टांगून क्रांतीची आवश्यकता लोकांना पटवून सांगितली. लिओ टॉलस्टॉयने कादंबरीतून सरंजाम सरदार व त्यांचे विलासी जीवन आणि त्यांच्याकडून भूदासाचे होणारे शोषण याचे चित्र लोकांपुढे मांडले. भूदासाच्या सर्वसामान्यांच्या दु:खाला वाचा फोडली. तुर्जेनिव्ह याने झारशाहीचे हिडीस स्वरूप लोकांसमोर मांडले. कामगारांच्या दु:खाला वाचा फोडली. रशियातील अनेक साहित्यिकांनी, विचारवंतांनी रशियन जनतेला जागृत केले. झारशाही सरंजामशाही उलथून टाकण्यासाठी आवश्यक ती वैचारिक भूमिका तयार केली.

**४) रशियन राज्यक्रांतीचा उद्गाता कार्ल मार्क्स :**

रूसो फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्गाता मानला जातो. क्रांतीपुत्र नेपोलियनने असे म्हटले की, रूसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झालीच नसती. रूसोचे फ्रेंच राज्यक्रांतीस जे स्थान आहे तेच रशियन क्रांतीस मार्क्सला स्थान आहे. कामगाराच्या शोषणामुळे कामगार संघटित होऊ लागले होते. मार्क्सने साम्यवादी तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत सांगितल्याने तो कामगारांत अतिशय लोकप्रिय झाला. त्याने इ.स. १८४४ मध्ये कम्युनिस्ट जाहीरनामा हा पहिला ग्रंथ प्रकाशित केला. त्यात त्याने, या संघर्षात तुम्ही काही गमावरणार नाही. कारण तुमच्याजवळ कामाशिवाय दुसरे काही नाही तर तुम्ही जिंकला तर तुम्ही कारखान्याचे मालक व्हाल. मार्क्सचे क्रांतीचे आव्हान रशियात वणव्याप्रमाणे पेटले. यातून रशियाची क्रांतीकडे वाटचाल सुरु झाली.

**५) रशियाचे औद्योगिकीकरण :**

१८ व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. रशिया तसा युरोपियन देश पण औद्योगिकदृष्ट्या अप्रगत मागासलेला व शेतीप्रधान देश होता; परंतु औद्योगिक क्रांतीचे लोन हळूहळू रशियात येऊ लागले. विशेषत: इ.स. १८९४ मध्ये फ्रान्स रशिया मैत्री करारानंतर फ्रान्सने रशियात प्रचंड भांडवल गुंतवले म्हणून रशियाच्या औद्योगिक क्रांतीला वेग आला. नवे कारखाने, उदयास आले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ज्याप्रमाणे कामगारांची वाढती संख्या, कामगारांचे शोषण, कामगारांच्या समस्या या सर्व गोष्टी १९ व्या शतकाच्या अखेरीस रशियात दिसू लागल्या, नव्यानेच औद्योगिक क्रांतीस प्रारंभ झाल्याने भांडवलदाराने कामगारांचे शोषण करुन प्रचंड संपत्ती मिळवली. यामुळे भांडवलदार कामगार संघर्षास प्रारंभ झाला. त्यामुळे कामगार क्रांतीची भाषा बोलू लागले.

**६) साम्यवादाचा उदय :**

औद्योगिक क्रांती, कामगाराचा उदय व त्यांच्या समस्या यातूनच युरोपमध्ये साम्यवादाचा उदय झाला. युरोपमध्ये लुई ब्लँक, सेंट सिमॉ, पायुरिया इ. साम्यवादी नेत्यांनी सर्वच युरोपियन देशांत कामगार संघटित करुन भांडवलदाराविरुद्ध पेटवून दिले. इ.स. १८४८ मध्ये अनेक क्रांत्या झाल्या. त्या साम्यवादी होत्या; परंतु फारसे यश आले नाही. नव्याने औद्योगिक प्रगती घडून आलेल्या रशियात यादृष्टीने प्रयत्न झाले नाहीत; परंतु मार्क्सचे समाजवादी विचार रशियात लोकप्रिय ठरल्याने इ.स. १८९५ मध्ये रशियात कामगारांची वर्क्स डेमाटिक पार्टी स्थापन केली. भांडवलदारांविरुद्ध संघर्ष सुरु केला. सरंजाम सरदारांच्या शेतीवर राबणारा भूदास जमिनी ताब्यात घेण्यास तयार होता. भूदास, शेतकरी, शेतमजूर यांनी इ.स. १९०० मध्ये सोशल रिव्होलेशन पार्टी स्थापन केली.

रशियात झारशाही, भांडवलदार विरुद्ध कामगार व शेतमजूर संघटित होऊ लागले. त्याने तीव्र आंदोलन केले; परंतु बोल्शेविक गट (बहुमतवाला) व मेन्शेव्हिक (अल्पमतवाला) दोन गट निर्माण झाले. लेनिन हा बोल्शेविकचा नेता. तयाला रशियात फक्त कामगारांची क्रांती हवी होती. तो झारशाही उलथून टाकण्यास व क्रांती करण्यास इतर वर्गाचे सहकार्य घ्यायला तयार नव्हता. साहजिकच बहुमत असूनही लेनिनचा गट काही करु शकला नाही. याचा फायदा घेउन झारने बहुमतावालाने हद्दपार केले. कामगारांचे नेतृत्व मेन्शेव्हिक गटाकडे आले. यांनी इ.स. १९०५ मध्ये जपानने रशियाचा पराभव केला. याचा फायदा घेऊन रशियात क्रांती केली. लोकशाही निर्माण केली.

**७) प्रातिनिधिक लोकशाहीला अपयश :**

इ.स. १९०४-०५ च्या युद्धात रशिया जपानकडून पराभूत झाला. या वेळी झारशाहीविरोधी धुमसत असलेला असंतोष विकोपाला गेला. सर्व देशभर झारशाही व त्यांच्या लोकांचा धिक्कार केला जाऊ लागला. पराभवाच्या अपमानाने संतापलेला पिट्सबर्ग विद्यार्थ्यांनी झारशाहीचा धिक्कार करुन झारशाही पदच्युत करा अशी मागणी करत मोचा काढला. यात मास्कोतील विद्यार्थी सामील झाले. यापाठोपाठ कामगारांचे संप, हरताळ पाहून मोर्चाला पाठिंबा दिला. अशा परिस्थितीत २२ जानेवारी १९०५ रोजी सेंट पिट्सबर्गमधील कामगारांचे गोबॅनच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोर्चा काढला. झारने या लोकांच्या मागण्या मान्य न करता या मोर्चावर आपले घोडदळ सोडले. नि:शस्त्र कामगाराची प्रचंड प्रमाणात हत्या झाली. रशियाच्या इतिहासात रक्तरंजित रविवार या नावाने ओळखला जातो. या हत्यामुळे जनता संतापली. सारा देश संप, हरताळाने पेटून उठला. त्यामुळे झारने ऑगस्ट १९०५ मध्ये जनतेच्या प्रतिनिधींची ड्यूमा बोलविली जाईल, अशी घोषणा केली. इंग्लडंच्या धर्तीवर रशियात राजेशाही सुरु केली; परंतु झारने इ.स. १९०५ नंतर कामगारांत फूट पाडून पुन्हा आपल्या अनियंत्रित सत्तेचे पुनर्जीवन केले.

**८) पहिले जागतिक महायुद्ध :**

वरील कारणामुळे क्रांतीची पार्श्वभूमी तयार झाली. जनता झारशाही उलथून टाकण्यास तयार झाली. परंतु झारने लष्कराच्या जोरावर सत्तेच्या जोरावर चिरडून टाकली. अशा परिस्थितीत इ.स. १९१४ पहिले जागतिक महायुद्ध सुरु झाले. युद्ध आघाडीवर

रशियाचा पराभव होऊ लागला. युद्धकालीन समस्या, पराभवाचे दु:ख यातून मार्च १९१७ मध्ये झारशाहीचा शेवट करुन रशियन क्रांती घडून आली.

**आपली प्रगती तपासा :**

१) रशियन राज्यक्रांतीची कारणे सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**११.२.२ क्रांतीची वाटचाल :**

**१) पेट्रोग्राडची क्रांती :**

रशियाने जागतिक महायुद्धात उडी घेतली. भ्रष्ट, अकार्यक्षम, झारशाहीमुळे सर्वत्र तुटवडा निर्माण झाला. अपुर्या युद्ध साहित्यामुळे सैनिक युद्ध आघाडीवरुन पराभूत होऊ लागले. झारशाहीविरुद्ध भयंकर वातावरण तापले. ८ मार्च १९१७ रोजी पेट्रोग्राडच्या १ लाख कामगारांनी तर मास्को शहरात २५ हजार कामगारांनी प्रचंड मोर्चा काढून झारशाही उलथून टाकण्याची मागणी केली. झारने मोर्चा चिरडून टाकल्यास लष्कराला आदेश दिला. त्याने आदेश न मानता कामगारांशी हातमिळवणी केली. अशा परिस्थितीत जमिनीसाठी, कारखान्याच्या मालकीसाठी, भाकरीसाठी देशभर दंगली झाल्या. झारने ड्यूमा बरखास्त केल्याची घोषणा केली. ड्यूमाने विसर्जित होण्यास नकार दिला. झार घराणे, नातेवाईक यांना तुरुंगात डांबले. राजकुमार जॉर्ज एलव्हॉव या समाजवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली रशियात हंगामी सरकार स्थापन झाले. अशाप्रकारे ८ मार्च १९१७ रोजी झारशाहीचा शेवट होऊन रशियात प्रतिनिधी राजवट सुरु झाली.

**२) हंगामी सरकार :**

निकोलसच्या राजत्यागानंतर ड्युमाने समितीची निवड करुन हंगामी सरकार स्थापन केले. त्यांनी सर्व राजकीय कैद्यांची ताबडतोब मुक्तता करण्याचा आदेश दिला. युद्धाबाबतचे नवीन धोरण जाहीर केले. ज्यू लोकांवरील सर्व नियंत्रण रद्द केले. रशियाकरिता नवीन घटना बनविण्यात येईल, असे जाहीर करुन उदारमतवादी मानवतावादी कार्य केले; परंतु त्याच्या कारभाराला अंतर्गत विरोध होऊ लागल्याने मे १९१७ मध्ये जॉर्ज एलव्हॉन याने राजीनामा दिला आणि केरेन्सकीने सत्ता हाती घेतली. केरेन्सकीने मे ते नोव्हेंबर १९१७ पर्यंत अस्थिर परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला; परंतु असंतोष नष्ट करता आला नाही. भांडवलदार-कामगार यांच्यात ऐक्य तयार करता आले नाही. जर्मनीशी शांतता करण्यास विरोध केल्याने सैन्यात बेशिस्त निर्माण झाली. युद्धात सतत पराभवामुळे अपमान झाला व जनतेने युद्ध बंद करावे ही मागणी केली. पण केरेन्सकीने अमान्य करत याचा फायदा लष्कराने व लेनिनने घेतला.

**३) बोल्शेव्हिक क्रांती - ७ नोव्हेंबर १९१७ :**

केरेन्सकीचे धोरण लेनिनला अमान्य होते. त्यातच रशियन सैन्यात कमालीची अस्वस्थता, शेतकरी जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेत होते तर बोल्शेव्हिक पक्षाने रेड गार्डसमध्ये कामगार जास्त संख्येत भरती केले. लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा सिद्धांत मांडला. ट्रॉटस्कीच्या सहकार्याने ७ नोव्हेंबर १९१७ रोजी बोल्शेव्हिक पक्षाने लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा निश्चय केला. कामगारांनी व क्रांतिकारकांनी एकदम उठाव करुन सर्व राज्यकारभाराची केंद्र ताब्यात घेतली. रक्तपात न होता राजधानी बंडवाल्यानि ताब्यात घेतली. केरेन्सकीचे सरकार नष्ट करुन ८ नोव्हेंबरला लेनिनने नव्या सरकारची सूत्रे अध्यक्ष या नात्याने हाती घेतली.

**११.२.३ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम :**

रशियात झारशाहीची अनियंत्रित सत्ता, भ्रष्टाचारी, अकार्यक्षम असल्याने सर्वसामान्य जनतेचे हाल होत होते. झारने औद्योगिक प्रगतीला व नव्या विचारांना, कल्पनांना खोल खड्ड्यात गाडून आपली हुकूमशाहीची टिकवण्याचा प्रयत्न करत होता. परंतु औद्योगिक प्रगतीमुळे कामगार वर्ग उदयाला आला. या वर्गाला संघटित व मार्गदर्शन करण्याचे कार्य कार्ल मार्क्सने केले. त्यामुळे रशियात लोकजागृती होऊन आपल्या हक्कासाठी इ.स. १९०५ ला क्रांती केली. परंतु अपयश आले. यातून इ.स. १९१४ महायुद्धात पराभव झाल्याने ७ मार्च १९१७ ला रशियात क्रांती होऊन झारशाहीचा शेवट झाला आणि हंगामी सरकार अस्तित्वात आले. या वेळी राजकुमार जॉर्ज एलव्हॉव व केरेन्स्की यांनी लोकप्रतिनिधी सरकारमध्ये कार्य केले; परंतु केनेन्सकीच्या धोरणामुळे बोल्शेव्हिक लोकांनी त्याचे सरकार नष्ट करुन ७ नोव्हेंबर १९१७ ला बोल्शेव्हिक क्रांती केली आणि ८ नोव्हेंबरला लेनिनने रशियाची सूत्रे हाती घेतली या राज्यक्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे -

**१) फॅसिझम विरुद्ध कम्युनिझम संघर्षाचा उदय :**

कार्ल मार्क्स व लेनिनने साम्यवादाचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. त्यामुळे निरनिराळ्या विचारप्रणालीत संघर्ष निर्माण झाला. त्याचा आंतरराष्ट्रीय संबंधावर दूरगामी परिणाम झाला. भांडवलदार वर्गाला धक्का बसला. भांडवलदाराच्या संरक्षणासाठी साम्यवादी विरुद्ध फॅसिझम राष्ट्रांची साखळी तयार झाली. त्यातून संघर्ष निर्माण झाला.

**२) वसाहतीतील स्वातंत्र्यलढ्याला व्यापकता प्राप्त झाली :**

भांडवलशाहीची शेवटची अवस्था म्हणजे साम्रज्यवाद अशी साम्यवादी शिकवणीमुळे वसाहतीत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याला राजकीय संघर्षाचे स्वरूप न राहता सामाजिक आणि आर्थिक न्यायाकरिता लढा असे महत्त्व प्राप्त झाले. कम्युनिस्टाने वसाहतीच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा दिला. त्यामुळे जागतिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले.

**३) पाश्चात्य राष्ट्रांनी पुरस्कारिलेल्या उदारमतवादी कल्पनांना जबरदस्त आव्हान :**

रशियन राज्यक्रांतीत पुरस्कारिलेल्या साम्यवादाने उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय राज्यपद्धती इ. पाश्चात्त्य कल्पनांना जबरदस्त आव्हान दिले. जगातील सुसंस्कृत, बुद्धिमान वर्गाने आतापर्यंत पाश्चिमात्त्य संस्कृती निर्माण झालेल्या ज्या कल्पना

उराशी बाळगलेल्या होत्या त्या निरुपयोगी आहेत. त्या साम्यवादी विचाराने खोट्या ठरवल्या.

**४) क्रांतीने नवीन समाज निर्माण केला :**

रशियन राज्यक्रांतीनंतर विषमता लयास गेली. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुरुप आणि गुणानुरुप काम करावे. त्या आधारावर नवीन समाज उदयास आला. या समाजात गरीब-श्रीमंत भांडवलदार, जमीनदार, व्यापारी, धर्मगुरु त्या सर्वांना कामे करावे लागे. कामानुरुप वेतन सर्वांनाच देण्यात आले. रशियात श्रमणार्यांच्या हातात सत्ता आली. समाजात कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची पुनर्घटना निर्माण केली. समाजातील सर्वात खालचा थर म्हणजे कामगार त्याला सत्ता मिळाल्याने जगातील सर्व कामगारांत समाधान निर्माण होऊ लागले.

**५) रशियन साम्रज्यवादाचा अंत :**

बोल्शेव्हिक राज्यक्रांतीमुळे रशियन साम्रज्यशाहीचासुदधा शेवट झाला. पोलंड, फिनलंड, जॉर्जिया यात रशियन साम्रज्यवाद्याने मोठ्या प्रमाणात दडपशाही चाललेली होती. रशियन राज्यक्रांतीने या दडपशाहीचा शेवट केला आणि त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य दिले.

**६) रशियाला जागतिक राष्ट्रांत स्थान मिळाले :**

रशिया क्रांतीपूर्वी एक मागासलेले राष्ट्र होते. त्याला सुधारणांचा स्पर्शही झालेला नव्हता. इ.स. १९१७ बोल्शेव्हिक क्रांती घडून आल्यानंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा जागतिक राजकारणात उदय झाला. जगातील लक्षावधी श्रमिक रशियाकडे नेतृत्वाच्या आशेने पाहू लागले. त्यामुळे एक बलशाली राष्ट्र म्हणून मान मिळाला.

**७) पंचवार्षिक योजनेची देणगी :**

पाश्चात्त्य लोकशाही पद्धतीने देशाचा विकास होत नाही हे रशियाला पटल्यानंतर रशियाने पंचवार्षिक योजनेद्वारे एक-एक विभागावर लक्ष केंद्रित करुन विकास होतो हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे पंचवार्षिक योजनेचे सर्व जगाने अनुकरण केले.

**८) जगात कामगार आता येऊ लागल्या :**

रशियात राज्यक्रांती होऊन कामगारांची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे जगातील कामगार जागृत पाले आणि आपल्या हक्कांसाठी प्रचलित शासन व्यवस्थेशी संघर्ष करु लागले. त्यामुळे त्या देशांनी कामगारांच्या हितासाठी व संरक्षणासाठी अनेक कायदे पास करुन त्यांना स्थान देण्याचा प्रयत्न केला.

**आपली प्रगती तपासा :**

१) रशियन राज्यक्रांतीचे परिणाम सांगा.

## ११.३ सारांश

रशियातील झारची राजेशाही उलथून टाकणारी साम्यवादी क्रांती ही रशियाप्रमाणेच जगाच्या राजकीय, आर्थिक व वैचारिक क्षेत्रांत फार मोठा प्रभाव पडणारी ही क्रांती ७ नोव्हेंबर १९१७ रोजी घडून आली. रशियाने दिनदर्शिकेप्रमाणेच मात्र ही क्रांती २४ ऑक्टोबर १९१७ रोजी झाल्याने ती ऑक्टोबर राज्यक्रांती म्हणून ओळखली जाते. या क्रांतीमुळे रशियात इ.स. १४८० सालापासून चालत आलेल्या झारच्या राजेशाहीचा शेवट झाला आणि तेथे बोल्शेव्हिक कम्युनिस्टांची सत्ता स्थापन झाली. जगाच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती इतकेच रशियन राज्यक्रांतीला देखील महत्व आहे. या रशियनराज्यक्रांतीने वर्तमान जागतिक राजनीतीला अत्यंत संघर्षात्मक रूप दिले आहे. रशियन क्रांतीच्या वेळी शेतकरी जमीनदाराच्या तावडीतून सुटला; पण तो ग्रामीण अर्थव्यवस्थेशी बांधला गेला. स्थानिक स्तरावर शासनाला लोकांचा सहभाग हवा होता; पण राष्ट्रीय स्तरावर एकतंत्री करभार कायम ठेवायचा होता. साहजिकच जनसामन्यांचा असंतोष वाढत गेला. अराज्यवादी तसेच दहशतवादी लोकनेतृत्व करू शकले नाहीत. पण रशियन अस्मितेवर भिस्त ठेवणारा जो गत होता, त्यातूनच समाजवादी क्रांतिकारक पुढे आले; तर पश्चिमीकरणाकडे आकृष्ट झालेल्या गटातून मार्क्सवादी अग्रेसर झाले. या दोन्ही गटांनी झार सत्तेविरुद्ध असंतोष भडकत ठेवला. या दोन्ही गटांपैकी मार्क्सवादी मार्क्सवादी बोल्शेव्हिक अखेर यशस्वी ठरले. रशियन राज्यक्रांती ही म्पाहिली साम्यवादी क्रांती ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही या क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे. इ.स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात पेट्रोग्राड येथे कामगारांनी संप पुकारला. ही रशियन राज्यक्रांतीची नांदी ठरली. त्यानंतर राजधानीतील सैनिकांनीही कामगारांना पाठींबा दिला. हे या राज्यक्रांतीचे पहिले पर्व होते. स्वित्झर्लंडमध्ये अज्ञातवासात असलेला बोल्शेव्हिक नेता लेनिन इ.स. १९१७ च्या एप्रिलमध्ये रशियात परतला, तेव्हा या राज्यक्रांतीचे दुसरे पर्व सुरु झाले.

अर्थात, रशियातील क्रांती हे सहज मिळालेलं यश नव्हतं. फेब्रुवारी क्रांतीविरोधात जनरल कोर्निलोव्हनी ऑगस्ट २०१७ मध्ये केलेल्या प्रतिक्रांतिकारी कारवायांवर पुढंही सेनाधिकाऱ्यांनी सैनिकीहुकुमशाही क्लुप्त्या करून क्रांती अपयशी व्हावी यासाठी प्रयत्न केले. परंतु सैन्य विखुरल्यामूळ प्रतिक्रांतीच्या या कारवाया निष्प्रभ ठरल्या आणि नंतर मोठ्या संखेन सैनिक क्रांतिकारी दलांमध्ये सामील झाले. क्रांतिकारी 'रेड आर्मी' विरोधात प्रतिक्रांतिकारी शक्तींच्या 'व्हाईट आर्मी' नं सुरु केलेल्या यादवी युद्धात आधी उल्लेख केलेल्या महासत्ता प्रतिक्रांतीला खतपाणी घालत होत्या. 'रशियात हस्तक्षेप करू नका' असा संदेश देणाऱ्या काही चळवळी युरोपातील वर्गाच्या पक्षांनी सुरु केल्या, त्यामुळं पश्चिमेतील महासात्ताना 'व्हाईट आर्मी'ला शेवटपर्यंत आधार देणं शक्य झालं नाही. आपल्याच देशात सोव्हिएत निर्माण होतील, अशी भीती या सत्तांच्या मनात निर्माण झाली आणि आपण आधीच रशियात पाठवलेल्या सैनिकांमध्येही बंड होण्याची शक्यता त्यांच्या भयग्रस्ततेत भर घालणारी ठरली.

## ११.४ प्रश्न

१) रशियन राज्यक्रांतीची कारणे स्पष्ट करा.

२) रशियन राज्यक्रांतीचा रशियावर व जगावर झालेला परिणामांचा आढावा घ्या.

३) रशियन राज्यक्रांतीवर एक निबंध लिहा.

४) १९१७ च्या रशियन क्रांतिचा घटनाक्रम लिहा.

५) रशियात झालेल्या १९०५ च्या क्रांतिची पार्श्वभूमी स्पष्ट करुन, महत्व विषद करा.

६) रशियन राज्यक्रांतीसाठी लेनिनचे विचार अधोरेखित करा.

**संदर्भ**


१) आवटे, लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.

२) गाडगीळ, पां.वा.रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१.

३) डॉ. आठल्ये, विभा, आधुनिक जगाचा इतिहास, नागपूर, २०१०.

४) प्रा. दीक्षित, नी.सी.पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.

५) डॉ.सौ. वैद्य, सुमन आधुनिक जग, नागपूर, २००२.

६) डॉ. काले, म.वा.आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०२१.

७) प्रा. जोशी, पी.जी., अर्वाचीन यूरोप, नांदेड, २००८.

८) Brower, D.R.Ed. Russian Revolution : Disorder or New Order, London, 1979.

९) Carr. E.H.The Bolshevik Revolution, 3 Vols., London, 1961-64.

१०) Deutscher, Isaac, The The Unifinished Revolution : Russia – 1917-67. London, 1967.

११) Fitzpatrik, David, The Russian Revolution, 1917-32, New York, 1984.

१२) Footman, David, The Russian Revolution, London, 1962.

१३) Moorehead, Alan, The Russian Revolition, London, 1967.

१४) Roy, M.N. The Russian Revolution, Culcutta, 1967.

१५) Trotsky, Lean, History of the Russian Revoluttion, 3 Vols, London, 1934.

१६) Wolfe. B.D. An ideology in power : Reflections on the Russian Revolution. London, 1969.

१७) Black, C.E. Rewriting Russian History (1962).

१८) Ellison, H.J.History of Russia (1964).


❖❖❖❖

# १२

# राष्ट्रसंघ

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्टे
१२.१ प्रस्तावना
१२.२ राष्ट्रसंघ
१२.३ राष्ट्रसंघाचे कार्य
१२.४ राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे
१२.५ सारांश
१२.६ प्रश्न

## १२.० उद्दिष्टे

१) राष्ट्र संघाचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्य असमाजेल.
२) जागतिक शांतता स्थापनेत राष्ट्रसंघाची भूमिका समजेल.
३) राष्ट्रसंघाच्या अपयशाची करणे समजतील.

## १२.१ प्रस्तावना

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विड्रो विल्सन हे शांततेचे भोक्ते होते. त्यांना खूश करण्यासाठी आणि त्यांच्या विचारांची पूर्तता करण्यासाठी दोस्त राष्ट्रांनी राष्ट्रसंघाची स्थापना केली. युरोप खंडात वादाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवणे या हेतून संघाची स्थापना झाली. राष्ट्रसंघाची सनद, उगम, हेतू इ. घटनांचा विचार केला. राष्ट्रसंघाच्या वेगवेगळ्या समितीच्या मार्फत राजकीय व अराजकीय कार्य केले. राष्ट्रसंघावर इंग्लंड-फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांचा प्रभाव होता. जर्मनी इटलीमध्ये हुकूमशहाच उदय झाला. त्यांनी राष्ट्रसंघाचा राजीनामा देऊन वर्चस्व झुगारुन दिले. आपली इच्छापूर्तीसाठी त्यांनी आक्रमक धोरण स्वीकारले. त्यामुळे राष्ट्रसंघाला अपयश आले आणि राष्ट्रसंघाचा शेवट झाला; परंतु त्यातून पुढे संयुक्त राष्ट्रसंघाचा उगम झाला.

पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला आणि १० जानेवारी १९२० रोजी राष्ट्रसंघाची स्थापना झाली. राष्ट्रसंघाचा पॅरिस शांतता तहात अंतर्भाव केला होता. संघाची स्थापना म्हणजे युद्धापासून मानवजातीला वाचवण्याचा प्रयत्न होता. यापूर्वी झारने पुढाकार घेऊन १८१५ मध्ये पवित्रसंघाची स्थापना तर मेटर्निकने चतु:संघाची स्थापना करुन १८२२

पर्यंत शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंघ स्थापनेचे श्रेय अमेरिकेच्या विड्रो विल्सनला दिले जो. मुख्य कचेरी स्वीत्झर्लंडमधील जिनेव्हा येथे आहे. राष्ट्रसंघाची स्थापना झाल्यानंतर सामाजिक, अराजकीय, राजकीय कार्य करुन आंतरराष्ट्रीय शांतता व सामाजिक कार्य घडवून आणले. राष्ट्रसंघाच्या कार्याचे दोन विभाग पडतात.

## १२.२ राष्ट्रसंघ

**१) राष्ट्रसंघाचा उगम :**

महायुद्धात जगाची दैन्यावस्था झाल्याने आंतरराष्ट्रीय संघटनेची मागणी झाली. त्याचप्रमाणे इंग्लंडच्या पंतप्रधानाने संघटनेची गरज व्यक्त केली. जागतिकक शांततेसाठी विल्सनने राष्ट्रसंघाची कल्पना मांडली. अमेरिकेने जून १९१५ ला शांतता संघ स्थापन केला. त्याचप्रमाणे विल्सनच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. ६ आठवडे जगभर चर्चा केली, त्यानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

**२) राष्ट्रसंघाची सनद व कलमे :**

जागतिक शांततेसाठी प्रस्थापित झालेली आंतरराष्ट्रीय संघटना म्हणजे राष्ट्रसंघ होय. याची सनद असून त्यामध्ये २६कलमे आहेत. कलम १ ते ७ मध्ये संघाची रचना, सदस्यत्व आहे. कलम ८ व ९ मध्ये नि:शस्त्रीकरण, कलम १० ते १७ मध्ये वादग्रस्त प्रश्न किंवा नोंदणी, प्रसिद्धी, उजळणी, व्याप्ती यासंबंधीचे आहेत. कलम २१ मन्रो वसाहतीबाबत आहे. कलम २३ सामाजिक सुधारणासंबंधीचे आहे. कलम २४ राष्ट्रसंघ व इतर आंतरराष्ट्रीय संघटनाबाबत आहे. कलम २५ रेडक्रॉसच्या कार्यासंबंधी तर कलम २६ राष्ट्रसंघाच्या सनदेत दुरुस्ती करण्याबाबत आहे.

**३) राष्ट्रसंघाची उद्दिष्टे :**

१) जागतिक शांतता व सुरक्षा निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या क्षेत्रात वाढ करणे.
२) एकमेकांशी न्याय्य, परस्परांचा सन्मान राखणे, गुप्ततेचा त्याग करुन उघड संबंध ठेवण्याचे मान्य केले.
३) जागतिक शांतता व सुरक्षितता कायम ठेवण्यासाठी युद्ध न करण्याचे व्रत स्वीकारणे.
४) इतर राष्ट्रांशी असलेले संबंध निश्चित करण्यासाठी दृढ अशा विधिनियमांची निर्मिती करणे.
५) राष्ट्रांबरोबरच्या व्यवहारात, तहानुसार कर्तव्यात सभासद राष्ट्रांनी मान्यता दिली.
६) जर राष्ट्रांनी तत्त्वाचा भंग केला तर व्यापारबंदी, आर्थिक बहिष्कार व सैन्याचा वापर करणे.

**४) राष्ट्रसंघाचे स्वरूप :**

राष्ट्रसंघ म्हणजे विस्कळीत जगाचे संघराज्य असून अधिकार मर्यादित व सभासद हे देशाचे प्रतिनिधी होते. त्यामुळे राजेशाही, हुकुमशाही, लोकशाही राष्ट्रांचे प्रतिनिधी होते.

नवीन राष्ट्रांना सभासदत्व देताना आमसभेच्या २/३ मतांची गरज होती. रशियातील समाजवाद चिरडून टाकण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

**५) राष्ट्रसंघाचे सभासद :**

राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या प्रारंभी दोस्त राष्ट्रांचे ३० राष्ट्रे महायुद्धातील व १३ तटस्थ राष्ट्रे अशी ४३ राष्ट्रे होती. इ.स. १९२७ पर्यंत ५६ सभासदांपैकी ४५ छोटी राष्ट्रे होती. १९३५ पर्यंत सभासद संख्या ६५ राष्ट्रे होती. जपानने इ.स. १९३३, जर्मनीने इ.स. १९३३ मध्ये राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनाम दिला. इ.स. १९३५ ला ते बाहेर पडले. इ.स. १९४६ ला शेवटच्या परिषदेला फक्त ३४ राष्ट्रे होती.

**६) राष्ट्रसंघाच्या संघटना :**

**१) महासभा :**

सर्व सभासद राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा म्हणजे महासभा होय. प्रत्येक सभासद राष्ट्राला तीन प्रतिनिधी. मात्र त्यांना एकच मत देण्याचा अधिकार होता. त्यांची कृती सरकारच्या धोरणाला पोषक असे. वर्षातून एक वेळ आणि ते ३ आठवडे अधिवेशन असे. जरूरीनुसार मुदत कमी अधिक होत होती. ६ स्थायी समित्या महासभेच्या मदतीस होत्या.

महासभेचे कार्य म्हणजे सर्व सभासद राष्ट्रांत शांततेबाबत विचार करणे, तसेच त्यासंदर्भात उपाय सुचवणे, वाटाघाटी, मध्यस्थी, तडजोड करुन प्रश्न सोडवणे, कायदे तयार करणे, अंदाजपत्रक मंजूर करणे, न्यायाधीशांची नेमणूक करणे इ. कार्य करणे.

**२) समिती :**

महासभा म्हणजे कायदे मंडळातर समिती म्हणजे कार्यकारी मंडळ होय. बड्या राष्ट्रांच्या राजकीय डावपेचांचा बालेकिल्ला म्हणजे समिती होय. सुरुवातीला अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, इटली, जपान हे ५ कायमचे तर ४ अस्थायी असे ९ सभासद होते. अस्थायी सभासदांची निवड ३ वर्षांसाठी होत असे. इ.स. १९२२ मध्ये २ अस्थायींची वाढ इ.स. १९२६ मध्ये जर्मनीला कायम सभासदत्व प्राप्त झाले त्याचे वेळी ३ अस्थायी सभासद वाढ म्हणजे ५ कायमचे ९ अस्थायी सभासद असे १४ सभासद झाले. इ.स. १९३४ मध्ये रशिया कायमचे व अस्थायी २ वाढ त्यामुळे ६ + ११ = १७ सभासद. इ.स. १९३९ मध्ये इंग्लंड, फ्रान्स हे दोन कायमचे व ११ अस्थायी सभासद होते.

सचिवालयाला मार्गदर्शन करणे हे समितीचे महत्त्वाचे कार्य आहे. तसेच संमेलनाचे संयोजन करणे, उपसमित्यांचे अहवाल स्वीकारणे, मतभेद, तंटे, चौकशी करुन शांततेने सोडवणे, वसाहतींची देखभाल करणे, सरचिटणीसांची, नोकर वर्गाची नेमणूक करणे इ. कार्येही समितीला करावी लागत असे.

**३) सचिवालय :**

सचिवालय हे असून ती आंतरराष्ट्रीय सनदी नोकरांची कायम स्वरूपाच कचेरी होय. स्वीत्झर्लंडमधील जिनेव्हा येथे आहे. युद्धकाळात अनेक समित्या नेमल्या होत्या. त्यातून सचिवालयाची कल्पना निर्माण झाली. यामध्ये १ सरचिटणीस, २ चिटणीस, २ उपचिटणीस आणि ७५० कर्मचारी वर्ग आहे. सचिवालयाचे कार्य म्हणजे प्रशासकीय



munotes.in

कार्याची जबाबदारी सांभाळणे, सर्व विषयांची माहिती गोळा करुन महासभेला व समितीला पुरवणे, कार्यक्रम प्रसिद्ध करणे, निर्णयाची, आदेशाची अंमलबजावणी करणे.

**४) स्थायी आंतरराष्ट्रीय न्यायालय :**

आंतरराष्ट्रीय संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडवून सार्वजनिक सुरक्षिता व शांतता टिकवणे, १५ फेब्रुवारी १९२५ ला न्यायालयाचे उद्घाटन केले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कायदेतज्ज्ञ असून ११ न्यायाधीश, ४ सहाय्यक न्यायाधीश असे. इ.स. १९३० मध्ये सहाय्यक न्यायाधीशपद नष्ट करुन १५ न्यायाधीस केले. दरसाल ३० हजार डाॅलर्स पगार याशिवाय भत्ते असत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्य म्हणजे वादाच्या प्रश्नासंबंधी निर्णय देणे, महासभा समितीला कायदेशीर सल्ला देणे, विधिनियमांचा अर्थ लावणे होय.

**५) इतर समित्या :**

आंतरराष्ट्रीय कामगार समिती, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात कार्य करणार्या संघटना, वाहतूक संघटना, बौद्धिक क्षेत्रातील समिती, मादक पदार्थ व्यापाराबाबत समिती, स्रिया, मुले, व्यापाराबाबतची समिती इ. समित्या कार्ये करीत.

आपली प्रगती तपासा :

१) राष्ट्रसंघाच्या संघटनांची माहिती द्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.३ राष्ट्रसंघाचे कार्य

राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० झाल्यानंतर राष्ट्रसंघाने सामाजिक, राजकीय, अराजकीय कार्य करुन जगात शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जे राष्ट्राराष्ट्रामधील वाद होते ते सोडवण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंघावर इंग्लंड, फ्रान्स यांचे अप्रत्यक्ष वर्चस्व होते. राष्ट्रसंघाने जे कार्य केले त्याचे राजकीय व अराजकीय कार्य असे दोन गट निर्माण केले आहे. राष्ट्रसंघाने कार्य करुनही आपले ध्येय साध्य करण्यास अपयशी ठरले. कारण युरोपच्या राजकारणात जर्मनीमध्ये हिटलर, इटालीत मुसोलिनी, स्पेन, जपान इ. देशांत हुकूमशाही राजवटीचा उदय झाला. त्यामुळे राष्ट्रसंघाला अपयश आले. राष्ट्रसंघाजवळ स्वत:चे लष्करी सामर्थ्य नसल्याने हुकूमशहावर नियंत्रण ते ठेवू शकले नाही, परिणामी अपयश आले.



munotes.in

**अ) अराजकीय कार्य :**

**१) आर्थिक क्षेत्रातील कार्य:**

युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदतीसाठी आर्थिक व वित्तसंघटना स्थापन केली. राष्ट्रसंघाला आर्थिक सल्ला, कर्ज देणे व्यापार, चलन यात स्थैर्य प्राप्त करणे, व्यापारांचे प्रश्न लवादामार्फत सोडवणे.

**२) निर्वासितांच्या प्रश्नांची सोडवणूक :**

पहिले महायुद्ध व रशियन क्रांतीमुळे युरोपातील लक्षावधी लोकांचे जीवन उद्धवस्त झाले होते. त्यांच्या अनेक समस्या होत्या. १९२१ मध्ये डॉ. फाइनजेफ नॉनसेनच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली. ४० लक्ष लोकांना आधार, १० लक्ष लोकांचे पुनर्वसन केले. हिटलरच्या हकालपट्टीमुळे ज्यूंचा भरणा पडला. त्यामुळे हे काम अशक्य झाले.

**३) वाहतूक आणि दळणवळण :**

राष्ट्रसंघाच्या सनदेतील कलम २३ मध्ये वाहतूक आणि दळणवळणाचे स्वातंत्र्य व सुरक्षा आणि राष्ट्रसंघाच्या सभासद राष्ट्रांना व्यापारात सन्मानाने वागविणे असा उल्लेख होता. जर्मनीच्या पाणबुड्यांचे स्वातंत्र्य धोक्यात आले. आंतरराष्ट्रीय जलमार्गावरील वाहतुकीचे नियम, रेल्वेमार्गाच्या सवलती इ. अनेक प्रश्न सोडवणे.

**४) सामाजिक कार्य :**

राष्ट्रसंघाचे सामाजिक कार्य अत्यंत महत्त्वाचे कार्य होय. युद्धामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले होते. त्यासाठी संघटना स्थापन करुन रोगनियंत्रण कार्यक्रम राबवले. राष्ट्रसंघाच्या कलम २३ नुसार स्त्रिया, मुले यांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. महासभेने १९२१ मध्ये ठराव करुन विवाहाचे वय वाढवले. परदेशात जाणाऱ्या स्त्रिया, मुले यांना संरक्षण दिले. गुलामगिरी, वेठबिगारी अत्यंत वाईट प्रथा होती. युद्धानंतर गुलामांच्या व्यापारास बंदी घातली. १९३२ मध्ये राष्ट्रसंघाने स्थायी गुलामगिरी आयोगाची स्थापना केली. अफू व अफूपासून मार्फिया, हेरॉईन, कोकिन इ. मादक पदार्थांची बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या खूप हानी होते. त्याच्याविरुद्ध प्रसार व प्रचार करण्यासाठी १९२० ला समिती स्थापन केली. मादक पदार्थांचे सेवन औषधापुरतेच मर्यादित ठेवले.

**५) जागतिक शांततेबाबतचे कार्य :**

आंतरराष्ट्रीय संघर्ष शांतता मार्गाने मिटवून जगात कायमची शांतता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. कोणताही वादविवाद लवादाकडे द्यावा. निकाल लागेपर्यंत तीन महिने युद्ध करु नये. सभासद राष्ट्रांना प्रादेशिक अखंडत्वाची व राजकीय स्वातंत्र्याची हमी दिली होती. प्रथम व्यापारी व आर्थिक निर्बंध लादणे, नंतर लष्करी कारवाई करणे अशी तरतूद होती.

**ब) राजकीय कार्य :**

**१) राष्ट्रसंघाच्या ताब्यातील प्रदेशाची व्यवस्था :**

डॅझिंग बंदर मुक्त शहर म्हणून घोषित केले. त्याच्या परिसरातील ७०० चौ.मी. प्रदेश जर्मनीपासून तोडून घेतला. या प्रदेशाची व शहराची व्यवस्था राष्ट्रसंघाकडे दिली. जर्मनीचा सारा प्रांत १५ वर्षासाठी फ्रान्सला दिला. स्वतंत्र पोलंड निर्मितीला मान्यता दिली.

**२) आज्ञांकित प्रदेश (मॅंडेट पद्धत) :**

सर्व पराभूत राष्ट्रांच्या वसाहती राष्ट्रसंघाने ताब्यात घेऊन त्या प्रदेशाचे ३ विभाग केले. पहिल्या वर्गात - इराक, सीरिया, लेबनान, पॅलेस्टाईन, ट्रान्सजॉर्डन, दुसरा विभाग - ६ वसाहती तर तिसर्या विभागात नैऋत्य आफ्रिकेतील काही प्रदेश, पॅसिफिक महासागरातील बेटे यांचा समावेश होता. यांची सर्व व्यवस्था राष्ट्रसंघाकडे पण प्रत्यक्ष कारभार इंग्लंड, फ्रान्स, जपान, इटली इ. राष्ट्रांकडे होता.

**३) अल्पसंख्याकांचे संरक्षण :**

विल्सनच्या १४ कलमी योजनेत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा अंतर्भाव केल्याने देशाची राज्यप्रणाली ठरविण्याचा अधिकार जनतेला दिला होता. त्यामुळे अनेक राष्ट्रे उदयास आली. त्यामध्ये निरनिराळ्या धर्माचे, वंशाचे लोक एकत्र आले. त्यातून अल्पसंख्याकांना त्यांच्या देशात राजकीय हक्क प्राप्त झाले. वांशिक, धार्मिक, भाषिकदृष्ट्या त्यांच्यावर अन्याय होऊ नये ही दक्षता घेतली. यासाठी ३ सदस्यांच्या उपसमित्या स्थापन केल्या. तक्रार सोडवण्याचा प्रयत्न केला.

**४) शस्त्रकपात :**

महायुद्धापूर्वी फ्रान्स, रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया यांच्याजवळ ३५ लाख सैन्य होते. कोट्यवधी रुपये यासाठी खर्च करत होते. त्यामुळे मानवी इतर प्रगत कमी झाली. केवळ शस्त्रसज्ज राष्ट्र बनले होते. यामध्ये कपात करण्यासाठी जानेवारी १९२० मध्ये शस्त्रकपात योजनेसाठी स्थायी सल्लागार आयोगाची स्थापना केली. इ.स. १९२२ मध्ये परिषद होऊन प्रमुख राष्ट्रांत आरमारी प्रमाण ठरवले. इ.स. १९२४ मध्ये समन्वय आयोगाची स्थापना केली. इ.स. १९३० ला लंडन येथे नाविक संमेलन झाले. शस्त्रकपात संदर्भात इ.स. १९३२ मध्ये सनद तयार केली. यावेळी ६१ देशांचे २३० प्रतिनिधी हजर होते.

**५) आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न :**

१) युपेन-मेल्मेडी यावरुन जर्मनी आणि बेल्जियम यांच्यात वाद सुरु झाला. इ.स. १९२० मध्ये संघाने हा प्रदेश बेल्जियमला कायमचा दिला.
२) इनझाईक बंदरावरुन इ.स. १९२० मध्ये रशिया आणि पर्शिया यांच्यात वाद झाला. वाटाघाटीने मिटवला.
३) आलँड बेटावरुन इ.स. १९२० मध्ये फिनलंड-स्वीडन यांच्यातील वाद वाटाघाटीने मिटवला.
४) सिव्हियर्स तहाती कलमांमुळे आर्मेनिया-तुर्कस्थान वाद सुरु झाला. इ.स. १९२० मध्ये मिटवला.

५) मोरोक्को-ट्युनिस वसाहतींवरुन इंग्लंड-फ्रान्स वाद इंग्लंडच्या बाजूने इ.स. १९२१ मध्ये मिटवला.

६) ग्रीस-इटली यांच्यात कोर्फ्यूमध्ये संघर्ष झाला. वाद दंड दाखल ग्रीसने देऊन मिटवला.

७) व्हिलना शहरावरुन पोलिश-लियुनिया यांच्यातील वाद पोलंडकडे अधिकार देऊन मिटवला.

**आपली प्रगती तपासा :**

१) राष्ट्रसंघाचे कार्य सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १२.४ राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे

**राष्ट्रसंघाच्या अपयशाला प्रारंभ :**

चीनमध्ये वसाहती प्राप्तीसाठी जपानने चीनच्या माँचुरियावर इ.स. १९३१-३२ मध्ये आक्रमण केले. राष्ट्रसंघाने निषेध केला. जपानने इ.स. १९३३ मध्ये राष्ट्रसंघाचा त्याग केला व तो बाहेर पडला. इ.स. १९३५ मध्ये इटलीने इथिओपियावर आक्रमण केले. आर्थिक बहिष्कार टाकल्याने इटली संघाबाहेर पडला. त्याचप्रमाणे रशियाने फिनलंडविरुद्ध युद्ध सुरु केले. इ.स. १९३६-३९ काळात स्पॅनिश यादवी युद्ध झाले. हिटलरचे पोलंडवर १ सप्टेंबर १९३९ रोजी आक्रमण आणि दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला. त्यामुळे जागतिक शांतता राखण्यात अपयश आले.

**राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे :**

**१) राष्ट्रसंघात जनतेचे प्रतिनिधित्व नव्हते :**

निरनिराळ्या देशांतील सरकारचे प्रतिनिधी म्हणजे पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री, राजे, हुकूमशहा इ. राष्ट्रसंघात प्रतिनिधी होते. त्यांना सरकारचा पाठिंबा होता. जनतेचा नव्हता त्यामुळे त्यांची भूमिका सरकारची असे.

**२) राष्ट्रसंघाने लहान राज्यांचा विश्वास गमावला होता :**

आपल्यावर जर इतर राष्ट्रांनी आक्रमण केल्यास ते आक्रमण राष्ट्रसंघ नष्ट करेल हा विश्वास प्रारंभी होता; परंतु सामूहिक प्रतिकार तत्त्व कोसळले. जपान, इटली, रशिया इ. च्या आक्रमक भूमिकेपुढे संघ दुबळा ठरला. त्यामुळे राष्ट्रसंघावरचा विश्वास नष्ट झाला.

**३) हुकूमशहाचा युरोपमध्ये उदय :**

जर्मनी, इटली, जपान इ. देशात हुकूमशाही राजवट उदयाला आली. त्यांनी देशासाठी नवीन प्रदेश मिळवण्याचा सतत प्रयत्न केला. राष्ट्रसंघाने त्यावर उपाययोजना केल्या तर त्यांनी संघाच्या सभासदपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे संघ दुबळा बनला.

**४) आर्थिक नाकेबंदीचे शस्त्र संघाने योग्य रीतीने वापरले नाही :**

राष्ट्रसंघातील एखाद्या राष्ट्रावर आक्रमण केल्यास उपाययोजना म्हणून आक्रमण करणार्या राष्ट्रावर आर्थिक नाकेबंदी केली जात असे. पण हा उपाय योग्य रीतीने राबवला नाही. इटलीविरुद्ध आर्थिक बंदी धोरण अर्धवट राबवले.

**५) प्रमुख राज्ये आपल्या सार्वभौमत्वाचा त्याग करण्यास नाखूश :**

युद्धाच्या भयानकतेमुळे प्रमुख राष्ट्रे सर्व प्रकारचे सहकार्य करतील. जागतिक शांतता टिकवण्यासाठी प्रसंगी स्वत:च्या सार्वभौमत्वाकडे दुर्लक्ष करुन संघाचे निर्णय स्वीकारतील असे राष्ट्रसंघाला वाटत होते; परंतु प्रत्यक्ष असे घडले नाही. त्यामुळे अपयश आले.

**६) राष्ट्रसंघाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले नाही :**

जगातील सर्व राष्ट्रे राष्ट्रसंघाने सभासद झाले असते तर कदाचित यश मिळाले असते. रशिया, जर्मनी प्रारंभी नव्हती, अमेरिका नंतर संघात नव्हती. फक्त इंग्लंड-फ्रान्सचे वर्चस्व संघावर होते. त्यांनी स्वार्थ साधला, परिणामी इतरांचा विश्वास नष्ट झाला.

**७) राष्ट्रसंघाशी स्वत:ची यंत्रणा नव्हती :**

आंतरराष्ट्रीय निरनिराळे करार घडवून आणले; परंतु कराराचा भंग करणार्या राष्ट्रांवर कारवाई करणारी स्वत:ची यंत्रणा राष्ट्रसंघाजवळ नव्हती. त्यामुळे प्रभावी उपाययोजना झाली नाही.

**८) दोन परस्पर-विरोधी विचारप्रणालीचे अपत्य म्हणजे राष्ट्रसंघ :**

राष्ट्रसंघाच्या निर्मिती संदर्भात दोन विचारप्रवाह होते. राष्ट्रसंघाने संघटित स्वरूपाने वेळोवेळी कारवाई करुन आपल्याजवळ स्वत:चे सैन्य बाळगून शांतता टिकवावी हे विचार फ्रान्सचे, तर राष्ट्रसंघाने युरोपीय युतीप्रमाणे शांतता प्रस्थापनेचे कार्य करावे असे विचार इंग्लंडचे होते. त्यामुळे ही रस्सीखेच नेहमीच चालू होती.

**९) संपूर्ण जग एक व एकमेकांशी सहकार्य यावर संघाचे यश अवलंबून होते :**

जगातील राष्ट्रवाद हळूहळू कमी होऊन सारे जग एक होईल, एकमेकांशी सहकार्य करतील, अशी कल्पना संघाची होती आणि त्यावर यश अवलंबून होते. तसेच सर्व प्रश्न, वाद-चर्चा करुन सुटतील; परंतु ही कल्पना प्रत्यक्षात खोटी ठरली. त्यामुळे अपयश आले.

**१०) जागतिक शांततेचे अशक्य काम राष्ट्रसंघाकडे :**

पहिल्या महायुद्धानंतर युरोपात 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवणे हे काम अशक्य होते. कारण व्हर्सायचा तह हा अन्यायकारक व अपमानकारक होता. त्याचा बदला घेण्यास जर्मनी तयार झाली त्यामुळे अपयश आले.



munotes.in

**११) राष्ट्रसंघाची कल्पना लोकांच्या मनावर खोलवर रूजली नाही :**

पहिले महायुद्ध सुरु असताना राष्ट्रसंघाच्या कल्पनेचे लोकांनी स्वागत केले. परंतु नंतरच्या काळात ही कल्पना लोकांच्या मनात खोलवर रूजली नाही. त्यामुळे अपयश आले.

**१२) इंग्लंड-फ्रान्सच्या साम्राज्यवादी धोरणात बदल नाही :**

इंग्लंड-फ्रान्स राष्ट्रसंघात सामील झाले; परंतु संघाचे तत्त्व पाळले नाही. संघाचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी केला. जर्मनी व तिच्या मित्रराष्ट्राचे साम्रज्य नष्ट केले आणि त्याच्या जागी आपला साम्रज्यवाद निर्माण केला. त्यामुळे अपयश आले.

**१३) राष्ट्रसंघाच्या सनदेतील मूलभूत दोष :**

राष्ट्रसंघाची घटना ही व्हर्साय तहात अंतर्भूत करण्यात आली होती. अमेरिकेने राष्ट्रसंघात सामील होण्याचे नाकारले. संघाची निर्णय घेण्याची पद्धत चुकीची होती. तसेच स्वत:जवळ स्वत:चे सैन्य नव्हते. त्यामुळे अपयश आले.

**आपली प्रगती तपासा :**

१) राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १२.५ सारांश

राष्ट्रसंघाची स्थापना करतांना अमेरिकेचे अध्यक्ष विल्सनसारख्या ध्येयवादी व्यक्तिचा फार अपेक्षा होत्या. पण या सर्व अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. एवढेच नव्हे तर राष्ट्रसंघाला आलेले अपयश ही मानवी इतिहासातील फार मोठी शोकांतिका ठरली.

अनेक आंतरराष्ट्रीय राष्ट्रसंघाने शांततेच्या मार्गाने मिटवून शांतता प्रस्थापित केली हे मान्य केले पाहिजे. पण काही प्रकरणात बड्या राष्ट्रांच्या हितसंबंधांमुळे राष्ट्रसंघ काही करू शकला नाही. परंतु सामाजिक आर्थिक आणि मानवतावादी कार्यात राष्ट्रसंघाने प्रशंसनीय कार्य केले.

बौद्धिक सहकार्यामुळे ज्ञानाची प्रगती घेण्यास आणि शांतता निर्माण होण्यास मदत झाली. राष्ट्रसंघाच्या निर्मितीमुळे आंतरराष्ट्रीय भावना निर्माण होण्यास मदत झाली. त्याचबरोबर राष्ट्रसंघाने केलेले विधायक कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय

munotes.in

शांतता आणि सहकार्य निर्माण करण्यात राष्ट्रसंघाने पार्श्वभूमी तयार केली. त्या पार्श्वभूमीवरून संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली.

## १२.६ प्रश्न

१) राष्ट्रसंघाच्या संघटनांची माहिती द्या.
२) राष्ट्रसंघाचे कार्य सांगा.
३) राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे सांगा.

**संदर्भ**


१९) आवटे, लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.
२०) गाडगीळ, पां.वा.रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१.
२१) डॉ. आठल्ये, विभा, आधुनिक जगाचा इतिहास, नागपूर, २०१०.
२२) प्रा. दीक्षित, नी.सी.पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.
२३) डॉ.सौ. वैद्य, सुमन आधुनिक जग, नागपूर, २००२.
२४) डॉ. काले, म.वा.आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०२१.
२५) प्रा. जोशी, पी.जी., अर्वाचीन यूरोप, नांदेड, २००८.
२६) Brower, D.R.Ed. Russian Revolution : Disorder or New Order, London, 1979.
२७) Carr. E.H.The Bolshevik Revolution, 3 Vols., London, 1961-64.
२८) Deutscher, Isaac, The The Unifinished Revolution : Russia – 1917-67. London, 1967.
२९) Fitzpatrik, David, The Russian Revolution, 1917-32, New York, 1984.
३०) Footman, David, The Russian Revolution, London, 1962.
३१) Moorehead, Alan, The Russian Revolition, London, 1967.
३२) Roy, M.N. The Russian Revolution, Culcutta, 1967.
३३) Trotsky, Lean, History of the Russian Revoluttion, 3 Vols, London, 1934.
३४) Wolfe. B.D. An ideology in power : Reflections on the Russian Revolution. London, 1969.
३५) Black, C.E. Rewriting Russian History (1962).
३६) Ellison, H.J.History of Russia (1964).


❖❖❖❖